म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. १३३

REFBK-0005211
REFBK-0005211


म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

ची प्रवासवृत्त-माला

सं. ग्रं. नं.
ठाणें.

प ७ वें

# माझी विलायतची यात्रा.



विलायतचें पार्लमेंट-गृह व वेस्ट मिन्स्टर पूल

गो. चि. भाटे

मराठी ग्रंथ संग्रहालय,
स्थळ प्रत
सं. नं.
ता.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे.

प्रि. भाटे यांची प्रवासवृत्त--माला

पुष्प सातवें

# माझी विलायतची यात्रा.

५२७७

लेखक व प्रकाशक

गोविंद चिमणाजी भाटे

डे. ए. सोसायटी पुणें हिचे सेवानिवृत्त नहाद्याता सभासद

REFBK-0005211

REFBK-0005211

( सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत १॥ रुपाया

मुद्रक :

रा. रा. **अनंत विनायक पटवर्धन**, बी. ए.,

आर्यभूषण प्रेस, भांबुर्डा पेठ, घर नं. १३६।३

पुणें, नं. ४

* * * *

* * * *

प्रकाशक :

**गोविंद चिमणाजी भाटे,**

महाड, जिल्हा कुलाबा.



हिज हायनेस सर चिंतामणराव आप्पासाहेब, के. सी. आय. ई.,
राजेसाहेब, सांगली.

हिज हायनेस श्रीमंत सर चिंतामणराव

आप्पासाहेब पटवर्धन, के. सी. आय. ई.

# राजेसाहेब संस्थान सांगली

यांना

आपल्या विलायतच्या सफरींचें सदास्मरण

देणारें विलायतच्या यात्रेचें हें वर्णनात्मक

पुस्तक त्यांच्या शीतल कृपाछत्राखालीं

घालविलेल्या एका तपाच्या आयु-

ष्याचें आनंददायी चिंतन करणाऱ्या

लेखकानें सादर व सप्रेम

# अर्पण

केलें आहे.

गो. चि. भाटे.

# प्रस्तावना.

मी विलायतेस केव्हां व कशाकरितां गेलों व माझ्या प्रवासाचें वर्णन क्रमशः कसें लिहिलें गेलें यासंबंधीं सविस्तर विवेचन या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणांत आलेंच आहे. तेव्हां त्याचा येथें पुनरुच्चार करण्याचें कारण नाहीं. पण त्यावेळची गुपित गोष्ट इतक्या काळानंतर उघड करून सांगण्यास हरकत नाहीं. माझ्या विलायतच्या यात्रेचे आश्रयदाते म्हणजे श्रीमंत नारायणराव बाबासाहेब इचलकरंजी संस्थानचे अधिपति हे होत. त्यांनीं मला विलायतच्या प्रवासास व निवासास मिळून सव्वा दोनशें पौंड दिलें. तेव्हां माझ्या प्रवासवृत्त-मालेचें अर्धे अधिक श्रेय त्यानांच आहे. क्रमशः माझ्या प्रवासाचे लेख प्रसिद्ध होत असतांना व विलायतेंतील माझे अनुभव संभाषणांत व भाषणांत निवेदन करीत असतांना ग्रंथरूपानें एकत्र माझे प्रवास कां छापीत नाहीं असें पुष्कळ लोक विचारीत असत. पण माझ्या जास्त निकडीच्या व्यवसायामुळें व पैशाच्या अडचणीमुळें आतांपर्यंत प्रवासवृत्तांत स्वतंत्र ग्रंथरूपानें छापण्याचा योग आला नाहीं. पण मी सेवानिवृत्त झाल्यापासून सवड मिळाली व श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब राजेसाहेब सांगली यांचेकडून ग्रंथछपाईकरितां मदत मिळाली म्हणून हें पुस्तक प्रसिद्ध करतां आलें.

मी विलायतेंत सन १९२९ मध्यें गेलों व देशीं परत सन १९३० मध्यें आलों. या पुस्तकांत दिलेली माहिती त्या काळांतील आहे. हल्लीं जगांत काय किंवा निरनिराळ्या देशांत काय सारखे फेरबदल होत चालले आहेत, उ. मी गेलों त्यावेळीं मुंबई तें लंडनचें जाण्यायेण्याचें भाडें चारशें रुपयांचेवर होतें; पण हल्लीं तें त्याच्या निम्मेवर आलें आहे. पण माझें पुस्तक ताजी आंकडेवजा व नांवनिशीवजा माहिती देणारें व तटस्थपणें व तिऱ्हाइतपणें लिहिलेलें मार्गदर्शक पुस्तक नव्हे तर तें स्वानुभवाच्या पायावर ऐतिहासिक व वाङ्मयीन दृष्टीनें लिहिलेलें प्रवासपर पुस्तक असल्यामुळें मीं दिलेल्या माहिती-मध्यें किंवा प्रदर्शित केलेल्या मतामध्यें मुळींच फिरवाफिरव केली नाहीं. लिहि-लेली माहिती व व्यक्त केलेले विचार हे सन १९२९ ते १९३० मधले आहेत

येवढें वाचकांनीं ध्यानांत ठेविलें म्हणजे झालें. क्रमशः लिहिलेल्या लेखांतील हस्त-दोष व '**छपाईचीं भुतें**' मात्र होतां होईल तितकीं काढून टाकिलीं आहेत.

गणेश चतुर्थीपासून विजयादशमीच्या अल्पावकाशांत आडीचशें पानांच्या-पेक्षां मोठें सचित्र पुस्तक प्रसिद्ध करण्यास पुष्कळांची मदत झाली म्हणून हें काम माझ्या हातून तडीस गेलें. माझे मित्र प्रो. आर. पी. शिंत्रे यांनीं माझ्या पुण्यांतील गैरहजेरींत पुस्तकाच्या बहुतेक प्रकरणांचीं प्रुफें तपासलीं याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. तसेंच प्रो. आर. एस. जोग यांनीं सूचि घालण्याची सूचना केल्याबद्दल व तदनुरूप दोन्हीं पुस्तकांच्या सूची फार थोड्या वेळांत व फार व्यवस्थितपणें करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. शेवटीं आर्यभूषण छापखान्यांतील मंडळींचे पुस्तक वेळेवर व ठरल्या तिथीस तयार करून दिल्याबद्दल आभार मानणें रास्त आहे.

महाड, जिल्हा कुलाबा,<br>
ता. १७ आक्टोबर १९३४<br>
विजयादशमी.

**गो. चि. भाटे**

# विषयांची अनुक्रमणिका


| प्रकरण. | नांव. | पानें. |
|---|---|---|
| १ | विलायतच्या यात्रेचा योगायोग व तिची तयारी ... | १–१२ |
| २ | लंडनपर्यंतचा जलस्थल प्रवास ... ... ... | १३–४० |
| ३ | लंडननिवासाचा पहिला दशवडा ... ... | ४१–५७ |
| ४ | विराट-शरीरी लंडन शहर व त्याच्या शिरा व फुप्फुसें ... | ५८–७२ |
| ५ | लंडनकरांची रहाणी व चालरीत... ... .. | ७३–९२ |
| ६ | लंडनकरांचे सार्वजनिक सण, सुट्या व समारंभ ... | ९३–१०७ |
| ७ | दक्षिण लंडनचीं प्रेक्षणीय स्थळें... ... ... | १०८–१२७ |
| ८ | उत्तर लंडनमधील प्रेक्षणीय स्थळें ... ... | १२८–१३८ |
| ९ | मध्य लंडनमधील प्रेक्षणयि स्थळें ... ... | १३९–१६४ |
| १० | टेम्स नदी व तिच्यावरील प्रेक्षणीय स्थळें ... ... | १६५ १७७ |
| ११ | ऑक्सफर्ड ... ... ... ... | १७८–१९२ |
| १२ | केंब्रिज ... ... ... ... | १९३–२०८ |
| १३ | स्कॉटलंडची राजधानी एडिंबरा... ... ... | २०९–२२९ |
| १४ | विलायतचें हवापाणी, ऋतुमान व सृष्टिचमत्कार ... | २३०–२४१ |
| १५ | माझा लंडननिवासाचा अखेरचा आठवडा ... | २४२–२५८ |

# चित्रांची अनुक्रमणिका.


नं. नांव पान


श्रीमंत राजेसाहेब, सांगली प्रारंभीं
विलायतचा नकाशा ... ... १
प्रवासमार्गांचा नकाशा ... १२
१ पांपेशहरः बासिलिका (देवालय) ३८
२ ,, : कबरस्थान व त्याचा रस्ता ३९
३ लंडन : टल्सहिल ट्रिनिटी राईझ नं. ६६चें घर (आमचें निवासस्थान) ४६
४ भुयारी रेल्वे ... ... ४७
५ लंडन रिचमंड टेकडीच्या बाजूची बाग ... ... ११६
६ रिचमंड उपवनांतील हरणें ११७
७ कॉलेज रस्त्यावरील जकातनाकें ... ... १२४
८ डलीच बागेचें प्रवेशद्वार ... १२५
९ टॉवरब्रिज व टेम्सनदी ... १४४
१० सेंटपॉल प्रार्थनामंदिर ... १४५
११ ट्राफलगार स्क्वेअर, नेलसन पुतळा ... ... १५२
१२ व्हाईट-हॉल राजवाड्यापुढील घोडेस्वार, आडमिराल्टी आर्च (कमानी), महायुद्धाचा स्मारक-स्तंभ, लंडनटॉवरमधील शुभ्र वाडा, रॉयल एक्सचेंज ... १५३
१३ रोमन कॅथॉलिक प्रार्थनामंदिर १५८
१४ पार्लमेंट गृह १ हाऊस ऑफ लॉर्डस् गृह, २ हाऊस ऑफ कॉमन्सगृह, ३ सेंट स्टीफन्सहॉल १५९

नं. नांव पान

१५ पार्लमेंट गृह जुना वेस्टमिन्स्टर हॉल ... .. १६२
१६ ,, ,, सेंट स्टीफन्स तळघर १६३
१७ व्हिक्टोरिया एंबँकमेंट ... १६७
१८ ,, , क्लिओपाट्रा स्तंभ १६८.
१९ हँपटनकोर्ट राजवाडा द्राक्षवेल १७५
२० ,, मेरीराणीचा वृक्षमंडप १७६
२१ ऑक्सफर्ड : बॉडलियन पुस्तकालय ... ... १८१
२२ रॅटक्लिफ कॅमेरा (वाचनगृह) १८२
२३ कॅरफॅक्स बुरुज, व चौक १८९
२४ सेंट मेरीचें प्रार्थनामंदिर ... १९०
२५ मॅगडेलेन कॉलेज ... १९१
२६ क्राईस्टचर्च कॉलेज .. १९२
२७ केंब्रिज : किंग्स कॉलेजचें प्रार्थनामंदिर ... ... १९८
२८ ट्रिनिटी कॉलेजचा पूल ... १९९
२९ एडिंबरा : प्रिन्सेस स्ट्रीट ( राजरस्ता ) ... २२४
३० सर वाल्टरस्कॉटचा स्मारक-मनोरा ... ... २२५
३१ काल्टन टेकडी व नेलसन स्तंभ ... ... २२६
३२ मौंड व राष्ट्रीय चित्रालय २२७
३३ फोर्थ खाडीवरील लोखंडी पूल २२८
३४ ॲबट्सफर्ड : सर वाल्टर-स्कॉटचा वाडा ... २२९

# चित्रांची अनुक्रमणिका.


| नं. | नांव | पान |
|---|---|---|
| | श्रीमंत राजेसाहेब, सांगली | प्रारंभीं |
| | विलायतचा नकाशा ... ... | १ |
| | प्रवासमार्गांचा नकाशा ... | १२ |
| १ | पांपेशहरः बासिलिका (देवालय) | ३८ |
| २ | ,, : कबरस्थान व त्याचा रस्ता | ३९ |
| ३ | लंडन : टल्सहिल ट्रिनिटी राईझ नं. ६६ चें घर (आमचें निवासस्थान) | ४६ |
| ४ | भुयारी रेल्वे ... ... | ४७ |
| ५ | लंडन रिचमंड टेकडीच्या बाजूची बाग ... ... | ११६ |
| ६ | रिचमंड उपवनांतील हरणें | ११७ |
| ७ | कॉलेज रस्त्यावरील जकातनाकें ... ... | १२४ |
| ८ | डलीच बागेचें प्रवेशद्वार ... | १२५ |
| ९ | टॉवरब्रिज व टेम्सनदी ... | १४४ |
| १० | सेंटपॉल प्रार्थनामंदिर ... | १४५ |
| ११ | ट्राफलगार स्क्केअर, नेलसन पुतळा ... ... | १५२ |
| १२ | व्हाईट-हॉल राजवाड्यापुढील घोडेस्वार, आडमिराल्टी आर्च (कमानी), महायुद्धाचा स्मारक-स्तंभ, लंडनटॉवरमधील शुभ्र वाडा, रॉयल एक्सचेंज ... | १५३ |
| १३ | रोमन कॅथॉलिक प्रार्थनामंदिर | १५८ |
| १४ | पार्लमेंट गृह १ हाऊस ऑफ लॉर्डस् गृह, २ हाऊस ऑफ कॉमन्सगृह, ३ सेंट स्टीफन्सहॉल | १५९ |
| १५ | पार्लमेंट गृह जुना वेस्टमिन्स्टर हॉल ... .. | १६२ |
| १६ | ,, ,, सेंट स्टीफन्स तळघर | १६३ |
| १७ | व्हिक्टोरिया एंबँकमेंट ... | १६७ |
| १८ | ,, , क्लिओपाट्रा स्तंभ | १६८ |
| १९ | हॅंपटनकोर्ट राजवाडा द्राक्षवेल | १७५ |
| २० | ,, मेरीराणीचा वृक्षमंडप | १७६ |
| २१ | ऑक्सफर्ड : बॉडलियन पुस्तकालय ... ... | १८१ |
| २२ | रॅटक्लिफ कॅमेरा (वाचनगृह) | १८२ |
| २३ | कॅरफॅक्स बुरुज, व चौक | १८९ |
| २४ | सेंट मेरीचें प्रार्थनामंदिर ... | १९० |
| २५ | मॅगडेलेन कॉलेज ... | १९१ |
| २६ | काईस्टचर्च कॉलेज .. | १९२ |
| २७ | केंब्रिज : किंग्स कॉलेजचें प्रार्थनामंदिर ... ... | १९८ |
| २८ | ट्रिनिटी कॉलेजचा पूल ... | १९९ |
| २९ | एडिंबरा : प्रिन्सेस स्ट्रीट (राजरस्ता) ... | २२४ |
| ३० | सर वाल्टरस्कॉटचा स्मारक-मनोरा ... ... | २२५ |
| ३१ | काल्टन टेकडी व नेलसन स्तंभ ... ... | २२६ |
| ३२ | मौंड व राष्ट्रीय चित्रालय | २२७ |
| ३३ | फोर्थ खाडीवरील लोखंडी पूल | २२८ |
| ३४ | ॲबट्सफर्ड : सर वाल्टर-स्कॉटचा वाडा ... | २२९ |




BALODYAN PRESS, POO

# माझी विलायतची यात्रा

## प्रकरण १ लें

5211

### विलायतच्या यात्रेचा योगायोग व तिची तयारी

अकल्पित कारणांनीं घडून आलेलें कार्य म्हणजे योगायोग. मनुष्याच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या बाबतींत सुद्धां विलक्षण योगायोग केव्हां केव्हां घडलेले दिसून येतात. मनुष्याला आपल्या धंद्यांत अपूर्व यश मिळून त्याचें नांव सर्वतोमुखीं होतें; त्याला सुशील, सद्वर्तनी व सुग्रण पत्नी मिळून त्याचा संसार सुखासमाधानाचा होतो; त्याला उत्तम मित्रलाभ होऊन त्याचा काळ सत्संगतींत व सद्वर्तनांत जातो; त्याला प्रिय पण अप्राप्य वस्तु सांपडून अत्यंत आनंद होतो; हे सर्व आयुष्यांतील विलक्षण योगायोग होत. असे अनुभव मनुष्याला केव्हां केव्हां येतात व अशा माणसाला नेहमीं भाग्यवान् समजतात. प्राकृत म्हणीप्रमाणें त्याचें दैव फळफळलें आहे असें म्हणतात.

माझीच गोष्ट घ्याना. माझी प्रवासप्रियता सर्वश्रुत आहे. 'मनोरंजना' च्या वाचकांस तर तिचा पूर्ण परिचय आहे. कारण गेल्या वीस वर्षीमध्यें मीं जीं चार प्रवास वर्णनपर पुस्तकें लिहिलीं त्यांचा पहिला आस्वाद क्रमशः 'मनोरंजना' च्या वाचकांसच मिळाला आहे. म्हणून वयोमानानें कदाचित् शेवटची अशी माझी विलायतची महायात्रा हिच्या वर्णनाचा आस्वाद कै. मित्रांच्या आमरण मित्रत्वाला स्मरून 'मनोरंजना' च्या वाचकांस देण्याचें मीं मनाशीं ठरविलें व तदनुरूप हें माझ्या विलायतच्या यात्रेच्या वर्णनाचें प्रास्ताविक प्रकरण मी वाचकांच्या चरणीं

सादर करीत आहें. तें माझ्या पूर्वींच्या प्रयत्नाप्रमाणें माझ्या प्रिय वाचकांस पसंत पडेल अशी मला आशा आहे.

कांहीं काळापूर्वीं आपल्या लोकांना प्रवास करणें मोठें कठीण काम वाटे व परदेशगमन तर निषिद्ध वर्तन वाटे. "हे दहा हजार रुपये घे व तुला वाटेल ती विद्या विलायतेंत किंवा युरोपांत राहून शिकून ये" असें म्हणून पैसे देणाऱ्या बापाला, "विलायतेंत जाऊन मी बाटेन व म्हणून मी जात नाहीं," असें उत्तर देणारे सुशिक्षित हरीचे लाल त्याकाळीं भेटत असत. पण हल्लींच्या काळीं एखादा जुना शास्त्रीसुद्धां संधि मिळाल्यास विलायतेस जातो, तेथें आपल्या कर्तबगारीनें उद्योग मिळवितो व तेथली पत्नी करून तेथें स्थाईक होतो! इतका समाजाच्या समजुतींत इष्ट फरक पडला आहे! मग माझ्यासारख्या माणसाला विलायतचा प्रवास करण्याची हौस असावी, नव्हे 'काशीस जावें नित्य वदावें' या जुन्या म्हणीप्रमाणें मी 'विलायतेस जावें नित्य वदावें' हें पालुपद गुणगुणत असावें यांत नवल नाहीं. विशेषतः मुंबई विश्वविद्यालयांत बी. ए. च्या परीक्षेला मराठी वाङ्मयाचा इतिहास हा विषय नेमिल्यापासून 'अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' लिहावा असें माझ्या मनांत येत असे. सन १८०० पासून छापलेलीं मराठी पुस्तकें इंडिया ऑफिसच्या वाचनालयांत जपून ठेवलेलीं आहेत असें कळल्यापासून तर विलायतेला जाण्याची गोष्ट माझ्या मनांत घोळत असे; नकळत या मनांतल्या गोष्टीचा उच्चार भाषणांत व संभाषणांत होत असला पाहिजे. दोन वर्षांखालीं मला माझ्या तहाहयात सभासदत्वाच्या कामांतून मोकळीक मिळाली. तेव्हांपासून तर हा विचार वारंवार मनांत येई. पण मनांतल्या मांड्यांना मूर्तस्वरूप देणारी 'तण्डुलां'ची तजवीज कशी व्हावी ही अडचण होती. पण ती अडचण दूर होऊन विलायतच्या यात्रेचा योगायोग अचानक व अकल्पित रीतीनें घडून आला तो असाः—सन १९२९ च्या जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत मला माझ्या एका आश्रयदात्या मित्राची 'जरूरीच्या कामाकरितां ताबडतोब येऊन

भेटावें' अशी तार आली. त्याप्रमाणें मी त्यांना जाऊन भेटलों. तेव्हां 'विलायतेंत जाऊन अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाची तेथें मिळणारी माहिती मिळवून एक स्वतंत्र व विस्तृत ग्रंथ लिहिण्याची तुमची तयारी असल्यास पैशाची तजवीज मी करीन' असें त्यांनीं सांगितलें. वरील शब्द कानीं पडल्यावर माझ्या मनाची जी स्थिति झाली आहे तिचें वर्णन करणें कठीण आहे. वाळवंटांत वणवण करणाऱ्या व तहानेनें विव्हल झालेल्या मनुष्यास अकस्मात् निर्मळ पाण्याचा झुळझुळ वहाणारा झरा दिसावा किंवा रानावनांत भटकून भुकेनें पीडलेल्या माणसाला अन्नछत्र किंवा अर्वाचीनकाळचें अन्नपूर्णागृह दृष्टीस पडावें; किंवा अकल्पित तऱ्हेनें दिसेनासें झालेल्या माणसाला नेत्रवैद्य भेटून त्यानें त्याचा नेत्ररोग काढून त्याला दृष्टि द्यावी; म्हणजे या माणसांना जितका आनंद होईल तितका आनंद मला माझ्या आश्रयदात्याच्या शब्दांनीं झाला. आनंदातिशयानें माझें अंतःकरण भरून आलें व मी माझ्या आश्रयदात्याचे मनःपूर्वक आभार मानले. आपण सांगितलेलें काम हरप्रयत्न करून पुरें करीन असें मीं त्यांना आश्वासन दिलें. त्याबरोबर माझे आश्रयदाते म्हणाले "तर आतां उशीर नको; हे घ्या पूर्वतयारीचे व जाण्यायेण्याच्या भाड्याचे पैसे व आजच मुंबईस जाऊन आगबोटीचें तिकीट काढून व पोषाख वगैरेची तजवीज करून मला परत भेटावयास या." झालें. याप्रमाणें ता. २९ जून १९२९ रोजीं एका दिवसांत माझ्या परदेशगमनाचा बेत ठरला व मी लागलाच मुंबईस रवाना झालों.

जाण्यापूर्वीं माझ्या एका जीवलग डॉक्टर मित्रांना (ज्यांना माझी प्रकृति पूर्णपणें ठाऊक होती व ज्यांनीं माझ्या दोनतीन वर्षांपूर्वींच्या दुःसाध्य दुखण्यांत जीवापाड मेहनत केली होती व माझा जीव वांचविला होता) विलायतेंत जाण्यास हरकत नाहींना ? असें पत्रद्वारें विचारलें. त्याचें उत्तर आलें कीं, "आपण बेलाशक विलायतेस जावें तेथें जाण्यानें कांहींएक विकृति न होतां आपली प्रकृति सुधारून आपली

आयुर्मर्यादा वृद्धिंगत होईल." हें उत्तर वाचून तर मला जास्तच आनंद झाला. शिवाय, याच वेळीं मला विलायतेस जाण्यास सांपडत आहे हें पाहून दुधांत साखर पडल्याप्रमाणें माझ्या मनाला द्विगुणित आनंद झाला. कारण आठ दहा महिन्यापूर्वींच माझा धाकटा मुलगा पुढच्या विद्याभ्यासाकरितां विलायतेस गेलेला होता; तेव्हां त्याचा सहवास घडणार होता. या सर्व गोष्टींमुळें मी परक्या देशांत जात आहें असें सुद्धां मला वाटलें नाहीं; तर मी आपल्या मुलालाच जणूं कांहीं भेटण्यास जात आहें असें माझ्या मनाला वाटलें. अशा आनंदित मनानें मी आपल्या विलायतच्या यात्रेच्या तयारीस लागलों.

प्रथमतः मी सर्व जगभर शाखा असलेल्या व परदेशगमनाची सर्व व्यवस्था करणाऱ्या टॉमस कूकच्या कचेरींत जाऊन इटालीयन कंपनी व त्यांची आगबोट याबद्दल चवकशी केली. तेव्हां कळलें कीं "त्या कंपनीची **एशिया** बोट. ता. १७ जुलै रोजीं मुंबई बंदरांतून निघणार आहे. त्या बोटींत जागा आहे; ती बोट **जिनोआ** बंदरास जाते; तेथून आगगाडीनें लंडनपर्यंत गेलें पाहिजे; एका वर्षाचें किंवा दोन वर्षाचें परत येण्याचें जोड तिकीट मिळेल; त्याला शाहांयशी पौंड किंवा सुमारें बाराशें रुपये पडतील." मी लागलीच आपलें नांव व पत्ता सांगितला व १७ जुलैच्या बोटीचें लंडनपर्यंतचें तिकीट पाहिजे म्हणून म्हटलें. म्यानेजरनें मला लागलाच बोटीचा नकाशा दाखविला व मी ब्याण्णव नंबरची जागा मुक्रर केली. "तिकीट ( हें बोटी व निरनिराळ्या देशांतील रेल्वेचीं तिकिटें व इंग्रजी खाडींतील बोटीचें तिकीट अशा पुष्कळ तिकिटांचें पुस्तक असतें ) दोन चार दिवसांत तयार होईल तेव्हां पैसे भरून तिकीट घेऊन जावें; नेहमींची रीत भाड्याच्या चवथाईची भरपाई तावडतोब करण्याची आहे; पण आतां दिवस थोडेच आहेत; तेव्हां तिकीट तयार झाल्यावर पैसे एकदम भरले तरी चालतील" असें म्यानेजर म्हणाले. अर्थात् परत मुंबईस आल्यावर तिकीट घेऊन पैसे देण्याचें कबूल करून मी कचेरींतून बाहेर पडलों.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पासपोर्टकरितां सेक्रेटेरिएट् मधल्या पासपोर्ट ऑफीसरकडे जाऊन पासपोर्टकरितां अर्ज करून तो मिळविणें. त्या पासपोर्टाकरितां ३ रुपये फी लागते व एक लहान आकाराचा फोटो लागतो म्हणून क्राफर्ड मार्केटजवळ एका फोटोग्राफरकडे जाऊन फोटो काढविला. तीन प्रतीला अडीच रुपये पडले. त्या फोटोच्या प्रती दुसऱ्या दिवशीं मिळणार होत्या. त्या प्रती घेऊन पासपोर्ट ऑफिसरास देऊन पासपोर्ट त्यांचेकडून आणून मजकडे पाठविण्यास मी आपल्या मित्रास सांगितलें. याप्रमाणें प्रवासाच्या पूर्वतयारीपैकीं दोन गोष्टी-पासपोर्ट व पॅसेज—या २९ व ३० जून या दोन दिवसांत उरकून घेतल्या.

प्रवासांत व विलायतेंत लागणारे कपडेलत्ते व इतर सामानसुमान या-संबंधानें युरोपांत जाऊन तेथें राहून आलेल्या माझ्या दोघां मित्रांची मीं सल्लामसलत व मदत घेतली. एकाचें म्हणणें पडलें कीं येथें फार थोडे कपडे घ्यावे व अधिक लागणारे कपडे तेथेंच करावे म्हणजे ते जास्त गरम कापडाचे व तेथल्या पद्धतीचे करतां येतात; तर दुसऱ्याचें म्हणणें असें कीं " येथूनच लागणारे कपडे करून घेणें. सोईचें व स्वस्ताईचें पडेल; शिवाय देशी कापड वापरावयास सांपडेल. " मी नेहमीं देशीच कापडाचे कपडे वापरणारा असल्यामुळें मला ही दुसऱ्या मित्राची सल्ला पसंत पडली. म्हणून त्यांना बरोबर घेऊन गिरगांवांतल्याच एका देशी कापडाच्या दुकानांत जाऊन तेथें गरम देशी कापड पसंत केलें. त्याचे दोन सूट त्याच दुकानच्या शिंप्याकडे शिवण्यास दिले." विलायतेस जावयाचें आहे तेव्हां कपडे वेळेवर पाहिजेत; कारण पुरे पंधरा दिवसहि राहिले नाहींत; तिकडले लोक इकडल्या शिलाईला व कापणीला नांवें ठेवणार नाहींत अशा तऱ्हेनें व विशेष काळजीनें कपडे तयार करावे " असें मीं सांगितलें. तेव्हां ते म्हणाले "विलायतेंत जाणारे देशी कापडाचे कपडे करून ने गांवांतच ( फोर्टमध्यें युरोपीयन दुकानदाराकडे न जातां ) देशी दुकानदाराकडून व देशी शिंप्याकडून करून घेणारें तुम्हीच पहिलें

गिऱ्हाईक आम्हाला लाभलां आहांत; तेव्हां आम्हीं अगदीं चालू फॅशन-प्रमाणें व काळजीपूर्वक कपडे शिवून देऊं व वेळेवर तयार करून देऊं." या बोलण्यानें मला थोडें आश्चर्य वाटलें; पण त्याच्या आश्वासनाबद्दल आनंद वाटला. पाटलोण, जाकीट व शॉर्ट कोट अशा तीन तीन कपड्यांचे दोन सूट लोकरीचे करविले; सहा शर्ट व त्याच कापडाच्या मऊ कॉलर्स बारा, आंतल्या तोकड्या विजारी सहा व रात्रीं निजतांना घालावयाचा पायजमा व कुडतें याचे सहा जोड (हे खरोखर चुकीच्या समजुतीच्या घोटाळ्यानें केले गेले. आम्हाला तीनच जोड करावयाचे होते).

इतक्या कपड्यांना लागणारें सुती व लोकरी देशी कापड घेऊन कपड्याचीं मेजमापें देऊन कपडे शिवण्यास दिले. एक नीळसर रंगाची पाटलोण शिल्लक व अडचणीला असावी म्हणून माझ्या मित्रानीं मला सांगितलें. पण त्याला लागणारें कापड तेथें नव्हतें; म्हणून आम्हीं डेक्कन स्टोअर्स व कोऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें जाऊन आलों; तेथेंहि तसलें कापड मिळालें नाहीं; म्हणून विलायती कापड पसंत करून त्याची एक पाटलोण करावयास दिली. याप्रमाणें मुख्य कपड्यांची तयारी झाली. दुसरे दिवशीं दुसऱ्या मित्रांना घेऊन इतर लागणाऱ्या सामानाची आयती खरेदी केली. त्यांत मुख्यतः फेल्ट हॅट व नाईट गाऊन, (सकाळीं खोलींतून बाहेर येतांना व बाहेर जावयाचा पोशाख करीपर्यंत रात्रीचा पायजमा व कुडतें यावर घालावयाचा सैल व साधा असा लांब लोकरीच्या कापडाचा झगा) या आपल्या इकडे कधींहि न लागणाऱ्या व म्हणून आपल्या दुकानांत न मिळणाऱ्या वस्तु माझ्या मित्राच्या सल्ल्यानें युरोपीयन दुकानांतच घेतल्या. बाकी सुती व लोकरीचे मिळून सहा गंजीफ्राक, सुती व लोकरीचे मिळून बारा सॉक्स, लोकरीचे व रेशमी आठ नेकटाय (गळोटच्या), सुती साधे बारा हातरुमाल, सुती सहा लहान मोठे टॉवेल वगैरे कापड सामान मिळालें तितकें देशी, नाहीं तितकें परदेशी खरेदी केलें. नंतर तिसरे दिवशीं गोद्रेज साबण, देशी

तेलाची बाटली, थोडींफार लागणारीं देशी विदेशी औषधें, केस विंचरण्याचे व कपडे साफ करण्याचे ब्रश व इतर चाकुकातऱ्या, सुईदोरा वगैरे नेहमीं लागणाऱ्या वस्तु खरेदी केल्या. याप्रमाणें परदेशच्या प्रवासाची तयारी करण्यास चार दिवस लागले.

माझ्या कपड्यालत्त्याच्या व सामानसुमानाच्या तयारीचें इतक्या बारकाईनें व सविस्तरपणें वर्णन करण्याचें एक कारण, ही माहिती भावी प्रवाशांना मार्गदर्शक व्हावी हें होय. दुसरें कारण अंदाज व अनुभव ( एंजिनीयरिंग खात्याच्या उलट ) या मधला फरक स्पष्टपणें ध्यानांत यावा व माझ्या प्रत्यक्ष अनुभवाचा फायदा प्रवाशांना घेतां यावा हें होय. मात्र असें करतांना मला माझ्या विलायतेंतील वस्तीच्या अनुभवाचा उल्लेख व उपयोग तयारीच्या प्रकरणांत करावा लागत असल्यानें एक प्रकारच्या कालविपर्ययाचा दोष मजवर येणार आहे. पण त्या दोषाकडे दुर्लक्ष करून मला असें सांगावयाचें आहे कीं, विलायतेच्या प्रवासाला व तेथल्या वस्तीला इतका खर्च व इतकें सामान मुळींच लागत नाहीं. उलट प्रवासाचा बराच खर्च उगाच आधीं केल्यासारखा व कांहींसा व्यर्थ व म्हणून उधळपट्टीचा होतो असा माझा अनुभव मला सांगतो. कारण मी हिंदुस्थानाबाहेर एकंदर दहा महिने राहिलों, तरी परत येतांना माझे अर्धे अधिक कपडे व कांहीं सामान जसेंच्या तसें आखबंद परत देशीं आणलें. विलायतेंत चैन करावयास गेलेल्या किंवा मोठमोठे सरदार मुत्सद्दी यांच्याशीं काम असलेल्या गृहस्थाची गोष्ट निराळी. पण जो प्रकृतीकरितां किंवा अभ्यासाकरितां किंवा मध्यमवर्गीतील लोकांमध्यें राहून काम करण्याकरितां विलायतेस जातो व तेथें राहतो त्याला हिंदुस्थानांत विलायती पोशाख करणाऱ्या माणसापेक्षां फारच कमी कपडे लागतात. आधीं वरचा सूट, पाटलोण, वेस्टकोट ( मराठींत ज्याला जाकीट म्हणतात ) व जाकीट ( मराठींत ज्याला शॉर्टकोट म्हणतात ) सहा सहा महिने बदलावा लागत नाहीं. सामान्यतः जास्त थंडीच्या सहा महिन्यांत जाडजुड व जास्त गरम असा कापडाचा सूट वापरतात व कमी थंडीच्या

सहामाहींत कमी जाड व कमी गरम सूट वापरतात. असे दोन सूट दोन अडीच वर्षे सहज पुरतात. कारण सर्व कपडे आधीं घरीं रात्रीं काढून ते खुंटीच्या दारबंद कपाटांत ठेवतात. यामुळें त्यावर धुरळा बसत नाहीं. सकाळीं घालतांना प्रत्येक मनुष्य या कपड्यावरून स्वतः ब्रश फिरवितो. शिवाय या कपड्यांचा कार्तडीशीं संबंध येत नाहीं. यामुळें हे कपडे मळत नाहींत किंवा त्यांची घडी मिघडत नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें दोन सूट व एक फालतु फ्लॅनेलची पाटलोण मी बरोबर नेली होती. थंडीकरितां नवंबरमध्यें मी एक जाड गरम लोकरीच्या कापडाचें पोटावर दुहेरी पदर येणारें डबल ब्रेस्टचें जाकिट—आपल्या भाषेंत शॉर्टकोट—३५ शिलींग किंवा एकवीस बावीस रुपयांला घेतला व त्यामुळें वेस्ट कोट न लागतां मला सर्व थंडीभर फ्लॅनेलची पाटलोण व हें जाकिट पुरलें व यामुळें माझा एक सूट मीं बहुतेक कोराच परत आणिला. मला जरी आणखी दीड दोन वर्षें राहावें लागलें असतें तरी अधिक सूटाची जरूरी लागली नसती. इतके वरचे कपडे कमी लागतात.

तेथली थंड हवा, निर्धूळ घरें व निर्मळ रस्ते यामुळें आणि परटाचा नियमितपणा व व्यवस्थितपणा यामुळें कपड्यांची खराबी होत नाहीं; कपडे जास्त टिकतात व कमी लागतात. मात्र तिकडल्या थंड हवेमुळें व नीटनेटक्या व व्यवस्थित रहाणीमुळें व कांहीं कांहीं आरोग्यपोषक संवईमुळें थोडे कपडे जास्त लागतात. पण एकदां वापरण्यास काढलेले कपडे एक आठवडाभर चालतात. विलायतेंत सामान्यतः नियमितपणें प्रार्थनेला जाणारे किंवा आदितवारीं गांवाबाहेर करमणुकीकरितां जाणारे किंवा सिनेमा नाटकाला जाणारे लोक आदितवारीं आंतले कपडे बदलतात. बाकीचे लोक सोमवारीं बदलतात. म्हणून तेथें परीट लोक मंगळवारीं कपडे धुण्यास नेतात व चार दिवसांनीं म्हणजे शनिवारीं आणून देतात.

परटाकडून कपडे परत आले म्हणजे प्रथमतः घरधनीण सर्व कपडे तपासून घेते व कपड्याचें गेलेलें बटन, फाटलेला किंवा उसवलेला भाग

याची दुरुस्ती करते, यामुळें 'वेळीं घातलेला टांका नऊ टांके वांचवितो' या न्यायानें कपडे जास्त दिवस टिकतात व खर्च वांचतो. तसेंच पायमोज्याचा फाटलेला भाग रफू करून काढण्याचें काम घरांतल्या बायका करतात व सहा माणसें असलेल्या घरीं हें काम, निदान बारा पायमोजांना रफू करण्याचें, क्षुल्लक नाहीं. यालं डार्निंग म्हणतात व हें काम लहान मुलीपासून मोठ्या बायकांपर्यंत सर्वांना येतें व नेहमीं करावें लागतें. तें चांगलें करतां यावें म्हणून पायमोज्याच्या आंत लांकडी ठोकळे घालून त्यावर मोज्याचा रफू करावयाचा भाग ठेवतात. असे लहान लाकडी ठोकळे ही वस्तु घरांतल्या आवश्यक वस्तूंपैकीं एक समजली जाते. आपल्या देशांत ज्या देशी लोकांना नेहमीं बूट घालावे लागतात किंवा बूट घालावयाची संवय आहे त्यांना अनुभव असेल कीं पायमोज्याचा व सॉक्सचा किती तरी खर्च येतो. कारण आपल्या इकडे पायमोज्यांना रफू करावयची कल्पना नाहीं व माहितीहि नाहीं. पण या पद्धतीनें पायमोजा दुरुस्त ठेवल्यास दररोज सोळा सतरा ताससुद्धां घालून किती महिने तरी तो एक पायमोजा टिकतो. आपल्या शहरामध्यें नोकरीकरितां पायपिटी करून थकणाऱ्या एखाद्या तरुणानें पायमोजे रफू करण्याचा धंदा करण्याचें मनांत आणलें तरी तो आपलें पोट भरूं शकेल. रफू करण्यापासून पायमोज्यांच्या खर्चांत कितीतरी काटकसर होते हें माझ्या अनुभवावरून वापरणारास कळेल. तेव्हां असलें काम करण्यास एखादा तरुण तयार झाल्यास त्याला हवें तितकें काम मिळेल.

मी आठ महिने लंडनशहरीं काढले; पण एकहि वेळां परीट वेळेवर आला नाहीं किंवा वेळेवर त्यानें कपडे आणिले नाहींत असें झालें नाहीं. उन्हाळा असो, पावसाळा असो, बर्फ पडो, धुकें पडो, दंव पडो, सारांश हवा कशीहि असो व कितीहि बदलो, परिटाकडून अनियमितपणा होत नाहीं. यामुळें आपल्या इकडच्यासारखे परटाच्या अनियमितपणामुळें दोन दोन तीन तीन आठवड्यांचे मळके कपडे सांचत नाहींत व म्हणूनच अधिक

कपडे लागत नाहींत. दर आठवड्याला सामान्यतः अकरा किंवा बारा कपडे परटास द्यावे लागतात; एक शर्ट, रात्रींचा पायजमा व कुडतें, गंजीफ्राक व तोकडी विजार, दोन सॉक्सचे जोड, दोन कॉलरी व दोन हातरुमाल. काटकसरी विद्यार्थी तर रात्रीचा पायजमा व कुडतें फक्त दर पंधरवड्यास एकदां धुवावयास देतात. या कपड्यांना रुपया किंवा सव्वारुपया धुणावळ पडते. अशी तिकडली व्यवस्थित व नियमित राहणी व तऱ्हा असल्यामुळें कपड्यांचे तीन जोड एक अंगांत, एक परटाकडे व एक अडी-अडचणीला पेटींत असले म्हणजे अगदीं पुरें होतें. यामुळें मी सहा शर्ट नेले असतांना मला खरोखरीं दोनच शर्ट पुरले. मात्र मी ते शर्ट क्रमानें घालीत असल्यामुळें माझे सर्व शर्ट साधारण नव्यासारखेच मीं परत आणिले. विलायतेंत पडसें झालें तर मात्र अधिक हातरुमाल लागतात. कारण तेथें बाहेर शिंकावयाची किंवा थुंकावयाची सक्त मनाई आहे. यामुळें पडसें झालें म्हणजे दुररोज एक किंवा दोन सुद्धां हातरुमाल त्या तीन चार दिवसांत लागतात; व हे सर्व हातरुमाल त्या आठवड्यांत परटास द्यावे लागतात. हाच पडशाचा मोठा खर्च. तेथें पडशाला एक साधें औषध घेतात. रात्रीं कढत पाण्यांत लिंबाचा रस घालून तें पाणी निजतांना पितात व त्यानें पडसें बरें होतें असें मीं पाहिलें !

पासपोर्ट, पॅसेज व कपडेलत्ते यांची तजवीज झाल्यावर कपड्यांकरितां व इतर सामानाकरितां कातड्याच्या बॅगा खरेदी केल्या. अर्थात् त्याहि कानपूर व म्हैसूर येथील कातड्याच्या कारखान्यांतील स्वदेशीच घेतल्या; मात्र सामान बॅगांत घालतांना पहिल्यानें घेतलेल्या तीन बॅगा पुरल्या नाहींत. मग आणखी दोन बॅगा शेवटीं निघतां निघतां घ्याव्या लागल्या व माझें सर्व सामान पांच बॅगाभर झालें.

याप्रमाणें चारपांच दिवसांत मुंबईस प्रवासाची सर्व तयारी आटोपून मी आपल्या राहत्या गांवीं आलों व तेथें सर्व आप्तवर्गास व मित्रमंडळीस भेटलों. मला रहावयास फार सवड नव्हती; पण त्यांतल्या त्यांत माझ्या

मित्रांनीं मला पानसुपारी केली व विलायतच्या यात्रेच्या योगायोगाबद्दल माझें अभिनंदन केलें व माझा विलायतचा प्रवास व तेथला निवास सुरक्षित, व सुखाचा व्हावा अशी सदिच्छा प्रदर्शित केली. मी त्यांचा निरोप घेऊन पुण्यास गेलों व तेथल्या नातलगांना व मित्रांना भेटून माझ्या आश्रयदात्या मित्राच्या गांवीं गेलों; तेथें त्यांच्या संभाषणाचा व सहवासाचा आनंद चार दिवस अनुभवून ता. १२ जुलै रोजीं सायंकाळीं मी मुंबईस आलों.

परदेशच्या प्रवासाला निघण्यापूर्वी चारपांच दिवस स्वस्थपणें घालविण्याकरितां व एक व्याख्यान देण्याकरितां मी मुंबईस जरा आधीं आलों. तें व्याख्यान आगरकर स्मृतिदिनाचे दिवशीं-तो दिवस त्यावर्षी १३ जुलईला साजरा करण्याचें ठरविलें होतें-द्यावयाचें होतें. हाहि एक विलक्षण योगायोग घडून आला असें मला वाटलें. कारण माझ्या वयोमानाप्रमाणें व आपल्या इकडल्या अल्पायुष्यतेमुळें मला वडीलधारी माणसें आशीर्वाद देण्यास राहिलीं नव्हतीं. तेव्हां माझे प्रत्यक्ष गुरु कै. आगरकर यांच्या स्मृतिदिनीं त्यांचें गुणगौरव करून त्यांच्या मृत आत्म्याचा मनोमय आशीर्वाद ग्रहण करण्याची मला संधि मिळाली हा माझ्या यात्रेला शुभशकून झाला असें मला वाटलें. तदनुरूप ता. १३ जुलई हा माझा सर्व दिवस आगरकरांच्या कार्याच्या चिंतनांत व सायंकाळ त्यांच्याबद्दल व्याख्यान देण्यांत गेला यांचा मला फार आनंद वाटला.

पुढें तीन दिवस राहिले. तारीख चवदा, पंधरा, सोळा व सतरा जुलै पहांटेपर्यंत माझी आप्तइष्ट मंडळी व स्नेहीसोबती मुंबईस येत होते. तेव्हां त्यांना भेटण्यांत व त्यांचें अभिनंदन व सुरक्षित व सुखाच्या प्रवासाबद्दल सदिच्छा स्वीकारण्यांत बोलतां बोलतां हे तीन दिवस निघून गेले. ता. १७ रोजीं सकाळीं आम्हां एकत्र जमलेल्या सर्व नातेवाईक मंडळीचा काळबादेवीवरील विजेच्या दिव्याची व्यवस्था असलेल्या स्टूडिओमध्यें ग्रुप फोटो काढविला; व तेथून अले-

व्हझांड्रा डॉकमध्यें उभी असलेल्या आमच्या एशिया बोटीच्या धक्यावर गेलों. तेथें पासपोर्ट दाखविण्यास आणि सामानाबद्दल पोर्टभाडें—हें भाडें दर बोजास एक रुपाया पडतें व तें जरा जास्त वाटलें—देऊन सामान हमालाकरवीं ९२ नंबरच्या केबीनमध्यें पाठविण्यास बराच वेळ लागला. शेवटीं एकदां सर्वत्रांचा निरोप घेऊन शिडीनें मी आमच्या एशिया बोटीवर चढलों. ज्यांनीं तीन रुपये भरून डेकवर जाण्याचें तिकीट काढलें होतें तेवढी मंडळी बोटीवर येऊन माझी केबीन पाहून मग वर माझ्यासह डेकवर आली व सुमारें दहा वाजतांना परत धक्यावर गेली व मग तेथें बराच वेळ उभी राहिली. बोटीची हालचाल सुरू झाली; तरी पण किती वेळ बोटीनें धक्का सोडला नाहीं. म्हणून मीं आमच्या मंडळींना अधिक वेळ उगाच उभे राहण्यांत अर्थ नाहीं तरी तुम्हीं आतां परत बिऱ्हाडीं जा म्हणून आग्रहानें सांगितलें व मग मंडळी निरुपायानें परत फिरली. ती मंडळी गेली तरी मी डेकवरून मुंबई बंदराकडे पहात उभा राहिलों. दुसरीहि मंडळी हळूहळू परत जाऊं लागली. शेवटीं एकदां आमच्या बोटीनें बरोबर अकरा वाजतां धक्का सोडला व हळूहळू बोट चालू झाली व मीं आपल्या विलायतच्या यात्रेस प्रत्यक्ष सुरवात केली.

# प्रकरण २ रें

## लंडनपर्यंतचा जलस्थल प्रवास

**माझी** विलायतची यात्रा हा एक ज्याप्रमाणें विलक्षण योगायोग होता, त्याप्रमाणें माझ्या प्रवासाच्या प्रारंभतिथीचाहि एक योगायोगच होता. इंग्रजी पंचांगाप्रमाणें १७ जुलई १९२९ या दिवशीं माझ्या प्रवासास प्रारंभ झाला. पण आपल्या हिंदू पंचांगाप्रमाणें तो दिवस आषाढी एकादशीचा होता. **आषाढी कार्तिकी भक्तजन येती । चंद्रभागेमध्यें स्नानें जे करिती ॥** या अभंगामध्यें वर्णिलेल्या पवित्र दिवसांपैकीं तो एक दिवस होता. मात्र धार्मिक यात्रेमध्यें एकादशीच्या दिवशीं यात्रास्थानीं पोहोंचावयाचा परिपाठ असतो. पण माझ्या या व्यावहारिक यात्रेमध्यें प्रारंभ व पोहोंच यांची उलटापालट झाली. यात्रास्थानीं पोहोंचावयाच्या दिवशीं मी यात्रेला प्रारंभ करीत होतों इतकेंच.

माझ्या यात्रेच्या प्रारंभदिनाचा हा जसा व्युत्क्रम तसाच आमच्या आगबोटीच्या नांवाचा होता. आमच्या आगबोटीचें नांव 'एशिया'; जणूं कांहीं वयातीत एशिया तरण्याताठ्या युरोपला भेटावयास जात आहे. पण आमच्या आगबोटीचें 'एशिया' हें नांव 'नांव सोनुबाई हातीं कथलाचा वाळा' या म्हणीची सत्यता सिद्ध करणारें होतें. आमची 'एशिया' आगबोट लांबचा जलप्रवास करणाऱ्या आगबोटींपैकीं प्रायः सर्वांत लहान आगबोट असावी! कोठें पन्नास साठ हजार टनांच्या प्रचंड आगबोटी व कोठें आमची सात हजार टनाची चिमुकली आगबोट! कोठें इंद्राचा ऐरावत तर कोठें शामभटाची तट्टाणी!

आमची आगबोट चिमुकली होती. तरी पण किती झालें तरी ती परदेशाचा व लांबीचा प्रवास करणारी आगबोट होती; कोंकणांतील किनाऱ्याकिनाऱ्यानें चालणारी, एकदोन दिवसांत आपली सफर संपविणारी

**वाफेनें चालणारी होडी** नव्हती. तेव्हां माझ्या सारख्या पहिल्यांदा परदेशगमन करणाऱ्या प्रवाशाला सर्व कांहीं नवेंच होतें. म्हणून आगबोट मुंबई बंदराबाहेर पडल्याबरोबर मी मागच्या बाजूकडून पुढच्या बाजूपर्यंत—सुकाणूपासून नाळेपर्यंत–एका बाजूच्या पायवाटेनें जाऊन दुसऱ्या बाजूच्या पायवाटेनें परत येऊन सर्व आगबोटीला प्रदक्षिणा घातली; मी पहिल्या वर्गाच्या बैठ्या खेळाच्या व धूम्रपानाच्या दिवाणखान्यांत डोकावलों; नाळेच्या समोर उभा राहून त्या अफाट समुद्राचें अवलोकन केलें; त्या समुद्राचा धुसर व भीषण भासणारा रंग, त्या प्रचंड पर्वतप्राय लाटा यांकडे माझ्यानें पाहवेना म्हणून लवकर माघारीं फिरलों; व परत येतांना आमच्या दुसऱ्या वर्गाच्या दिवाणखान्यामध्यें इकडेतिकडे हिंडलों; मागच्या सुकाणूच्या बाजूकडे गेलों व आतां क्षणोक्षणीं अंधुक होणाऱ्या व दिसत आहे नाहीं असा संशय उत्पन्न करणाऱ्या मुंबई बंदराकडे टक लावून पाहिलें; शेवटीं एकदोनदां माझ्या खोलींत जाऊन आलों; याप्रमाणें मी सुमारें दोन तास मोठ्या आनंदांत घालविले. मला आगबोट लागणार नाहीं अशी माझ्या मनांत घमेंड उत्पन्न झाली तोंच, दुपारच्या फराळाच्या तयारीची सूचक पहिली घंटा झाली व मी आपल्या खोलींत गेलों. पण मला जरा अस्वस्थ वाटूं लागलें. कपाळ दुखत आहे कीं काय, पोटांत दुखत आहे कीं काय, अशी शंका येऊं लागली अशा स्थितींत मी जेवण्याच्या टेबलावर माझ्या नंबरावर जाऊन बसलों तोंच तोंडाला चुळा सुटूं लागल्या, पोटांत गरंदळल्यासारखें वाटलें, घेरी येते कीं काय असा भास झाला। या भावना मी आपल्या शेजारीं बसलेल्या गृहस्थास सांगितल्या; त्यांना जलपर्यटनाचा पुष्कळ अनुभव होता. ते म्हणाले “ ही तुमची कपाळदुखी नव्हे, पोटदुखी नव्हे, ही दर्यादुखी ( sea sickness ) आहे; हिनें तुम्हांला पछाडलें आहे. तरी तावडतोब तुम्हीं आपल्या खोलींत जाऊन बिछान्यावर स्वस्थ पडा; कांहीं खाऊं नका; सगळ्यांचें जेवणखाण झाल्यावर तुमचा खोलीवाला ( cabin-boy or steward ) तुम्हाला चहा आणून देईल तेवढाच आज घ्या; दुसरें

कांहीं खाद्य किंवा पेय घेऊं नका." हें माझ्या शेजाऱ्याचें म्हणणें ऐकल्या-बरोबर माझी घटकेपूर्वीची घमेंड उतरली. माझ्या कपाळावर ग्लानि आली व कसाबसा खालीं जाऊन मी आपल्या खोलींत खाटेवर पडलों. याप्रमाणें मी जो एकदां खाटेवर खिळला गेलों तो सबंद सात दिवस तेथें खितपत पडलों. कसाबसा निसर्गविधि उरकण्याकरितां दिवसांतून एक दोन वेळ कठड्याला धरून खोलीबाहेर पडत असें. पण खोलीपासून फार दूर जावयाचें नसे; ही त्यांतल्या त्यांत सुदैवाची गोष्ट होती.

खरोखरीं '**दर्यादुखी**' हें एक अद्वितीय दुखणें आहे. यांत प्रत्यक्ष वेदना होतात अशांतला भाग नाहीं; तरीपण या दुखण्याकडे मनुष्याचें सर्व लक्ष वेधतें; यांत हिंडतांफिरतां येत नाहीं; यांत वाचतां बोलतां येत नाहीं; यांत खावेंप्यावेंसें वाटत नाहीं; यानें केव्हां मनुष्य पछाडलें जाईल हें सांगतां येत नाहीं; हें नव्या प्रवाशांना होतें असा नेम नाहीं; व निर्ढावलेल्या खलाशाला होत नाहीं असाहि नेम नाहीं; याला औषध नाहीं; औषध घेत-ल्यास दुखणें दुणावतें. याप्रमाणें हें दुखणें इतकें सर्वव्यापी आहे खरें तरी पण त्याची मौज ही कीं यानें शरीराच्या गात्रांना किंवा इन्द्रियांना कायमचा किंवा तात्कालिक अपाय मुळींच होत नाहीं. यानें तात्पुरती क्षीणता भासली तरी कायमचें शरीरसामर्थ्य कमी होत नाहीं; उलट या दुखण्याचा अंमल ओसरला म्हणजे शरीर हलकें व कार्यक्षम होतें, मनाला उत्साह वाटतो व एकंदरींत मनुष्याला या दुखण्यानंतर पूर्ण आरोग्याचा लाभ होतो; अशी सर्व प्रवासी खातरजमा देतात. या दर्यादुखींत खाटेवर खिळलेला असतां नाना विचारतरंग माझ्या मनांत उठत असत. अशा एका तरंगांत मला वाटलें कीं हें दुखणें म्हणजे आमच्या वरुण देवाची—वेदांतील समुद्राचा स्वामी—मनुष्यांना सात्विक रागाची देणगी असावी ! मनुष्यें आपल्या नौकानयन-विद्येच्या जोरावर व वाफेच्या शक्तीच्या शोधानें अफाट समुद्राच्या छातीवर पाय देऊन समुद्रोल्लंघन बेधडक व सर्व काळीं करूं लागले. म्हणून समुद्रानें वरुण-देवाकडे तक्रार केली. वरुणानें वरकरणी रागाचा आविर्भाव आणला व

समुद्राच्या समाधानाकरितां त्यास असें सांगितलें, " कीं मनुष्यांना त्यांच्या उद्धटपणाबद्दल शासन करण्याकरितां मी ' दर्यादुखी ' नांवाचें दुखणें समुद्रोल्लंघन करणाऱ्या मनुष्याच्या पाठीमागें लावतों म्हणजे झालें ना ? " या योगें समुद्राचें समाधान झालें. पण वरुणदेवाची मनुष्यावर दयार्द्र दृष्टि असल्यामुळें या दर्यादुखीच्या दुखण्यापासून मनुष्यांना त्रास व्हावा पण कायमचा अपाय होऊं नये असा अद्वितीय गुण वरुणदेवानें या दुखण्यामध्यें ठेवून दिला !

आपल्या खोलींत खाटेवर खिळलेल्या स्थितींत माझा कसाबसा एक आठवडा गेला. खोलीवाला खोलींत दोनचार वेळ चहा, कोको वगैरे सारखें पेय अन्न मला आणून देत असे. या वेळीं " चहा दुधावांचून पण लिंबाचा रस व साखर घालून घ्यावा म्हणजे बरें वाटतें " असें खोलीवाल्यानें सांगितल्यावरून मी तसा चहा घेऊं लागलों. पुढें मला असला चहा आवडूं लागला. मग आगबोटीच्या बाकीच्या सर्व प्रवास-भर मी दोनप्रहरीं असला चहा घेत असें. आगबोटीवर ४॥ वाजतांचा चहा दूध घालून किंवा लिंबाचा काप घालून आवडेल तसा देण्यांत येतो असें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. आठव्या दिवशीं मला जरा हुशारी वाटली. खोलीवाल्यानें "वर डेकवर जाऊन बसल्यास जास्त बरें वाटेल." असें सांगितल्यावरून मी ता. २४ रोजीं सकाळीं पोशाख करून वर आलों. प्रवासाला निघतांना ठरविल्याप्रमाणें मी एक आराम खुर्ची २॥ शिलींग भाड्यानें माझ्या खास उपयोगाकरितां घेतली व त्या खुर्चीवर मी येऊन बसलों. शांत व शीतल असा वारा झुळूझुळू वाहत होता; समुद्र सरोवरासारखा अगदीं शांत होता. प्रवासाच्या प्रारंभींच्या दिवसाचें समु-द्राचें तें खवळलेलें भेसूर भीषण स्वरूप कोठें व आजचें तें शांत शीतळ नेत्राला आनंद देणारें निळसर स्वरूप कोठें ! जिकडे पहावें तिकडे निश्चळ निळसर पाणीच पाणी ! वर आकाशाचें वर्तुळाकार छत व खालीं सपाटच सपाट तो नीळवर्ण जलाशय ! हा देखावा किती नयनमनोहर ! एवढा मोठा अफाटसमुद्र पण त्यावर लाटेचा लवलेशहि नव्हता. आमच्या

आगबोटीच्या वेगामुळें फेसाळलेल्या पांढऱ्या पाण्याच्या लहान लहान लहरी त्या नीलवर्ण निश्चल पाण्यावर दूरवर पसरत होत्या! पांढऱ्या शुभ्र फुलांच्या वेण्या अदृष्ट जलदेवतांचे बुचड्यांत भराभर घातल्या जात आहेत असा भास होत होता. खरोखरीं हा माझा जलप्रवासांतला पहिला अपूर्व अनुभव! तो सारखा पहात बसावें असें मला वाटलें! डेकवरील शुद्ध व शीतल हवा, समोरून येणारा मंद मंद वारा व सभोंवारचा 'जलमय जिकडे तिकडे दिसे' असा समुद्राचा देखावा या सर्वांचा एकदां अनुभव घेतल्यावर आगबोटीवरील खास खोलींतील निवास प्रवाशास तुरुंगवास वाटावा व त्यानें आपला बहुतेक वेळ डेकवर किंवा बैठ्याखेळावयाच्या दिवाणखान्यांत घालवावा हें स्वाभाविक आहे. फक्त रात्रीं निजावयापुरतें खोलीमध्यें जावयाचें असाच बहुतेक सर्व प्रवाशांचा नित्य क्रम असतो व म्हणून जलप्रवासानें प्रकृति निकोप होते असा सर्वांचा अनुभव आहे.

•

**" यदेवोपनतं दुःखात्सुखं तद् रसवत्तरम् "**

( दुःखानंतरचा सुखानुभव हा अधिक सरस असतो )

या कवनाचा प्रत्यय मला पुरा येतो आहे नाहीं तोंच ता. २४ जुलई सन १९२९ च्या सायंकाळीं मला एक अल्पसा अपाय घडला. त्यानें **चक्रवत्परिवर्तंते दुःखानि च सुखानि च** ( सुखदुःखें हीं चाकासारखीं फिरत असतात ) या वचनाची सत्यता मला पटवून दिली. इतकेंच नाहीं तर त्या अपघातानें **सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ । ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥** या प्रसिद्ध उपदेशाचें तत्त्व माझ्या मनावर ठसवून मला विचारभ्रमणांतून सत्यसृष्टींत आणून सोडिलें.

सायंकाळच्या सहासातांच्या सुमारास सूर्यास्ताच्या वेळचा पश्चिम विभागाचा अपूर्व देखावा पहाण्यांत मी गुंग असतां एकाएकीं माझ्या आराम खुर्चीच्या हाताचा स्क्रू निसटून पडला व माझ्या डाव्या हाताचें मधलें बोट

सांध्यांत सांपडून त्याची नखापर्यंत चापटपोळी झाली व त्यांतून रक्त वाहूं लागून त्याचा लाकडी तक्तपोशीवर तांबडा लाल सडा झाला. मला अर्थात् घेरी आल्यासारखें झालें. मी तक्तपोशीवर पडणार इतक्यांत माझ्या शेजारीं बसलेल्या गृहस्थांनीं झटदिशीं मला सांवरून धरलें व आगबोटीच्या डॉक्टरांना तावडतोब घेऊन येण्याबद्दल डेकवर उभे असलेल्या दुसऱ्या गृहस्थास सांगितलें. लवकरच आगबोटीचे डॉक्टर व त्यांचे साहाय्यक माझ्याजवळ आले. त्या दोघांनीं हळूंहळूं मला खालच्या मजल्यांत असलेल्या दवाखान्याच्या खोलींत नेलें. डॉक्टर-साहेबांनीं माझी जखम बारकाईनें पाहिली. "सुदैवानें बोटाच्या हाडाला इजा झाली नाहीं, तेव्हां भिण्याचें कारण नाहीं" असे आश्वासनपर उद्गार त्यांनीं काढले. त्यांनीं सर्व जखम धुवून त्यावर ओली पट्टी ठेवून हाताचीं सर्व बोटें पट्टीनें गुंडाळून हात मनगटापर्यंत घट्ट बांधून टाकला. "नव्या कापडाची झोळी गळ्यांत अडकावून त्यांत हात ठेवून रात्रभर दुसऱ्या कुशीवर निजा, रोज सकाळीं नऊ दहाच्या दर-म्यान मलमपट्टी बांधण्याकरितां दवाखान्यांत या, आज रात्रीं कळ लागल्यास दोन दोन तासांनीं एकएक गोळी घ्या," असें म्हणून गोळ्यांची डबी माझेपाशीं देऊन डॉक्टरसाहेबांनीं माझी वरच्या मज-ल्यावर रवानगी केली. याप्रमाणें शिपाईपेशा नसतांना व लढाईस न जातांना जखमी शिपायाची मला स्थिति प्राप्त झाली. माझा हात पुढें सर्व जलप्रवास सरेपर्यंत रोज बांधावा लागत होता, इतकेंच नव्हे तर लंडनला पोहोंचल्यावरसुद्धां एक पंधरवडा त्याला रोज मलम लावावें लागत होतें, व आणखी एक पंधरवड्यापर्यंत कातड्याचा एक **बोट-मोजा**—सबंध हातमोजा नव्हे—हि वापरावा लागत होता. हा माझा अपघात इतक्या दिवस टिकणारा होता. या अपघातामुळें जेवणाचे वेळीं मला चाकूकाट्याचा दोहों हातांनीं उपयोग करितां येत नसे. म्हणून माझ्या शेजारीं बसणारे गृहस्थ यांनीं मला खाण्याचे पदार्थ कापून द्यावे व वाढप्यानें स्वतः माझ्या ताटांत पदार्थ वाढावे, अशा

प्रकारचें परावलंबन मला पतकरावें लागलें. सांगण्यासारखी गोष्ट ही कीं या दोघांनींहि मला सर्व प्रकारें मदत केली. अर्थात् आगबोटी-वरून उतरतांना दोघांचेहि मला मदत केल्याबद्दल मीं मनापासून आभार मानले.

दर्यादुखीबद्दल व नव्या बोटदुखीबद्दल माझी कर्मकहाणी ऐकण्याला वाचक कंटाळले असतील व माझ्या यात्रेंतील स्थलवर्णनें वाचण्यास ते उतावीळ झाले असतील हें मला समजतें. पण माझ्या या लांबच्या प्रवासामधला पहिला पल्ला-मुंबई ते एडन मुळीं १६५९ मैलांचा! शिवाय मी यात्रेला निघालों तो भर पावसाळ्यांतला जुलई महिना, दर्यांत सारखें तुफ़ान व 'नांव मोठें व लक्षण खोटें' अशी चिमुकली आगबोट! मग तिला एडनला पोहोंचावयाला नेहमींपेक्षां तीन दिवस अधिक लागले यांत नवल काय?

तारीख २५ जुलई १९२९ म्हणजे निघाल्यापासून नवव्या दिवशीं सकाळीं एडन बंदरच्या आवारांत आमची बोट आली असून एडन बंदर लवकरच येणार असें समजलें. म्हणून मी पोषाख वगैरे करून मजल्या-वर आलों. थोड्याच वेळानें 'प्रसादचिन्हानि पुरःफलानि' या न्यायानें एडन आखातांतला एक उघडा बोडका सुळक्यासारखा एकाकी खडक दृष्टीस पडला!' पण म्हणतातना भुकेला कोंडा व झोंपेला धोंडा! मुंबई बंदर सोडल्यापासून भूमिमातेचें नऊ दिवसांत दुरूनही दर्शन माझ्या दृष्टीला घडलें नव्हतें. यामुळें तो खडकाळ भूमिभाग सुभग दिसला. आतां खरोखरींच भूमिमाता जवळ आली असें वाटून मनाला आनंद वाटला. इतक्यांत न्याहारीची घंटा झाली. बंदरांत बोट थांबल्यावर आपल्याला किनाऱ्यावर जाऊन एडन पहावयास सांपडेल असें मनोराज्य करीत मी न्याहारी केली; व वर आलों तोंच एडनचा लष्करी किल्ला व तटबंदी यांचे बाजूनें बोटीनें पुढें जाऊन बंदरांत नांगर टाकलासुद्धां. पण मग मला कळलें कीं एडनला देवीची सांथ असल्यामुळें बोटीवरच्या। कोणालाही किनाऱ्यावर जाण्याची परवानगी नव्हती व एडन बंदरांतून

पोलिसचे एकदोन अधिकारी व डॉक्टर याखेरीज दुसऱ्या लोकांस येण्याची मनाई होती. या बंदीमुळें माझी थोडी निराशा झाली. पण या बंदरांत आमची बोट तब्बल आठ तास सायंकाळचे पांच वाजेपर्यंत थांबली. भूमिमातेला प्रत्यक्ष भेटावयास सांपडलें नाहीं तरी तिच्या अगदीं सन्निध आठ तास राहावयास सांपडलें यांतच मीं समाधान मानून घेतलें.

एडन बंदर मुंबई बंदराच्या थेट पश्चिमेस सोळाशें एकुणसाठ मैल दूर असून अरेबिया देशाच्या अगदीं दक्षिणच्या टोंकाला आहे. हें बंदर मुंबई सरकारनें १८३९ मध्यें तेथल्या सुलतानाकडून काबीज करून घेतलें. हें बंदर व त्याच्या लगतचा अरेबिया देशाचा ८० मैल क्षेत्रफळाचा दक्षिण-दिशेकडील भूमिभाग तेव्हांपासून मुंबई सरकारच्या ताब्यांत असून मुंबई इलाख्यांत मोडतात. १८५७ मध्यें एडनच्या पश्चिमेस १०० मैलांवर बाबेल मँडेपच्या सामुद्रधुनीच्या अगदीं तोंडाशीं असलेलें पांच मैल क्षेत्रफळाचें पेरिम बेट हें मुंबई सरकारनें आपल्या ताब्यांत घेतलें व तें एडन प्रांतांत सामील केलें. पण १९२१ मध्यें या प्रांताचा स्वतंत्र कारभार ब्रिटिश-वसाहतमंत्र्याच्या देखरेखीखालीं देण्यांत आला व हा छोटा प्रांत व त्यालगतचे आरबी जहागिरदार या सर्व भागाला हल्लीं संरक्षित संस्थान अशी संज्ञा देण्यांत आली आहे.

एडन हें १८३९ सालीं एक हजार वस्तीचें लहान खेडें होतें. तेथें अजून म्हणण्यासारखा व्यापार नव्हता. पण ब्रिटिश लोकांचें सुदैव हें कीं तेव्हांपासून हें बंदर युरोप व हिंदुस्थान यांच्या मधील व्यापाराच्या मार्गावरील एक महत्त्वाचें नाकें बनलें. लवकरच सुएझचा कालवा काढण्याची कल्पना निघून तिला मूर्तस्वरूप येऊन गलबतांच्या व आगबोटींच्या सर्रहा रहदारीला तो कालवा १८६९ मध्यें उघडण्यांत आला. त्यामुळें एडन बंदर हें कोळशाच्या कोठीचें ठाणें झालें व तेथला आयात निर्यात व्यापार अतोनात वाढला. व जें एडन एक हजार वस्तीचें खेडें होतें तें अर्धलाख वस्तीचें टोलेजंग शहर बनलें. या बंदरीं दरवर्षास आगबोटी व जहाजें मिळून तीस लाख टनांचीं जलयान लागतात. यथ

मालाची मोठी देवघेव व ने-आण चालते. या प्रांताचें वार्षिक उत्पन्न सुमारें अठ्याऐंशी लाख आहे व सामान्यतः तितकाच कारभाराचा खर्च आहे. येवढी या प्रांताची पूर्वपीठिका पाहून त्याच्या दृश्यदेखाव्याकडे नजर टाकूं या.

पण येथें नयनमनोहर असें कांहीं एक नाहीं. आगबोट किनाऱ्याजवळ येऊं लागली म्हणजे काळेसांवळे खडकाचे सुळके व उंचसखल पण उभ्या चढाची डोंगरांची रांगच रांग दृष्टीस पडते. येथें झाडझाडोरा नाहीं; गवताची हिरवळ नाहीं; सपाट जमीन नाहीं; पाण्याचें तर नांव नको; असा हा भीषण डोंगराळ भाग आहे; त्यांतच लष्करी तट, बुरूज व किल्ले यांची भर. मग हें ठिकाण खुष्कीच्या मार्गानें अजिंक्य असावें हें साहजिक आहे. म्हणून एकदां ब्रिटिशांच्या ताब्यांत आल्यावर तें कायमचें त्यांच्या हातीं राहिलें. आमची आगबोट जेथें थांबली होती तेथून तें बंदर व शहर स्पष्ट दिसत होतें. डोंगराच्या उतारावरच शहर वसलेलें दिसलें. तांबड्या लाल कौलांचीं घरें व इमारती एकावर एक अशा रांगांनीं बांधलेल्या दिसत होत्या. एक मोठा नागमोडी रस्ता डोंगराच्या वरवर जातांना दिसत होता व त्यावर मधून मधून एखादी मोटार चढत चढत चाललेली दिसत होती. या डोंगराच्या रांगेमध्यें एक डोंगराचें टोंक पुष्कळ उंच आहे. तें सुमारें १८०० फूट असून त्यावर एक मोठें टोलेजंग निवासगृह आहे. तेथून बंदराचा देखावा मजेदार दिसतो असें मला कळलें. पण या येवढ्या शहरांत व डोंगरांच्या रांगेंत झाडझाडोरा औषधालासुद्धां मिळणें मुष्कील; इतका हा प्रदेश निर्जळ व निर्वृक्ष आहे. जिकडे तिकडे रखरखीत व उजाड असा भूमिभाग आहे. मात्र बंदराच्या धक्क्याला लागून एक छोटीशी बाग दृग्गोचर होत होती; पण ती बाग कसली ! तें बागेचें सोंग होतें. दोन चार झुडुपावजा झाडें, चार दोन पिकुटलेल्या पानांच्या कुंड्या, 'तुरळक तुरळक केश रुपेरी' अशा नमुन्याच्या गवताच्या पट्ट्या; हीं काय ती येथली बाग ! अशा या येथल्या अनाकर्षक देखाव्यामुळें भूमिभागाकडे

पाहण्याचा लवकरच कंटाळा आला; तेव्हां गलबतांनीं गजबजलेलें बंदर व तेथलें हिरवट रंगाचें पाणी व पलीकडचा आफ्रिकेचा किनारा पाहाण्यांत थोडी करमणूक झाली. विशेषत: वरखालीं सारख्या हलणाऱ्या होडक्यांत बसून बोटीच्या कठड्याशीं उभे असलेल्या प्रवाशाशीं सौदा जमविणाऱ्या आरबी व्यापाऱ्याच्या घासाघाशी पद्धतीची जास्तच मौज वाटली ! हिंदुस्थानांतील मारवाडी बोहरी व्यापाऱ्यांप्रमाणें हे आरबी व्यापारी मालाच्या भावांत गिऱ्हाईकांना खूब फसविण्याचा प्रयत्न करतात. नाना तऱ्हेच्या वस्तु, पिसाचे पंखे, नानारंगाच्या कांचमण्यांच्या माळा, पत्ते, तंबाखूच्या विड्याच्या पेट्या, मेजावरील रुमाल, खुर्चीवर ठेवावयाचे छोटे गालीचे, बैठकीचे लहान मोठे गालीचे, बायकांच्या अंगावर घ्यावयाच्या जाळीदार झालरीच्या नानारंगांच्या सुंदर सुंदर शाली अशा नानाविध वस्तु ते दाखवून मोडक्या तोडक्या इंग्रजींत किंमत सांगत व एका दोरीला बांधलेल्या टोपलींतून माल पहावयास वर पाठवीत. पदार्थांच्या किंमती कितीतरी पटीनें फुगवून सांगत. याचा एक मासला सांगण्यासारखा आहे. एका व्यापारी बोवानें बायकांच्या एका सुंदर शालीची किंमत ६० पौंड सांगितली. घासाघीस चालतां चालतां ती शाल शेवटीं त्या व्यापारीबोवानें दहा पौंडाला विकली ! पण या व्यापाऱ्यांची गिऱ्हाईकाच्या गळीं माल उतरविण्याची चिकाटी, गिऱ्हाईकानें कितीहि कमी किंमत सांगितली तरी चिडून न जातां धिम्मेपणानें आपला माल पुन: पुन: गिऱ्हाईकांस दाखविण्याचा दम व शेवटपर्यंत निराश न होतां सौदा जमविण्याचा दीर्घप्रयत्न हे गुण अवर्णनीय आहेत यांत शंका नाहीं. याप्रमाणें ही देवघेव पाहण्यांत माझा बराच वेळ मौजेंत गेला. शेवटीं एकदांची साडेचार वाजतांच्या चहाच्या वर्दीची घंटा झाली व मी मोठ्या प्रमुदित मनानें जेवणाच्या दालनांत गेलों. उष्णकाळाला अनुरूप असा लिंबरसमिश्रित चहा घेतला. चहापान संपतें न संपतें तोंच आगबोट निघण्याची सूचक घंटा झाली व लागलींच नांगराची वर घेण्याची घरघर सुरू झाली. बरोबर पांच वाजतां आम्हीं एडन बंदर सोडलें.

येथून शंभर मैलपर्यंत आगबोट एडनच्या आखाताच्या तोंडाशीं थेट पश्चिमेकडेस जाते. मुंबई सोडल्यापासून या बाबेल मँडेपच्या सामुद्रधुनीपर्यंत जलमार्ग सारखा पश्चिमेकडेस असल्यामुळें वेळांत भराभर फरक पडत जातो. माझ्या एका आठवड्याच्या दर्यादुखीमुळें व बोटदुखीच्या अपघातामुळें या सर्व दिवसांत मी आपलें घड्याळ बदललें नव्हतें. म्हणून तें तीन तास मागें करावें लागलें. कारण आमची आगबोट पश्चिमेकडे जात असल्यानें सूर्योदय रोज थोडा थोडा उशीरानें होई व अशातऱ्हेनें आठ नऊ दिवसांत तीन तासांचा फरक पडला.

बाबेल मँडेपची सामुद्रधुनी ही एडनचें आखात व तांबडासमुद्र यांना जोडणारी अरुंद सामुद्रधुनी आहे. येथून तांबडासमुद्र थेट उत्तरेकडे गेलेला आहे. हा समुद्र म्हणजे एक समुद्राची चिंचोळी पट्टी आहे. येथपासून आगबोट थेट उत्तरेस जाते.

ता. २५ जुलै १९२९ रात्रीं आमच्या आगबोटीवर पहिला सिनेमाचा खेळ झाला. येथपासून जिनोआला पोहोंचेपर्यंत बहुधा रोज रात्रीं कांहींना कांहीं तरी करमणुकीचा खेळ असे. अर्थात् सिनेमा हा सर्व प्रवाशांचा—हिंदी, युरोपियन व खलाशी यांचा-आवडता करमणुकीचा प्रकार होता. नाच गाण्याचे जलसे हे करणुकीचे प्रकार सामान्यतः युरोपियन प्रवाशांच्या करितां असत. पण नाचाच्या दिवशीं जपानी दिवे लावून निराळ्या रंगाचीं निशाणें व पडदे वगैरे लावून आगबोटीचा वरचा उघडा मजला शृंगारला जात असे; तसेंच त्या दालनांत विजेच्या दिव्यांचा चकचकाट व प्रकाश केला जात असे. यामुळें हिंदी प्रवाशांनाही करमणूक होत असे.

रात्रींच्या या करमणुकीच्या प्रकाराप्रमाणें दिवसांहि पुष्कळ खेळण्याचे प्रकार जलप्रवासांत वेळ जाण्याकरितां व थोडा व्यायाम होण्याकरितां काढलेले आहेत. त्याचीहि हकीकत येथेंच देतों.

अर्थात् बैठे पत्त्याचे, बुद्धिबळाचे किंवा ड्राफ्चे खेळ खेळण्याची सोय आगबोटीवर असते. ज्याला धूम्रपानगृह म्हणतात तें दालन अशा खेळा-

करितां राखून ठेवलेलें असतें. व प्रवाशांच्या दुकला किंवा चौकड्या या खेळांत गुंतलेल्या नेहेमीं दृष्टीस पडतात. एकलकोंड्या स्वभावाचे प्रवासी कादंबऱ्या वाचण्यांत वेळ घालवतात. व्यायामाचे खेळ पुष्कळ प्रकारचे असतात. यांचीं नांवें जमिनीवरील खेळांचीं आहेत खरीं; पण ते खेळ वेगळेच आहेत. आगबोटीवर टेनीस खेळतात असें ऐकलें किंवा वाचलें म्हणजे आपल्याला येवढें मोठें मैदान कोठलें असा अचंबा वाटतो खरा; पण नांवावरून खेळाची खरी कल्पना येत नाहीं. बोटीवरील टेनीस या खेळांत जमिनीवरल्याप्रमाणें टणटण उड्या मारणारा चेंडू नसतो किंवा टेनीस बॅटहि नसते. बोटीच्या खुल्या मजल्यावर जाड दोरांच्या जाड गांठींचें व मोठ्या भोंकांचें एक लहानसें जाळें असतें. लांकडी तक्तपोशीवर खडूनें टेनीसच्या आंगणाप्रमाणें पण पुष्कळच लहान जागेंत रेखा आंखलेल्या असतात. दोरीचें एक गांठीगांठींनीं घट्ट केलेलें लहानसें कडें असतें. तें कडें हाच टेनीसचा चेंडू व आपला हात हीच टेनीसची बॅट! हातानें जाळ्यावरून तें कडें पलीकडे टाकावयाचें व दुसऱ्या बाजूच्या गड्यानें तें हातानें परत जाळ्यावरून ढकलून द्यावयाचें; तें कडें खालीं पडलें कीं पुनः खेळ सुरू व्हायचा; म्हणजे टेनीसच्या खेळांतील नियमांचें काय तें साम्य या बोटीवरील टेनिसमध्यें आहे. बाकी जमिनीवरील टेनीस व बोटीवरील टेनीस यांत मुळींच साम्य नाहीं.

दुसरा खेळ बोटीवरील बिलियर्ड. याला खऱ्या बिलियर्डसारखें सपाट एकाच पातळींत असलेलें हिरव्या बनातीचें मेज लागत नाहीं; हस्तिदंती तांबड्या पांढऱ्या गुळगुळीत गोट्यांची गरज नाहीं; कमी जास्त लांब व अणकुचीदार काठ्या लागत नाहींत. आगबोटीच्या लांकडी तक्तपोशीवर दोन बाजूला एक मध्यबिंदु धरून तीन निरनिराळीं वर्तुळें काढतात व मध्यबिंदूपासून पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्तुळांत ३, २, १ असे आंकडे काढतात. झालें बिलियर्डचें मेज तयार. लांकडाच्या वाटोळ्या चपट्या चकत्या आठ असतात; चार तशाच असतात; चारीवर तांबड्या रंगाचें लहानसें वर्तुळ रंगवितात. चकतींत बरोबर बसेल

अशी अर्धवर्तुळाकार खोबण असलेल्या चार काठ्या असतात. "या काठ्यांच्या खोबणींत ती चकती लांकडी तक्तपोशीवर ठेवून काठीनें तं चकती वर्तुळांच्यामध्यें जाईल व वर्तुळांचे अलीकडे किंवा पलीकडे किंवा वर्तुळांच्या रेघवर न पडेल अशा तऱ्हेनें ढकलावयाची व ज्या वर्तुळांत ती पडेल तितके मार्क मोजावयाचे. बोटीवरचा बिलियर्ड खेळ हा दोघांनीं किंवा चौघांनीं खेळतां येतो.

तिसरा खेळ असाः—तीन फूट तीन इंच लांबी रुंदीचा चौकोनी काळ्या रंगाचा एक फळा असतो व त्याच्या वरच्या बाजूस सहा इंचांचा चढ दिलेला असतो म्हणजे तो उतरता असतो. त्या काळ्या फळ्यावर पक्क्या पांढऱ्या रंगाच्या रेषांनीं बारा चौकोनी घरें पाडलेलीं असतात. त्यांच्या अर्थात् चार रांगा असतात. पहिल्या रांगेत १० ब, अ, दुसऱ्या रांगेत ४, ८, ३, तिसऱ्या रांगेत ९, १, ५ व चवथ्यांत २, ६, ७, असे आंकडे व अक्षरें कायमच्या रंगांनीं काढलेलीं असतात. या आंकड्यांच्या मांडणीची मौज ही आहे कीं कोणत्याहि बाजूनें आंकड्यांची बेरीज केली तरी ती १५ च भरते. बारीक वाळूनें गच्च भरलेल्या तळहाताएवढ्या आकाराच्या चार पांच तरटाच्या पिशव्या करतात. या पिशव्या नेमक्या घरांत टाकावयाच्या म्हणजे त्या घरांतल्या आंकड्याइतकें मार्क मिळतात; पिशव्या रेघेवर पडतां कामा नयेत; किंवा फळ्याच्या बाहेर पडतां कामा नयेत; अक्षरांच्या घरांत पिशवी पडल्यास एक मार्क कमी केला जातो. पंचवीस किंवा पन्नास मार्क करणाराचा जय होतो.

खेळाचा चवथा प्रकार तर इतका साधा व सोपा आहे कीं, तो पाहून प्रथमतः हसूं आल्याखेरीज रहात नाहीं. दोन लांकडाच्या बादल्या थोड्या अंतरावर ठेवलात व पांच सहा टेनिसकरितां तयार केलेलीं दोरींचीं कडीं घेतात व एका बाजूकडून दुसऱ्या बाजूच्या बादलींत हीं कडीं टाकावयाचीं. ज्याचीं जास्त कडीं बादलींत पडतील त्याचा जय !

अशातऱ्हेचे आगबोटीवरील खेळ असतात. पण या खेळामध्यें मुलें-मुली स्त्रीपुरुष लहानथोर असे सर्व दर्जांचे व सर्व वयाचे प्रवाशी भाग घेतात. ही खेळांची व विशेषतः कांहीं तरी करीत बसावयाची प्रवृत्ति युरोपियन प्रवाशामध्यें हिंदी प्रवाशापेक्षां जास्त प्रमाणांत असते असें माझ्या अनुभवावरून मला वाटलें. लांबलांबच्या जलप्रवासांत प्रवाशांचा वेळ आठवडेच्या आठवडे कशा तऱ्हेनें जातो याची कल्पना यावी म्हणून मी बोटीवरील करमणुकीच्या साधनांचें इतक्या सविस्तरपणें वर्णन केलें. पण मला आतां माझ्या प्रवासप्रगतीच्या हकीकतीकडे वळलें पाहिजे.

एडन बंदर सोडल्यापासून साडेचार दिवसांनीं म्हणजे तारीख ३० जुलई १९२९ रोजीं सकाळीं आठ वाजतां आम्हीं सुएझ बंदराला आलों. एडनपासून सुएझ १३१२ मैल आहे. त्यापैकीं १०० मैल एडनचें आखात आहे. म्हणजे तांबड्या समुद्राची लांबी बरोबर बाराशें बारा मैल भरते.

या समुद्राची रुंदी दोनशें पन्नास मैलांपासून एकशें वीस मैलांपर्यंत जास्ती कमी अशी आहे. उत्तरेच्या टोंकाला त्याचे बारके दोन फांटे होतात; उजव्या हाताच्या फांटयाला **अकाबाचें** आखात म्हणतात, व डाव्या हाताच्या फांट्यास **सुएझचें** आखात म्हणतात. या दोन फांट्यामधल्या दुबेळक्यांत क्रिश्चन धर्मपुस्तकांत उल्लेखिलेला प्रसिद्ध **सिनाई** पर्वत आहे. तांबड्या समुद्राच्या उजव्या हाताला सारखा **अरेबिया** देश लागतो त्याचे मध्यावर **जेद्दा** बंदर आहे. तेथून मुसलमानांचें पवित्रस्थान **मक्का** हें सेचाळीस मैलांवर आहे. त्याचे उत्तरेस दुसरें पवित्र शहर **मदिना** आहे. तांबड्या समुद्राच्या डाव्या हातास सारखा आफ्रिकेचा भूमिभाग लागतो.

तांबड्या समुद्रामध्यें उष्मा फार होतो व विशेषतः जुलई आगष्ट या महिन्यांत तर असह्य उकाडा होतो व मनुष्य अगदीं घाबराघुबरा होतो असें मला सांगण्यांत आलें होतें; म्हणून मला मोठी काळजी वाटत होती. आम्हांला आरबी समुद्रामधल्या वादळामुळें अनन्वित त्रास झाला होता;

आमचा तीन दिवस प्रवास लांबला होता; म्हणून वरुण देवाला आमची करुणा येऊन त्यानें जणूं कांहीं आमचा तांबड्या समुद्रांतील साडे चार दिवसांचा प्रवास फारच सुखकारक केला. आधीं तांबडा समुद्र सरोवरासारखा संथ होता; शिवाय सर्वकाळ मंदमंद व शीतल वारा वहात होता; यामुळें त्रास झाला नाहीं व उष्मा भासला नाहीं; शिवाय या प्रवासांत आरबी समुद्राच्या प्रवासांतल्याप्रमाणें सुनें व असहाय वाटलें नाहीं. आधीं तांबड्या समुद्राच्या पाण्याचा रंग नयनमनोहर असा निळा आहे. इतक्या नीलवर्ण समुद्राला तांबडा समुद्र हें नांव कां पडलें हें समजत नाहीं. या समुद्राचें अन्वर्थक नांव नील समुद्र असें पाहिजे होतें. या समुद्रांतून जात असतां गलबतें व आगबोटी वारंवार भेटतात. शिवाय, केव्हां आफ्रिकेचा किनारा, केव्हां आरेबियाचा किनारा व सुएझ आखातांत शिरल्यावर तर दोन्ही किनारे एकदम व एकसमयावच्छेदेंकरून दिसतात. तसेंच वाटोवाट दीपस्तंभहि लागतात. हा समुद्र म्हणजे मोठा वाहता व राबता जलमार्ग आहे, याची प्रतीति पटत असल्यामुळें हे चार पांच दिवस हां हां म्हणतां निघून जातात. असाच आम्हांला अनुभव आला व आमच्या आगबोटीनें सुएझ बंदरांत ता. ३० जुलई रोजीं सकाळीं आठ वाजतां नांगर टाकला. एडनपर्यंतच्या प्रवासाला तीन दिवस जास्त लागल्यामुळें, आमच्या बोटीच्या कप्तानाला त्यापैकीं साधेल तितका वेळ भरून काढावयाचा होता. म्हणून बारा वाजतांच्या आधींच सुएज बंदरांतून बोट हाकारावयाची असल्यामुळें मी किनाऱ्यावर जाण्याच्या भानगडींत पडलों नाहीं. जे दोन तीन तास येथें मुक्काम झाला, तो वेळ आमच्या आगबोटीवर भरलेल्या बाजाराच्या गडबडींत केव्हांच निघून गेला. कितीतरी लहान मोठे व्यापारी बोटीवर आले व त्यांनीं सर्व उघड्या मजल्याची जागा चिक्कार भरून टाकली. येथेंहि एडनप्रमाणें व्यापाराची घासाघिशी पद्धति दिसली. येथल्या व आसपासच्या स्थळांच्या चित्रांचीं कार्डें येथें बरींच स्वस्त वाटलीं. म्हणून मी पन्नास एक लहान मोठीं कार्डें विकत घेतलीं. बारा वाजण्याच्या

आधींच आमच्या आगबोटीनें सुएझ कालव्यांतल्या आपल्या प्रवासास सुरुवात केली.

सुएझ बंदरापासून पोर्ट सय्यद ( हें मध्य समुद्रावरचें बंदर ) १०० मैल आहे. म्हणून सामान्यतः सुएझ कालवा १०० मैलांचा आहे असें समजतात. पण सुएझ हें सुएझच्या आखातांत कालव्याच्या सुरवातीपासून जरा अलीकडे असल्यामुळें हें अंतर वाढलें आहे. प्रत्यक्ष खणलेला कालवा ८७ मैलच आहे. त्यांतहि ६६ मैल लांबीचा वरपासून जमीन पोखरून कालवा केलेला आहे; व २१ मैल लांबीच्या तीनचार सरोवरांचाच कालव्याला उपयोग करून घेतला आहे. मात्र मोठमोठ्या बोटी जाण्याकरितां सरोवराचा कालव्याच्या रुंदीचा तेवढा भाग जास्त खोल करून घेतला आहे. सारांश, सुएझ कॅनाल हा एकच एक सलग व सगळा जमीन पोखरून तयार केलेला कालवा नाहीं, तर भूमध्य समुद्र व तांबडा समुद्र यांच्या मधल्या जमिनीमध्यें नाईल नदीच्या अपरंपार पुरानें बनलेल्या गोडचा पाण्याच्या चार सरोवरांना जोडणारी ती कालव्यांची एक मालाच आहे असें म्हटलें तरी चालेल. लहान **बिटरलेक** मोठें **बिटरलेक** हीं **सरोवरें, टिमशा** सरोवर व **मेंझाला** सरोवर हीं तीं चार सरोवरें होत. या सुएझ कालव्याची कृति किती विचित्र पहा ! भरभक्कम भूमीनें जोडलेलीं आशिया व आफ्रिका खंडें यांची सततची ताटातूट करून या कालव्यानें अफाट समुद्रांनीं विभक्त असलेले पश्चिम युरोपांतले देश व हिंदुस्थान देश यांचा संयोग घडवून आणला ! यासारखे विचार माझ्या मनांत येत आहेत तोंच सुएझचे आखातांतून प्रत्यक्ष कालव्यांत आमची बोट शिरली. खरोखरी कालवा बराच अरुंद आहे. दोन आगबोटी मुष्किलीनें एकमेकांजवळून जाऊं शकतात. म्हणून युरोपला जाणाऱ्या बोटी सरोवरांत शिरल्या म्हणजे त्या जरा बाजूला होऊन तेथें थांबतात ! त्याप्रमाणें आमची बोट चांगली तास दीडतास थांबली. तितक्या वेळांत समोरून सहा सात बोटी येऊन सुएझकडे गेल्या व मग आमची बोट पुढें चालू झाली. या कालव्यांत बोटी फार सावकाश चालवतात. पूर्वीं तर

कालव्यांतून रात्रीची रहदारी बंद होती. पण आतां विजेचे दूरवर चांद-दण्यासारखा प्रकाश पाडणारे दिवे निघाल्यापासून रात्रींची रहदारी चालू झाली आहे. रात्रीच्या वेळीं मागून किंवा पुढून येणाऱ्या आगबोटीची या दिव्यांच्या प्रकाशांत मोठी मौज दिसते. आम्ही पोर्ट सय्यद येथें तारीख एकतीस जुलई रोजीं पहांटे चारच्या सुमारास पोहोंचलों. येथें आगबोट निदान सहा तास तरी थांबणार आहे असें कळल्यावरून आम्ही किनाऱ्यावर जाण्याचा व पोर्ट सय्यद शहर पाहण्याचा बेत केला व सकाळचा चहा घेऊन बरोबर सहा वाजतां आम्हीं होडींत बसून किनाऱ्यावर गेलों.

पंधरा दिवस माशासारखे पाण्यांत नव्हे पण पाण्यावर काढलेल्या आमच्या स्वारीचे पाय जमिनीला लागतांच मनाला किती आनंद झाला याची खरी कल्पना स्वानुभवावांचून कळणार नाहीं. बंदराच्या धक्क्या-बाहेर आल्याबरोबर आम्हांला प्रवासपरवाने तेथल्या अधिकाऱ्याला दाख-वावे लागले व मग आमची शहरांत जाण्याला सुटका झाली. शहर बंदराला लागून आहे. तेव्हां आम्ही लगेच शहरांत शिरलों.

पोर्टसय्यद हें अगदीं अर्वाचीन शहर आहे. सुएझ कालव्याची कल्पना निघून त्याची आंखणी व उपक्रमोपसंहारस्थानें कायम झाल्यावर म्हणजे सन १८५९ या सालीं मुळीं या शहराचा जन्म झाला. इजिप्त प्रांतांतील त्या वेळचा व्हॉईसरॉय महमद सय्यद पाशा यांचे नांवावरून नव्या शहराचें **पोर्टसय्यद** असें नामाभिकरण करण्यांत आलें. इजिप्त प्रांताच्या कोनाकोपऱ्याच्या किनाऱ्यावर असलेलें नापिक, निर्वन व निर्जन खारटण असें हें ठिकाण ! पण अवघ्या सत्तर वर्षांच्या अवधींत तेथें सुंदर, संपन्न व एक लाख वस्तीचें शहर उदयास आलें ! शहराचा मुख्य रस्ता फ्रान्सची राणी **युजीन** इच्या नांवाचा आहे. त्यांतच आम्ही प्रथम शिरलों. केवढा विस्तीर्ण सरळ व लांबलचक हा रस्ता आहे ! ती पांढरी शुभ्र स्वच्छ रेखीव मधली सडक, दोन्ही बाजूला माड गुलमोहोर इत्यादि पुष्पपल्लवांनीं बहरलेल्या झाडांची रांगच रांग; त्याच्या पलीकडे दोन्ही आंगच्या फरसबंदी प्रशस्त

पायवाटा व त्यावर समान अंतरावर हारीनें पुरलेले दिव्यांचे खांब व त्यांच्या पलीकडे कमानदार सहा सहा, सात सात मजली उंचच उंच इमारती असा हा मोठा सुंदर रस्ता आहे.

हें शहर नवीन वसलें असल्यामुळें येथें वांकडे तिकडे नागमोडीचे रस्ते, वेडींवांकडीं मागेंपुढें बांधलेलीं घरें व त्यामुळें पायवाटेला येणारे कानेकोपरे मुळींच दिसत नाहींत. सर्व रस्ते सरळ व काटकोनांत धरलेले असल्यामुळें शहराच्या रस्त्याची रचना बुद्धिबळाच्या पटासारखी भासते. बराच वेळ याप्रमाणें शहरांत फिरल्यावर दोन तासांच्या फिरतीचें दोन शिलींग भाडें ठरवून आम्हीं व्हिक्टोरियांतून शहराबाहेर किनाऱ्याच्या बाजूला गेलों. हा रस्ताहि मोठा सुंदर आहे. एका बाजूला कांहीं वेळ इमारती लागतात. पण मग पुढें दोन्ही बाजूंला बागच बाग लागते. बागांत नानारंगांच्या फुलांचीं व पानांचीं लहान झाडें लावलेलीं असून मधली सर्व जागा हिरव्यागार गवतानें आच्छादिलेली आहे. यामुळें या रस्त्यानें जातांना फार मौज वाटते. किनाऱ्याच्या टोंकापर्यंत हा रस्ता गेला आहे व चिंचोळ्या बंधाऱ्याच्या टोंकाशींच सुएझ कालव्याची कल्पना काढून तिला मूर्त स्वरूप देणारा फ्रान्स देशांतला कर्ता पुरुष **फर्डिनंड डी लेसेप्स** याचा पुतळा बसविलेला आहे. या पुतळ्याचें काम प्रसिद्ध फ्रेंच मूर्तिकार **फ्रीमेट** याच्या हातचें आहे. हा पुतळा नकशीच्या सुंदर उंच चबुतऱ्यावर अधिष्ठित केलेला असून तो पूर्ण आकाराचा आहे. मूर्तीचें काम अप्रतिम झालें असल्यामुळें **लेसेप्स** हा जणूं कांहीं स्वतः तयार केलेल्या कालव्याकडे समाधानाच्या दृष्टीनें सारखा पहात आहे कीं काय असा पुतळा पहाणारास भास होतो !

येथें या पुतळ्याकडे पहात उभें राहिलें व समोंवारच्या देखाव्याकडे दृष्टि फेकली म्हणजे या सुएझ कालव्याच्या कल्पनेचें व त्याच्या कल्पकाचें मोठें नवल वाटतें. या कालव्याचा व त्याच्या कल्पकाचा आश्चर्यकारक इतिहास येथें देणें योग्यच होईल.

**फर्डिनंड डी लेसेप्स** याचा जन्म १८०५ सालीं फ्रान्समध्यें **व्हर्सेल्स** येथें झाला. याचें घराणें तेथल्या संभावित घराण्यांपैकीं असून त्याचे पूर्वजांनीं परराष्ट्रांच्या दरबारी वकिलांचीं कामें केलीं होतीं. त्याच्या बापाला सुद्धां वकिलातींत नोकरी होती. यामुळें **फर्डिनंड** यास वयाच्या अठरा वर्षांपासून त्या कठीण कामाची दीक्षा मिळाली. यामुळें त्यानें टर्की, इटली, स्पेन वगैरे देशांत दुय्यम वकीलाचीं कामें केलीं व त्याच्या हुशारीमुळें तो त्या कामांत तरबेज झाला. पुढें त्यानें १८४९ पर्यंत मुख्य वकिलाचीं कामेंसुद्धां यशस्वी रीतीनें पार पाडलीं. १८३२ सालीं **फर्डिनंड** याला **अलेक्झांडिया** येथें दुय्यम वकील नेमिलें. त्या कामावर असतांना इजिप्त येथील टर्कीचा व्हॉईसरॉय महमदअल्ली व त्याचा मुलगा सय्यद्-पाशा या दोघांशीं लेसेप्सची मैत्री जमली. अलेक्झांड्रिया येथें असतांना आसपासच्या भूमिभागाची त्यास प्रत्यक्ष माहिती झाली. नेपोलियन बोनापार्टाच्या काळचा **लेपेरे** या फ्रेंच एंजिनीयराचा भूमध्य समुद्र व तांबडा समुद्र यामध्यें जलमार्गानें दळणवळण सुरूं करण्याच्या शक्यते-बद्दलचा रिपोर्ट फर्डिनंडच्या सहज दृष्टीस पडला. या रिपोर्टाचा फर्डि-नंडच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. आफ्रिका व एशिया यांना जोडणारी अरुंद संयोगभूमि फोडून सुएझचा कालवा काढण्याची कल्पना त्याच्या मनावर ठसली. म्हणून त्या दृष्टीनें त्यानें त्या प्रांताची पाहणी केली. त्याची व सय्यदपाशाची दाट मैत्री असल्यामुळें त्याजजवळ या विषयासंबंधीं लेसेप्सचें पुष्कळ वेळा बोलणें झालें. जुन्याकाळीं तांबडा समुद्र व भूमध्य समुद्र यामध्यें जलमार्गानें दळणवळण होतें पण तें द्राविडी प्राणायामासारखें वांकडें तिकडें होतें. अलेक्झांड्रिया येथील नाईल नदीच्या मुखानें केरोपर्यंत गलबतें जात. केरोपासून सुएझ बंदरा-पर्यंत पूर्वकाळीं कालवा होता. त्यामधून तीं गलबतें तांबड्या समुद्रांत येत असत. पण कालेंकरून हा कालवा ओहोरून गेला. कारण नाईल नदीच्या अपरंपार पुरानें गांळ फार येतो. खरोखरीं ही संयोगभूमि फार प्राचीन काळीं अशा गाळाचीच झाली असली पाहिजे असें फर्डिनंड यास

वाटलें. तेव्हां वेडावांकडा कालवा न काढतां भूमध्यसमुद्र व तांबडा समुद्र यामध्यें सरळ व नदीशीं संबंध नसलेला स्वतंत्र कालवा काढला म्हणजे तो न ओहोरतां कायमचा राहील असें लेसेप्सच्या मनानें घेतलें. पण वीस वर्षेपर्यंत लेसेप्सची ही कल्पना बीजावस्थेमध्यें राहिली. भूमध्य समुद्र व तांबडा समुद्र यांच्या पातळींत अंतर आहे; तेव्हां लेसेप्सची कल्पना अव्यवहार्य आहे अशी एक शंका सामान्य माणसांत होती. पण भूस्तर शास्त्रज्ञाच्या एका कमिशननें प्रत्यक्ष पातळीची सूक्ष्मतऱ्हेनें मोजणी करून पातळी सारखीच आहे असें सिद्ध करून त्या शंकेचें निराकरण केलें होतें.

वर सांगितल्याप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं वकीलातीचीं कामें करून १८४९ मध्यें फ्रेंच सरकारच्या धोरणाशीं फर्डिनंडचें धोरण न जमल्यामुळें लेसेप्सला जागेचा राजिनामा द्यावा लागला. १८५३ मध्यें त्याची बायको व मुलगी थोड्या अंतरानें वारली व या दुहेरी दुःखापुढें लेसेप्सच्यानें फार दिवस टिकाव धरवला नसता. पण सुदैवानें त्याच्या मनांत वीस वर्षें घोळत असलेल्या सुएझ कालव्याच्या कल्पनेला मूर्त स्वरूप मिळण्याची संधि येऊन लेसेप्सला आवडता उद्योग लाभला. १८५४ मध्यें लेसेप्सचा जीवश्चकंठश्च मित्र सय्यद पाशा हा इजिप्तचा व्हॉईसरॉय झाला व फर्डिनंड सय्यदपाशाच्या आमंत्रणावरून इजिप्तला गेला. तेथें सुएझ कालव्याची योजना मुक्रर ठरून १८५४ मध्यें जमिनीसंबंधीं करारमदार होऊन लेसेप्सनें सुएझ कॅनाल कंपनी काढण्याचा व लागलीच कामास सुरवात करण्याचा निश्चय केला. या कालव्याच्या कल्पनेंत लेसेप्सचा केवळ फ्रान्सचा फायदा व्हावा असा कोणताही राजकीय हेतु नव्हता. युरोप व आशिया यामध्यें सरळ, सुलभ, स्वतंत्र व एकमार्गी दळणवळण सुरू व्हावें व त्याचा फायदा सर्व राष्ट्रांना मिळावा असा त्याचा उदात्त हेतु होता. पण चमत्काराची व आश्चर्याची गोष्ट ही कीं इंग्लंडचे त्या वेळचे प्रधान **पामरस्टन** यांचे मनांत किल्मीष उत्पन्न झालें; व त्यांनीं या योजनेला जोराचा विरोध केला व टर्कीच्या सुलतानाकडून

चालू झालेल्या कामांत खीळ घालण्याचा घाट घातला. पण लेसेप्सची चिकाटी व धीर विलक्षण होता. त्यानें टर्कीच्या सुलतानाला समक्ष भेटून त्याची खातरी केली व त्याची संमति मिळविली. त्यानें जगांतील मुख्य व्यापाऱ्यांची सक्रिय सहानुभूति मिळविली. सुएझ कनाल कंपनी-करितां वीस कोटी फ्रँक भांडवल जमविण्याचा लेसेप्सनें यत्न केला. भांडवलाचे ५०० फ्रँकचा एक असे चार लक्ष भाग त्यानें विक-ण्यास काढले. त्यांतले सुमारे अर्धे भाग इजिप्त सरकारनें घेतले व बाकीचे बहुतेक फ्रेंच लोकांनीं घेतले. या कंपनीबद्दल फ्रेंच जनतेंत विलक्षण उत्साह दिसून आला. याप्रमाणें ब्रिटिश विरोधाला न जुमानतां लेसेप्सनें आपलें काम नेटानें चालू केलें. कंपनीचे भाग खपून पूर्व तयारी होण्यास कांहीं काळ लागला. पण १८५९ मध्यें लेसेप्सनें आपल्या हातानें पोर्टसय्यद या उजाड व नापिक खारटणामध्यें पहिली कुदळी मारून कालवा खणण्यास सुरवात केली. पण या कामाच्या पूर्ततेला त्या भागांतला गोड्या पाण्याचा अभाव ही मोठी अडचण होती. म्हणून लेसेप्सनें केरोहून नाईल नदीचा गोड्या पाण्याचा कालवा आणला. तो **टिमशा** सरोवरापर्यंत १८६२ मध्यें आल्यामुळें लेसेप्सला धीर आला. पुढें गोड पाण्याचा एक फाटा सुएझपर्यंत व दुसरा पोर्टसय्यदपर्यंत नेण्यांत आला व या शंभर मैलांच्या टापूंतील गोड्या पाण्याची पंचाईत दूर झाली. तेव्हांपासून लेसेप्सचें कालवा खणण्याचें काम जारीनें सुरू झालें. मध्यंतरीं पुष्कळ अडचणी व अडथळे आले पण ते सर्व नाहींसे होऊन १८६९ च्या अखेरीस कालव्याचें काम पुरें झालें व १७ नवंबर १८६९ या दिवशीं कालवा उघडण्याचा मोठ्या थाटाचा समारंभ झाला. व नाना देशांचीं ६७ गलबतें पोर्टसय्यद बंदराला आलीं होतीं; त्यांवर सिंहासनस्थ राजे, राजघराण्यांतील पुरुष, दरबारी वकील, शिपाई, खलाशी, व नाना देशांतले सुशिक्षित लोक अशी मंडळी जमली होती. फ्रान्स देशाची युजीन राणी व फार्डिनेंड डी लेसेप्स एका फ्रेंच गलबतांत बसले होते व तें गलबत प्रथम कालव्यांत शिरलें; मागोमाग ६६ गलबतें एकामागें एक

अशीं कालव्यांत शिरून टिमशा सरोवरांतून पुढें थेट सुएझपर्यंत गेलीं व सर्व सुखरूपपणें परत आलीं. कालव्याच्या दोन्ही बाजूंनीं लोकांच्या झुंडींच्या झुंडी जमल्या होत्या व त्यांना विलक्षण उत्साह वाटला. याप्रमाणें फर्डिनंड डी लेसेप्सनें आपल्या कल्पनासृष्टींतील योजना सत्यसृष्टींत आणून दळणवळणाच्या मार्गांत क्रांति घडवून आणिली. कारण या त्याच्या कालव्यानें लंडनपासून मुंबईचा जलमार्ग ४५०० मैलांनीं कमी झाला. या योगें इंग्लंडचा विलक्षण फायदा झाला. पण इंग्लंडनें या योजनेंत काडीचाहि भाग घेतला नाहीं. आपली ही चूक झाली हें इंग्लंडला मागाहून कळून आलें. त्यांच्या सुदैवानें या चुकीचें परिमार्जन करण्याची संधि १८७५ मध्यें इंग्लंडचे त्यावेळचे प्रधान बीकन्सफील्ड यांना आली. इजिप्तचा खेदीव सुएझ कनाल कंपनीचे आपले पाऊणेदोन लाख भाग विकणार अशी गुप्त बातमी बीकन्सफील्ड प्रधानांना कळल्या-बरोबर या कानाची गोष्ट त्या कानावर न जाऊं देतां त्यांनीं ते भाग चाळीस लक्ष पौंडांस विकत घेऊन टाकले. लेसेप्सचा थोरपणा हा कीं या विक्री-मध्यें विघ्न न आणतां इतक्या भागाचे मालक म्हणून ब्रिटिश सरकारचे तीन प्रतिनिधि आपल्या कंपनीच्या बोर्डावर त्यानें घेण्याचें कबूल केलें व कंपनीचें काम सुरळीत चालविलें. पुढें या कालव्यामुळें ब्रिटिश लोकांचा पूर्वेकडे अतोनात व्यापार वाढला व त्यायोगें कंपनीचा फार फायदा झाला. म्हणून इंग्रज व्यापाऱ्यांनीं दर टनास १० फ्रांक हा कालव्याच्या भाड्याचा दर कमी करण्याबद्दल ओरड सुरू केली. "आपल्या वतीचे आणखी सात प्रतिनिधि कंपनीच्या कारभारांत घ्यावे; नाहीं तर आम्ही निराळा स्वतःचा कालवा काढूं" असा लेसेप्स यास त्या व्यापाऱ्यांनीं धाक घातला. लेसेप्सचा हेतु उदात्त होता; सर्वांचें कल्याण व्हावें व जल-मार्गाच्या बाबतींत भलतीच चढाओढ होऊं नये असा पोक्त विचार करून इंग्रजी व्यापाऱ्यांचें म्हणणें त्यानें कबूल केलें. तेव्हांपासून कंपनीचें काम निर्वेधपणें चाललें आहे.

स्थळ प्रत
सं. ....... नं. .......
ता. .......

सुएझच्या कालव्याचें काम यशस्वी झाल्यामुळें अमेरिकेंतल्या पनामा कालव्याची कल्पना पुढें आली व तेथें एक कंपनी निघून त्याचें काम फर्डिनंड डी लेसेप्स याचे स्वाधीन करण्यांत आलें. त्याचें वय झालें होतें. तरीपण त्यानें तें काम हातीं घेतलें. परंतु त्या कामामध्यें राजकीय व एंजिनियरिंग अशा दुहेरी अडचणी उत्पन्न झाल्या. सुएझप्रमाणें एक पातळीमध्यें सर्व कालवा काढण्याची कल्पना अव्यहार्य ठरली व म्हणून ती कंपनी मोडावी लागली व फर्डिनंड डी लेसेप्सच्या हातून तें काम तडीस जाऊं शकलें नाहीं. फर्डिनंड डी लेसेप्स हा दीर्घायुषी मनुष्य होता. तो नव्वद वर्षांचा होऊन दिजंबर सन १८९४ मध्यें वारला.

आम्ही पोर्टसय्यदहून दिवसा साडेदहा वाजतां निघालों. पंधरा दिवस आमचा जलप्रवास झाला खरा; पण आम्हीं अजून आशिया खंडांतच होतों. आतां मात्र आम्हीं युरोपमध्यें व तेथल्या भूमध्य समुद्रांत प्रवेश केला. हा समुद्रहि तांबड्या समुद्राप्रमाणें शांत असून त्याचा वर्णहि निळसर होता. आमचा पुढचा मुक्काम नेपल्स येथें व्हावयाचा होता. पोर्टसय्यदपासून नेपल्स १११४ मैल आहे. तेथें पोहोंचावयास आम्हांला चार दिवस लागले. पोर्टसय्यद मागें टाकल्यापासून तीन दिवसपर्यंत जिकडे तिकडे जलमय होतें. शांत समुद्र, थंड हवा, मंद वारा, वेळच्यावेळीं व चांगलें चमचमीत जेवणखाण इतक्या गोष्टींचें आनुकूल्य असल्यावर आणखी काय पाहिजे ? मनुष्य महिनेच्या महिने अशा प्रवासांत आनंदानें काढील. तीच आमची गोष्ट होती. तारीख ३ ऑगस्टच्या दोन प्रहरापासून डाव्या हाताला सिसिली बेटाचा किनारा व उजव्या हाताला इटाली देशाचा किनारा दिसूं लागला व आमची आगबोट मेसिना सामुद्रधुनीकडे चालली आहे असें कळलें.

बोटीच्या नाळेच्या टोंकाशीं आलों तों अद्वितीय देखावा दिसूं लागला. उजव्या बाजूला पाहावें तों सिसिली बेटांतील हिरव्याहिरव्यागार अशा छोट्या टेकड्यांची रांगच रांग दिसूं लागली. मधून मधून तांबड्या कौलांचीं घरें व पांढरे रस्ते स्पष्ट दिसत. डावीकडे इटालीचा किनारा

दिसत होता. याहि किनाऱ्याच्या बाजूला डोंगरांची रांगच रांग दिसली पण इकडचे डोंगर जास्त उंच दिसले. डोंगरामधून वाहणारे नद्यानाले दृष्टीस पडत होते. किनाऱ्यावरील नीटनेटकीं गांवें दिसत होतीं. किनाऱ्याच्या कांठानें गेलेला रेल्वे रस्ताहि स्पष्ट दिसत होता. डोंगरांची रांग मागेंपुढें व वांकडीतिकडी असल्यानें कोठें डोंगर अगदीं थेट समुद्राला भिडलेला दिसे व त्यांतला आगगाडीचा लहान बोगदा दृग्गोचर होई; तर कोठें डोंगर मागें जाऊन मध्यें मोठी दरी दिसे व आगगाडीच्या रस्त्याला उंच धक्का घातलेला दिसे व मध्यें नदीवरील सुंदर पूल दृष्टीस पडे. सर्व डोंगर हिरवेगार तर होतेच पण मधून मधून फळझाडें व धान्यपिकें असावीं असा भास होई. बोट रिजियो नांवाच्या मोठ्या शहरावरून गेली. जरी ती तेथें थांबली नाहीं तरी ती बोटीच्या धक्क्याजवळून गेली व त्याला लागून असलेला रेल्वेचा प्लॅटफार्म व तेथें थांबलेली आगगाडी आम्हांला स्पष्टपणें दिसली. चार साडेचारच्या सुमारास आमची बोट मेसिनाच्या सामुद्रधुनीच्या अगदीं अरुंद भागामधून गेली. यावेळीं तर दोन्ही बाजू फारच स्पष्ट दिसून मोठी मौज वाटली. याप्रमाणें दोन तास सिसिली व इटली या दोन सुंदर ठिकाणांचें दुरून व ओझरतें दर्शन घेऊन मी नेहेमींच्या चहापानास खाद्यखान्यांत गेलों. पुढें रात्र झाल्यावर जरी इटालियन किनारा दिसला नाही तरी मधूनमधून दिव्यांची रांगची रांग दृष्टीस पडे व गांवांतले ते विजेचे दिवे आहेत असें समजून मजा वाटे.

नेपल्स शहरीं आम्ही ता. ४ ऑगस्ट रोजीं सकाळीं पांच वाजतां पोहोंचलों. येथें बोटीचा मुक्काम आठ तास होणार होता. प्रवाशांना नेपल्स शहर पहाण्यास पुष्कळ वेळ मिळावा व खलाशांनाहि शहरांत जाऊन सावकाशीनें परत येतां यावें म्हणून न्याहारीची वेळ नेहमींच्या वेळाचे अर्धा तास आधीं आणण्यांत आली. न्याहारी करून आम्हांला आठ साडेआठ वाजतां शहराकडे येण्यास मिळालें. आम्ही बंदराच्या बाहेर आलों तों आपल्या इकडल्या तीर्थांच्या पंड्यांप्रमाणें नेपल्सचे त्राटाडे आमच्या पाठीस लागले. पूर्वी एकदां युरोपांत प्रवास केलेले एक

गृहस्थ माझे केबिनबंधु होते. त्यांनीं पूर्वी नेपल्स पाहिलेलें होतें. तेव्हां त्याचें म्हणणें असें पडलें कीं नेपल्सच्या शेजारीं असलेलें व जुन्याकाळीं जमिनीखालीं गडद्लेलें पण नवथर उकरून काढलेलें पॅांपे शहर फार प्रेक्षणीय आहे तें पाहण्यास जावें. मला दोन्ही नवीनच, तेव्हां मला ही सूचना मानवली. मग आम्हीं चौघेजण मिळून जातांयेतांचें दर माणशीं आठ शिलिंग भाडें ठरवून एक मोटार मुक्रर केली व आम्ही लागलीच मोटारमध्यें बसलों व पॅांपेकडे चालू झालों.

नेपल्स हें इटालीमधलें सर्वांत मोठें शहर आहे. त्याची वस्ती सात लाख आहे असें मला सांगण्यांत आलें. वाटेनें जातां जातां शहरांतील प्रशस्त रस्त्यांचें, टोलजंग इमारतींचें, मोठमोठ्या चौकांचें व सुंदर पुतळ्यांचें व कारंजांचें ओझरतें दर्शन झालें व त्यावरून नेपल्स शहर फार प्रेक्षणीय आहे असें मला वाटलें.


नेपल्स शहर व पॅांपे शहर यांचेमध्यें बात्तीस मैल अंतर आहे. हा भूमिभाग धनुष्याच्या आकाराचा असून मध्यें व्हेसूव्हीयस ज्वालामुखी पर्वताचें उंच टोंक दिसतें. आम्ही शहर मागें टाकून उजव्या बाजूनें चाललों. रस्ता डामरी असल्यामुळें काळसर दिसतो. शहर टाकलें कीं दोन्हीं बाजूंस द्राक्षाच्या बागाच बागा लागतात; द्राक्षांचा त्यावेळीं बहर होता; यामुळें द्राक्षवेलींना सारखे द्राक्षांचे घोंसचेघोंस लोंबत असलेले दिसत होते. मधून मधून धान्यांचीं पिकेंहि दिसत होतीं; त्यांपैकीं कांहीं आपल्या इकडल्या मक्यासारखीं व ज्वारीसारखीं दिसत; कांहीं कांहीं इतर फळझाडांच्या बागा लागत. या भागांतली जमीन आपल्या इकडल्या काळ्या जमिनीसारखी दिसली. हा सर्व भूमिभाग व्हेसूव्हीयस पर्वताच्या मुखांतून निघणाऱ्या द्रव्याचा झालेला आहे. पण तो पुष्कळ सुपीक असावा असें वाटलें!

सुमारें एका तासानें आम्ही पॅांपे शहराजवळ आलों. तेथें फी देऊन पास काढले व जुन्या शहराच्या तटाच्या उंचवट्याच्या पाऊलवाटेनें

आंत शिरलों. सर्व शहराला पूर्वीचा तट होता तो आतां मोकळा केलेला आहे. सर्व रस्ते फरसबंदी दिसले व दोन्ही बाजूंना उंच ओटे असलेले दिसले. शहरांत दगडी बंद पाटांनीं पाणी आणून मोठ्या चौकांमध्यें हौद व कारंजीं केलेलीं दिसलीं. मोठमोठ्या लोकांच्या वाड्यांच्या आळीच्या आळी लागल्या. शहराच्या साधारण मध्यभागीं रोमन देवतांचीं देवळें, नाटकगृहें, न्यायकचेऱ्या, शिपायांच्या मोठमोठ्या बराकी, सभागृहें इत्यादि इमारती आहेत. अर्थात् या सर्व इमारतींच्या भिंती व खांब तेवढे शाबूत आहेत. दुसरे मजले व इमारतींचीं छपरें हीं व्हेसूव्हीयस ज्वालामुखींतून बाहेर आलेल्या द्रव्याच्या भाराखालीं कोसळलीं व सर्व शहर या द्रव्याखालीं गडून गेलें. हा ज्वालामुखीचा स्फोट सन ७९ मध्यें झाला. तीन दिवसपर्यंत राख व वितळलेल्या वगैरे वस्तू यांचा अहोरात्र सारखा वर्षाव होत होता असें म्हणतात. या शहराचा शोध अगदीं अलीकडे लागला. मग वर सांचलेल्या मातीचे ढिगारे काढून शहराचे अवशेष भाग मोकळे करण्यांत आले व जसेच्या तसे ठेवण्यांत आले. सांपडलेल्या वस्तूंकरितां एक प्रदर्शनगृह बांधून त्यांत नाना वस्तू, माणसांचे, जनावरांचे अवशेष जतन करून ठेविले आहेत. आपल्या देशांत तक्षशिला या विश्वविद्यालयाचा शोध लागून तें शाबूत शहर उघडकीस आलें किंवा अगदीं अलीकडे सिंध प्रांतांत मोहिंजारो येथें फार पुरातन काळच्या सुधारणेवर प्रकाश पाडणाऱ्या वस्तूंचा शोध लागला, त्याचप्रमाणें या जुन्या पॉंपे शहराच्या शोधानें रोमनकाळच्या वास्तुकला, मूर्तिकला इत्यादि कलांचे मासले व त्या काळची राहणी व एकंदर सुधारणा यावर पुष्कळ प्रकाश पडला आहे. आम्हीं बहुतेक सर्व शहर फिरलों. एका टोंकाला आम्हांला पूर्वीचीं थडगीं उत्तम घडीव दगडांचीं व कळाकुसरीचें काम केलेलीं दृष्टीस पडलीं. याप्रमाणें बराच वेळ तें जुनें पॉंपे शहर पाहून आम्ही परत फिरलों. पण मला इटालियन किंवा फ्रेंच या दोन्हीही भाषेचें ज्ञान नसल्यामुळें सर्व शहराच्या अवशेषांवर माहितीच्या पाट्या होत्या तरी त्याचा मला कांहींएक



नं. १ जुनें पांपे शहरः बाझिलिका (देवालय) पान ३९



नं. २ जुनें पांपे शहर : कबरस्थान व त्याचा रस्ता पान ३८

उपयोग झाला नाहीं. तेव्हां युरोपच्या यात्रेला निघालेल्या माण-साला नुसतें इंग्रजी येऊन भागत नाहीं. युरोपांतील दुसऱ्या भाषा न आल्या तरी फ्रेंच भाषेचें ज्ञान आवश्यक आहे असें माझ्या अनुभवास आलें. शहर पाहून झाल्यावर उशीर झाला म्हणून आम्ही घाईघाईनें माघारीं आलों व लागलींच बोटीवर चढलों तोंच बोट सुटण्याची घंटा झाली व थोड्याच वेळांत बोट सुरू सुद्धां झाली.

नेपल्सपासून जिनोआ-आमच्या जलप्रवासाचें शेवटचें बंदर-हें फक्त तीनशें एकवीस मैल आहे. हा प्रवास आमच्या बोटीनें २८ तासांत आटपला व आम्ही ता. ५ आगष्ट रोजीं सायंकाळीं ५ वाजतां सुखरूपणें जिनोआ शहरीं पोहोंचलों. स्टेशनवर चवकशी करतां लंडनला जाण्यास सकाळची आगगाडी सोयीची असून ती लंडनमधल्या व्हिक्टोरिया स्टेशनला ता. ७ आगष्ट रोजीं दोनप्रहरीं साडेतीन वाजतां पोहोंचेल असें कळलें. त्याप्रमाणें माझ्या मुलाला तार करून मीं एका खाणावळींत रात्री पुरती वस्ती केली व सकाळीं पावणेसातच्या गाडीनें निघालों. मला मिलन येथें गाडी बदलावी लागली. मी त्या गाडीनें सायंकाळीं पांच वाजतां स्वित्झरलंड देशांतल्या लुझान या शहरीं आलों. येथें दोन तास थांबावें लागलें. पण तेवढ्यांत काय पहाणार ! म्हणून मी लवकरच गाडींत येऊन बसलों. येथून निघालों तों पॅरीसला सकाळीं सहा साडेसहा वाजतां आलों. तेथें पुनः डबा बदलावा लागला. पॅरीस ईस्ट स्टेशनवरून पॅरीस नॉर्थ स्टेशनवर येऊन तेथून निघालों तों बोलोन या बंदरास अकरा वाजतां आलों. लागलींच आगबोटींत बसलों व इंग्लिश चॅनल ओलांडून फोकस्टोनला १ वाजतां पोहोंचलों. तेथें पुनः आगगाडींत बसलों. हा प्रवास निव्वळ चवतीस तासांत होतो खरा; पण त्यामध्यें इतक्या ठिकाणीं गाड्या बदलाव्या लागतात; एका गाडींतून दुसऱ्या गाडींत, गाडींतून बोटींत व बोटींतून पुनः गाडींत अशी सारखी धांदल व गडबड चालते; सिनेमामध्यें ज्याप्रमाणें सारखे देखावे बदलत असतात त्याप्रमाणें येथें प्रकार होतो; प्रांतामागून प्रांत, शहरामागून शहर, देशा-

मागून देश सारखे नजरेपुढून भरभर जातात. या अशा जलद प्रवासांत युरोपचें ओझरतें दर्शन होतें येवढेंच; पण त्यामध्यें सृष्टिसौंदर्याचा सावकाश आस्वाद घेण्यास सांपडत नाहीं. परत देशीं येतांना थांबून थांबून सावकाश सावकाश व पहात पहात प्रवास करण्याचा माझा बेत होता येवढीच त्यांतल्या त्यांत मला समाधानाची गोष्ट वाटली. मी पाहिलेल्या युरोपच्या भागाचें सविस्तर वर्णन दुसऱ्या भागांत देणार आहे. तेव्हां या गर्दीच्या, धांदलीच्या व उतावळीनें शेवटचा मुक्काम गांठतांना केलेल्या प्रवासाचें जास्त वर्णन न करतां ता. ७ आगस्ट रोजीं दुपारीं साडेतीन वाजतां म्हणजे मुंबई बंदर सोडल्यापासून बरोबर तीन आठवड्यांनीं मी लंडन शहरीं व्हिक्टोरिया स्टेशनला आलों. जरी मी माझ्या मुलाला तार केली होती तरी त्याची परीक्षा चालू असल्यामुळें त्याला स्टेशनवर येण्यास सांपडणार नाहीं असेंच मला वाटत होतें. पण स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर माझा मुलगा व सौ. सईबाई परांजपे ( डॉक्टर परांजपे यांच्या पत्नी ) या दोघांना पाहून मला किती आनंद झाला असेल याची वाचकांना सहज कल्पना करितां येईल. याप्रमाणें माझ्या मुंबई ते लंडनच्या प्रवासाची चिरस्मरणीय हकीकत आहे.

# प्रकरण ३ रें

## लंडननिवासाचा पहिला दशवडा

**मा**गच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें ता. ७ आगष्ट सन १९२९ रोजीं तिसऱ्या प्रहरीं साडेतीन वाजतां मीं लंडनांतल्या व्हिक्टोरिया स्टेशनवर पोहोंचलों तोंच माझा मुलगा व सौ. सईबाई परांजपे मला बिऱ्हाडीं न्यावयास आल्या. जिवलग मित्रत्वाचें किंवा निकट संबंधाचें नातें असलें तरी राहत्या बिऱ्हाडीं पाहुण्याची स्वतंत्र सोय करण्याची व्यवस्था नसल्यामुळें व तशी तिकडील पद्धति नसल्यामुळें टॅक्सी करून आम्हीं त्रिवर्ग बिरलाप्रभृति हिंदी व्यापाऱ्यांनीं काढलेल्या **आर्यभवन** नांवाच्या शुद्ध शाकाहारी वसतिगृहांत गेलों. वसतिगृहिणीनें सांगितलें कीं "एकेरी खोली शिल्लक नाहीं; दुहेरी खोली मिळेल; पण दुसरा इसम न आल्यास दर आठवड्यास पांच पौंड पडतील." हा आकार माझ्या अदमासाच्या व आहाराच्या बाहेर होता, तरी सध्यां ती खोली घेण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. म्हणून आम्हीं तें कबूल करून खोलीची किल्ली घेऊन त्यांत माझें सामानसुमान आणवून खोलींतील खुर्च्यांवर बसलों. चहाची वेळ झालीच होती, म्हणून तिघांकरितां चहा मागविला. **वसतिगृहसेविकेनें** (आर्यभवन शुद्ध शाकाहारी वसतिगृह होतें तरी तेथली सर्व व्यवस्था इंग्रजी पद्धतीची व इंग्रजी बायांकडेच होती) केकबिस्किटें यांसकट चहाचें तबक मेजावर आणून ठेविलें. प्रवाससंबंधीं बोलत बोलत आम्हीं चहा घेतला व लागलींच डॉक्टर परांजपे यांचे बिऱ्हाडीं गेलों. अर्थात् तेथेंहि प्रवाससंबंधीं, व हिंदुस्थानांतल्या हकीकतीसंबंधीं बराच वेळ संभाषण झालें व पुढल्या दोन तीन दिवसांचा कार्यक्रम ठरला. "दुसऱ्या दिवशीं दोन्हीही वेळां चि. मनोहर (माझ्या मुलाचें नांव) याची परीक्षा असल्यामुळें त्याला माझ्याकडे

येणें शक्य नव्हतें. म्हणून सौ. सईबाईकडे न्याहारीनंतर मीं जावें व मग त्यांनीं दोन तीन तास माझ्याबरोबर फिरून मला शहराची थोडी माहिती करून द्यावी व तिसरे दिवशीं म्हणजे शुक्रवारीं मनोहराची सकाळीं दहा ते दोनप्रहरीं एक वाजेपर्यंत एकच वेळ परीक्षा असल्यामुळें त्यानें तीन वाजतां आर्यभवनांत येऊन मग आम्हीं त्याचें बिऱ्हाड पहावयास व त्याच्या निवासगृहिणीची ओळख करून घेण्यास तिकडे जावें " असें ठरलें. सायंकाळ झाली म्हणून आम्हीं सौ. सईबाईचा निरोप घेऊन व त्यांच्या बिऱ्हाडाचा पत्ता ( ७४ अंट्रिम मॅन्शन्स, वायव्य ३, लंडन, प्रिमरोझ ००१४. ) रोजनिशींत लिहून घेतला. लंडनमध्यें नव्यानें जाणाऱ्यानें काय किंवा कायम रहाणाऱ्यानें काय रोजनिशींत किंवा स्मरणवहींत टेलीफोन पत्त्यासकट पूर्ण पत्ता लिहून घेतल्याखेरीज गत्यंतर नाहीं. तरच नंतर माणसाला निरोप पाठविणें, पत्र लिहिणें किंवा त्याची भेट घेणें शक्य आहे, नाहींतर लंडनसारख्या अफाट शहरांत दाद लागणें अशक्यप्राय आहे. " उद्यां दहा वाजतां आपल्या बिऱ्हाडीं येतो " असें सौ. सईबाईस सांगून त्यांना **शिवरात्र** करून आम्हीं आर्यभवनांत आलों. तोंच माझे आगबोटीमधले सहप्रवासी श्रीयुत संपत माझ्याच खोलींत आलेले पाहून मला फार आनंद झाला. चुकलेला फकीर मशिदींत या म्हणीची मला आठवण झाली. चि. मनोहरास " मला आतां एकटें एकटें वाटणार नाहीं " असें पाहून आनंद झाला. " परवां तीन वाजतां येतों " असें सांगून तो आपल्या बिऱ्हाडीं गेला. इतकें होत आहे तोंच भोजनाची घंटा झाली. तीन आठवड्यांच्या विदेशी भोजनानंतर देशी भोजन—पुरीतर्कारी, दहींभात व लोणचें पापड—मिळाल्यामुळें मजा वाटली. जेवण जरी देशी होतें तरी जेवण्याची पद्धति व वाढण्याची तऱ्हा सर्व इंग्रजी होती. कारण येथें जेवण करणारा फक्त एक देशी आचारी ठेवलेला आहे. बाकी सर्व व्यवस्था इंग्रजी बायांच्या हातीं आहे; यामुळें शाकाहार येथें असला तरी भोजनपद्धति गंगाजमनी वाटते.

जेवण झाल्यावर श्रीयुत संपत यांजबरोबर बराच वेळ बोलणें चालणें होऊन आम्हीं झोप घेण्याच्या तयारीस लागलों. रात्रीं उठावें लागतें कीं काय याची माझ्या सोबत्यांनीं चवकशी केली. मी होय म्हटल्यावर ते म्हणाले, "येथली दारें उघडण्याची माहिती पाहिजे. नाहींतर येथल्या दारांच्या आंगच्या कुलुपांच्या चातुर्याच्या रचनेमुळें गैरमाहीतगाराची कीलोत्पाटीव वानरासारखी अवस्था होते." म्हणून त्यांनीं त्या कुलुपाच्या उघडझांपीच्या सर्व खुब्या मला सांगितल्या. दोन चार वेळ बारकाईनें उघडझांप करून पाहिल्याखेरीज त्यांची खुबी माझ्या ध्यानांत आली नाहीं. इतकीं इकडचीं आंगचीं कुलुपें खुबीदार बनविलेलीं असतात. नंतर मी माझ्या मऊ मऊ मखमालीच्या गादीवर मऊमऊ व ऊबदार लेप पांघरुण घेऊन स्वस्थपणें झोंपलों व सकाळीं सहा साडेसहाला उठलों व मुखमार्जन करून **शेजचहा** ( bed-tea ) घेतला. हा पहांटेचा चहा म्हणजे दूधसाखर घालून तयार केलेला चहाचा एकच पेला असतो व इकडील स्थाईक रहाणारे खरोखरींच आंथरुणांत असतांना असाच चहा पितात ! मला ही पद्धति ओंगळ व आरोग्यहानिकर वाटली. नंतर प्रातर्विधि-यामध्यें रोजचा श्मश्रुविधि येतो—करून पोशाख करून न्याहारीची वाट पहात बसलों व तिचीही घंटा साडेआठच्या सुमारास झाली. न्याहारी झाल्यानंतर थोड्यावेळानें मी बाहेर पडलों व आदल्या दिवशीं काळजीपूर्वक पाहिलेल्या रस्त्यानें डॉ. परांजपे यांचे बिऱ्हाडीं गेलों. तेथें डॉक्टर परांजपे ( ते आदल्या दिवशीं केंब्रिजला गेले होते ) हे भेटले व अर्थात् त्यांचेजवळ निरनिराळ्या विषयांवर बरेंच बोलणें झालें; त्यांना माझा 'अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' लिहिण्याचा उद्देश कळविला व ब्रिटिश म्युझियम व इंडिया ऑफिस येथल्या वाचनालयाधिकाऱ्यांना तेथें जाऊन वाचनाची परवानगी मिळण्याकरितां शिफारसपत्रें देण्याबद्दल मी डॉक्टरसाहेबांना विनंति केली. तेव्हां सोमवार ता. १२ आगष्ट रोजीं कचेरींत भेटण्याबद्दल त्यांनीं मला सांगितलें. नंतर ते आपल्या कचेरीला गेले. सौ. सईबाई व मी सुमारें

साडे अकरा वाजतां बाहेर पडलों. त्यांना कांहीं सामानसुमान घ्यावयाचें होतें. त्याकरितां त्यांच्याबरोबर दुकानांत गेलों. मला लंडन नवेंच व म्हणून सर्वच एका दृष्टीनें प्रेक्षणीय. तेव्हां त्यांचेबरोबर बाजारांत फिरण्यांत मला मौज वाटली. पुढें आम्हीं एका औषधाच्या दुकानीं गेलों. तेथें मला माझ्या बोटाच्या जखमेकरितां कापूस, कापड व बोरीक पावडर घ्यावयाची होती ( कारण अजून जखम थोडी ओली होती व बोटीवर डॉक्टरनें दिलेलें जखम बांधण्याचें सामान संपलें होतें ) तीं घेतलीं. त्यांनींही स्वतःकरितां कांहीं वस्तू घेतल्या व मग मला त्यांनीं वजन करावयास सांगितलें. औषधवाल्याकडे कांटा होता. त्यानें लागलीच माझें वजन करून एका छापील **वजन-कार्डावर** माझें नांव, वय व ८ आगष्ट १९२९ तारखेचें १२६ पौंड वजन लिहून देऊन कार्ड माझ्या हवालीं केलें. त्या कार्डावर बारा ओळी होत्या. पुढें याच कार्डावर मी आपलें वजन दर दोन महिन्यानें करून लिहून ठेवीत असें व सरासरीनें दरमहा दोन अडीच पौंड या मानानें माझें १५ पौंड वजन वाढलें व पुढें शेवटच्या दोन महिने १५१ वजन राहिलें व विलायत सोडतांना माझें इतकेंच वजन राहिलें होतें. माझ्या उतार वयांतहि माझें इतकें वजन वाढलें यावरून तेथील रहाणी व हवापाणी हीं आरोग्यकारक व शक्तिवर्धक आहेत असें माझ्या प्रत्यक्ष अनुभवास आलें.


सुमारें एक वाजेपर्यंत याप्रमाणें इकडेतिकडे फिरल्यानंतर एका कोपऱ्यावरच्या उपाहारगृहांत आम्हीं फराळ केला. लंडनमध्यें हाच प्रघात आहे; बहुतेक लोक दोनप्रहरचा फराळ बाहेर करतात; वसतिगृहांत लोक दुसऱ्यास त्रास न व्हावा म्हणून हलक्या आवाजांत बोलतात; नोकराशींसुद्धां सभ्यतेनें वागतात व आपला फराळ झाल्यावर शेंकडा सुमारें दहा या प्रमाणांत बिलावर बक्षिसी देतात इत्यादि स्वतःच्या अनुभवाची व उपयुक्त माहिती सौ. सईबाईनीं सांगितली. फराळ झाल्यावर आणखी थोडेसें इकडे तिकडे फिरून आम्हीं सौ. सईबाईच्या बिऱ्हाडीं गेलों व मग मीं आर्यभवनांत परत आलों. सायंकाळीं

नं. ता. ......

सरळ सडकेनें सहल करावयास गेलों व "आश्चर्यवत् पश्यति" या मनः-स्थितींत त्या सुंदर स्वच्छ शहरांतील वस्तीकडे पहात पहात परतलों. याप्रमाणें लंडननिवासाचा दुसरा दिवस पार पडला.

तिसरे दिवशीं न्याहारीनंतर मला कांहीं काम नव्हतें व प्रत्येक वस-तिगृहाला वाचण्याकरितां, वाट पाहण्याकरितां व विश्रांतीकरितां समा-ईक दिवाणखाना असतो हें ठाऊक नसल्यामुळें मी आपल्या खोलींत वाचीत बसलों असतांना वेळाचें भान राहिलें नाहीं. इतक्यांत कोणी आल्याची वर्दीची घंटा वाजली म्हणून मी दार उघडलें तों **निवास-सेविका** आली असून तिनें हास्यमुखानें 'बाहेर केव्हां जाणार, गेल्यावर मला आपली खोली, सामानसुमान व बिछाना यांची साफसुफी व लावा-लाव करावयाची आहे' असें म्हटलें. तेव्हां तेथल्या नेहमींच्या नियमा-प्रमाणें मला फराळास बाहेर जावयास पाहिजे व सेविकेकरितां लवकर खोली मोकळी करून दिली पाहिजे हें माझ्या ध्यानांत आलें. 'हा मीं बाहेर निघालों' म्हणून मीं म्हटलें. ती खालीं गेली व मग मी पेटींतून पैशांचें पाकीट काढून कोटाच्या खिशांत घातलें व खालीं येऊन "सायंकाळीं भोजनास परत येईन" असें **निवास-गृहिणीस** सांगून मी बंगल्याच्या बाहेर पडलों. घड्याळांत पहातों तों पावणेबा-राचा सुमार झाला होता. चि. मनोहरची परीक्षा एक वाजतां आटपून तो बिऱ्हाडीं जाऊन मग तीन वाजतां इकडे येईल असा मीं तर्क केला. तेव्हां त्यालाच बिऱ्हाडीं गांठून आश्चर्यचकित करावें अशी मला कल्पना सुचली. मला लंडनच्या भुयारी रेल्वेचा नकाशा (याचें चित्र सोबत दिलें आहे) दिलेला होता व आदल्या दिवशीं आमच्या बिऱ्हाडानजीकचें **बेलसाईज बाग** हें भुयारी स्टेशन मला दाखविलें होतें तेव्हां मी त्या स्टेश-नवर जाऊन **ट्रिनिटी रोड** या स्टेशनाचें तिकीट काढलें व विजेच्या पाळण्यानें खालीं गेलों. या पाळण्यांतून जातांना आपण पाताळांत जातों आहों कीं काय असा भास होतो. खालीं गेलें म्हणजे अर्ध-वर्तुळाकार भुयाराचीं भोकें व मधलें लंबवर्तुळाकार पांढऱ्या शुभ्र


संगमरवरी विटांनीं वरखालीं व बाजूला मढविलेलें स्टेशन व विजेच्या दिव्यांचा तो शुभ्र प्रकाश पाहून मी आश्चर्यचकित झालों. हिंदुस्थानांतील माणसाला, मग त्यानें त्या देशांत कितीहि प्रवास केलेला असो, लंडनांतली भुयारी रेल्वे म्हणजे एक अजब चमत्कार भासतो असें मी स्वानुभवावरून सांगतों. तो विजेनें चालणारा पाळणा-पन्नास पाऊणशें माणसें उभीं राहतील इतकी मोठी खोलीच असते ती--पांढरा शुभ्र व विजेच्या दिव्याच्या प्रकाशाच्या परिवर्तनानें शुभ्रतम भासणारा प्लॅटफार्म, तो आपोआप पायऱ्या वरवर जाणारा जिना हा सर्वच देखावा प्रथम पहाणाराला आश्चर्यमूढ करून टाकतो यांत शंका नाहीं. तीच माझी अवस्था झाली. या भुयारी रेल्वेच्या गाड्या दर दीडदोन मिनिटानें येतात. मला **मॉर्डेनला** जाणाऱ्या गाडींत बसावयाचें होतें. येणाऱ्या गाड्यांच्या शेवटच्या मुकामाचें ठिकाण विजेच्या दिव्यांनीं प्रकाशित केलेल्या पाट्यांवरून नवख्या माणसासमुद्धां सहज समजतें. त्याप्रमाणें मी **मॉर्डेनला** जाणाऱ्या गाडींत बसलों. गाड्यांत लांबच्यालांब गाद्या असलेल्या दुहेरी रांगा असतात किंवा आडवीं दुहेरीं बाकें असतात व मधून जाण्याची वाट असते. **ट्रिनिटी रोड** स्टेशनच्या पुढें जाईन म्हणून मी मधून मधून नकाशाकडे पहात होतों; यामुळें गाडींतल्या लोकांनीं मी लंडनमध्यें नवाच आलों आहें हें ताडलें असलें पाहिजे. थोड्याच वेळांत **ट्रिनिटी-रोड** ( दुसरें नांव **दुर्थींग बेक** ) आलें व मीं गाडीबाहेर उतरून पाळण्यानें वर आलों. व मुलाच्या बिऱ्हाडाच्या **ट्रिनिटीराईझ टलसहिल** या ठिकाणाचा शोध जवळ उभ्या असलेल्या पोलीस शिपायाजवळ केला. मी त्याला **दुलसहिल** कोठें आहे विचारलें; त्याला माझा उच्चार समजला नाहीं म्हणून Tulse असें स्पेलिंग सांगितलें. तेव्हां तो म्हणाला याचा उच्चार **टलस** आहे, **डुलस** नव्हे पण हें ठिकाण येथून दूर आहे. तेव्हां **ट्रिनिटीरोड** व **ट्रिनिटी राईझ** हे दोन रस्ते निराळे व माझी येथें येण्यांत चूक झाली हें माझ्या लक्षांत आलें. पण पोलीस शिपायानें सांगितलें कीं, येथून तुम्हीं ४९ नंबरची **बस** घ्या व त्याला **टलसहिलला**



लंडन : टलसाहिल ट्रिनिटीराईस रस्त्यावरील नं. ६६ चें घर

नं. ३ [ आमचें निवासस्थान ] पान ४६

# लंडनची भुयारी रेल्वे




नं. ४

जावयाचें आहे म्हणून सांगा म्हणजे तो तुम्हांस योग्य ठिकाणीं उतरवील व तेथून मग **ट्रिनिटीराईझला** चालत जातां येईल. इतक्यांत ४९ नंबरची **बस** आली व त्यांत मीं बसलों व कंडक्टरला माझा पत्ता सांगितला. त्यानें माझें उतरण्याचें ठिकाण आल्यावर येथें उतरा व समोरच्या रस्त्यानें सरळ जा असें सांगितलें. त्याचे आभार मानून मी खालीं उतरलों. घड्याळांत पहातों तों बरोबर एक वाजलेला. मी चि. मनोहराच्या बिऱ्हाडीं एकाचे आधीं पोहोंचेन असा माझा अंदाज होता पण तो चुकला. त्या चौकाच्या कोपऱ्यावरच सुंदर झाडावेलींनीं सुशोभित केलेलें उपाहारगृह दृष्टीस पडलें. तेव्हां येथें फराळ करून मग पुढें जावें असा विचार केला. तेथें फराळ केला व त्या बाईला माझें जावयाचें ठिकाण सांगितलें. तिनेंही "आतां सरळ रस्ता सुतासारखा आहे; पाहिजे तर चालत जा किंवा अर्ध्या वाटेवर गेल्यावर ट्राम लागेल; तेथून एक आणा ट्रामचालीवर तुमचें ठिकाण आहे" असें सांगितलें. बाईचें बिल चुकतें करून व तिचे आभार मानून मी वाटेनें चालूं लागलों. मी उभा असलेला चौक हा एका उंच टेकडीच्या पठारावर असून सरळ रस्ता खालीं खोल खोल गेला आहे असें दिसलें. हा रस्ता एकदम खोल उताराचा होता; पण तो फरसबंदी शुभ्र पांढरा रस्ता व पांढऱ्या शुभ्र पायवाटा व दोन्ही अंगांस तांबड्यालाल कौलारु दुमजली इमारती व त्यांच्या पुढल्या छोट्या-छोट्या बागा हा देखावा फार चित्ताकर्षक होता. यामुळें मी चालचाल चाललों तरी कंटाळा आला नाहीं. शेवटीं एकदां ट्रामचा रस्ता लागला. तेव्हां माझ्या जीवांत जीव आला. कारण उशीर झाल्यामुळें मनोहर निघून जाईल व मग चुकामूक होईल ही भीति पडली. ट्राममध्यें बसून **ट्रिनिटी राईझला** जावयाचें आहे असें कंडक्टरला सांगितलें. त्यानें एक पेनीचें तिकीट दिलें व माझ्या विनंतीप्रमाणें **ट्रिनिटी राईझ** रस्त्याजवळ मला उतरण्यास खुणावलें. शेवटीं एकदां **ट्रिनिटी राईझ** अशी रस्त्याची पाटी भिंतीवर प्रत्यक्ष पाहून इष्ट ठिकाणीं पोहोंचलों असा धीर

आला. आतां फक्त ६६ वरनंबर शोधावयाचा होता. तें काम फार सोपें होतें. कारण मला असें दिसलें कीं घराचे नंबर स्पष्टपणें दारावर लिहिलेले आहेत. उजव्या हातची घरांची ओळ सलग एकाला एक लागून होती व हीं सर्व घरें एकसारखीं, एकाच उंचीचीं, एकाच आकाराचीं व एकाच विटकर बांधणीचीं दुमजली होतीं; फरक काय तो खिडक्यांच्या पडद्यांचा व समोरच्या बागेमधील फुलझाडांचा होता; उजव्या बाजूला ४,६,८ असे नंबर लागले; यावरून येथें डाव्या उजव्या घरांना विषम सम आंकड्यांचे नंबर देण्याची पद्धति दिसली. शेवटीं एकदां सहासष्ट नंबर दृष्टीस पडला. विजेची घंटा बिघडल्यामुळें ती बंद आहे अशी चिठ्ठी दारावर लाविली असल्यामुळें मी हळूच पण आंत ऐकूं जाईल अशा बेतानें दारावर टिक टिक असे ठोके मारले; तोंच एका तरुण मुलीनें दार उघडलें. मला पाहिल्यावर आश्चर्यानंदयुक्त मुद्रेनें ती धांवत माडीवर गेली व तिनें आपली आई मिसेस बॉट यांना खालीं पाठवून दिलें. त्यांनीं उजव्या हातच्या उत्तम शृंगारलेल्या दिवाणखान्यांत मला नेलें व खुर्चीवर बसावयास सांगितलें. खुर्चीवर बसल्यावर त्या ह्मणाल्या "मिस्टर भाटे तर परीक्षा झाल्यावर परभारें आपल्याकडे जाणार होता व तो आतां तिकडे गेलाही असेल किंवा थोड्या वेळांत जाईल. तेव्हां आतां तुम्ही येथेंच थांबा; नाहींतर आणखी चुकामूक होईल. आपण आपल्या बिऱ्हाडीं नाहीं असें पाहून तो परत इकडेच येईल." तेव्हां मीं विचारलें "पण आपण मला ओळखलें कसें?" त्या म्हणाल्या "आमच्या विनीला आपला एका मराठी मासिकांत आलेला फोटो मिस्टर भाटे यानें दाखविला होता. म्हणून आपल्याला दारांत पहातांच आपल्याला ओळखून आपली जास्त विचारपूस न करितां ती तडक माझ्याकडे आली व मिस्टर भाट्यांचे वडील खालीं आले आहेत असें म्हणाली म्हणून मी आलें व मीही आपणास सहज ओळखलें. मासिकांतला आपला फोटो चांगला असल्यामुळें आम्हांस आपली ओळख पटण्यास मुळींच अडचण पडली नाहीं."

नंतर आमचें प्रवासाविषयीं पुष्कळ बोलणें झालें. मी सारखा परत जाण्याबद्दल गोष्ट काढीत होतों पण त्या कांहीं ऐकेनात. नंतर त्यांनीं आपलें सर्व घर मला दाखविलें. प्रथम जिन्यावर जाऊन पुढला मोठा दिवाणखाना ज्यांत त्या मायलेकी निजत असत तो त्यांनीं मला दाखविला. त्याला लागूनच मनोहराची खोली होती. त्याच्यापुढें न्हाणीगृह होतें व त्यानंतर आणखी दोन खोल्या दोन दुसऱ्या विद्यार्थ्यांच्या होत्या. या सर्व पाहिल्यावर आम्ही खालीं आलों व खालचें माजघर, स्वयंपाकगृह व मागचा दिवाणखाना पाहून मागच्या बागेंत गेलों. जिकडेतिकडे स्वच्छता, टापटीप व नीटनेटकेपणा पाहून मला आनंद वाटला. हें सर्व पाहून झाल्यावर आम्ही पुनः दिवाणखान्यांत आलों. तेथें त्यांनीं आपल्या पतीच्या वेळचे फोटो मला दाखविले; ( मिसेस बॉट या बाई विधवा होत्या व त्यांना एकच मुलगी **विन्फ्रेड** किंवा **विनी** नांवाची होती ). मिस्टर बॉट घरें बांधण्याचा धंदा करीत; ते फ्रीमेसन होते; लॅंबेथ या लंडनच्या **बरोचे** ते मेयर ( म्युनिसिपल अध्यक्ष ) होते व या नात्यानें प्रत्यक्ष बादशाहांच्या हस्तें त्यांना पदक मिळालें होतें वगैरे हकीकत त्यांनीं सांगितली. मला सांगतांना पतिनिधनाबद्दल शोक, पतीच्या सामाजिक दर्जाबद्दल अभिमान अशा मिश्र मनोवृत्ति त्यांच्या मनांत उद्भूत होत होत्या हें त्यांच्या चेहेऱ्यावरून व आवाजावरून मला कळून आलें. पण माझें मन गुंतलेलें राहावें व मला कंटाळवाणें वाटूं नये याकरितां त्यांची सर्व खटपट होती हेंहि मला समजून आलें व त्यांच्या सौजन्याबद्दल माझा अनुकूल ग्रह झाला. नंतर बोलण्याचे विषय संपलेच असें वाटून त्यांनीं मिस **विन्फ्रेडला** पाठ केलेल्या कविता म्हणावयास सांगितलें. त्या तिनें म्हटल्या. इतका वेळ झाला तरी मनोहरचा ठिकाण नाहीं. त्यामुळें त्यांना व मलाही आतां काय करावें असें झालें. पण इतक्यांत मनोहर नव्हे पण दुसरे एक त्यांच्याकडे राहणारे विद्यार्थी आले. तेव्हां मिसेस बॉटना बरें वाटलें. त्या लागलींच मला म्हणाल्या "तुम्हीं एवींतेवीं इतका वेळ थांबलांच आहां तेव्हां आतां मनोहरास भेटल्याखेरीज जाऊं नका. तो

वाट पाहून कंटाळून परत आल्याखेरीज रहात नाहीं. आमच्या शेजारीं ब्राकवेल बाग आहे. ती आमचे मिस्टर शाळिग्राम आपल्याला दाखवितील असें म्हणून त्यांनीं शाळिग्रामाचा व माझा परिचयविधि करून दिला. मग आम्ही दोघे बागेंत गेलों. ही बाग या बिऱ्हाडापासून फार नजीक होती. **ट्रिनिटीराईझ** हा रस्ता **नारवुड** या दक्षिणोत्तर जाणाऱ्या मोठ्या रस्त्याला मिळाल्यावर लागलींच डाव्या बाजूला ही मोठी बाग लागते. आम्ही बागेच्या प्रशस्त लोखंडी दारांतून आंत गेलों तोंच फुललेल्या फुलांचे ताटवे प्रथम दृष्टीस पडले. जिकडे तिकडे हिरव्या रंगाचा गालीचाच सर्वत्र पसरलेला आहे कीं काय असा भास झाला; बागेंत मोठमोठे प्रचंड वृक्ष बरेच आहेत व मध्यें मध्यें खुलीं मैदानें आहेत. बागेचा मधला भाग टेकडीवजा उंचवट्याचा असून तेथें राजवाड्यासारखी सुंदर इमारत आहे; त्यांत उपहारगृह व समोरच बँडमंदिर आहे; त्या उंचवट्याच्या ठिकाणावरून सभोंवारचा बराच भाग दृष्टीस पडतो. येथून आम्हीं पोहावयाच्या तलावाच्या आणि लहानशा पक्षीगृहाच्या बाजूनें जुन्या फुलबागेंत गेलों. तेथें नाना रंगांचीं, नाना आकाराचीं लहान मोठीं फुलेंच फुलें जिकडे तिकडे दिसत होतीं. लंडनांतील बाग पहिल्यानें पाहिल्यामुळें ही बाग माझ्या मनांत फार भरली व पुढें तर मी इकडे राहण्यास आल्यामुळें ही बाग म्हणजे माझी रोजची राबत्यांतलीच झाली. मि. शाळिग्राम यांनीं सांगितलें कीं, "ही बाग फार विस्तीर्ण म्हणजे १३६ एकर असून येथें टेनिस कोर्टें, फुटबॉल मैदानें वगैरे व्यायामाच्या सर्व सोई आहेत; सबंध बागेसभोंवतीं पण बागेच्या बाजूनें पायवाट असल्यामुळें या पायवाटेनें दोन तीन फेऱ्या केल्या म्हणजे चालण्याचा हवा तितका व्यायाम होतो; शिवाय आमचे बिऱ्हाडापासून ही बाग पांच मिनिटांच्या चालीवर आहे." अर्धा एक तास बागेंत फिरून व बागेची शोभा पाहून आम्ही परत बिऱ्हाडीं आलों. तरी सुद्धां मनोहर परत आला नव्हता. आतां मात्र मिसेस बॅाट यांना काळजी वाटली व मलाहि मनोहरास न कळवितां बेत बदलल्याबद्दल वाईट वाटलें. आतां मिसेस

बॉटचे रस्त्याकडे सारखे डोळे लागले होते. त्या आंतबाहेर सारख्या खेपा घालीत होत्या. शेवटीं एकदां त्यांना मनोहर दुरून दिसला व त्यांनीं आनंदानें ती बातमी मला सांगितली. “आतां तुम्ही बाहेर येऊं नका; मी जरा मनोहारची मजा करत्यें. याला सांगत्यें तुझे वडील या अफाट शहरांत वाट चुकले असतील; आतां आपणास पोलिसला वर्दी दिली पाहिजे” असें म्हणून त्या मनोहरास सामोऱ्या गेल्या व ठरल्याप्रमाणें त्यांनीं बतावणी केली असली पाहिजे. कारण मनोहर दारांत आला तों त्याच्या मुद्रेवर काळजी, कंटाळा व त्रास यांचीं स्पष्ट चिन्हें दुरून पाहणाऱ्याससुद्धां दिसत होतीं. शेवटीं तो जड पावलानें दिवाणखान्यांत येतो तोंच मिसेस बॉट यांनीं “हे घे तुझे वडील” असें म्हणून मला दाखविलें.

या अचानक भेटीमुळें मनोहरास अत्यंत आनंद झाला हें सांगणें नकोच. “मी आर्यभवनांतून कसा व कां बाहेर पडलों; ठरलेला बेत बदलून येथें येण्यास कसा निघालों व शेवटीं बिऱ्हाडीं कसा पोहोंचलों; मला मिस् विनी व मिसेस बॉट यांनीं ताबडतोब कसें ओळखलें, त्यांनीं दोन तीन तास संकोच न करतां मोकळ्या मनानें माझ्याशीं बोलूनचालून बंगला व बंगल्यांतील संस्मरणीय वस्तू दाखवून माझें मन सारखें गुंतवून ठेवून मला कसा कंटाळा येऊं दिला नाहीं” वगैरे सविस्तर हकीकत मी मनोहरास मराठींतून सांगितली. तेव्हां त्याला स्वतःच्या त्रासाचा व विमनस्कतेचा विसर पडून पुष्कळ मौज वाटली. आतां सायंकाळ झाली होती व मला परत जाणें प्राप्त होतें. “मी तुम्हांला बिऱ्हाडीं पोहोंचवायाला येऊं काय?” असें त्यानें मला विचारलें. मी म्हटलें, “तूं आतां तीन चार तास वाट पाहून कंटाळला आहेस. शिवाय, पोहोंचवून परत येण्यास किती तरी उशीर होईल; तेव्हां मीं एकटा जाईन; कोणत्या तऱ्हेनें जाणें सोईचें तें सांग म्हणजे झालें.” तो म्हणाला “जरी आर्यभवन येथून लांब आहे तरी दोन नंबरची बस न बदलतां स्वीस कॉटेजवरून जाते व स्वीस कॉटेजपासून आर्यभवन फारच जवळ व सरळ रस्त्याला

आहे." इतकी सोपी येण्याची सोय असतांना पुस्तकी व नकाशी ज्ञानावर विसंबून मीं कसा द्राविडी प्राणायाम केला व उगाच सगळ्यांना त्रास दिला असें मला वाटलें. मोठ्या प्रमुदित मनानें मी सर्वांचा निरोप घेतला. ब्राकवेल बागेच्या दारानजीक रस्त्यावर **बस** उभी राहण्याच्या खुणेचा खांब होता तेथें आम्ही आलों; इतक्यांत दोन नंबरची **बस** आली व मी **बसमध्यें** बसलों. "दुसरे दिवशीं दोनप्रहरचा फराळ झाल्याबरोबर मी तुमच्या बिऱ्हाडीं येतों" असें सांगून मनोहर परतला व मी पुढें चालू झालों. एका तासाच्या आंत मी **स्वीस कॉटेजला** आलों, व तेथें उतरलों. आदल्या दिवशीं फिरावयास गेलों तोच हा रस्ता हें माझ्या ध्यानांत आलें. म्हणून मी सरळ न चुकतां आर्यभवनांत गेलों. तों सायंकाळच्या भोजनाची वेळ झालीच होती; म्हणून वर जाऊन हात तोंड धुवून जेवणाच्या दिवाणखान्यांत आलों. सबंध दिवसांत बरीच चाल झाल्यामुळें व सहा सात तास बाहेर काढल्यानें मला भूक चांगली लागली होती. तेव्हां मी 'सुखेनैव भोक्तव्यं यद् यद् रोचते तत् तत् ग्राह्यम्' या मंत्राप्रमाणें यथेष्ट पोटभर जेवलों हें सांगावयास नकोच.

भोजनानंतर खोलींत येऊन सुखासीन झाल्यावर मी माझ्या विलायतेंतल्या आयुष्यांतील त्या संस्मरणीय दिवसाचें सिंहावलोकन करूं लागलों; तेव्हां मिश्र मनोविकार माझ्या मनांत उद्भूत झाले. मुलाशीं कां होईना पण ठरलेला संकेत त्याला न कळवितां बदलणें ही चूकच; तसेंच औपचारिक परिचयविधिपूर्वक भेट घ्यावयाची सोडून एकदम एकाकीं मिसेस बॉटची गांठ घेणें हेंहि गैरच; या वाईट गोष्टीबद्दल मला खरोखरीं खेद झाला. या वाईटांतूनच चांगल्या गोष्टी निष्पन्न झाल्या असें विचारांतीं मला वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. आधीं माहितगार सोबत्याच्या मदतीवांचून लंडनमध्यें पाहिजे तिकडे जातां येतें अशा विषयीं मला स्वावलंबनाचा धडा मिळाला व लंडननिवासाची प्रथम वाटणारी अडचण व भीति पार नाहींशी झाली. खेरीज लंडनच्या

प्रसिद्ध पोलीसच्या कर्तव्यतत्परतेचें प्रत्यंतर पटलें व लंडनचे पोलीस व हिंदवासीयांना परिचित हिंदुस्थानांतील पोलीस यामधला विरोध मनापुढें उभा राहिला. कोठं तो लंडन पोलीसचा साहाय्यक सभ्यपणा व समाज-सेवावृत्ति ! कोठें तो हिंदुस्थानांतील पोलीसचा अधिकारी ताठा व अंमल गाजवेगिरी ! कोठें ती लंडनच्या पोलीसचा काळा पोषाख पहातांच पूर्व परिचयामुळें उत्पन्न होणारी जिवांत जीव आणणारी विश्वासवृत्ति ! कोठें ती हिंदुस्थानांतील काळा डगला पाहतांच पोटांत धडकी भरविणारी पूर्वानुभवानें उत्पन्न होणारी भीतवृत्ति ! कोठें तो लंडनच्या हंसतमुख पोलीसचा पांढरा शुभ्र हातमोजा घातलेला व पांढऱ्या शुभ्र अस्तनीनें आच्छादिलेला संरक्षक खुणा करणारा हात ! कोठं तो हिंदुस्थानांतील उग्र पोलीसचा लाठी मार-ण्याकरितां उगारलेला लाठीबाज हात ! त्या दिवसाच्या अनुभवानें वरील-प्रमाणें दोन देशांतील पोलीसच्या परस्परविरोधी वृत्तींचें चित्र माझ्या डोळयासमोर उभें राहिलें. व हिंदुस्थानांतील पोलीसची अशी वृत्ति कां हा प्रश्न मनांत आला. त्याचें मनोमय उत्तरही तत्क्षणीं लक्षांत आलें. हा विरोध वंशपरंपरेनें आला आहे असें नाहीं; इतर बाबतींत जर एतद्देशीय लोक युरोपियनांच्या बरोबरीनें कामें करूं शकतात तर पोलीसच्या बाबतींत त्यांना तसेंच बरोबरीनें काम कां करतां येणार नाहीं ? पण हा विरोध पोलीस खात्यांतील भरती करण्याच्या भिन्नभिन्न पद्धतीमुळें उत्पन्न झालेला आहे. लंडनच्या पोलीस खात्यांत घेतलेले लोक चांगले शिकलेले असतात; आपलें काम लोकसेवेचें आहे व आपण समाजसेवक आहोंत अशा भावनेचें त्यांना शिक्षण दिलें जातें. म्हणूनच लंडन पोली-सची सर्व जगभर प्रख्याति झालेली आहे. हिंदुस्थानांत या खात्यांत निरक्षर, आडदांड, अपराधी व उडाणटप्पू अशा लोकांची भरती करतात; इतकेंच नव्हे तर पोलीस अंमलदारासारखे वरच्या दर्जाचे पोलीस कोर्टा-समोर भिकारबंदी कायद्यान्वयें आलेल्या किंवा दुसऱ्या कांहीं अपराधा-करितां आलेल्या आरोपी मधून निवडले जातात. शिवाय, कडकपणानें प्रजेवर अंमल गाजवावयाचेंच त्यांना मुख्यतः शिक्षण दिलें जातें. अशा

पद्धतीनें निवडलेले पोलीस लंडन पोलीसच्या तोडीचे कसे निघावे ! हिंदुस्थानांत आतां सुशिक्षित बेकार हजारों आहेत. तेव्हां सभ्य व सुशिक्षित लोकांची भरती करून सर्व पोलीस कर्तव्यतत्पर व समाजसेवक बनतील अशी सुधारणा घडवून आणणें हल्लीं अगदीं शक्य आहे. यायोगें पोलीस खात्याची सुधारणा होऊन सुशिक्षित बेकारीचा प्रश्न अंशतः सुटण्यासारखा आहे. पण लक्षांत कोण घेतो !

यामप्रमाणें माझ्या मनांत कल्पनांवर कल्पना येऊं लागल्या. तेव्हां माझा कल्पनावारू बेफाम होऊन सैरावैरा धांवूं लागला असें माझ्या ध्यानांत आलें व मी लागलीच विवेकरूपी लगाम जोरानें खेंचून कल्पनावारूला वाटेवर आणिलें व मग पुनः माझें सिंहावलोकन सुरळित सुरू झालें. आजच्या माझ्या अनुभवांपैकीं विलक्षण अनुभव म्हणजे मिसेस बॉट या मनोहराच्या निवासगृहिणीची अचानक व अनौपचारिक भेट. इंग्रजलोकां-बद्दल आपली हिंदुस्थानांत जी सामान्यतः कल्पना आहे तदनुरूप त्या इंग्रज बाईचें वर्तन नव्हतें. नाहीं तर "मिस्टर भाटे आपल्याकडे गेला आहे; तुमची चुकामूक झाली; पण तुम्हींच बेत बदलला त्याला तो काय करणार ?" असें म्हणून त्यांना मला वाटेला लावणें गैर नव्हतें. पण रूढीविरुद्ध परिचयविधीवांचून भेट झाली असतांना त्यांनीं ती गोष्ट मुळींच मनांत न आणतां माझ्याशीं घरोब्याच्या नात्यानें त्या वागल्या, मन मोकळें करून बोलल्या सवरल्या; त्यांनीं आपल्या घरांतल्या संस्मरणीय वस्तु मला दाखविल्या व माझे चार पांच तास मोठ्या आनंदांत जातील अशा तऱ्हेची तजवीज केली. यामुळें त्यांच्याबद्दल माझा फार अनुकूल ग्रह झाला व मनोहराला चांगली निवासगृहिणी मिळाली आहे असें माझ्या मनांत आलें. याप्रमाणें माझ्या त्या दिवसाच्या विविध अनुभवांचें सिंहावलोकन करतां करतांच निद्रादेवी माझ्यावर प्रसन्न झाली व मला सकाळपर्यंत एकसांधि झोंप लागली.

आपल्या इकडल्याप्रमाणेंच लंडनमध्यें शनिवार हा अर्धसुटीचा व रविवार हा सर्व सुटीचा दिवस असतो व या दोन दिवशीं रोजच्या दिन-

क्रमांत फरक होतो. रोज दोनप्रहरचा फराळ बाहेर व रात्रींचें सात-साडेसात वाजतांचें जेवण घरीं बिऱ्हाडीं होतें; पण या दोन दिवशीं दोनप्रहरीं फराळाऐवजीं जड अन्नाचें भोजन होतें, मग रात्रीं साडेआठ नऊ वाजतां नुसता अल्पाहारच होतो. यामुळें घरांतील सर्व मंडळींना फिरायला, पहायाला, भेटायाला, दूर जायला व करमणूक करावयाला सहासात तास अखंड मिळतात. तेव्हां या दोन दिवशीं मनोहरच माझे-कडे आला व मग आम्ही ब्रिटिश म्युझीयम व हाइडपार्क या लंडन-मधल्या प्रेक्षणीय स्थळांच्या मुकुटमण्यांचें ओझरतें दर्शन घेतलें. त्याचें सविस्तर वर्णन यथाक्रम पुढें येईल.

सोमवार ता. १२ आगष्ट १९२९ पासून मी नवखेपणा टाकून देऊन माझ्या कामास सुरवात केली. डॉ. परांजपे यांनीं इंडिया ऑफिसच्या वाचनालयाच्या अधिकाऱ्याची समक्ष ओळख करून देऊन त्याला माझा उद्देश सांगितला. त्यांनीं सर्व तऱ्हेची मदत करण्याचें आश्वासन दिलें व अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास आधीं इंग्रजींत लिहिण्याचा आग्रह केला. ते म्हणाले " आमच्या येथें मराठी वाङ्मय–भांडार आहे; पण तें आम्हाला कडीकुलपांत असल्याप्रमाणें आहे;तुमच्या पुस्तकानें त्याचें खुलें प्रदर्शन भरविल्याप्रमाणें होईल." त्यांचें म्हणणें मला पटलें व मी त्याप्रमाणें त्यांना आश्वासन दिलें. त्या वाचनालयांतील मराठी ग्रंथांचें विषयवार वर्गीकरण केलेल्या यादीचें पुस्तक व ब्रिटिश म्युझियम मधील मराठी ग्रंथांचें ग्रंथकाराच्या नांवाच्या वर्णानुक्रमानें केलेल्या यादीचें दोन भागांचें पुस्तक अशीं तिन्हीं पुस्तकें त्यांनीं मला घरीं उपयोगाकरितां म्हणून दिलीं, दुसरे दिवशीं डॉ. परांजपे यांचें शिफारसपत्र घेऊन मी ब्रिटिश म्युझियम वाचनालयाधिकाऱ्याकडे जाऊन वाचकाचें सहा महिन्याच्या मुदतीचें परवाना–तिकीट आणलें. याप्रमाणें माझ्या वाङ्मयीन कामाला सुरवात झाली. रोज दहा पासून चार पर्यंत मी वाचनालयांत जाऊन वाचीत बसूं लागलों व सायंकाळीं दोन तास फिरावयास जाऊं लागलों. सोमवारीं आर्यभवनाच्या गृहिणीनें अर्ध्या आठवड्याचें बिल दिलें. आम्हीं अधिक

व अवेळीं घेतलेला चहा, परीटाचे कपडे व वाचनालयाची महिन्याची फी मिळून साडेतीन पौंड बिल झालें. म्हणजे रोज सरासरीनें एक पौंड आकार झाला. हिंदुस्थानांतून निघतांना धरलेल्या अंदाजापेक्षां हा चार्ज जास्त होता. आर्यभवनांत माझ्यासारखे कोणीही विद्यार्थी नसल्यामुळें व बहुतेक व्यापारीपेशाची मंडळी असल्यामुळें न्याहारीची वेळ मला जरा उशीराची वाटली. कारण मला न्याहारी आटोपून दहा वाजतां इंडिया ऑफीसमध्यें पोहोंचतां येईना. खेरीज, मनोहरचें बिऱ्हाडही आर्यभवनापासून आठ मैल दूर. या सर्व अडचणी मनांत आणून मनोहरच्या शेजारीं कोठं तरी राहण्याची सोय करण्याचें मीं मनाशीं ठरविलें. मिसेस बॉट या आपल्या घरीं नेहमीं तीनच विद्यार्थी ठेवीत असल्यामुळें व त्यांचेकडे चवथी खोली नसल्यानें त्यांना विचारणें आम्हांला अडचणीचें वाटलें. तेव्हां मनोहराचा परीक्षेचा एक कागद त्या आठवड्यांत व्हावयाचा होता तो पुरा झाल्यावर आम्हीं हिंदी विद्यार्थ्यांना सल्लामसलत देऊन त्यांची खासगी कुटुंबांत पगारी पाहुणे म्हणून सोय करण्याकरितां नेमिलेले हिंदी गृहस्थ मिस्टर बानर्जी यांना विचारून मनोहराच्या शेजारींच बिऱ्हाड पहाण्याचा बेत केला. पण शनिवार ता. १७ आगष्ट रोजीं दोनप्रहरीं मनोहर मोठ्या आनंदाची बातमी घेऊन आला. तो म्हणाला "काल माझ्या परीक्षेचा कागद संपून मी घरीं गेल्यावर मिसेस बॉट मला म्हणाल्या "सध्यां तुला सुटी आहे म्हणून गोष्ट निराळी. पण तुझे वडील सात आठ महिने तरी येथें राहणार व तुला काय किंवा त्यांना काय एकमेकांना भेटण्याची इच्छा होणार, पण असें करण्यांत तुझा किती तरी वेळ जाणार व पैसाही खर्च होणार. तुझें कॉलेज सुरू झालें म्हणजे तर तुला त्यांना भेटणें कठीणच जाईल. तेव्हां तुझ्या वडिलांची हरकत नसेल तर त्यांना आपल्या येथेंच येऊन राहण्यास सांग. आपल्या येथें चवथी खोली नाहीं खरी; तरी आम्ही मायलेकी निजतों तो मोठा दिवाणखाना आहेच. त्यांत तुम्हीं बापलेक रहा म्हणजे झालें. आम्हीं तुझ्या खोलींत निजत जाऊं; म्हणजे तुम्हां दोघांना

नेहमींच एकत्र राहण्यास सांपडेल; रोज क्लासला जायला सांपडेल; लंडनला येऊन दूर दूर राहण्यापेक्षां अशा एकत्र राहण्यानें तुम्हां दोघांचेहि आठ महिने मोठ्या आनंदानें जातील. आम्हां मायलेकींना तुझी खोली लहान असली तरी एकत्र रहाण्याचा कांहीं एक त्रास वाटणार नाहीं. तेव्हां तुझ्या वडिलांना विचारून काय तें ठरवा." याप्रमाणें मिसेस वॅटनें आपली अडचण दूर केली आहे असें मनोहरानें मोठ्या आनंदानें सांगितलें. मलाही ही बातमी ऐकून फारच आनंद वाटला हें सांगणें नकोच. देवाजवळ मागावा एक डोळा व त्यानें द्यावे दोन डोळे अशांतली माझी गत झाली. मनोहरच्या शेजारीं कोठें तरी बिऱ्हाड शोधण्याच्या आम्ही विचारांत होतों; त्यायोगें एकमेकांच्या भेटीस थोडा जास्त अवसर मिळाला असता. त्या ऐवजीं एके ठिकाणीं एका घरांत राहावयास मिळालें हें पाहून मला किती आनंद झाला असल याची कल्पना माझ्यासारख्या स्थितीचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याखेरीज कळणार नाही.

हा आमचा बेत आम्हीं लागलीच आर्यभवनाच्या गृहिणीला कळविला. "शुभस्य शीघ्रम् या नात्यानें मी दुसऱ्या दिवशीं म्हणजे आदितवारीं न्याहारीला मनोहराचे बिऱ्हाडीं जाणार व म्हणून आजच्या दिवसासकट बिल तयार करा" असें सांगितलें. लागलींच आम्हीं सामानाच्या बांधाबांधीस लागलों. सर्व सामान बॅगांमध्यें भरून ठेऊन मग थोडे फिरावयास गेलों. ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं सकाळीं सात वाजतां चहा घेऊन व आर्यभवनाच्या देवडीवाल्यास व निवास-सेविकेस व आचाऱ्यास बक्षिसी देऊन टॅक्सी करून आठाच्या सुमारास **६६ ट्रिनिटी राईझ टलसहिल नैऋत्य २ लंडन** या मनोहराच्या बिऱ्हाडीं ता. १८ आगष्ट रोजीं येऊन पोहोंचलों. लंडन सोडीपर्यंत मी येथेंच राहिलों. याप्रमाणें लंडनमधल्या माझ्या पहिल्या **दशवड्याच्या** निवासाची हकीकत आहे. पुढील कथाभाग फारच अद्भुत व चित्ताकर्षक आहे अशी पुराणिकाप्रमाणें किंवा कादंबरीकाराप्रमाणें ग्वाही देऊन माझ्या यात्रापुराणाचा हा तिसरा अध्याय समाप्त करतों.

# प्रकरण ४ थें

## विराट-शरीरी लंडन शहर व त्याच्या शिरा व फुप्फुसें

**लंडन** शहरांतील असंख्यप्राय प्रेक्षणीय स्थळांचें सविस्तर वर्णन करण्यापूर्वीं, **लंडन** राजधानीचा विलक्षण विस्तार, त्याचे स्थानिक विशेष, त्याचीं दळणवळणाचीं साधनें व ज्यांना लंडन शहराच्या शिरा व फुप्फुसें म्हणतात त्या सडका व बागा या सर्वांचें विहंगमदृष्ट्या वर्णन करणें वावगें होणार नाहीं.

ब्रिटन देशांतील सर्वांत जुन्या शहरांपैकीं **लंडन** हें शहर आहे. ब्रिटिश बेटावरील रोमन लोकांच्या स्वारीपूर्वीच वसलेलें तें शहर आहे. त्यावेळच्या तद्देशीय सेल्टिक भाषेमध्यें त्याला **लिनडिन** ( तलावावरील टेकडी ) म्हणत असत. कारण त्या ठिकाणीं टेम्स नदी तलावासारखी रुंदावलेली व स्थिरावलेली होती. ( अजूनसुद्धां **लंडन-पुलानं**जिकच्या नदीच्या त्या भागाला **तलाव** म्हणतात ) व ज्या उंच जागेवर हल्लीं सेंट पॉलचें प्रार्थनामंदिर आहे त्याला टेंकडी म्हणत. रोमन लोकांनीं आपल्या भाषेमध्यें मूळच्या नांवाचें रूपांतर **लंडिनियम** असें केलें व या शहराचें **लंडन** हें नांव रोमन नांवाचें अर्वाचीन रूपांतर होय. **टेम्स** नदीवरील लंडन हें शहर फार पुरातनकाळापासून उत्तम बंदर म्हणून प्रसिद्ध होतें व बंदर व शहर या दुहेरी नात्यानें त्याची विलक्षण वाढ व्हावी अशा तऱ्हेचेच त्याचे स्थानिक विशेष होते. कारण लंडन शहर हें सपाट, सखल अशा विस्तीर्ण प्रदेशाच्या मधोमध वसलेलें आहे. इंग्लंड देशाचा दाक्षिणेकडचा सर्वच भाग सपाट व सखल आहे. हा प्रदेश पश्चिमेकडून पूर्वेकडे उतरत गेला आहे खरा. पण एकंदर प्रदेश समुद्र-सपाटीच्या वर फारसा उंच नाहीं. या लांबच लांब प्रदेशाची टेंकड्यां-

मुळें व नद्यांच्या योगानें तीन लहानमोठीं खोरीं झालेलीं आहेत. पश्चिमे-कडे एक चिंचोळी पट्टी झाली आहे. तिच्यांत **सेव्हर्न** व **ॲव्हन** नांवाच्या दोन नद्या वाहतात; व **ग्लॉस्टर, ब्रिस्टल** व **बाथ** हीं शहरें वसलीं आहेत. या पट्टीच्या पूर्वेस व दक्षिणेस टेकड्या व डोंगर आहेत; वरच्या बाजूस **कॉट्स्‌ वोल्ड** टेंकड्या, मध्यावर **मार्लबरो** टेकड्या व दक्षिणेस **मेंडिप** टेकड्या असून या सर्व टेंकड्या अरुंद सुळक्यांनीं जोडलेल्या असल्यामुळें या टेंकड्यांच्या उतरणीवरील पाणी ओढ्या-नाल्यांच्या द्वारें **ॲव्हान** व **सेव्हर्न** नांवाच्या दोन नद्यांना मिळतें व या नद्या **ब्रिस्टल आखातास** मिळतात.

**कॉटसवोल्ड** टेंकड्यांच्या पूर्व बाजूस **सात झरे** या ठिकाणापासून किंवा त्याच्या जरा दक्षिणेस **टेम्सहेड** नांवाच्या ठिकाणापासून **टेम्स** नदीचा उगम आहे असें समजतात व या नदीच्या प्रथमतः दक्षिणवाही व नंतर पूर्ववाही प्रवाहांनीं दोन खोरीं बनतात. दुसरें खोरें जवळजवळ वर्तुळाकार असून बरेंच लहान आहे व तिसरें खोरें म्हणजे पूर्वेकडचा सर्व प्रांतच होय. हें दुसरें खोरें **कॉटसवोल्ड** टेंकड्या, **मार्लबरो** टेंकड्या व **चिलटर्न** टेंकड्या यांनीं वेष्टिलेलें आहे. या खोऱ्यांत उत्तरे-कडून **चेरवेल** व पश्चिमेकडून **आझीस ( टेम्सचें** आधींचें नांव ) या नद्या येतात व त्यांच्या संगमावरच **ऑक्सफर्ड** हें शहर वसलें आहे. त्यांच्याच जरा दक्षिणेस या संगम पावलेल्या नद्यांना **टेम** नांवाची नदी येऊन मिळते व या त्रिवेणी संगमानंतरच ही नदी **टेम्स** हें जगप्रसिद्ध नांव धारण करते. या खोऱ्याचे दक्षिणेस ही नदी **चिलटर्न** टेंकड्या व **व्हाईट हार्स** टेंकड्या यांच्या चिंचोळ्या चिळणींतून बाहेर येते व पूर्ववाहिनी होऊन पूर्वेकडच्या सपाट सखल प्रदेशाच्या मधून नागमोडी वळणांनीं वाहात जाऊन इंग्लिश खाडीच्या उत्तर टोंकाशीं **उत्तर-समुद्राला** जाऊन मिळते. या नदीच्या कांठींच व सपाट प्रदेशाच्या मधोमध लंडन शहर वसलें आहे.

**टेम्स** नदीची एकंदर लांबी सुमारें दोनशें मैल आहे, पण ही नदी बहुतेक सपाट प्रदेशांतून वाहते. **सात झऱ्याचा** प्रत्यक्ष उगम समुद्र-

सपाटीपासून सातशें फूट उंच आहे; पण **टेम्सचें** जरा खालचें उगमस्थान जें **टेम्स–हेड** तें अवघें ३५६ फूट उंच आहे. **ऑक्सफर्ड** येथें नदीची रुंदी १५० फूट आहे तर **लंडनपुलाशीं** नदीची रुंदी ७५० फूट आहे. या नदीचा दर मैलीं उतार अवघा वीस इंचांचा आहे. यामुळें नदीचा प्रवाह फार संथ चालतो; शिवाय **टेम्सचें** मुख **उत्तर–समुद्र** व **इंग्लिश–खाडी** यांच्या संगमाशींच असल्यामुळें **टेम्स** नदीला दुजोरा भरती येते व लंडन बंदरांत उधानाची भरती वीस फूट उंच येते. या दोन अनुकूल स्वाभाविक कारणांनीं टेम्स नदी नौकानयनक्षम झाली आहे. जागोजाग नदीमध्यें कृत्रिम बांध व दुहेरी दरवाजे (ज्यांना इंग्रजींत water-locks म्हणतात) यांच्या योजनेनें पाणी होड्यांना पुरेसें राहण्याची तजवीज केल्यामुळें उगमाजवळचे वीस एक मैल सोडून ही नदी सररहा जलमार्ग बनली आहे. अशा मोठ्या नौकागमनयोग्य नदीच्या कांठीं असल्यामुळें व सपाट प्रदेशाच्या मध्यें असल्यामुळें लंडन शहराचा विलक्षण विस्तार होऊं शकला. पण या विस्तीर्ण राजधानीचें मूळ म्हणजे लंडनचें कसबें होय. याचा विस्तार अवघा ६७३ एकर आहे व त्याची रात्रीं राहणारी लोकसंख्या फक्त चौदा हजार आहे; पण दिवसाची लोकसंख्या सुमारें चार लाख असते व हे सर्व लोक सदा कामांत गुंतलेले असतात. **यार्क** व **वुंचेस्टर** यांना एकामागून एक राजधानीपदाचा मान मिळाल्यानंतर महा **ऑलफ्रेडच्या** कारकीर्दींत **लंडन** कसब्यास राजधानीचा मान मिळाला. **टेम्स**नदीवर **लंडनपूल** नांवाचा पहिला पूल सन ९९४ मध्यें बांधण्यांत आला. वास्तवीक याला पूल म्हणण्यापेक्षां बाजारपेठ म्हणणें योग्य होय. कारण सर्व पुलावर दुकानें व घरें बांधलेलीं होतीं व त्यांचा तळमजला कमानींचा केला असल्यामुळें कमानींखालून जाण्यायेण्याचा रस्ता होता. लंडन पुलाजवळ नदीकांठावर असलेल्या लंडनकिल्ल्यामध्यें **विलयम धि कॉंकरर** यानें अजून शाबूद असलेला शुभ्र उंच बुरुजी बंगला बांधिला. लंडनपुलाच्या पूर्वेस बोटींचे धक्के

बांधण्यांत आले व तेथें माल भरलेलीं मोठमोठीं गलबतें लागत व आतां सुद्धां लंडनच्या प्रचंड गोद्या व धक्के हे **लंडनपुलाच्या** पूर्वेसच आहेत. मात्र आतां पश्चिमेकडच्या **क्यूपुलापासून** पूर्वेकडील **ग्रीनीचपुलापर्यंत** अठरा मैलांच्या नदीच्या दुथडीला सारखे धक्केच धक्के आहेत व तेथें लहान-मोठीं सर्व प्रकारचीं गलबतें, होड्या व बोटी लागण्याची सोय केलेली आहे असा आश्चर्यकारक लंडनबंदराचा विस्तार झाला आहे.

राजधानी या नात्यानें लंडनचा विस्तार क्रमाक्रमानें होत गेला आहे. प्रथम कसबें लंडन या मूळ शहराला पश्चिमेकडील **वेस्टमिन्स्टर** हें खेडें जोडण्यांत आलें. या खेड्याचें क्षेत्रफळ २५०० एकरांचें होतें. या दोन्ही गांवांना विशेष हक्क देण्यांत आले व त्या प्रत्येकाचें निराळेंच स्थानिक कौन्सिल स्थापण्यांत आलें. **वेस्टमिन्स्टरला** लंडनचें **पश्चिम टोंक** ( West End ) म्हणत व तेथें राजेरजवाड्यांचे राजवाडे होते. लंडन कसबें याला **पूर्वटोंक** ( East End ) म्हणत व तेथें सामान्य लोक व व्यापारी लोक रहात.

लंडन राजधानीचा विस्तार सावकाश व क्रमाक्रमानें झाला व तिची वाढ प्लेगची सांथ व मोठी आग या आपत्तींनीं कांहीं काळ खुंटली; याचें स्पष्ट गमक असें आहे कीं, **टेम्स** नदीवरील दुसरा पूल-**वेस्ट मिन्स्टर** पूल-**लंडन पुलानंतर** सातशें शतकांनीं सन १७५० मध्यें बांधण्यांत आला. पण पुढल्याच एका शतकांत लंडनचे सर्व प्रख्यात पूल बांधण्यांत आले. हल्लीं लंडन राजधानीमधल्या टेम्स नदीच्या १८ मैलांच्या नागमोडी प्रवाहावर भुयारी रेल्वे, भूपृष्ठ रेल्वे व जाण्यायेण्याचे रस्ते या सर्वांचे मिळून सुमारें तीस पूल झालेले आहेत.

**लंडन** राजधानीचे **टेम्स** नदीनें उत्तर व दक्षिण असे दोन भाग केले आहेत. **महत्तर लंडनचा** नकाशा पाहिल्यास असें दिसतें कीं, टेम्स नदी पश्चिमेकडून बारीक शेपूट दक्षिण दिशेस लोंबत असलेल्या व पूर्व बाजूस रुंद डोकें व जबडा असलेल्या नागिणीप्रमाणें शहराच्या मधून

सरसर चालली आहे. कारण लंडनच्या नैऋत्य दिशेस असलेल्या **रिचमंड** टेंकड्यांपलीकडून **टेम्स** नदी थेट उत्तरेस वाहात आहे व **क्यु** पुलाजवळ ती नदी एकदम पूर्वेकडेस वळते व नंतर नागमोडी वळणा-वळणानें शहराच्या अगदीं मधून वहात जाते. हीं वळणें जवळजवळ अर्धवर्तुळाकार आहेत. यामुळें शहराला नयनमनोहर विविधता आली आहे; व शहरांत नदीप्रवाह पुष्कळ लांबीचा झाला आहे.

राजधानीचा उत्तर भाग **लंडन** कसबा, **वेस्ट मिन्स्टर** गांव व दुसरीं सतरा खेडीं मिळून झालेला आहे व दक्षिण भाग दहा खेड्यांचा मिळून झालेला आहे. या उत्तर व दक्षिण भागांमध्यें एकंदर ७५००० हजार एकर जागा आहे किंवा त्याचें एकंदर क्षेत्रफळ ११६ मैलांचें आहे. हें एकंदर क्षेत्र म्हणजे खरी **लंडन** राजधानी. या राजधानीचा सर्व सार्व-जनिक कारभार **लंडन कौंटी कौन्सिल** नांवाच्या सभेकडे आहे. **लंडन** कसबा, **वेस्ट मिन्स्टर** गांव व बाकीचीं सत्तावीस खेडीं या २९ भागांच्या स्थानिक व्यवस्थेकरितां एक एक निराळी सभा आहेच. या राजधानीची लोकसंख्या सुमारें पंचेचाळीस लाख आहे. या राजधानीच्या सभोंवार **महत्तम लंडनाच्या** शाखा उपनगरें म्हणून पसरलेल्या आहेतच. या महत्तम लंडनचें क्षेत्रफळ ७०० मैल आहे; आणि त्याची लोकसंख्या पाऊण कोट आहे; तेव्हां हल्लींचें **महत्तम लंडन** हें **चेरिंगक्रॉस** या मोठ्या स्टेशनरूपी मध्यबिंदूपासून बारा मैलांच्या त्रिज्येनें काढलेल्या वर्तुळाच्या आकाराचें शहर आहे. खरोखरीच लंडन शहराचे नकाशे याच नमुन्यावर काढलेले आहेत व त्या नकाशांत **चेरिंगक्रॉस**पासून एक एका मैलाच्या अंतरावर वर्तुळें आंखलेलीं आहेत. या नकाशाच्या मदतीनें अगदीं परक्या माणसासुद्धां लंडनमधल्या दोन प्रेक्षणीय स्थळांमधलें अंतर किंवा आपल्या राहत्या ठिकाणापासूनचें अंतर चटकन समजतें.

आतां या विस्तीर्ण राजधानींतील दळणवळणाच्या साधनांकडे थोडेंसें लक्ष पुरवूं या.

दळणवळणांतल्या साधनांतलें साधन म्हणजे **पादचार** होय. हें नव्या व जुन्या जगांत रानटी व सुधारलेल्या देशांत सर्वत्र पसरलेलें आद्य साधन होय. या पादचारास अत्यंत सुखकर अशा लंडन शहरांतल्या सडका आहेत. महत्तम लंडनमध्यें एकंदर सात हजार मैल लांबीचे रस्ते व सडका आहेत. सर्व रस्त्यांना व सडकांना दोन्ही बाजूंस स्वतंत्र पायवाटा ठेवलेल्या आहेत. सामान्यतः घरांच्या रांगांमधील मोकळ्या जागेचे तीन सारखे भाग केलेले दृष्टीस पडतात. मधला किंचित् सखल व दोन्हीं बाजूस तेवढाल्याच जरा उंच पायवाटा. केव्हां केव्हां तर मूळ रस्त्यापेक्षां पायवाट जास्त रुंद असते. यामुळें लंडन शहरांत विलक्षण गर्दी असून पादाचारी लोकांस सुरक्षितपणें व निःशंकपणें जातांयेतां येतें. मात्र रस्ता ओलांडतांना काळजी घ्यावी लागते. पण जागोजाग ‘ येथून रस्ता ओलांडा ’ अशा मोठ्या अक्षरांच्या पाट्या लावलेल्या असल्यामुळें व अशा ठिकाणीं रस्त्याच्या मधोमध लहान लहान दोन खांब किंवा उंचवटा ठेवल्यामुळें अर्ध्या रस्त्यावर सुरक्षितपणें थांबतां येतें. याप्रमाणें पादचारी लोकांची फार सोय होते व केव्हांही भर रस्त्यावर चालण्याचा प्रसंगच येत नाहीं. लंडनचे रस्ते व सडका निरनिराळ्या तऱ्हेनें केलेले आहेत. मुंबईमध्यें हल्लीं मोठमोठे रस्ते ज्या तऱ्हेनें केलेले आहेत तसे **अस्फ़ाल्टचे** रस्ते, कांक्रीटचे रस्ते, दगडी फरशीचे रस्ते, लांकडी विटांचे रस्ते, डांबरी खडीचे रस्ते किंवा दगडगोट्यांचे रस्ते असे नानाविध तऱ्हेनें केलेले लंडनचे रस्ते आहेत. पण ते सर्व निर्धूळ, निर्मळ व गुळगुळीत असतात. जरी जास्त जलद जाणारीं दळणवळणाचीं साधनें उपलब्ध आहेत, तरी लंडनमध्यें पादचारी लोक पुष्कळ दृष्टीस पडतात. हिंदुस्थानांतून लंडनला नवथर आलेल्या माझ्यासारख्याच्या दृष्टीला इकडले लोक जणूं काय पळत आहेत असा भास झाला. हिंदुस्थानप्रमाणें रेंगाळत, सावकाश व आळसांत चालण्याची येथें पद्धत नाहीं. येथें सर्व लोक अत्यंत कामांत गुंतलेले व घाईत असलेले दिसतात व तद्नुरूप त्यांचा पादचार फार जलद व झपाझप पावलांचा वाटतो!

बायका तर जास्तच तुरतुर चालतांना दिसतात; यामुळें आपल्या संस्कृत कवींची आवडती उपमा 'गजगति' ही इकडल्या बायकांना मुळ शोभणार नाहीं. त्यांच्या प्रत्यक्ष जलद चालीला अनुरूप 'मृगगति' अशी नवीन उपमा स्त्रियांच्या तुरतुर चालीला देणें अन्वर्थक होईल. लो फार झपाझप व जलद पळाल्याप्रमाणें चालल्यामुळें रस्त्यांत बो बसण्यास किंवा मोठ्यानें गोंगाट करण्यास सवड नसते व म गर्दीच्या मानानें इकडले रस्ते जास्त शांत व निवांत वाटतात. लंडनचे रस्ते परकीय माणसास अत्यंत गोंधळांत पाडणारे अ कारण या रस्त्यांना विलक्षण वळणें आहेत हें एक, शिवाय खरो लांबच लांब व सलग एकाच रस्त्याला निरनिराळीं नांवें आहेत. उदा णार्थ, लंडन कसब्याच्या मध्यभागीं असलेल्या जगप्रसिद्ध लंडन पेढी-पासून पश्चिमेकडे समांतर असे दोन सलग रस्ते **वेस्टमिन्स्टर** गांवाच्या पलीकडच्या भागांत जातात. एक रस्ता **हाईड पार्क** नांवाच्या प्रचंड बागेच्या उत्तर बाजूनें जातो व दुसरा त्या बागेच्या दक्षिण बाजूनें जातो, पण या एका रस्त्याच्या मधल्यामधल्या तुकड्यांना निरनिराळीं नांवें आहेत. हीच दक्षिणोत्तर जाणाऱ्या रस्त्यांची स्थिति आहे. यामुळें लंडनमध्यें नव्यानें येणाऱ्या प्रवाशाची प्रथम मोठी धांदल उडते; पण थोडक्याशा अनुभवानें लंडनचे रस्ते अगदीं पायाखालचे होतात.

लंडनकर कितीही जलद व झपाझप चालत असले तरी पादचार हें दळणवळणाचें सर्वांत सावकाशीनें मार्गक्रमण करणारें साधन असल्यामुळें जास्त जलद जाणारीं सुखसोईचीं साधनें येवढ्या विस्तृत शहरांत आवश्यक आहेत हें उघड आहे. व तदनुरूप अशीं पुष्कळच साधनें तेथें आहेत; तिकडे आतां लक्ष दिलें पाहिजे.

पादचारापेक्षां जास्त जलद साधन म्हणजे घोड्यांच्या गाड्या होत. पण या गाड्या मोटारटॅक्सी झाल्यापासून बंद झाल्यासारख्या आहेत. मात्र अवजड मालाची नेआण करणाऱ्या खटारा गाड्या, घरोघर जाणाऱ्या किंवा थोड्या थोड्या अंतरावर थांबणाऱ्या कामकऱ्यांच्या गाड्या,

वाल्यांच्या गाड्या या घोड्याच्या असतात. गाड्यांचे घोडे फारच सरदारी थाटाचे असतात. तेथें इकडल्यासारखीं तट्टू घोडीं दिसतच नाहींत. घोडे उंच, भव्य, पाणीदार व भरदार असतात; त्यांच्या पायांतील केस पुष्कळच लांब असतात (त्या देशांतील थंडीमुळें ते लांब होत असतील). लंडनमध्यें प्रथमच पाऊल टाकणारास या घोड्यांच्या पायांचें आश्चर्य वाटतें. पण आतां भाडें करणाऱ्या घोड्यांच्या गाड्या राहिल्याच नाहींत. त्यांची जागा मोटार टॅक्सीनीं भरून काढली आहे. पण या मोटार टॅक्सी महाग असतात; मैलीं जवळजवळ एक **शिलिंग** भाडें पडतें. तेव्हां सामान्य लोक या दळणवळणाच्या साधनांचा क्वचितच उपयोग करतात.

लंडनमधलें तिसरें दळणवळणाचें साधन म्हणजे विजेची ट्रामगाडी हें होय. शहाराच्या सर्व भागांमध्यें या ट्रामगाड्यांचें जाळें पसरलेलें आहे. या ट्रामगाड्या लंडन कौंटी कौंसिलच्या मालकीच्या असून त्या सभेच्या देखरेखीखालीं यांची व्यवस्था आहे. राजधानीच्या मुख्य भागामध्यें व अत्यंत रहदारीच्या रस्त्यांवर या ट्रामगाड्या रुळाच्या खालून नेलेल्या विजेच्या शक्तीनें चालतात. यामुळें मुंबईप्रमाणें ताराचें जाळें रस्त्यावर दिसत नाहीं. परंतु कमी रहादारीच्या रस्त्यावर व राजधानीच्या सरहद्दीच्या रस्त्यावर मुंबईप्रमाणें वरच्या तारांनीं नेलेल्या विजेनें या ट्रामगाड्या चालतात. लंडनमधल्या ट्रामगाड्या स्वस्त व सोयीच्या आहेत पण त्या फारशा शीघ्रगामी नाहींत; शिवाय ट्रामगड्यांनीं शहरांतल्या सर्व भागांना पोंहचतां येतेंच असें नाहीं व कांहीं कांहीं ट्रामचे गमनमार्ग सरळ नाहींत, तर ते वळणावळणाचे असल्यामुळें इष्ट ठिकाणीं जाण्यास बराच वेळ लागतो व केव्हां केव्हां ट्रामहि बदलावी लागते.

चवथें शीघ्रगामी दळणवळणाचें साधन म्हणजे शहरांतल्या जमिनीवरल्या रेल्वे होत. पूर्वीं एकमेकांशीं चढाओढ करणाऱ्या निरनिराळ्या रेल्वे कंपन्या होत्या व म्हणून व्यवस्थेंत बराच घोटाळा होता. पण

हल्लीं हा सर्व घोटाळा जाऊन एकंदर **चारच** रेल्वे कंपन्या करण्‍ आल्या आहेत व त्यांचीं वेगवेगळालीं मुख्य स्टेशनें आहेत. शहराच्‍ दक्षिण भागाला **सदर्न** रेल्वे (S. R.) कंपनीचा रस्ता असून त्याचीं **वाटर**, **चेरिंग क्रॉस** व **व्हिक्टोरिया** अशीं तीन प्रचंड स्टेशनें आहेत. कार युरोप खंडाचें लंडनशीं दळणवळण याच रेल्वेरस्त्यानें होतें. उत्तरे बाजूला तीन कंपन्या आहेत. लंडन मिडलंड स्कॉटिश रेल्वे (L.M.S. ग्रेट वेस्टर्न रेल्वे ( G. W. R. ), लंडन नॉर्थ ईस्टर्न रेल्वे ( L. N. E. R व अनुक्रमें **युस्टन** व **सेंट पँक्रियस, पॅडिंगटन** व **मेरिलीबोर्न** अ **किंग्स क्रॉस** व **लिव्हरपूल** अशीं प्रत्येक कंपनीचीं दोन दोन स्टे आहेत. या सर्व कंपन्यांच्या लाइन्स शहरांतून व शहराबाहेरच्या खेड्यां-पाड्यांत पसरलेल्या आहेत व म्हणून राजधानीच्या कोणत्याहि भागांतून दुसऱ्या कोणत्याहि भागांत रेल्वेनें जातां येतें. या रेल्वेचें केवढें जाळें शहरांत पसरलें आहे याचें गमक हें होय कीं **महत्तम लंडन** शहरांत रेल्वेचीं एकंदर सहाशें स्टेशनें आहेत. परंतु रेल्वेचें दळणवळण जरा महागाईचें आहे.

पांचवें सोयीचें व स्वस्त दळणवळणाचें साधन म्हणजे **आमनीबस** ( बोलतांना याचें **बस** असें संक्षेपरूप झालें आहे ) होय. या **बसला** ट्रामप्रमाणें किंवा रेल्वेप्रमाणें लोखंडी रूळ व स्वतंत्र रस्ता लागत नसल्यामुळें ही बससार्व्हिस लंडनच्या कोनाकोपऱ्याच्या भागाला जाते व सर्व महत्तम लंडनच्या एका सीमेपासून दुसऱ्या सीमेपर्यंत म्हणजे पंचवीस पंचवीस मैलपर्यंत बसेस जातात. व इतक्या लांबच्या प्रवासाचें भाडें दोन शिलिंगांपेक्षां जास्त नसतें. एक पेनीपासून अंतराच्या मानानें २४ पेनी किंवा दोन शिलिंगांपर्यंत बसचें भाडें असतें. सर्व बसेस दुमजली असतात व त्याचा दुसरा मजला अगदीं उघडा असतो व दोन्ही मजले मिळून ७२ माणसांची सोय असते. येथल्या ट्राम्सहि दुमजली असून माणसें बसावयाची बसच्या इतकीच सोय असते. या उघड्या बसच्या दळणवळणाच्या योगें लंडनचीं सर्व प्रेक्षणीय स्थळें व देखावा ओझरतें

होईना पण सहज जातां जातां पाहून होतात. बससर्व्हिसच्या या अद्वितीय सोईमुळें प्रसिद्ध मुत्सद्दी **ग्लॅडस्टन** यांची प्रसिद्ध उक्ति लंडन-साधानें सुभाषित बनली आहे. कांहीं अमेरिकन प्रवाशांनीं लंडन कसें पहावें असें विचारलें असतां ग्लॅडस्टननें मोठ्या आवेशानें सांगितलें " सभ्य गृहस्थहो, लंडन पहावयाचा उत्तम मार्ग म्हणजे बसचा माथा—पायचा माथा, बरें सद्गृहस्थहो. "

आतांपर्यंत वर्णन केलेलीं दळणवळणाचीं साधनें हीं हल्लीं तरी हिंदुस्थानांतील मोठमोठ्या शहरांत प्रचारांत असल्यामुळें त्यांचा थोडा फार परिचय वाचकांस आहे. मात्र लंडनमध्यें हीं साधनें प्रचंड प्रमाणावर चाललेलीं आहेत व तीं दूरदूर अंतरापर्यंत पसरलेलीं आहेत. परंतु शेवटचें व सहावें साधन हें मात्र हिंदुस्थानाला अगदीं अपरिचित आहे. लंडनमध्यें नव्यानें जाणाऱ्यास त्याची मौज वाटते व तो प्रथमतः तर आश्चर्यचकित होतो. हें साधन म्हणजे जमिनीखालील रेल्वे व भुयारी रेल्वे या होत. हें दळणवळणाचें साधन फारच शीघ्रगामी असून तें फार स्वस्तहि आहे. जमिनीवरील रेल्वे रस्त्याच्याप्रमाणें या जमिनीखालील रेल्वे व भुयारी रेल्वे चालविणाऱ्या वेगवेगळ्या व परस्परांशीं चढाओढ करणाऱ्या खासगी कंपन्या होत्या. जमिनीखालील रेल्वे ( underground Railway ) या जमिनीखालून जात पण त्या फार खोल नसत, वीस-पंचवीस फुटांच्या खोलीवरच त्या असत; भुयारी रेल्वेना (tube Railway) म्हणत व या जमिनींत खालीं फार खोल—शंभर फुटांपर्यंतसुद्धां—असत. पण आतां या नानाविध कंपन्या व रेल्वेचे दोन प्रकार हे सर्व मोडून सर्व कंपन्यांचें व सर्व जमिनीखालील व भुयारी अशा दोन्ही तऱ्हेचे रेल्वे-मार्ग यांचें एकीकरण करून '**लंडन अंडरग्राऊंड रेल्वे संस्था**' या नांवाची एकच कंपनी करण्यांत येऊन सर्व रेल्वे रस्त्यांचें जाळेंच्या जाळें त्यांच्या ताब्यांत व व्यवस्थेखालीं देण्यांत आलें आहे. सबंध लंडन शहरभर एकमेकांना जोडलेल्या अशा सात भुयारी रेल्वे आहेत. त्यांचा सुंदर नकाशा फुकट मिळतो; तसेंच या अंडरग्राऊंड संस्थेनें लंडनचें

सुंदर सचित्र असें तीनशें पानाचें **माहिती–पुस्तक** काढलें आहे. त्या किंमत एक शिलिंग आहे. लंडनला जाणाऱ्या प्रत्येक प्रवाशानें हें पुस्त व हा नकाशा सतत जवळ बाळगण्यासारखा आहे. नकाशाचें छायाचि या लेखासोबत दिलें आहे.

या भुयारी रेल्वेची रचना आश्चर्यकारक आहे यांत शंका नाहीं. उ रेल्वेचा सर्व रस्ता भुयारांतून नेलेला असतो. सर्व रस्ता म्हणजे मैलच मैल केलेला बोगदा होय. एक आगगाडी जेमतेम जाईल इतका ल बोगदा असतो; स्टेशनच्या ठिकाणीं मात्र तो एका बाजूला प्लॅटप होईइतका रुंदावलेला असतो व स्टेशनच्या ठिकाणीं प्लॅटफार्म व बोग-द्याच्या बाजूवरचा वर्तुळाकार भाग हे सर्व पांढऱ्या शुभ्र संगमरवरी विटांनीं बांधून काढलेले असतात व सर्वत्र विजेचे दिवे लावलेले असतात. यामुळें जिकडे तिकडे पांढराच पांढरा प्रकाश पडलेला असतो. हा देखावा आश्चर्यजनक असतो. स्टेशनच्या ठिकाणीं पुढल्या सर्व स्टेशनांचीं नांवें व आगगाडीचा शेवटचा मुक्काम यांच्या सोनेरी अक्षरांच्या व विजेच्या दिव्यांनीं प्रकाशित झालेल्या पाट्या लावलेल्या असतात. यामुळें नवख्या प्रवाशासुद्धां इष्ट ठिकाणीं पोहोंचण्यास अगदीं अडचण भासत नाहीं; शिवाय खिशांत अंडरग्राऊंडचा छोटेखानी नकाशा असला म्हणजे तर त्या ठिकाणाहून पाहिजे तिकडे कसें जावयाचें तें तेव्हांच समजतें. स्टेशनहून वर येण्यास किंवा स्टेशनकडे खालीं जाण्यास खोलीयेवढाले मोठे विजेचे पाळणे तरी असतात, किंवा आपोआपच चढणाऱ्या पाय-ऱ्यांचे जिने तरी असतात. या जामिनीखालील किंवा भुयारी रेल्वेनें मुख्य शहराच्या बरेंच बाहेर जातां येतें. तेव्हां एक विलक्षण विरोधाभासाचा प्रकार घडून येतो. स्टेशनच्या पाटीवर ‘ **जमिनीखालील** रेल्वे ’ अशीं अक्षरें असतात; परंतु या जमीनीखालील स्टेशनचा प्लॅटफॉर्म गांठण्यास आपल्यास जिन्यावरून **वर चढावें** लागतें व प्लॅटफॉर्मवर गेल्यावर आप-ल्याला असें दृष्टीस पडतें कीं रेल्वे रस्ता दोन्हीं बाजूंच्या घरांपेक्षां उंचीवरच आहे. परंतु गाडी सुरू होऊन भराभर जाऊं लागली कीं लागलीच

ारांत गाडी शिरते व मग ती सारखी भुयारांतूनच जाते ! लंडनचें भुयारी रेल्वेचें दळणवळणाचें साधन फार स्वस्ताईचें, सुखाचें व शीघ्रमी आहे यांत शंका नाहीं.

लंडन राजधानींत वर वर्णन केलेलीं विविध दळणवळणाचीं साधनें ेत. तीं निरनिराळया संस्थांच्या मालकीचीं असल्यामुळें व एका णाला या नाहीं तर त्या साधनानें पोहोंचतां येत असल्यामुळें सर्वांमध्यें त्याकडे गिऱ्हाइकी मिळविण्याची चढाओढ सुरू असते. म्हणून लोकांसोयी करण्याची व त्यांना सवलती देण्याची या संस्थांमध्यें अहमहमिका ते. उदाहरणार्थ, बस कंपनी काय किंवा ट्राम कंपनी काय दोन्हीचीं ीं सारखीं असतात व दोन्ही संस्था आठवड्याच्या कामाच्या दिवसांत डपटीच्या सवलतीनें जातां येतांचें भाडें आकारतात; तर दिवसा दहा वाजेपासून तों चार वाजेपर्यंत कंपनी अर्ध्या दरानें भाडें आकारतात. तसेंच ट्राम मजुरांकरितां सकाळीं सहापासून साडेसात आठपर्यंत अर्ध्या दराची मजूरांना सवलत देते. शिवाय एक शिलिंगाला सबंद दिवसाचें सर्वगामी ट्रॅम तिकीट मिळतें. जर एखाद्या माणसाला सकाळपासून रात्रीं बारापर्यंत सबंद दिवसभर सारखें फिरत राहण्याची शारीरिक शक्ति व सोशिकपणा असेल तर त्याला सर्व लंडन शहराचें ओझरतें दर्शन एका दिवसांत घडेल ! जमिनीवरील रेल्वे कंपन्या लंडन शहराच्या आसपासच्या व दूरदूरच्या ठिकाणांना जाण्यायेण्याकरितां खूब सवलतीच्या आठवड्याच्या अखेरीचीं मुदतीचीं तिकिटें काढतात ! या सर्व संस्था जाहिरातींची रेलचेल करतात व लंडन व त्याच्या आसपासचीं प्रेक्षणीय स्थळें या संबंधींचे नकाशे व मार्गदर्शक पुस्तकें फार कमी किंमतीस व केव्हां केव्हां फुकट देतात ! अशा मार्गदर्शक पुस्तकांचा उत्तम मासला म्हणजे मागें उल्लेखिलेलें भुयारी रेल्वे संस्थेनें काढलेलें एक शिलिंगाचें सुंदर छपाईचें सचित्र मार्गदर्शक पुस्तक होय.

या सर्व दळणवळणाच्या साधनांचा लंडनकर मोठ्या प्रमाणावर उपयोग करतात. शहरांतील जमिनीखालील व जमिनीवरील रेल्वे मिळून

दरवर्षास **चौपन्न कोट** लोक प्रवास करतात! मोठमोठ्या चार रे कंपन्या आसपासच्या ठिकाणांहून **बासष्ट कोट** लोकांची नेआण व तात! ट्राम **सत्याण्णव कोट** लोकांची नेआण करते व **बसम एक अब्ज एकाहत्तर कोट** लोक जातात येतात! म्हणजे मह लंडन् शहरांतील एकंदर रहदारी **तीन अब्ज ऐशीं कोटी** लोकांची या अवाढव्य रहदारीची कल्पना दुसऱ्या तऱ्हेनें अशी देतां येईल. स्थानची लोकसंख्या **पसतीस कोटी** आहे त्याचे **अकरापट** दर व महत्तम लंडनची रहदारी आहे!

लंडन राजधानींतील दळणवळणाच्या विविध साधनांचें वर्णन करत पर्यायेंकरून मी विराट-शरीरी लंडन शहराच्या शिरांचें वर्णन केल्य सारखेंच आहे. कारण शरीरामध्यें शिरांच्या द्वारें शुद्ध रक्त खेळतें; त्याप्रमाणें लंडनच्या सात हजार मैल लांबीच्या रस्त्यांनीं शहरांतील दाट वस्तीला शुद्ध हवा मिळते. कारण वर सांगितल्याप्रमाणें लंडनचे रस्ते निर्धूळ व निर्मळ आहेत व सर्व रस्त्यांना दुहेरी पायवाटा आहेत. यामुळें शुद्ध व मोकळी हवा खेळण्यास मुबलक अवकाश आहे. शिवाय ज्या ठिकाणीं चार किंवा अधिक रस्ते एके ठिकाणीं मिळतात असे प्रशस्त चौक पुष्कळ आहेत. त्यांना स्क्वेअर ( square ) किंवा सरकस ( circus ) म्हणतात. उदाहरणार्थ, **ट्राफलगार** स्क्वेअर, **ऑक्सफर्ड** सरकस, **पिकाडिली** सरकस, **लडगेट** सरकस हे लंडनमधले मुख्य प्रख्यात चौक आहेत.

विराट–शरीरी लंडन शहराच्या उल्लेखानंतर ज्यांना लंडनचीं फुप्फुसें म्हणतात त्यांचा उल्लेख करणें क्रमप्राप्त आहे. सातशें स्क्वेअर मैल पसरलेल्या विराट–शरीरी लंडन शहराचीं फुप्फुसेंहि त्या प्रमाणांत प्रचंड असलीं पाहिजेत व तीं तशीं आहेत!

लंडन शहराचीं हीं फुप्फुसें म्हणजे तेथलीं वनें, उपवनें व खुलीं मैदानें होत! प्रजाहिततत्पर राजांनीं आपल्या खासगी जमीनी सार्वजनिक उप

गाकरितां देणगी दिल्यामुळें हीं उपवनें बनवितां आलीं आहेत. मुख्य न कौंटी कौन्सिल व निरनिराळीं सत्तावीस बरो–कौन्सिलें यांनीं सगी मिळकती विकत घेऊन हीं केलेलीं आहेत; किंवा सार्वजनिक तबुद्धि गृहस्थांनीं मृत्युपत्रान्वयें दिलेल्या देणग्यांनीं हीं बनविलेलीं त; शेवटीं, जुन्या काळचीं खेड्यांतील गायरानें तशींच मोकळीं न हीं उपवनें बनविलेलीं आहेत. महत्तम लंडनच्या लांब रुंद अशा र्ण प्रदेशांत हीं उपवनें इतकीं समप्रमाणांत पसरलेलीं आहेत कीं दी **पार्क**, एखादी **ग्रीन**, एखादी **गार्डन**, एखादी **हीथ** किंवा एखादी **मन**–लंडनच्या फुप्फुसांना अशीं विविध नांवें आहेत–लंडनच्या णत्याहि भागापासून पंधरावीस मिनिटांच्या अंतराच्या आंत असतात. लंडनकर या वनोपवनांचा पूर्णपणें उपयोग करून घेतात व शनिवारीं रविवारीं प्रत्येक वनोपवनांत लोकांच्या झुंडीच्या झुंडी दृष्टीस पडतात.

लंडन शहरभर पसरलेलीं हीं वनोपवनें विस्तारानें, स्थानभेदानें व रचनावैचित्र्यानें विविधरूप आहेत तरी त्यांमध्यें कांहीं सर्वसामान्य गुण आहेत. बहुतेक सर्व वनोपवनांना अनेक प्रवेशद्वारें असून द्वारप्रदेशीं नानाविध रंगांचे नयनमनोहर फुलझाडांचे व सदापानी झाडांचे ताटवे असतात. बहुतेक सर्वांमध्यें खेळाडू लोकांकरितां खेळण्याच्या सोयी केलेल्या असतात; बहुतेकांमध्यें पाणझाडांनीं फुललेले तलाव व पुष्करणी असतात. पुष्कळ पार्कांमध्यें पोहण्याचीं जलमंदिरें व होडी वल्हविण्याची सोय असलेले तलाव असतात. बहुतेक वनोपवनांत भोवतीं व सीमेवर उंच उंच झाडांची रांग असून त्याखालून पाऊलवाट ठेवलेली असते; पुष्कळ वनोपवनांत मधून मधून घनदाट छायेच्या राई असतात; किंवा दुतर्फा झाडांनीं आच्छादिलेले सुंदर रस्ते असतात. पुष्कळ वनोपवनांत ब्यांडगृह असतें. बहुतेकांमध्यें बसावयाकरितां मोफत बाकें ठेवलेलीं असतात; तसेंच, कापडी आराम खुर्च्या व लोखंडी छोट्या खुर्चा भाड्यानें देण्याकरितां ठेवलेल्या असतात. या खुर्चांपैकीं कांहींना ऊन प्रत्यक्ष डोक्यावर लागूं नये म्हणून कापडाच्या **कॅनोपी** असतात; या भाडोत्री खुर्च्यांना सबंद

दिवसाचें दोन पेनी भाडें पडतें. शेवटीं बहुतेक मोठ्या उपवनांत एक चहापानगृह असतें. उन्हाळयामध्यें तर उघड्यावर चहा देण्याचे व्यवस्था असते व त्याकरितां एका उंच खांबावर एक छत्री ठेवलेली अस व त्यासभोंवार चार पांच खुर्च्या ठेवतां येतात व अशा छत्राखालीं चारच पांचपांच मंडळींच्या टोळया चहा घेतांना दृष्टीस पडतात व अशा तऱ्हें तेथें पुष्कळ लोक छत्रपती होतांना दिसतात! राजधानीच्या दाट वस्तीच भागामध्येंसुद्धां एकंदर ७००० एकर आवाराचीं वनोपवनें आहेत; मह लंडनांत आणखी १७००० एकरांचीं वनोपवनें आहेत! लंडन कौं कौन्सिल व बरोकौन्सिलें यांच्याच खुद्द मालकीचीं १५० च्या वर व पदनें आहेत. चेरिंगक्रॉसपासून दहाबारा मैलांवर असलेलें एपिंग फारे नांवाचें वन म्हणजे खरोखरीचें जंगल आहे. तें ५००० एकर आहे. तें दाट व उंच झाडांनीं, झाडोऱ्यांनीं व वेलीगवतांनीं चिकार भरलें आहे. रस्ता सोडून अशा रानांत शिरलें असतां दिशाभूल होऊन मनुष्य वाट चुकतो व मग तासचे तास हिंडलें तरी वाट सांपडत नाहीं. उन्हाळयामध्यें या दूरच्या वनालासुद्धां हजारों लोक शनिवारीं व आदित्यवारीं भोजनास जातात व सबंद दिवस भटकण्यांत मौजेनें घालवून सायंकाळीं घरीं परत येतात.

विराट—शरीरी लंडन शहराचीं अशीं विस्तीर्ण फुप्फुसें आहेत. त्यांच्यापैकीं कांहींचें सविस्तर व विशेष वर्णन प्रेक्षणीय स्थळांचें वर्णन करतांना यथाक्रम मी देणार आहें. या लेखांत लंडन शहराचें विहंगमदृष्ट्या सामान्य स्वरूप कथन केलें आहे. त्यावरून लंडन राजधानीच्या विस्ताराची व विशिष्टपणाची अंधुक तरी कल्पना वाचकांस होईल अशी आशा आहे. लंडन शहराचा आकृतिरूप नकाशा या प्रकरणांत काढला आहे. त्यामध्यें तपशील भरण्याचें काम पुढील प्रकरणांत व्हावयाचें आहे.

# प्रकरण ५ वें

## लंडनकरांची रहाणी व चालरीत

**प्रसिद्ध** इंग्रज लेखक व तत्त्वज्ञानी **बेकन** यानें मानवी भ्रमोत्पादक प्रवृत्तींचें विवरण करतांना माणसांचे **आद्यग्रही** व **अंत्यग्रही** असे भेद पाडले आहेत. एखादा पदार्थ पाहिल्याबरोबर किंवा कांहीं गोष्ट अनुभवल्याबरोबर जो बराबुरा ग्रह एकदां मनावर होईल त्यालाच चिकटून राहणारा माणूस आद्यग्रही माणूस होय. उ. नवख्या माणसाचा प्रथम परिचय होऊन त्याच्याशीं दोन चार शब्द बोलल्यावर जो काय अनुकूल किंवा प्रतिकूळ ग्रह होईल तो त्या माणसाबद्दलचा ग्रह कायम उराशीं बाळगून बसणारे गृहस्थ पुष्कळ दृष्टीस पडतात. वकिलांचा न्यायाधीशाबद्दलसुद्धां असा अनुभव आहे. कांहीं न्यायाधीश असे असतात कीं दाव्याच्या प्रारंभीं वादीविरुद्ध किंवा प्रतिवादीविरुद्ध त्यांनीं एकदां ग्रह करून घेतला, कीं शेवटपर्यंत तो ग्रह ते सोडून देत नाहींत. एखादा शिक्षक एखाद्या शिष्याबद्दल प्रथमच्या अनुभवावरून आपला ग्रह बनवितो व मग तो सोडून देण्यास तो तयार नसतो. अशा प्रवृत्तीच्या माणसांना व्यवहारांत आपण **दुराग्रही** म्हणतों. पण बेकनच्या मतें तीं माणसें खरोखरी **आद्यग्रही** असतात. साधकबाधक प्रमाणें पाहून किंवा मागचापुढचा सारासार विचार करून मतें बनविणारी शास्त्रीय किंवा सत्यप्रिय प्रवृत्ति त्यांच्यामध्यें नसते. '**एक घाव दोन तुकडे**' अशी त्यांचीं वृत्ति असते. पहिल्यानें काय वाटलें तें ठाम मत. याच्या उलट अंत्यग्रही माणसाची प्रवृत्ति असते. आपला शेवटचा व अगदीं ताजा अनुभव असेल त्यावरून असा मनुष्य आपला ग्रह बनवितो. अशा प्रवृत्तीच्या न्यायाधीशावर शेवटच्या वक्त्या वकीलाच्या म्हणण्याचा परिणाम होतो व त्याप्रमाणें तो दाव्याचा

निकाल देतो. कांहीं कारणांनीं एखादे वेळीं मनुष्याच्या हातून कृत झाली कीं त्याबद्दल प्रतिकूल ग्रह अंत्यग्रही मनुष्य करून घेतोंच मनुष्याचे अनुभव बहुत कालचे असून अनेकविध असूं शकतील हें मनुष्य विसरतो. आद्यग्रही मनुष्य हा खरोखरी दुराग्रही असतव आपला ग्रह बदलण्यास तयार नसतो. त्याच्या उलट **अंत्यग्रही** मत. असतो. तो खरोखरी **चंचलबुद्धि** असतो. आज जें त्याचें मत हणू राहील असा भरंवसा नाहीं. वाऱ्याचा रोख दाखविणाऱ्या यंत्र मा अंत्यग्रही माणसाचे ग्रह किंवा मतें बदलत जातात. मात्र त्या माहेत आपण **चंचलवृत्ति** आहों असें वाटत नाहीं. आपलें शेवटचें मत सत्यख व तें कधींहि फिरणार नाहीं अशी त्याची वेडी समजूत असते. वर्‍ह केलेल्या दोन प्रवृत्तींच्या माणसाच्या कोणत्या वर्गांत आपण पडतो ज्याचें त्यास कळत नाहीं. मलाहि ती गोष्ट लागू आहे. आठ महिन्यांच्या निवासानें लंडनकरांची रहाणी याबद्दल झालेला माझा ग्रह मी या लेखांत देणार आहें; मग तो कोणाला आद्यग्रह वाटो किंवा अंत्यग्रह वाटो किंवा साधकबाधक विचार करून आलेला शास्त्रीय ग्रह वाटो.

जातवारीनें, पंथवारीनें, वर्णवारीनें व वर्गवारीनें ठरलेल्या नानाविध पोषाखाला व पागोट्याला चिरपरिचित असा हिंदी माणूस लंडनला प्रथम गेला म्हणजे जी गोष्ट त्याच्या नजरेंत भरते ती लंडनकरांच्या एकसारख्या पोशाखाची होय. तिकडील पुरुषांचा पोशाख हा बऱ्याच काळापासून रूढ झालेला आहे. त्याला हिंदुस्थानांत आपण **विलायती पोशाख** म्हणतों. आतां हिंदुस्थानांत युरोपियनाच्या सहवासानें सरकारदरबारीं पोषाख म्हणून तो गणला गेला आहे; तसेंच पुष्कळ बौद्धिक धंद्यांचा तो पोषाख ठरल्यासारखा झाला आहे. पुष्कळ लोक परदेशगमन करून आलेले असल्यामुळें हा पोषाख हिंदी लोकांत, विशेषतः वरच्या वर्गाच्या व्यक्तींमध्यें, रूढ होऊं पहात आहे. पण लंडनमध्यें गेल्यावर जी गोष्ट नवलाची वाटते ती ही कीं, प्रत्येक पुरुषाच्या— रावापासून रंकापर्यंत; मालकापासून मजूरापर्यंत, वरिष्ठ अंमलदारापासून कनिष्ठ नोकरापर्यंत—

पोशाखाची तऱ्हा व पद्धति एकसारखी झाली आहे. कापडाची किंमत उंचीपणा यांत काय फरक असेल तेवढाच काय तो फरक पडावयाचा. हानथोरांच्या पोशाखाच्या या सारखेपणाची गोष्ट नेहमीं माझ्या मनावर ण्याच कारण आमच्या शेजारच्या ब्राकबेल बागेच्या—या बागेंतून त सकाळीं मी ट्राम रस्त्याला जात असें—माळयाची भेट होय. गळपट्टा कॉलर, वेस्टकोट ( जाकीट ), जाकीट ( शॉर्टकोट ), वेस्टकोटाच्या खिशांतून लोंबणारी घड्याळाची सांखळी असा पूर्ण पोशाख केलेला गृहस्थ जणू कांहीं खांद्यावर बंदूक टाकून शिकारीला चालला आहे असें मला वाटे.

तिकडील बायकांच्या पोषाखांत मात्र महायुद्धापासून क्रांति घडून आलेली दृष्टोत्पत्तीस येते. इकडे आपल्याला चिरपरिचित असा जुना युरोपियन बायकांचा पोशाख तिकडे आतां नामशेष झाला आहे. ते रस्त्यावरील केर काढीत जाणारे पायघोळ लांबच लांब चुण्याचुण्यांनीं फुगलेले व झालरीनें गुंफलेले झगे, त्या नानारंगी पिसांनीं विचित्र दिसणाऱ्या व विविध आकाराच्या शिपतरी टोप्या, ते विलक्षण उंच टाचेचे अरुंद व निमुळते जोडे नाहींसे झाल्यासारखे आहेत. हल्लीं तिकडील स्त्रिया बिनचुण्याचे बिनझालरीचे गुडघाघोळ आखुड झगे घालतात, कापलेल्या केसावर डोक्याला घट्ट बसणाऱ्या बनातीच्या बिनपिसाच्या टोप्या घालतात व कातडीच्या रंगाच्या गुडघ्याच्यावर येणाऱ्या पायमोज्यावर कमी उंच टाचेचे जोडे घालतात. युरोपियन बायांच्या पूर्वीच्या पोशाखापेक्षां हा हल्लींचा पोशाख काम करण्याजोगा व सुखसोयीचा आहे यांत शंका नाहीं. पुरुषांप्रमाणें हा सुधारलेला स्त्रियांचा पोषाखही सर्वत्र रूढ झाला आहे व म्हणून इनामदारणीपासून मोलकरणीपर्यंत, शेटाणीपासून शिक्षकिणीपर्यंत, सर्व दर्जाच्या स्त्रिया एक तऱ्हेचा पोषाख घालतात. मात्र पुरुषांच्यापेक्षां बायकांच्या पोषाखांत लष्करी एकतानी सारखेपणा नसून रमणीय विविधतायुक्त सारखेपणा आलेला आहे.

पूर्वपरंपरा, सक्तीचें शिक्षण, प्रौढमताधिकार इत्यादि जास्त महत्त्वाच्या गोष्टींनीं राष्ट्रीय एकोप्याची भावना व देशाभिमान यांचा जनमनां उद्भव व विकास व्हावा हें स्वाभाविक आहे. पण पोषाखाचा सारखे पणा ही गोष्ट त्या भावनांना पोषक आहे, निदान त्यामुळें समाजांती वर्गावर्गांमधील तट तुटतात व खालच्या वर्गांतील लोकांना वर आल् सारखें वाटतें यांत शंका नाहीं. आगबोटीवर असतांना एका विश्वस हिंदी गृहस्थाच्या तोंडून ऐकलेल्या खालील घडलेल्या गोष्टीवरून विधानाला पुष्टी मिळते. लंडनमधल्या राजमार्गाच्या पायवाटेवर बु पॉलिश करणाऱ्या चांभाराला एका हिंदी गृहस्थानें आपला बूट पॉ करण्यास दिला. तें काम करीत असतां त्या चांभारानें त्या गृहस् विचारलें. 'आमचा अंमल हिंदी लोकांना कितपत आवडतो ?' इंग्रज-समाजाच्या वरखालच्या सर्व थरांमध्यें केवढी एकजीवपणाची भावना ही !

जी गोष्ट पोषाखाची तीच गोष्ट रोटीव्यवहाराची. लंडनमध्यें भोजनालयें, उपाहारगृहें व चहापानगृहें अतोनात आहेत; पण सर्वांमध्यें सारखीच व्यवस्था व स्वच्छता दिसून येते; इतकेंच नाहीं तर हीं सर्व मोठमोठ्या कंपन्यांच्या शाखा होत. उदाहरणार्थ लंडनमध्यें **ए. बी. सी.** (एरिएटेड ब्रेड कंपनी) कंपनी, **एक्प्रेस डेअरी** कंपनी, व **लायन्स** कंपनी यांच्या अक्षरशः हजारों शाखा आहेत व त्या विस्तीर्ण लंडनमध्यें सर्वत्र पसरलेल्या आहेत.

या शहराची एकंदर मांडणी मोठी मजेदार आहे. एक आळी खाजगी वस्तीची व खाजगी राहण्याच्या घरांची असते; व तिला लागूनच सर्व प्रकारचीं दुकानें असतात. अशा दुकानांच्या किंवा बाजाराच्या भागांतच उपाहारगृहें व चहापानगृहें असतात. अशा तऱ्हेनें सर्व शहरभर पसरलेलीं हीं उपाहारगृहें आहेत. यामुळें आपल्या कामाच्या ठिकाणच्या नजीक असलेल्या **लायन्स** कंपनीच्या एखाद्या उपाहारगृहांत नेहेमीं फराळ करीत असलेल्या गृहस्थास लंडनच्या दुसऱ्या कोणत्याहि भागांत **लायन्सचें** उपाहारगृह सांपडेल व त्याला दुसऱ्या कंपनीच्या उपाहारगृहांत

ाण्याची गरज पडणार नाहीं. अशा मोठमोठ्या कंपन्या अस-
ामुळें त्यांना मोठ्या प्रमाणावर जिन्नस करतां येतात व व्यवस्थित
ीनें सर्व शाखांना सारखे जिन्नस पुरवितां येतात. साधारण लोकांना
गृहें फार सोईचीं व स्वस्ताईचीं वाटतात. शिवाय या गृहांमध्यें
रांना 'बक्षिसी' द्यावी लागत नाहीं. कंपनीच त्यांना बक्षिसी-
ीं ठराविक **बोनस** देते.

ा खेरीज राजविलासी विख्यात निवासगृहें ज्यांना हॉटेल्स म्हण-
तीं निराळींच. तेथें राहण्याजेवण्याची सोय असते. अशा मोठ-
्या हॉटेलांना लागून चहापानगृहें असतात; पण तीं जरा महागाईचीं असतात. या सर्व गृहांमध्यें भेदाभेद मुळींच नसतो. त्यांत श्रीमंतगरीब उच्चनीच या सर्वांना सारखाच प्रवेश मिळतो व आपआपल्या पैशाच्या पिशवीच्या कमीं अधिक लांबीप्रमाणें व आपल्या आवडीप्रमाणें फराळाची व न्याहारीची व्यवस्था करतां येते. हिंदुस्थानांत शूद्रकाच्या काळीं अशीं सर्वांना मुक्तद्वार असणारीं गृहें असतीं तर त्यानें **मुक्तद्वार** गोष्टीच्या दाखल्यांत उपाहारगृहाचा अवश्य समावेश केला असता. शूद्रक कवीचें तें कवन लंडनांतील उपाहारगृहांना तंतोतंत लागू आहे म्हणून त्याचें येथें अवतरण घेतों.

**वाप्यां स्नाति विचक्षणो द्विजवरो मूर्खोऽपि वर्णाधमः ।**
**फुल्लां नाम्यति वायसोऽपि हि लतां या नामिता बर्हिणा ॥**
**ब्रह्मक्षत्रविशस्तरंतिच्च यया नावा तयैवेतरे ।**
**त्वं वापीव लतेव नौरिव जनं वेश्यासि सर्वं भज ॥**

लंडनांतल्या काय व इतर ठिकाणच्या काय हॉटेलांची व उपाहारगृहांची वरल्यासारखीच स्थिति आहे. गुदस्तसालीं अमेरिकन लोकांच्या नादानें जेव्हां एका निग्रो गृहस्थाला हॉटेलांत मज्जाव झाला तेव्हां त्या हॉटेलाच्या मालकाला शूद्रकाच्या उपमेनें व दाखल्यानें उपदेश करण्याची पाळी आली होती.

लंडनमधलीं काय किंवा तिकडील इतर शहरांतील काय सर्व उपाहार गृहें म्हणजे केवळ चैनीचीं विलासाचीं गृहें आहेत असें मात्र नाहीं. अत्यंत आवश्यक उपयुक्त व सोईस्कर अशा त्या संस्था आहेत.कारण तिकडल्या शहरी राहणीप्रमाणें-विलायतेंत बहुतेक राहणी शहरी झाली आहे-सकाळीं सात साडेसात किंवा आठ साडेआठ या वेळची न्याहारी घरीं करून लोक आपआपल्या उद्योगाला बाहेर जातात; त्यांना बारा एक वाजतां मीं दोन प्रहराच्या फराळास घरीं परत येणें अशक्य असंतें. कारण गाडा घरपरतीला वेळहि मोडतो व ट्राम वगैरेला पदरमोडहि होते. म्हणून आपल्या उद्योगस्थानाच्या आसपासच्या उपाहारगृहांत जाऊन फराळ करणें लोकांना भाग पडतें व असें करणें सोयीस्कर व स्वस्ताईचें होतें. कारण या उपाहारगृहांत फराळ आठदहा आण्यापासून रुपया दोनरुपयां-पर्यंत आपआपल्या ऐपतीप्रमाणें, आवडीप्रमाणें व आवश्यकतेप्रमाणें घेतां येतो; शिवाय वर वर्णिल्याप्रमाणें उपाहारगृहांत कोणताहि भेदाभेद नसतो व रावापासून रंकापर्यंत तीं सर्वांना मोकळीं अस-तात. पोशाखाच्या सारखेपणाप्रमाणें या रोटीव्यवहारांतहि अशा उपाहारगृहसंस्थांमुळें तिकडे एकसारखेपणा आला आहे. पोशाखाच्या व रोटीव्यवहाराच्या सारखेपणाचा परिणाम सामाजिक भेदाभेद नाहींसे करून समाजांत एकजीवपणा उत्पन्न करण्यांत झाला आहे यांत शंका नाहीं.

हिंदी माणसाच्या व विशेषतः उत्तर हिंदुस्थानांत हिंडलेल्या माण-साच्या मनांत भरणारा लंडनकरांच्या राहणींतला दुसरा विशेष म्हणजे तिकडल्या बायकांची पुरुषांच्या बरोबरीनें सर्व व्यवसायांत भाग घेण्याची रीत होय. मग ते व्यवसाय मोलमजूरीचे, मोफतचे, सन्मान्यतेचे, विद्या-कलार्जनाचे किंवा सुखविलासाचे असोत. लंडनमध्यें तुम्हीं खासगी किंवा सरकारी कचेरींत जा, दुकानांत किंवा कारखान्यांत जा, उपाहारगृहांत किंवा वाचनालयांत जा, जिकडे तिकडे तुम्हांला बायका काम करतांना दिस-तील. हल्लीं कांहीं कांहीं धंदे तर केवळ बायकांचे झाल्यासारखे झाले आहेत.

प्राथमिक शिक्षकाचा, टाइपिंगचा, मालविक्रीचा व वाढपाचा या धंद्यांत पुरुष क्वचितच दृष्टीस पडतील. सिनेमा, नाटकगृहें, बागबगीचे, क्रीडांगणें, व्याख्यानस्थानें या करमणुकीच्या, व्यायामाच्या व ज्ञानार्जनाच्या ठिकाणींसुद्धां बायकांची पुरुषांच्याप्रमाणें गर्दी असते. याचें कारण बायकांना पुरुषांप्रमाणें सर्व प्रकारचें शिक्षण मिळालें आहे. महायुद्धापूर्वी मुलींचें शिक्षण 'साहित्यसंगीतकलावती वधू' बनण्याचें होतें. पण मागील महायुद्धांत पुरुषमंडळी लढाईत देशाबाहेर गुंतली असतांना सर्व प्रकारच्या धंद्यांचीं व उद्योगांचीं कामें बायकांनीं केलीं व त्यांना स्वतंत्र उद्योगाची व धंद्याची चटक लागली. केवळ **घरगुती काम** किंवा केवळ मुलें संभाळण्याचें काम करण्याचा त्यांना कंटाळा आला व म्हणून थोडेफार पैसे मिळणाऱ्या व्यवसायांत त्या पडूं लागल्या आहेत. अल्पांशानें कां होईना पण सामाजिक समजुतींतील ही क्रांति इंग्लंडांतील बेकारीला कारणीभूत झाली असावी असें लंडनकरांची राहणी पाहिल्यावर वाटल्याखेरीज रहात नाहीं.

लंडनकरांच्या राहणींतील हिंदी माणसाच्या मनांत भरणारा तिसरा विशेष म्हणजे त्यांचा खासगी व सार्वजनिक व्यवहारांतील नियमितपणा होय. आपल्याला हिंदुस्थानांत या त्यांच्या नियमितपणाचा पूर्ण परिचय आहे. परंतु पुष्कळ लोकांना असें वाटतें कीं, इंग्रज येथें राज्यकर्ते म्हणून येतात, ते संख्येनें थोडे असतात व त्यांच्याकडे नोकर चाकर पुष्कळ असतात व मुबलक पैसा असतो. अशा स्थितींत त्यांनीं नियमितपणा राखला तर त्यांत काय नवल आहे? परंतु गोरगरीबांना व मध्यम वर्गातील माणसांना ज्यांना सर्व कामें स्वतःच करावीं लागतात व ज्यांना घरचा गाडी घोडा नाहीं त्यांना घड्याळासारखा नियमितपणा कसा ठेवतां येणार? अशा तऱ्हेचें आमच्या अनियमितपणाचें समर्थन मीं सुशिक्षित लोकांच्या तोंडून ऐकलें आहे. पण लंडनमध्यें राहिल्यास आपल्याला खरोखरीं तिकडील **सर्वसाधारण** नियमितपणाबद्दल सादर आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाहीं.

तिकडे घरांतील लहानथोर, स्त्रीपुरुष अशा सर्व माणसांना दररोज घराबाहेर जावें लागतें. मुलामुलींना पंधरावर्षेपर्यंत सक्तीचें शिक्षण असल्यामुळें दिवसाचे नऊ ते चारपर्यंत शाळेंत जावें लागतें. पुरुषां आपल्या उद्योगाच्या अगर धंद्याच्या कामाला जावें लागतें. वर उल्ले केल्याप्रमाणें निरनिराळा धंदा करणाऱ्या बायकांना बाहेर जावें लागतें जरी बायका अशा उद्योगधंद्यामध्यें काम करीत नसल्या तरी घरां बाजारहाट–तिकडील अन्न व भाजीपाला वगैरे रोजचे रोज व ताजे अ ण्याची रीत असल्यामुळें–करण्याकरितां रोज बाहेर जावें लागतें. य आठ साडेआठ किंवा सात साडेसातच्या सुमारास सर्वांची न्याहारी हो मुलगेमुली व पुरुष तावडतोब बाहेर जातात. मध्यम स्थितींतील लोकांना-सुद्धां घरकामी नोकर किंवा मोलकरीण ठेवणें अशक्य असल्यामुळें, खोल्या झाडणें, सामानाची साफसुफी करणें, बिछाने घालून ठेवणें वगैरे रोजचीं घरकामें करून मध्यम स्थितींतील बायकांना बाजाराकरितां बाहेर जावें लागतें व सामान्यतः सर्व मंडळी चहाला घरीं परत येतात. मग बायकांना रात्रींच्या जेवणाच्या कामाला लागावें लागतें. कारण पुडिंगसारखे सावकाश शिजणारे पदार्थ आधींपासून चुलीवर ठेवावे लागतात. पुरुषमंडळी व मुलगे मुली खेळायला किंवा फिरायला बाहेर जातात, तीं बरोबर सात साडेसाताला घरीं परत येतात. बागबगीच्यांतून पांच सात वर्षांचीं मुलें सहा साडेसहाच्या सुमारास मला वेळ विचारतांना आढळत असत. 'महाराज, किती वाजले' असा मोठ्या सभ्यतेनें तीं प्रश्न विचारीत व 'साडेसहा' असें उत्तर दिल्याबरोबर 'आभारी आहे. महाराज,' असें म्हणून तीं घरीं जाण्यास निघत. यावरून लहानपणापासून मुलांना नियमितपणाची व दुसऱ्याशीं सभ्यतेनें वागण्याची शिस्त शिकविली जात असली पाहिजे असें मला वाटलें. इंडिया ऑफीसच्या वाचनालयांत मी रोज वाचनाकरितां जात असें. त्याच्यासमोर असलेल्या लायन्सच्या उपाहारगृहांत साडेबारा वाजतां मी दररोज फराळास जात असें. तर मौज ही कीं दररोज त्याच वेळीं तींच तीं माणसें मला भेटत

असत. त्यांचें मला नांव गांव ठाऊक नव्हतें; त्यांची माझी ओळख नव्हती; त्यांच्याशीं मीं कधींहि अवाक्षर काढलें नव्हतें. तरी पण त्या लोकांचे चेहरे काझ्या चिरपरिचित मित्रांच्याप्रमाणें माझ्या ध्यानांत आहेत व आज लिहि-मांना ते माझ्या मनःश्चक्षूपुढें उभे आहेत व मला चित्रकला अवगत असती तर त्यांच्चीं हुबेहूब चित्रें मी काढून दाखवूं शकलों असतों. खासगी व्यवहारांत अधा इतका नियमितपणा तिकडील लोक पाळतात. सार्वजनिक कामांतील कामचा नियमितपणा तर महशूर आहे. पण मला तेथल्या मोठ्या समुदायांचा शानीं सततचा नियमितपणा पाहून आश्चर्य वाटलें. लंडनच्या **फेबीयन** सोसायटीमार्फत विख्यात व विद्वज्जनाश्रित अशी वार्षिक व्याख्यानमाला होते. ती व्याख्यानमाला लंडनमधल्या **किंग्जवे** नांवाच्या प्रशस्त व सुंदर सडकेवरील **किंग्जवे हॉल** मध्यें होते. या व्याख्यानमालेचा कार्यक्रम दोन महिने आगाऊ ठरतो व व्याख्यानें ऐकण्याकरितां तिकिटें घ्यावीं लागतात. व्याख्यानें विख्यात व विद्वान वक्त्यांचीं असल्यामुळें लोकांना तीं ऐकण्याची फार उत्कंठा असते; व तिकिटें मिळण्याची अड-चण पडते. व्याख्यानमाला दर आठवड्यास एक अशी सहा आठवडे चालते. मीं सर्व व्याख्यानांचीं एकदम तिकिटें घेतलीं होतीं व सर्व व्याख्यानमालेला मी हजर होतों त्या हॉलमध्यें सुमारें दोन हजार माणसें बसण्याची सोय आहे. व्याख्यानें रात्रीं साडेआठ पासून दहापर्यंत चालतात. बसण्याला स्प्रिंगनें उठल्या-बरोबर वर जाणाऱ्या बैठकीच्या खुर्च्यांची रांगचीरांग असते व प्रत्येक खुर्चीला नंबर असतो व आपल्या नंबराच्या खुर्चीवर प्रत्येकानें बसलें पाहिजे अशी पद्धत आहे. आमचें बिऱ्हाड बरेंच दूर असल्यामुळें मी लवकर घरून निघत असें व आठ वाजून दहा मिनिटांच्या सुमारास हॉलमध्यें जाई. तेव्हां तेथें तुरळक तुरळक लोक दिसत. पण लवकरच लोकांची येण्यास सुरवात होई व पंधरा वीस मिनिटांत साडेआठला येवढा मोठा हॉल पण माणसांनीं फुलून जाई. केवढ्या मोठ्या जनसमुदायाचा हा विलक्षण नियमितपणा ! लोक फार आधींहि येत नसत व उशीरांही

येत नसत; एखाद दुसरा मनुष्य एखाद्या व्याख्यानाला जरा उशीरां येई; पण त्याच्या सावकाश स्तब्धपणें चवड्यावर चालण्यावरून व त्याच्या चेहेऱ्यावरून आपल्या अनियमितपणाबद्दल त्याला अतोनात लाज वाट असावी असें स्पष्टपणें दिसून येई. शिवाय विशेष आश्चर्याची गोष्ट ही व वारा असो, पाऊस असो, थंडी असो, धुकें असो, सारांश व्याख्यान हजर राहणें कितीहि त्रासाचें असो, सर्व सहा आठवड्यांत केव्हांहि खुर्च्या रिकाम्या राहिलेल्या पाहिल्या नाहींत. या कोड्याचा उल त्या तिकीटावरील एका बारीक टीपेवरून झाला. “जर कांहीं कारण व्याख्यानास हजर राहण्यास सवड नसली तर आगाऊ कळवावें म्हण दुसऱ्या व्याख्यान-श्रवणेच्छु लोकांना हजर राहतां येईल.” जर कोणाला अनिवार्य कारणानें हजर राहतां आलें नाहीं तर लोक आगाऊ कळवितात व म्हणून रिकाम्या खुर्च्या वेळींच दुसऱ्यास देण्यास सांपडतात व म्हणून सर्व खुर्च्या नेहमीं भरलेल्या असतात असें मला कळलें. या व्याख्यानमालेविषयींची सविस्तर हकीकत देण्याचा हेतु त्या समाजांतील नानाविध बाबतींतील नियमितपणा व व्यवस्थितपणा यांची खात्री पटावी. तिकडे सर्व सार्वजनिक समारंभ निमंत्रणांत लिहिलेल्या वेळीं सुरू होतात. निमंत्रणपत्रिकेंतली वेळ व खरी समारंभ सुरवातीची वेळ यांत इकडल्याप्रमाणें अंतर ठेवण्याची पद्धति नाहीं. या खासगी व सार्वजनिक व्यवहारांतील नियमितपणामुळें एका तऱ्हेनें मानवी आयुष्य वाढल्यासारखें होत नाहीं का ? नाहीं तर भर्तृहरीनें म्हटलें आहेच, ‘ आधीं आयुष्य फार तर शंभर वर्षें त्यांत अर्धें रात्रींत जातें. अर्ध्यांतलें अर्धें बालपण व वृद्धपण यांत जातें. बाकीचें आधिव्याधिदुःखयुक्त अशा सेवाचाकरींत जातें मग सुखाचें आयुष्य कोठें राहिलें?” तदनुरूप अनियमित व आळशी माणसांसंबंधीं असेंच म्हणतां येईल कीं, कामाच्या उपयोगी आयुष्य आळसांत व अनियमितपणांत जातें मग त्यांच्या हातून काम काय होणार ? उलट नियमित मनुष्य आपल्या कार्योपयोगी आयुष्यांत किती तरी कामें करूं शकतो.

लंडनकरांच्या राहणींतील चवथा विशेष वर निर्दिष्ट केलेल्या विशेषांशीं संबद्ध आहे. लंडनकर आपल्या आठवड्याचे दोन विभाग करतात. कामाचा आठवडा व करमणुकीचें आठवड्याचें टोक. लंडनमध्यें साधारणपणें सर्वत्र आठ तासांचा कामाचा दिवस धरतात. ( हल्लीं खाणींत साडेसात तासांचा दिवस करण्याचें घाटत आहे ); शनिवार हा अर्धा दिवस धरतात, म्हणजे एकंदर आठवड्यांतून चव्वेचाळीस तास कामाचे होतात. तेव्हां पुष्कळ लोक पांच दिवस नऊ तास काम करून शनिवार व आदितवार पूर्ण सुटी घेतात; शाळा कॉलेजें यांना सुद्धां त्या दोन दिवस सबंद सुटी असते. आठवड्याचे पांच दिवस सपाटून आंगमोड काम करावें व आठवड्याच्या अखेरचे दोन दिवस दिवाळी दसरा करावा ही लंडनकरांची रीत. लंडनकर सपाटून व आंगमोड काम करून मुबलक मजुरी मिळवितात याचें मनाला पटणारें व दररोज दृष्टीस पडणारें उदाहरण म्हणजे ट्राम व बस यांच्या कंडक्टरांचें होय.

लंडनांतील सर्व ट्रामगाड्या व बसगाड्या दुमजली असतात व वरखालीं मिळून बहात्तर माणसें बसण्याची सोय असते. अशा गाड्यांना मुंबईमध्यें तीन चार कंडक्टर लागतात. पण या इतक्या माणसांना तिकिटें देणारा **एकच** कंडक्टर लंडनमध्यें असतो. तो एकसारख्या वरखालीं खेपा घालतो व सर्वांना बिनचूक व बिनविलंब तिकिटें देऊन पैसे घेतो. कंडक्टरचा वेळ मोडूं नये म्हणून उतारूहि पैसे हातांत घेऊन तिकीट घेण्यास अगदीं तयार असतात. इतकें सपाटून आठ तास आंगमोड काम केल्यावर ते ट्राम व बस भरधाव चालवून आपल्या जोडीदारांच्या हातीं काम देऊन मोकळे होतात. कामांत चुकारपणा किंवा लबाडी ते बिलकुल करीत नाहींत. यामुळें कंपनीला इन्स्पेक्टरांचा फार खर्च येत नाहीं. म्हणून कंडक्टरांना मुबलक मुशाहिरा देणें कंपनीला परवडतें. सामान्यतः आठवड्याच्या पांच दिवस इन्स्पेक्टर दृष्टीस पडत नाहींत. शनिवारीं आदितवारीं मात्र ते तुरळक तुरळक दिसतात.

इतर कामाधंद्यांच्या बाबतींत हीच स्थिति. आठवड्याचे पांच स लंडनकर खूप काम करतात. पण याचा वचपा ते आठवड्याच्या र काढतात. महालंडनच्या आंत बाहेर जाण्यास दळणवळणाची कि, अविलंब व स्वस्त साधनें असल्यामुळें आठवड्याअखेर लंडनकर भ्रां- तीकरितां, विनोदाकरितां, व वनभोजनाकरितां बाहेर पडतात. स्तुद्र- कांठच्या ठिकाणीं जाणारा लोकांचा लोट शुक्रवार संध्याकाळपासून सुरू होतो व तो भरतीप्रमाणें आदितवार सकाळपर्यंत सारखा वाढत ातो. यावेळीं मोटारी भरभरून सारख्या लंडनबाहेर जात असतात. ज्यांना दूरच्या ठिकाणीं जाण्याची सोय नसते ते जवळच्या सफरी करात. **एपिंग फॉरेस्ट, हॅंपडनकोर्ट, वुंइडसर राजवाडा, क्रॉयडन** व लंडन बाहेरील बागबगीचे इत्यादि ठिकाणीं जातात. याहि सफरी करणे ज्यांना शक्य नाहीं, ते शहरांतल्या बागबगिच्यांत जातात; किंवा शहरांत इकडे तिकडे पसरलेलीं नानाविध प्रेक्षणीय स्थळें पुनः पुनः पाहण्यास जातात. ज्यांना अशा स्थलांना जाण्याकरितां लागणारे थोडेसे पैसे सुद्धां खर्चतां येत नाहींत ते लोक आपल्या बिऱ्हाडापासून दूर नाहीं अशा सार्वजनिक ठिकाणीं चालत जातात! परंतु आठवड्याच्या अखेरच्या दोन दिवस लंडनचीं झाडून सारीं माणसें घराबाहेर पडतात; व ते दिवस मजेंत घालवितात. घरांतील बायकामुलांनासुद्धां फिरावयास पुष्कळ वेळ मिळावा म्हणून शनिवारीं, आदितवारीं दोनप्रहरच्या फराळाचे वेळीं मुख्य जेवण आटपून घेतात व मग त्या दोन दिवशीं सात-साडेसात वाजतांच्या जेवणास टाळा देतात. म्हणजे दोन वाजल्यापासून रात्रीं आठनऊ वाजेपर्यंत सर्व मुलामाणसांना बाहेर जाऊन येण्यास मुबलक वेळ मिळतो. निजण्याचे आधीं थोडा अल्पाहार खटाटोपाखेरीज करतां येतो. लंडनकरांच्या या विशेषामुळें शनिवारीः आदितवारीं सर्व सार्वजनिक ठिकाणें माणसांनीं फुललेलीं दिसतात. लहानथोर स्त्रीपुरुष, मुलगे, मुली अशी घरांतील सर्व मंडळी गप्पागोष्टी करतांना व नाना प्रकारच्या करमणुकी करतांना दृष्टीस पडतात. परदेशस्थ प्रवाशास हा

वर्तनक्रम पाहून लंडनकर नेहमींचे चैनी, खुशालचेंडू, छानछोकी, रिकामटेकडे व कालाचा अपव्यय करणारे आहेत असें वाटतें. प्रत्येक आठवड्याच्या शेवटच्या दोन दिवसांचा दिवाळी दसरा करण्याची प्रवृत्ति सर्व वर्षभर चालते; पण तिला वसंतग्रीष्म या ऋतूंत—एप्रिल ते सप्टेंबर या सहामाहींत—ऊत येतो. हिंवाळ्यांत दिवस फार लहान होतात; तिकडे सर्वांत लहान दिवस साडेसात तासांचा होतो; व सर्वांत मोठी रात्र साडेसोळा तासांची होते; अर्थात् या काळांत बाहेरच्या सफरी बंद पडतात. पण हे दिवस सिनेमा, नाटकें, पदार्थसंग्रहालयें इत्यादि पहाण्यास सोयीचे असतात. शिवाय धुकें ( fog ) हिमतुषार ( frost ) व बर्फवर्षाव ( snowfall ) या नैसर्गिक चमत्कारांचे हे दिवस असतात. ते पाहावयाची संधि बाहेर पडल्यानें मिळते. तसेंच बर्फावरून घसरगुंडी खेळ खेळण्याला याच दिवसांत सांपडतें ! सारांश, लंडनकर “ काम करायचें तेव्हां खूप काम करा व खेळायचें तेव्हां खूप खेळा ” या म्हणीप्रमाणें तंतोतंत वागतात.

लंडनकरांच्या राहणीचा पांचवा विशेष म्हणजे त्यांची स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा—एका शब्दांत सांगावयाचें तर त्यांची सद्भिरुची—होय. वस्त्रप्रावरणांत व वर्तनांत लहानथोर, रावरंक व स्त्रीपुरुष हीं सर्व स्वतः नीटनेटकीं टापटिपीचीं माणसें असतात व त्यांना गचाळ, गबाळ, गलिच्छ व बावळट माणसांचा मोठा तिटकारा येतो. अशा स्थितींत दुसऱ्याकडे जाणें म्हणजे त्याचा अपमान करणें होय असें ते समजतात. म्हणून बायकांजवळ कोठेंहि बाहेर जातांना आरसा फणी ठेवण्याची सुंदर पिशवी असते यांत कांहींच आश्चर्य नाहीं. पण केस पिकून पांढरे झालेल्या म्हाताऱ्यांनांसुद्धां ट्रामममधून बाहेर पडतांना केसावरून फणी फिरवून आरशांत चेहरा पाहतांना मीं पाहिलें आहे ! लंडनकरांच्या सद्भिरुचीची साक्ष घरोघर दिसते. आधीं प्रत्येक राहत्या घराला मागें किंवा पुढें व बहुधा दोन्हीकडे बाग ही असावयाची. त्यांत चारदोन सुंदर सुंदर गुलाबाचीं, चारदोन सदापानी व सदाफुली झाडें ;

हीं ठेवलेलीं असावयाचीं. घरांत जाणाऱ्या व घरांतल्या वाटेच्या बाजूस दिवाणखान्यांत व भोजनखान्यांत चकाकणाऱ्या पितळी किंवा काचेच्या फुलदाण्यांत फर्न, पाम यासारखीं सुरेख दिसणारीं छोटीं झाडें नीट-नेटकीं ठेवलेलीं असावयाचीं. घरांच्या सर्व भिंती आपल्या इकडील देवांच्या मखरांप्रमाणें नाना वेलबुट्टीच्या व नाना रंगांच्या कागदांनीं मढविलेल्या असतात व त्यावर लहान मोठ्या तसबिरा व फोटो लटका-विलेले असतात. खोल्यांत, जिन्यांवर, पाऊलवाटेंत, सारांश घरांत पाऊल टाकल्यापासून सर्वत्र गालिचे पसरलेले असतात; प्रत्येक खोलींत एखादें तरी आरशाच्या दाराचें कपडे ठेवण्याचें कपाट असतें. खुर्च्या टेबलें असतात, हें सांगावयास नकोच. अशा थाटाचीं लंडनकरांचीं राहतीं घरें असतात व म्हणून लंडनमध्यें प्रथम प्रवेश करणारा आपल्या इकडील मनुष्य आश्चर्यचकित होऊन लंडनकरांच्या श्रीमंती राहणीबद्दल तोंडांत बोटें घालतो. अशाप्रकारें घरें शृंगारण्याची सामान्य रीत पड-ल्यामुळें घरें बांधणाऱ्या कारखानदारांप्रमाणेंच घरांचे नकाशे काढणाऱ्या व घरबांधणीवर देखरेख करणाऱ्या एंजिनियरांप्रमाणें लंडनमध्यें गृहशृंगारणा-ऱ्यांचा एक स्वतंत्र धंदा आहे.त्यांना house decorators म्हणतात.अशा गृहशृंगारकांच्या नांवाच्या पाट्या वरील दोन धंद्यांच्या नांवाच्या पाट्यांच्या बरोबरीनें लंडनमध्यें दृष्टीस पडतात. ही झाली खासगी राहत्या घरांची गोष्ट. मग गिऱ्हाइकांचीं अंतःकरणें आपल्याकडे ओढ-ण्याची अत्यंत आवश्यकता ज्यांना आहे अशा दुकानांची गोष्ट काय विचारतां ? तीं दुकानें म्हणजे प्रत्यक्ष प्रदर्शनेंच होत. आधीं अलीकडे मुंबईस मोटारींच्या दुकानांना खणाखणाच्या मोठमोठ्या काचा व कांचांचीं द्वारें दृष्टीस पडूं लागलीं आहेत. त्याप्रमाणें सर्व दुकानांना मोठ-मोठ्या कांचा व कांचांचीं दारें असतात. त्या कांचा व दारें रोज पुसून अगदीं निर्मळ व निष्कलंक ठेवतात. गिऱ्हाईकांची जा ये सुरू होण्या-पूर्वी दुकान उघडून दुकानदाराचें पहिलें काम म्हणजे कांचा पुसणें व सर्व दुकान चकपक करणें हें होय. शिवाय दुकानासमोर जी काय

थोडीफार मोकळी जागा असेल ती नानारंगी फुलझाडांच्या, पामच्या व फर्नच्या वगैरे सदापानी सुंदर झाडांच्या कुंड्यांनीं सुशोभित केलेली असते; दुकानांच्या आंतहि मधूनमधून पुतळे व पितळी कुंड्यांतील छोटीं झाडें शोभेकरितां ठेवलेलीं असतात. तयार कपड्यांच्या व शिंप्यांच्या दुकानांत तर पुतळ्यांचें जणूं कांहीं प्रदर्शनच भरलेलें असतें. कारण, कपड्यांची कापणी, शिवण्याची शैली व एकंदर बेतशीरपणा यांचा प्रत्यक्ष नमुना दाखविण्याकरितां पूर्णप्रमाणी बायकामुलांचे मेणाचे पुतळे पुतळ्या करून त्यांच्या अंगांत कपड्यांचे नमुने प्रत्यक्ष पेहेरलेले दाखवितात. सर्व दुकानांत व कपाटांत जिकडे तिकडे विजेच्या दिव्यांची रोषणाई केलेली असते. यामुळें रात्रीच्या वेळीं हीं दुकानें पांढऱ्या शुभ्र विजेच्या दिव्यांनीं फुललेलीं असतात. अशा वेळीं दुकानांत नमुन्याकरितां ठेवलेली पूर्णप्रमाणी निर्जीव सुंदर पुतळी कोणती व कपडे घेण्याकरितां आलेली व पुतळीजवळ उभी असलेली सुंदर सजीव बाई कोणती याचा माणसाला भ्रम पडल्याखेरीज रहात नाहीं ! इतक्या पूर्णप्रमाणी मानवरंगी हुबेहूब या पुतळ्या बनविलेल्या असतात !

मुबलक नोकरचाकर पदरीं व पाण्यासारखा पैसा हातीं म्हणून घरांची व दुकानांची साफसफाई व शृंगारशोभा करण्यांत येते अशांतला भाग नाहीं; तर लंडनकरांचा तो प्रकृतिस्वभाव बनला आहे. कारण मागें उल्लेख केल्याप्रमाणें लंडनमध्यें मध्यम स्थितींतील लोकांना नोकरचाकर ठेवणें परवडत नाहीं. म्हणून घरांतील झाडून सर्व मंडळी आठवड्याच्या सुटीच्या दिवसांपैकीं कांहीं भाग नाहाणीघर व पायखाना धुऊन काढणें, बिछायती ब्रशानें साफ करणें, पितळी कडीकोयंड्यांना पॉलीश करणें, खिडक्यांचे जाळीचे पडदे साबणानें धुऊन काढणें, बागेंतील बेणणी करणें व झाडांची छाटाछाट करणें, त्यांना खत घालणें, हंगामी फुलझाडें लावणें, इत्यादि गृहसौंदर्यवर्धक कामांत खर्च करतात व म्हणून लंडन-करांचीं घरें नेहमीं नव्यासारखीं व सुशोभित वाटतात.

लंडनकरांच्या राहणीचा म्हणा किंवा वागणुकीचा म्हणा, पण वाखाणण्याजोगा शेवटचा विशेष म्हणजे त्यांचा सभ्यपणा व दाक्षिण्य होय. हिंदुस्थानांत इंग्रजांचा हिंदी लोकांशीं संबंध अधिकारी या नात्यानें बहुधा येतो. यामुळें त्या लोकांची खासगी व सामाजिक वागणूक कशा प्रकारची आहे हें येथें कळण्यास कठीण पडतें. पण लंडनमध्यें गेलेल्या हिंदी माणसाचा त्यांच्याशीं वारंवार संबंध येतो. म्हणून त्यांचे हे विशेष चटकन, ध्यानांत आल्याखेरीज रहात नाहीं. सभ्यपणा व दाक्षिण्य यांचें बाळकडू तिकडील लोकांना मिळालेलें असतें ही गोष्ट वेळ विचारणाऱ्या मुलांच्या मागें दिलेल्या संभाषणावरून पटेल. Sir, please, thank you (महाराज, मर्जी किंवा मेहेरबानी, तुमचा आभारी) हे शब्द त्यांच्या अगदीं जिव्हाग्रीं असून ते दिवसांतून शेंकडों वेळां ते उच्चारतात. लंडनमधल्या ट्राम किंवा बस या गाड्यांमध्यें दोन दोन माणसें बसण्याचीं बाकें असतात, व मधून जाण्याची पायवाट असते. पलीकडच्या माणसाला पायवाटेनें जावयाचें असल्यास अलीकडच्या माणसाला उभें रहावें लागतें. एकाला जावयाचें आहे असें दिसलें कीं दुसरा माणूस उभा राहतो. तो पहिला माणूस पलीकडे पायवाटेनें जातांना 'आभारी आहे' असें म्हणतो; ट्राम कंडक्टर आदबीनें तिकिटाबद्दल चवकशी करतो; बसलेला मनुष्य इष्ट ठिकाणच्या भाड्याचे पेन्स ट्राम कंडक्टरला देतो; कंडक्टर 'आभारी आहे' असें म्हणून तिकिट देतो व बसलेला मनुष्य तिकिट घेतल्यावर 'आभारी आहे' असें म्हणतो. सार्वजनिक इमारतींत जाण्याचीं दारें ढकलून उघडावीं लागतात; पण तीं सोडल्यास मागच्या माणसास लागण्याचा संभव आहे; म्हणून आपल्या मागें माणूस येत असल्यास तो येऊन दाराला हात लावीपर्यंत, अर्थात् ही वेळ क्षणभराचीच असते, दार पुढच्या माणसानें सोडावयाचें नसतें. मागचा माणूस दाराला हात लावतो व पुढच्यास 'आभारी आहे' असें म्हणतो. चहापान झाल्यावर सेविका बिल देते; तेव्हां 'आभारी आहे' असें म्हणावें लागतें. पुढें पैसे घेणाऱ्या बाई-

जवळ बिल व पैसे दिले म्हणजे ती 'आभारी आहे' असें म्हणते व मोड परत मिळाल्यावर पैसे देणारानें 'आभारी आहे' असें म्हटलें पाहिजे. लहान मोठ्या सर्व व्यवहारांत अशा प्रकारची सभ्य वागणूक व सभ्य भाषणपद्धति त्या लोकांच्या अगदीं आंगवळणीं पडलेली आहे. हा सभ्यपणाचा अतिरेक आहे असेंसुद्धां वाचकांस वाटण्याचा संभव आहे. पण ज्याप्रमाणें अर्वाचीन गुंतागुंतीच्या यंत्राच्या सर्व चक्रांचें भ्रमण न अडखळतां न वाजतां सुरळित सुसंगत व सत्वर व्हावें म्हणून थेंब थेंब व एकसारखें वंगणाचें तेल सर्व चक्रांवर पडेल अशी व्यवस्था केलेली असते व म्हणून वंगण हें गतिदायक शक्तीइतकें यंत्राला अवश्यक आहे त्याप्रमाणें मानवी समाजांतील गुंतागुंतीच्या व्यवहारास सभ्य व दाक्षिण्ययुक्त वागणूक व भाषणपद्धति अवश्यक आहे. तरच सर्व व्यवहार सुरळित चालतील.

लंडनकरांच्या राहणीचें व चालीरीतींचें वर रेखाटलेलें चित्र फाजील भडक रंगांत व बाह्य भपक्यानें आश्चर्यमूढ झालेल्या मनःस्थितींत मीं रंगविलें आहे. व 'अंदरकी बात राम जाने' या म्हणीप्रमाणें मला लंडनकरांची व इंग्रजांची आंतली काळी बाजू दिसली नाहीं असें पुष्कळ वाचकांना वाटेल. पण मी सर्व गोष्टी तुलनात्मक दृष्टीनें लक्षपूर्वक पाहून लिहिल्या आहेत व त्या सर्वस्वीं खऱ्या आहेत.

ज्याप्रमाणें लंडनकरांचे वाखाणण्याजोगे विशेष मीं लक्षपूर्वक पाहिले त्याप्रमाणें विवर्जनीय विशेषहि आहेत. त्यांचा उल्लेख केल्यानें लेखावर एकतर्फीपणाचा आक्षेप येणार नाहीं अशी आशा आहे.

गांव आहे तेथें म्हारवाडा आहे या म्हणीप्रमाणें लंडनमध्येंहि भिकार भाग नाहीं असें नाहीं. ज्याला **ईस्ट एंड** म्हणतात तो अशांतलाच भाग आहे. तरी पण अशा भागांत स्थानिक सरकारचे व समाजसेवक संस्थांचे सारखे प्रयत्न चालू आहेत; त्यामुळें दिवसेंदिवस पुष्कळ सुधारणा होत आहे व या भागांत गेलें तरी आपल्या इकडल्या

गांव व म्हारवाडा यांसारखा विलक्षण विरोध तेथें दृष्टीस पडत नाहीं. शिवाय लोकांना चांगल्या राहणीच्या कल्पना असूनसुद्धां केवळ निष्कांचनत्वामुळें त्याप्रमाणें वागतां येत नाहीं. तरीपण तिकडे मजूर-वर्गाची रहाणी वरीच वरच्या दर्जाची झाली आहे. ज्याप्रमाणें तिकडील मध्यम वर्गाची रहाणी आपल्या इकडल्या संस्थानिक व सरदार यांच्या-सारखी असते त्याप्रमाणें अगदीं खालच्या वर्गाच्या मजुराची राहणी-सुद्धां आपल्याकडच्या मध्यम वर्गाच्यासारखी असते. म्हणूनच ज्यांना लंडनचे गलिच्छ भाग किंवा ईस्ट एंड म्हणतात ते आपल्या इकडल्या शहरांच्या गलिच्छ भागांपेक्षां किती तरी पटीनें कमी गलिच्छ व कमी भिकार असतात म्हणजे तिकडील उच्च रहाणी व नीच रहाणी यांत आकाशपाताळासारखा भेद नाहीं; तर वरच्या व खालच्या मजल्या-इतकाच भेद आहे.

लंडनकरांच्या रहाणीचा किंवा वागणुकीचा दोषाकडे झुकणारा विशेष म्हणजे त्यांची द्यूतप्रियता होय. लंडनकरांना प्रेमाखातर ( for love ) खेळतां येत नाहीं, खेळ पहातां येत नाहीं. खेळ खेळ-तांना काय किंवा पहातांना काय जयापजयाबरोबर लाभालाभाची लालूच पाहिजे. त्यांचे खेळ असोत, कीं कोडें सोडवण्यासारखे करमणुकीचे प्रकार असोत; घोड्यांच्या शर्यती पहावयाच्या असोत; किंवा होड्यांच्या शर्यती पहावयाच्या असोत; या सर्व खेळाच्या, करम-णुकीच्या, प्रेक्षणाच्या कामांत ते पैज लावतील व पैसे मिळवितील किंवा घालवितील. पैजेखेरीज किंवा बक्षिसाच्या लालुचीखेरीज कोणत्याहि कामांत ईर्षा व हुरूप येत नाहीं असें त्यांना वाटतें. म्हणजे त्यांना निष्काम कर्माची कल्पना करवत नाहीं. पण यामुळें सर्व लंडनकरांची जुगारी वृत्ति होते व लवकर श्रीमंत होण्याची हांव सर्वांना सुटते. इंग्रजांच्या या जुगारी वृत्तीचा प्रसार त्यांच्या अनुकरणानें आपल्या इक-डल्या शहरांत लहानथोरांत व रावरंकांत होऊं पहात आहे ही मोठी अनिष्ट गोष्ट होत आहे.

लंडनकरांचा याहिपेक्षां गर्हणीय विशेष म्हणजे त्यांची मद्यप्रियता होय. लंडनमध्यें पहिल्यांदा जाणाराला उपाहारगृहाइतकीं जागोजाग मद्याचीं दुकानें दृष्टीस पडतात. बास, बिअर, एल, स्टाउट, व्हिस्की अशीं नाना नांवांचीं कमी अधिक अंमल आणणारीं मद्यें व निवळ उल्हास आणणारीं आसवें यांच्या भपकेदार मोठमोठ्या जाहिराती जिकडे तिकडे दृष्टीस पडतात ! कारण तिकडे दारू करण्याचे कारखाने खासगी लोकांचे असतात व आपल्या मालाकडे लोकांचें लक्ष वेधण्याकरितां या कारखानदारांची स्पर्धा चालू असते.

महायुद्धापासून पूर्वीच्यापेक्षां पुष्कळ कमी प्रमाणावर दारू पिण्याचा प्रघात चालू आहे असें एका **टेंपरन्स** चळवळीच्या चालक इंग्रज गृहस्थानें मला सांगितलें. पण माझ्या दृष्टीला तरी लंडनकरांच्या मद्यप्रियतेचें प्रत्यंतर वाटोवाट असलेल्या दुकानांवरून पटत होतें. खरोखरीं विडी ओढणें हें जसें तिकडे व्यसन मानीत नाहींत. त्याचप्रमाणें दारू पिणें हें तिकडे व्यसन मानीत नाहींत. **दारूचा अतिरेक** व **तोहि दररोज** करणें म्हणजे व्यसनाधीन होणें असें त्या लोकांना वाटतें. एखादा पेला—अंमल आणणाऱ्या मद्याचा किंवा उल्लास आणणाऱ्या आसवाचा घेणें हा तिकडील रोजचा राबता आहे. लंडनकरांची मद्याबद्दल अशी वृत्ति असल्यामुळें दारूला स्पर्श करणें किंवा दारूचा एक थेंबहि पिणें म्हणजे महापाप आहे ही हिंदी समजूत व तदनुरूप दारूबद्दल विलक्षण तिटकारा व दारूबंदीबद्दल लोकांची मागणी याबद्दल इंग्रज अंमलदारांना मुळींच सहानुभूति वाटत नाहीं. दारूबंदीची नैतिक चळवळ त्यांना केवळ राजकीय चळवळ भासते. पण हिंदी लोकांत अंजून दारूचा प्रसार किती तरी कमी आहे व म्हणून या देशांत दारूबंदी करण्याचा कायदा करणें व त्याची अंमलबजावणी करणें या गोष्टी फारशा कठीण नाहींत. हें विषयांतर होत चाललें. पण लंडनकरांच्या रहाणीचा हा विशेष लंडनास प्रथमच जाणाऱ्या व दारूपासून आजन्म अलिप्त असलेल्या माझ्यासारख्या माणसाच्या डोळ्यापुढें प्रामुख्यानें आल्याखेरीज

राहिला नाहीं हें खरें. लंडनकरांच्या हाडींमासीं दारू भिनली आहे. त्यांच्या मनांत उत्तमत्त्वाचें उपमान पद दारूनें घेतलें आहे ही गोष्ट एका विलक्षण जाहिरातीवरून माझ्या मनांत आली. एका पेट्रोलच्या दुकानांत मी खालील जाहिरात पाहिली. “ आमच्या दुकानचें पेट्रोल म्हणजे मोटारची शँपेन होय ”. मला वाटलें लंडनकरांचें माणसांना दारू पाजून समाधान होत नाहीं ! त्यांना निर्जीव यंत्रांनासुद्धां दारू पाजावीशी वाटते; निदान त्यांना लागणारें पेय पेट्रोल याला तरी शँपेन नांव देऊन ते मोटारीला पाजतील. माझ्या यात्रापुराणाचा ‘ लंडनकरांची रहाणी व चालरीत ’ नांवाचा अध्याय येथें समाप्त झाला.

स्थळ प्रत
सं. ...... नं. ......
ता. ......
ठा क्रं.

# प्रकरण ६ वें

## लंडनकरांचे सार्वजनिक सण, सुट्या व समारंभ

**लंडनकरांच्या नित्य** व्यवसायांच्या वर्णनानंतर त्यांच्या **नैमित्तिक** सण–सुट्या–समारंभांचें वर्णन करणें क्रमप्राप्त आहे. हिंदुस्थानांत नानाधर्मीय लोकांचें वास्तव्य असल्यामुळें व निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या धर्मांचा वरपगडा झाल्यामुळें सध्यां येथें सण–सुट्या–समारंभांचा सुळसुळाट झालेला आहे; मुसलमानांचा मोहरम रमजान, हिंदूंची होळी दिवाळी, ख्रिश्चनांचा ईस्टर क्रिस्टमस, व पारशांचा पपेटी नवरोज हे तर मोठे आठवड्या आठवड्याचे सण आहेतच; शिवाय एकएक दिवसाचे असे या चार धर्मांचे वर्षांतून किती तरी सण आहेत; याचा चांगला अनुभव शिक्षणविषयक संस्थांना येतो. हिंदुस्थानांत एकहि महिना असा जात नाहीं कीं ज्यांत एखाद्या धर्माचा एखादा तरी सण आला नाहीं ! पण लंडन काय किंवा एकंदर इंग्लंड काय यांमध्यें या बाबतींत असा सुळसुळाट नाहीं. आधीं इंग्लंडमध्यें एकाच धर्माचें–मग त्यांत पोटपंथ पुष्कळ असेनात–बहुत काळपासून सारखें वर्चस्व असल्यामुळें तेथें निरनिराळ्या धर्मांच्या सणांची खिचडी झालेली नाहीं. शिवाय, जुन्या धार्मिक व्रतवैकल्यांना अर्वाचीन लंडनकरांच्या आयुष्यक्रमांत फार गौणत्व आल्यामुळें व जे दोन मोठे ख्रिश्चन धर्मांचे सण अजून जीव धरून आहेत त्यांच्या अनुरोधानें विद्यालयीन वर्षाचे तिमाही तीन भाग झाल्यामुळें तिकडे शिक्षणाच्या कामांत काय किंवा इतर कामांत काय मध्यें मध्यें खळ आणणारे सण किंवा सुट्या नाहींतच म्हणाना. तिकडील विद्यालयीन वर्ष आक्टोबरपासून सुरू होतें. पण तेव्हांपासून दिजंबर अर्ध्यापर्यंत–क्रिस्टमस सणापर्यंत–बिनखळ, बिनसण व एकसारखी पहिली **तिमाही** चालू राहते. पुनः जानेवारी अर्ध्यापासून

तों मार्च अखेरपर्यंत–ईस्टर सणापर्यंत–दुसरी **तिमाही** तशीच चालते व एप्रिल अखेरपासून जून अखेरपर्यंत तिसरी **तिमाही** सारखी चालते. जुलई, आगष्ट, सप्टंबर हे विद्यालयीन वर्षाचे परीक्षा व त्यांचे निकाल यांचे दिवस असतात व उन्हाळ्याची सुटी या दिवसांतच असते. याच तीन महिन्यांत पार्लमेंट व न्यायकचेऱ्याही उन्हाळ्याची सुटी घेतात. इतर सुट्या न मिळणाऱ्या खात्यांना हीच मोठी सुटी. हेच दिवस लांबच्या प्रवासास सुखकर व सोईस्कर ! यामुळें लंडनकर वर्षांतले नऊ महिने कामाचे समजतात व तीन महिने विश्रांतीचे, करमणुकीचे व प्रवासाचे समजतात. सण–सुट्या–समारंभांचें इतकें सामान्य निरूपण पुरे. प्रत्यक्ष पाहिलेल्या व अनुभवलेल्या प्रसंगांच्या वर्णनास आतां लागूं या.

मी ऑगस्टच्या आरंभीं लंडनला पोहोंचलों तेव्हांपासून तीन महिन्यांत मला जिकडे तिकडे सामसूम दिसलें. लंडनकरांचा नित्यक्रम सुरळितपणें शांतपणें व रेखलेल्या रीतीनें चालतांना दिसला. रस्त्यांत केव्हांहि मिरवणूक दिसली नाहीं, किंवा वाद्यांचा व बँडचा आवाज ऐकूं आला नाहीं; किंवा मोठा समारंभ दिसला नाहीं. पण या तीन महिन्यांच्या शुकशुकाटाचा वचपा नवंबर महिन्यांत भरून आला. नवंबरच्या प्रारंभीं तीन चार दिवस मला रस्त्यामधून कृत्रिम मुखवटे ( mask ) घातलेले, रंगीबेरंगी पोशाख केलेले, विलक्षण प्रकारच्या चेष्टा करणारे, फटाक्यांचे व बारांचे आवाज करणारे व गाणीं म्हणत जाणारे मुलांचे थवे दृष्टीस पडले. तेव्हां आपल्या इकडल्या होळी-दिवाळीची मला आठवण झाली. हा काय प्रकार आहे, याची मीं चौकशी केली, तेव्हां मला कळलें कीं ५ नवंबर हा **गायफॉक्स दिवस** येथें सणासारखा अजून पाळतात. इंग्लंडच्या इतिहासांत सन १६०५ मधला, जेम्स राजा व त्याचें पार्लमेंटगृह यांचा एकदम नाश करण्याकरितां, पार्लमेंटगृहाखालीं भुयार तयार करून त्यांत दारू भरून तें दारूच्या भडक्यानें जाळून टाकण्याकरितां झालेला, रोमन कॅथॉलिक असंतुष्टांचा गुप्त कट **गनपावडर प्लॉट** या नांवानें प्रसिद्ध आहे. त्या गुप्त कटांतला

भुयारांत बसून दारूस आग लावण्याचें धाडसाचें काम पतकरणारा कटवाला **गायफॉक्स** हा होय. हा गुप्त कट उघडकीस आल्यावर अर्थात् कटवाल्यांना व **गायफॉक्सला** ५ नवंबर रोजीं फांशी दिलें. देवाच्या दयेनें आपला राजा आपलें पार्लमेंट व आपला प्रॉटेस्टंट धर्म यांचा बचाव झाला म्हणून तेव्हांपासून इंग्लंडांतील प्रॉटेस्टंट लोक हा दिवस सणाचा मानीत आले आहेत. पूर्वकाळीं प्रौढ मंडळीसुद्धां यांत भाग घेत असे. पण अलीकडे हा मुलांचा मजा करण्याचा सण झाला आहे. मोठीं माणसें त्यांत भाग घेत नाहींत. पण मुलें मात्र मोठ्या मजेनें नवंबरचे पहिले पांच दिवस हा सण पाळतात. यामुळेंच त्याला आपल्या इकडल्या होळीदिवाळीचें मिश्र स्वरूप आलेलें आहे. मुलें विलक्षण मुखवटे घालतात; फटाके बार वाजवितात; पेटणाऱ्या पदार्थांची होळी ( bon fire ) करतात, गाणीं गातात. गरीब स्थितींतील मुलें पैसे मागतात व मिळालेल्या पैशानें खाद्य पेय पदार्थ घेऊन खातात पितात ! अशा तऱ्हेनें हा लहान मुलांचा सण झाला आहे. अर्थात् त्याला आतां धार्मिक किंवा राजकीय स्वरूप राहिलें नाहीं, किंवा गंभीर सार्वजनिक समारंभाचेंहि स्वरूप राहिलें नाहीं. म्हणून त्याचें वर्णन किंवा उल्लेख मार्गदर्शक पुस्तकांत मिळणार नाहीं. पण लंडनमध्यें नवंबर महिना घालविणाऱ्या हिंदी गृहस्थाला तो सण व त्यांतील मुलांच्या नानाविध चेष्टा व वेष यांचें सानंद आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाहीं हें खास आहे. कारण या सणानें परकी देशांत आपल्या इकडल्या नेहमींच्या अनुभवाची आठवण होते व मूळ मानवी स्वभाव सर्वत्र सारखा ही गोष्ट भिन्न परिस्थितींतहि मनाला पटते.

परंतु लंडनांतला अपूर्व समारंभ पुढें चार दिवसांनीं म्हणजे ता. ९ नवंबर रोजीं पडतो. यांत मात्र लहानापासून थोरापर्यंत, रावापासून रंकापर्यंत सर्व स्त्रीपुरुष मोठ्या हौसेनें भाग घेतात. हा समारंभ राजकीय आहे व त्याच्या दर्शनानें लहानपणापासून मुलांच्या मनांत लोकशाहीचें तत्त्व बाणत असलें पाहिजे. मागें उल्लेखिलेल्या महालंडनचा कार-

भार **लंडन कौंटी कौन्सिल** या कॉरपोरेशनकडे आहे. मुंबईचा कारभार मुंबई कॉरपोरेशनकडे देण्यांत आला आहे. तो लंडनच्या धर्तीवरच आहे. येथल्याप्रमाणें लंडन कौंटीकौन्सिलचा अध्यक्ष-याला **लॉर्ड मेयर ऑफ लंडन** म्हणतात—प्रतिवर्षीं निवडला जातो. दरसाल ९ नवंबर या तारखेला नवा लॉर्ड मेयर मागच्या सालच्या लॉर्ड मेयरकडून कारभाराचीं सूत्रें आपल्या हातीं घेतो. १९२९ सालच्या ९ नवंबरला मावळते लॉर्ड मेयर सर **केनास्टन स्टड** हे होते व उगवते लॉर्ड मेयर **सर विलयम वाटरलो** हे होते. मॅनशन हाऊस ही इमारत लॉर्ड मेयरचें अधिकारावर असतांचें राहतें घर होय; व गिल्ड हॉल ही प्रचंड इमारत लॉर्ड मेयरच्या कचेरीचें ठिकाण व लंडनचा टाऊन हॉल होय. या गिल्ड हॉलमध्यें लॉर्ड मेयरच्या अधिकाराच्या विमोचनाचा व स्वीकाराचा विधि होतो व माजी व चालू लॉर्ड मेयर हे दोघे मिळून कौंटीकौन्सिलच्या सभासदांना, अंमलदारांना व शहरच्या प्रमुख लोकांना एक थाटाची मेजवानी देतात व लंडनशहराचा गाभा-मूळ-**लंडन गांव व वेस्ट मिनस्टरगांव, लंडन पुलापासून वेस्ट मिनस्टर** पुलापर्यंतचा सुंदर भाग या मधल्या प्रशस्त रस्त्यानें मोठी मिरवणूक काढतात. बादशहाच्या पार्लमेंटाच्या नव्या निवडणुकीनंतरच्या पार्लमेंट उघडण्याच्या समारंभाच्या खालोखाल लंडन शहरांतील प्रेक्षणीय व प्रचंड असा हा लॉर्ड मेयरचा मिरवणूकसमारंभ होतो. हिंदुस्थानांतील ग्वाल्हेर, बडोदा किंवा म्हैसूर या मोठ्या संस्थानांच्या महाराजांच्या दसऱ्याच्या स्वारीसारखा हुबेहूब थाट या मेयरच्या मिरवणुकीचा असतो. हा अपूर्व व अद्वितीय समारंभ पहाण्याची मीं संधि साधली. मिरवणूक व लोकांची गर्दी व उत्साह यांचें समग्र व सूक्ष्म अवलोकन करतां यावें म्हणून आम्हीं ज्या रस्त्यानें मिरवणूक यावयाची होती व ज्यावेळीं ती मिरवणूक यावयाची होती त्या रस्त्यानें व त्या वेळेच्या बऱ्याच आधीं पायीं पायींच पहात जाण्याचा बेत केला. तदनुरूप मी व माझा मुलगा असे दोघेजण ता. ९ नवंबर रोजीं न्याहारी आटपून नऊ वाजतां घराहून निघालों ते बसनें **वेस्टमिनस्टर** पुलाचे पलीकडे गेलों.

वाटेनें स्त्रीपुरुषांच्या झुंडीच्या झुंडी ट्रामनें, बसनें, आगगाडीनें, भुयार गाडीनें व पायीं पायीं लंडनच्या या भागाकडे सारख्या येत होत्या. **व्हाईट हॉल प्लेस** या प्रशस्त रस्त्यानें गिल्ड हॉलच्या ( मिरवणूक निघण्याचें ठिकाण ) जितक्या नजीक जातां येईल तितके नजीक जाण्याचा आम्हीं निश्चय केला होता. या सबंद रस्त्यानें दोन्ही बाजूंस प्रशस्त पायवाटा आहेत. त्यानें आम्हीं लंडनच्या या भागामधल्या सरकारी इमारती पहातं पहातं चाललों होतों. दोन्ही बाजूंच्या पायवाटांनीं लोकांची गर्दी मिरवणुकीच्या दिशेनें चालली होती. या व्हाईट हॉल प्लेस रस्त्याचे टोकाला खालून चिमुकला दिसणारा पण पूर्ण आकाराचा नेल्सनचा पुतळा बसविलेला उंच स्मारक स्तंभ व प्रख्यात **ट्राफलगार** चौक लागतो. या ठिकाणीं पांचसहा रस्ते एके ठिकाणीं आले असून येथें खुली जागा व या पांचसहा रस्त्यांच्या पाऊलवाटा माणसांनीं त्रिफुल्ल फुलल्या होत्या. येथपासून लोक पायवाटेवर दुतर्फा उभे होते व रस्त्यांमध्यें पोलिस लोक रांगेनें उभे होते. पायवाटेच्या इमारतीच्या बाजूनें एक एक मनुष्य जाऊं येऊं शकेल एवढीच चिंचोळी वाट खुली होती. त्या पाय वाटेनें आम्ही **स्ट्रँड** नांवाच्या रस्त्यानें पुढें पुढें चाललों तों तों गर्दी वाढत चालली. आतां रस्त्यामधून जाणारी रहदारी बंद झाली व पुढें जाणारांना पायवाटेच्या मागल्या चिंचोळ्या वाटेनें जाणें भाग झालें. आतां मनुष्यांना खेचून पुढें जाण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. **स्ट्रँड** रस्त्याचे शेवटीं प्रचंड न्यायमंदिराची भव्य इमारत लागते. तेथून **फ्लीट स्ट्रीट** नांवाचा मूळ लंडनमधला अरुंद रस्ता सुरू होतो; यामुळें मनुष्यांची अगदीं विलक्षण दाटी होते. पण इतकी गर्दी असून त्या मानानें गलबला किंवा आरडाओरड किंवा धक्काबुक्की मुळींच होत नाहीं. पायवाटेवर आठदहा रांगा सारख्या उभ्या होत्या, पण मागचे लोक पुढच्यास ढकलीत नव्हते किंवा फळी फोडून पुढें जात नव्हते. आतां आम्हांला मिरवणूक चांगली पहावयास सांपडत नाहीं असें वाटलें. आम्ही पायवाटेच्या पुढची जागा मिळते कीं नाहीं हें पहात पहात लंडनांतलें प्रख्यात प्रार्थनामंदिर सेंट पॉल याचे अगदीं

नजीक व समोर **कॅनन** रस्त्याच्या टोंकाशीं आलों. येथें आम्हांला दोन तीन रांगांच्या मागची जागा उभें राहण्यास सांपडली. येथून सर्व मिरवणूक उत्तमपणें पाहण्यास सांपडेल असें वाटलें म्हणून आम्ही येथें उभे राहिलों. पंधरावीस मिनिटांनीं ठरल्या वेळीं मिरवणुकीची आघाडीची लंडन शहर पोलीसची घोडेस्वार पलटणीची तुकडी आली. त्यांचे मागें त्यांच्या बँडचा ताफा बँड वाजवीत आला. त्याचे मागें लहान तोफा व त्यावरील अंमलदार यांची टोळी आली. याप्रमाणें सारखी मिरवणूक सुरू झाली; घोडे काय, पायदळ काय, बँडवाले काय, बॉयस्काउट काय, गर्लगाईड्स काय, लंडनमधल्या सर्व प्रकारच्या, लष्करी, पोलीशी, आरमारी, ॲम्बुलन्स व लहान मुलामुलींच्या नाना प्रकारच्या तुकड्या येत होत्या. प्रत्येक तुकडीचे पोषाख वेगळे; त्यांचीं हत्यारें व उपकरणें वेगळ्या प्रकारचीं; सारांश त्या मिरवणुकीस विलक्षण विविधता पण एक प्रकारचा मनोहर, संयोगहि दृष्टीस पडत होता. लॉर्ड मेयरच्या मिरवणुकीमध्यें इंग्लंडच्या लष्करी, आरमारी व हवेवरील वर्चस्वाचें प्रदर्शन होतें. यामुळें आपल्या इकडल्या संस्थानच्या स्वारीसारखा त्याचा थाट भासतो. पण या मिरवणुकीमध्यें निरनिराळ्या धंद्यांच्या मोठमोठ्या कंपन्या भाग घेतात व आपआपल्या धंद्यांचा माल व तो तयार करण्याच्या सुधारलेल्या पद्धती यांचेंहि प्रदर्शन मोठमोठ्या मोटार लॉरींवर दाखवितात. तसेंच राष्ट्रसंघासारख्या शांततेच्या नव्या संस्था, रेड क्रॉससारख्या शुश्रूषा करणाऱ्या संस्था, प्राणिसंरक्षक संस्था, वगैरे लोकोपयोगी संस्थांचें प्रदर्शन व त्यांच्या जाहिरातीवजा बोर्डांवर मोठ्या अक्षरांनीं लिहिलेलीं तत्त्वें यांचें प्रदर्शन करणाऱ्या मोटारलॉऱ्या चालत होत्या. सारांश, लंडनमधल्या राजकीय, लष्करी, सामाजिक, औद्योगिक व मानवीसुखसंवर्धक सर्व प्रकारच्या चळवळींचें व संस्थांचें चालतें प्रदर्शन या मिरवणुकींत होतें. शिवाय त्या त्या वर्षी होणाऱ्या लॉर्ड मेयरच्या आवडीप्रमाणें, त्याच्या धंद्याचें व त्यानें प्रावीण्य मिळविलेल्या गोष्टींचें प्रदर्शन करणारीं चित्रें व जाहिराती व पाट्या या दरवर्षी अर्थात् वेगवेगळ्या असतात. १९२९ सालचे लॉर्ड मेयर

**सर विलियम वाटरलो** हे व यांचें घराणें यांचा बहुत काळापासून छापण्याची कला व तत्संबंधींचे धंदे यामध्यें नांवलौकिक झालेला असल्यामुळें तेव्हां मिरवणुकीमध्यें छापखान्याच्या कलेचा उदय झाल्यापासूनचा सर्व इतिहास व त्यांतील शोध व प्रगति यांचे मासले व नमुने तयार करून त्यांच्या कृती प्रत्यक्ष दाखविण्याची तजवीज केली होती व या एकाच कलेचें यथास्थित प्रदर्शन करणाऱ्या नऊ स्वतंत्र मोटरलॉऱ्या मिरवणुकींत होत्या ! याप्रमाणें मन आश्चर्यानें थक्क करून टाकणारे देखावे पाहिल्यानंतर मिरवणुकींतील मुख्य मुख्य नागरिकांच्या मोटरगाड्या हळू हळू दृग्गोचर होऊं लागल्या. शेवटीं एकदांची सोन्याच्या मुलाम्याची सहा घोडे लावलेली लॉर्ड मेयर **सर विलियम वाटरलो** यांची ती प्रचंड दरबारी गाडी आली ! व ती पुढें गेल्याबरोबर सर्व रस्ताभर लोकांची गर्दी झाली व परत जातांना आम्हांला रेटारेटी करून कसाबसा मार्ग काढावा लागला. खरोखरीच ही मिरवणूक व हा समारंभ एखाद्या राजाला शोभेल अशा थाटाचा असतो यांत शंका नाहीं. असा विलक्षण मान नागरिकांपैकीं निरनिराळ्या माणसाला दर वर्षीं मिळतो. ही मिरवणूक दरवर्षीं होते म्हणून लोकांचें औत्सुक्य कमी होतें असें मात्र नाहीं. चौकशीअंतीं मला असें कळलें कीं, लंडनमध्यें लॉर्ड मेयरची मिरवणूक पाहण्यास लाखों लोक दरवर्षीं सारख्या उत्साहानें जातात; हवा कशीहि असो, लॉर्ड मेयर कोणीहि होवो, पण लॉर्ड मेयरची मिरवणूक पाहण्यास सर्व लंडनशहर लोटावयाचेंच. हा लंडनकरांचा वार्षिक परिपाठ आहे. या समारंभानें लहानपणापासून नागरिकत्वाचे हक्क, लोकांची निवडणूक, लॉर्ड मेयर हा नगराध्यक्ष व त्याला मान देणें व त्याचा गौरव करणें इत्यादि इष्ट गोष्टींचें सहज व नकळत ज्ञान होत असलें पाहिजे; व लोकशाहीबद्दल नागरिकांच्या मनांत आदरभाव उत्पन्न होत असला पाहिजे असें मला वाटलें.

ही मिरवणूक वेस्टमिन्स्टर पुलाजवळील पार्लमेंटगृहावरून जाते व आल्या रस्त्यानें परत न जातां **व्हिक्टोरिया एम्बँकमेंट** नांवाच्या नदी-

कांठच्या रस्त्यानें **ब्लॅकफ्रायर्सपुलाशीं** पुनः गांवांत शिरते व **क्वीन व्हिक्टोरिया** रस्त्यानें जाऊन सेंटपॉलच्या प्रार्थनामंदिराच्या पूर्वेस **कॅनन** रस्त्याला मिळून परत गिल्डहॉल इमारतीशीं जाऊन तेथें ती मिरवणूक संपते.

या लंडनच्या बऱ्याच जुन्या व दरसालच्या अपूर्व समारंभानंतर दोन दिवसांनीं म्हणजे अकरा नवंबर रोजीं महायुद्धतहकुबीच्या दिवसाचा समारंभ शांततेचा असतो. व्हाईट हॉल पॅलेस–या प्रचंड जुन्या राजवाड्यांत हल्लीं पुष्कळ सरकारी कचेऱ्या आहेत–याचेसमोर व रस्त्याच्या मधोमध महायुद्धांत कामीं आलेल्या शिपायांची स्मृति ताजी राहण्याकरितां एक छोटासा स्तंभ उभारला आहे. त्यासमोर लष्करी शिपायांच्या पलटणी येऊन त्या स्मृतिस्तंभाला सलाम करतात व एक फुलांची माळ वाहतात. हा समारंभ स्तब्धपणें न बोलतां होतो व तो अगदीं थोडा असतो. यावेळींसुद्धां या रस्त्यावर विलक्षण गर्दी जमते. पण या समारंभाची मिरवणूक वगैरे कांहींएक नसते. शिपायांची पलटण शिस्तीनें अकरा वाजतां येते. राजाज्ञेप्रमाणें दोन मिनिटें स्तब्धता धरते; नंतर वर लिहिल्याप्रमाणें स्तंभाला सलाम करून व माळ घालून लागलीच आल्यावाटेनें परत जाते. पण हा समारंभ म्हणा किंवा सण म्हणा इतका साधा व थोडका आहे तरी या महायुद्धतहकुबीच्या सणाला सार्वत्रिक स्वरूप आलें आहे तें खालील क्षुल्लक गोष्टीनें आलें आहे. युद्धामध्यें जखमी झाल्यामुळें, कायमचे जायबंदी झाल्यामुळें ज्या लढाईतील पेन्शनर पंगू शिपायांस श्रमाचीं कामें करतां येत नाहींत त्यांना थोडेंफार बसल्या बसल्या व बिनखर्चानें काम करतां यावें व त्यांना थोडीफार पैशाची मदत व्हावी म्हणून त्या शिपायांनीं कोटावर घालावयाचीं कापडाचीं सुंदर फुलें करावीं व तीं लोकांनीं विकत घ्यावीं व युद्धतहकुबीच्या दिवशीं आपल्या कोटावर लावावीं अशी टूम लष्करी अंमलदारांनीं काढली व ती लंडनकरांनीं तावडतोब उचलली यांत शंका नाहीं.

अकरा नवंबरचा अकरा वाजण्याचा वेळ दोन मिनिटें काम थांबवून स्तब्ध राहण्याचा आहे ही गोष्ट आतां हिंदुस्थानांत हि

परिचयाची झाली आहे. पण आपल्याला त्यांत फारसें वाटत नाहीं. लंडनमध्यें इकडल्यापेक्षां विशेष कांहीं होत असेल असें मला वाटलें नाहीं. यामुळें मी अकरा तारखेस रोजच्याप्रमाणें साडे-आठ वाजतां न्याहारी करून इंडिया ऑफिसच्या वाचनालयांत जाण्या-करितां बाहेर पडलों. ब्रॉकवेल बागेंतून बसच्या ठिकाणीं आलों तोंच तीन नंबरची बस आली व मी तींत बसलों; पहातों तो प्रत्येक माणसाच्या कोटावर तांबडें फूल! इंडिया ऑफिसनजीक थांबण्याच्या ठिकाणीं थांबलों तों स्मृतिस्तंभाजवळ अतोनात गर्दी! सर्व रस्ता मनुष्यांनीं फुललेला! व इतक्या असंख्य माणसांच्या कोटांवर नवीं फुलें! गर्दीतून मी इंडिया ऑफिसच्या दरवाज्याशीं गेलों. तेथें एक बाई निरनिराळ्या किंमतीच्या फुलांच्या रांगाच्या रांगा अडकवलेली दरवाज्यावर एक लाकडाची पाटी पोटाशीं धरून दरवाज्यावर उभी! तिनें हंसतमुख करून मला विचारलें "गरीब व पंगू शिपायांच्या मदतीकरितां यांपैकीं एक फूल आपण घेणार नाहीं काय?" अशा अदबीनें व आदरानें केलेल्या प्रश्नाला नकारार्थ उत्तर कोणाच्यानें देववेल! मी सहा पेन्स देऊन एक फूल पसंत केलें. त्याबरो-बर त्या बाईनें सेफटी टांचणीनें माझ्या कोटावर तें फूल अडकविलें व 'आभारी आहें' असें म्हणून ती दुसऱ्या गृहस्थाकडे वळली! मला वाटतें या दिवशीं पाऊण कोटी लंडनकरांपैकीं एकहि मनुष्य लहानमोठें एखादें तरी फूल घेतल्या खेरीज राहिला नसावा! कारण मी त्या सबंद दिवसभर कोठेंहि नव्या फुलाखेरीज मनुष्य पाहिला नाहीं. युरोपांतल्या लोकांनीं महायुद्धाचीं दुःखें व हालअपेष्टा प्रत्यक्ष अनुभवल्या असल्यामुळें महायुद्धतहकुबीच्या दिवसाचें त्यांना अत्यंत महत्त्व वाटावें हें स्वाभाविक आहे. पण तिकडे एखादी नवी गोष्ट किंवा नवी रीत काढल्यास व ती राष्ट्रीय भावना पोषक असल्यास किती ताबडतोब तिचा प्रसार सर्व दर्जाच्या लोकांत होतो याचें प्रत्यक्ष प्रत्यंतर मला पटलें. त्या दिवशीं कोट्यावधि फुलें खपलीं असलीं पाहिजेत व लक्षावधि रुपयांचा फंड जमा झाला असला पाहिजे!

४२७७

पण विलायतेंतील सार्वत्रिक सण म्हणजे नाताळ किंवा क्रिस्टमस हा सण होय. इंग्रजी अंमलापासून हिंदुस्थानांत हा सण हिंदूंच्या दिवाळी-होळीप्रमाणें चिरपरिचित आहे. कारण या सणानिमित्त दहा दिवसांची सुटी शाळा, सरकारी खातीं वगैरे सर्वांना मिळते. हिंदुस्थानांत या सणाकरितां रेल्वे सवलती वगैरे मिळतात म्हणून प्रवासाला सोयीचा हा सण झाला आहे. लंडनमध्यें या सणाचें धार्मिक स्वरूप लुप्तप्राय झालें आहे. या सणानिमित्त प्रार्थनामंदिरांत काय विशेष प्रार्थना होत असतील तेवढाच धार्मिक भाग अवशिष्ट राहिला आहे. त्यांतल्या त्यांत रोमन कॅथॉलिकपंथी लोकांमध्यें या प्रार्थना जास्त होतात. पण या पलीकडे घरोघरीं धार्मिकदृष्ट्या फारसें कांहीं केलें जात नाहीं. पण हल्लीं या सणाला सामाजिक स्वरूप आलेलें आहे. या सणाचे निमित्तानें घरांची विशेष साफसुफी केली जाते; या सणामध्यें मित्रांना व लहान मुलांना देणग्या देण्याची सार्वत्रिक चाल आहे; तसेंच या, सणाचे निमित्तानें--कारण या सणाचा शेवटचा दिवस म्हणजे इंग्रजी वर्षाचा वर्षारंभाचा दिवस होय--नूतन वर्ष तुम्हांला सुखकर होवो--अशा आशयाचीं पत्रें व कार्डें एकमेकांना पाठविण्याची रीत आहे. तसेंच या सणानिमित्त घरोघर-इकडील दिवाळीमध्यें पक्वान्नें करण्याची रीत आहे त्याप्रमाणें-क्रिस्टमस केक्स करण्याची रीत आहे. नाताळचे पूर्वीं या संबंधींची एक विशेष चाल कांहीं दिवस माझ्या नजरेस आली. क्रिस्टमस केक्स हा खाद्यपदार्थ बहुत दिवस टिकणारा आहे. नव्हे मागच्या क्रिस्टमस सणाची एखादी केक पुढच्या क्रिस्टमस सणाचे दिवशीं कापून खाण्याची रीत आहे. म्हणजे हा पदार्थ एक वर्षपर्यंत खराब न होतां टिकतो अर्थात् हा मुख्यतः गव्हाचा असून त्यामध्यें नानातऱ्हेचीं मनुका, बेदाणा, बदाम, चारोळ्या अशीं सुकीं फळें घालतात व पुष्कळ दिवस टिकावयाचा असल्यामुळें यांत पाणी किंवा लवकर खराब होणारे पदार्थ नसतात. या केकचें पीठ पुष्कळ मळावें लागतें. अर्थात् हें घरांतल्या घरधानिणीचें काम असतें व त्याला घरांतल्या सर्व मंडळींनीं हातभार लावावयाचा अशी रीत. पण

हल्लीं तो एक औपचारिक विधि झाला आहे. क्रिस्टमसकेकच्या पिठाचें भांडें घरांतल्या एकूणएक माणसाकडे नेलें जातें व त्यानें भांड्यांत हात घालून त्यांतील पीठ थोडें कुसकरलें म्हणजे पक्कान्न करण्याला हातभार लावल्यासारखें झालें. आमच्या घरधनिणीची मुलगी आम्हां बापलेकांकडे पिठाचें भांडें घेऊन आली तेव्हां मी मोठ्या बुचकळ्यांत पडलों. पण माझ्या मुलाला आदल्या वर्षाचा अनुभव होता व वरील माहिती त्यानेंच मला प्रथम सांगितली. तेव्हां आम्हीं दोघांनीं औपचारिक रीतीनें क्रिस्टमसच्या पक्कान्नसिद्धीला हातभार लावला. या केक्सना विलक्षण प्रकारचे आकार देतात; त्या सभोंवार नानारंगांचे कागद लावतात; त्यावर लहान लहान सुबक चित्रें डकवतात; त्यांत बहुधा एका म्हाताऱ्या बुवाचें—त्याला क्रिस्टमस फादर म्हणतात—चित्र असतेंच असतें. या क्रिस्टमस केक्सच काय पण अशा प्रकारच्या नाना आकाराच्या वेडिंगकेक्स करतात. खाद्यपदार्थ पण त्याचा एक अत्यंत सुंदर शोभादायक व चित्ताकर्षक असा प्रेक्षणीय पदार्थ बनवितात यांत शंका नाहीं. अशा केक्सचे विलक्षण आकार लंडनच्या मेवामिठाईच्या दुकानांत माझ्या दृष्टीस पडले. एखाद्या प्रार्थनामंदिराचा केकला आकार देतात व त्या प्रार्थनामंदिराच्या मनोऱ्यामध्यें छोटी घंटासुद्धां अडकवितात. दीपगृहाच्या आकाराची केक करतात, किल्ल्याच्या आकाराची केक करतात, असे कैंक आकार केक्सना देतात !

पण या घरगुती गोष्टी सोडून या सणाच्या सार्वजनिक स्वरूपाकडे वळूं. लंडनमध्यें या सार्वजनिक सणाचें आगमन लंडनमधल्या दुकानांवरून दिसूं लागतें. आधीं दुकानांची विशेष साफसफाई करतात; व दिव्यांची रोषनाई वाढवितात व दुकानांत नानातऱ्हेचा नवा नवा माल आणतात व त्याचें आकर्षक रीतीनें प्रदर्शन करतात; या सणानिमित्त मागें सांगितल्याप्रमाणें एकमेकांना भेटीदाखल देणग्या देण्याची रीत असल्यामुळें व्यापाराला या सणाच्या आधीं पंधरा वीस दिवसांपासून ऊत येतो. त्यांतल्या त्यांत मुलांच्या खेळण्याच्या पदार्थांबद्दल तर

विचारूंच नका; प्रत्येक दुकानांत नानाविध खेळणीं ठेवलेलीं असतात; तसेंच प्रत्येक दुकानांत हजारों क्रिस्टमस कार्डें विकावयास ठेवलेलीं असतात. या दिवसांत लंडनांतलीं लहान मोठीं दुकानें म्हणजे ,लहानमोठीं प्रदर्शनस्थळेंच बनतात; या दुकानांतून काय विलक्षण आरास करतात; व गिऱ्हाईकांच्या झुंडीच्या झुंडी लहान मुलांमुलींना घेऊन सायंकाळीं व विशेषतः शनवारीं-आदितवारीं दुकानांत जातांना दिसतात; क्रिस्टमस सणाच्या आधींच्या शनवारीं-आदितवारीं तर सर्व दुकानें माणसांनीं फुललेलीं असतात. या सणाच्या आदल्या शनवारीं व रविवारीं आम्हीं लंडनमधलीं अत्यंत मोठीं व प्रख्यात अशीं दोन प्रचंड दुकानें आहेत तीं पहावयास गेलों होतों. त्यांतलें एक दुकान **सेल्फ्रिजेस** नांवाचें आहे. तें अमेरिकन भांडवलावर व अमेरिकन देखरेखीखालीं चाल-लेलें आहे. त्याची प्रचंड पांच मजली इमारत लंडनमधल्या प्रसिद्ध **ऑक्सफर्ड** रस्त्याच्या एका कोपऱ्यावर आहे. यामुळें इमारतीच्या दोन्हीं बाजूंस खुली जागा असून तेथें सुंदर कुंड्यांत सदापानी रोपें रांगेनें ठेवलेलीं आहेत. दोनदोन पुरुष उंच व दहा दहा फूट लांब अशा सबंद काचांच्या खिडक्या असून दुकानाच्या दर्शनी भागांत नयन-मनोहर अशा नाना वस्तू व मुलांचीं नानाविध खेळणीं ठेवलेलीं आहेत. या इमारतीला वरच्या मजल्यास जाण्यास विजेचे पाळणे गिऱ्हाईकांकरितां ठेवलेले आहेत. पांचव्या मजल्यावर सबंद इमारतभर विस्तीर्ण गच्ची असून त्या सर्व गच्चीवर सुंदर बाग तयार केलेली आहे. येथून लंडन शहराची दाट दाट वस्ती व त्याचा विलक्षण विस्तार हीं प्रत्यक्ष विलोकन करावयास सांपडतात. या दुकानांत एका पेन्साच्या वस्तूपासून हजारों पौंडांच्या वस्तूपर्यंत सर्व प्रकारच्या आवश्यक, सुखसोईच्या, चैनीच्या व विलासाच्या सर्व वस्तु मिळतात. सारांश वाङ्मयांत ज्याप्रमाणें विश्व-कोश किंवा ज्ञानकोश त्याप्रमाणें दुकानांत हें विश्वदुकान आहे; किंवा ज्याप्रमाणें श्रीमद्भगवत्गीतेंत श्रीकृष्णानें अर्जुनाला आ पसरून आपल्या मुखांत सर्व विश्व लहान प्रमाणांत दाखविलें; त्याप्रमाणें या दुकानांत

सर्व लंडनचा बाजार एकत्र सांठवलेला आहे. आम्हीं फारसें कोठें न थांबतांना दुकानाचीं दालनें व सर्व मजले भराभर पाहिले तरीसुद्धां आम्हांला तीन चार तास लागले व मग दुकानच्या एका दालनांत असलेल्या चहापानगृहांत चहा घेऊन आश्चर्यचकित मनानें आम्ही घरीं आलों. दुसऱ्या एका दिवशीं **गॅमेजेस** कंपनीचें असलेलें दुसरें विश्व-दुकान पहावयास गेलों. हें दुकान इंग्रजी भांडवलावर व इंग्रजी देखरेखीखालीं चाललेलें आहे. पण याचाहि थाट व विस्तार **सेल्फरिजेस** कंपनीच्या दुकानासारखाच आहे.

ज्याप्रमाणें मुंबई इलाख्यांत दसरा-दिवाळीचे किंवा बंगाल्यांत दुर्गापूजेचे दिवस म्हणजे व्यापाऱ्यांच्या वर्षांतल्या मोठ्या मालखपाचे दिवस त्याप्रमाणेंच लंडनमध्यें क्रिस्टमसच्या आधींचे दिवस मोठ्या मालखपाचे दिवस. लंडनमध्यें या तीन चार आठवड्यांत किती किती मालाची विक्री होत असेल याचा अंदाज आमच्या सहा माणसांच्या मध्यम स्थितींतील घरांत किती खर्च झाला हें सांगितल्यानें सहज बांधतां येईल. आम्हीं चवघे हिंदी गृहस्थ होतों. आम्हीं कमींत-कमी दोन दोन डझन तरी क्रिस्टमस कार्डें प्रत्येकीं घेतलीं. आमच्या घरधनिणीच्या मुलीनें आपल्या मैत्रिणीस व नातेवाईकांस सुमारें पन्नास कार्डें पाठविलीं; घरधनिणीनें त्यांच्या निम्में तरी पाठविलीं असतील ! तसेंच देणगीदाखल देण्याकरितां लहानमोठीं दोन डझन खेळणीं व वस्तु आमच्या घरीं आल्या असतील. मग जरा श्रीमंत घराण्यांत व विशेष नातलग व मित्रमंडळी असलेल्या घराण्यांत आमच्या घरांत खपल्या त्याच्या कितीतरीपट अधिक वस्तू घेतल्या असतील ? क्रिस्टमसमध्यें याप्रमाणें व्यापाराची पुष्कळ देवघेव होते. गिऱ्हाइकांची अतोनात गर्दी प्रत्येक दुकानांत होते; यामुळें या चार आठवडे पुष्कळ स्त्रीपुरुषांना दुकानांतून तात्पुरतें काम मिळतें; क्रिस्टमसकरितां खेळणीं करण्याला कितीतरी कारागीर कसबी लोक कारखान्यांतून अधिक लागतात. याप्रमाणें या सामाजिक सार्वत्रिक सणाच्या निमित्तानें पैशाची अदलाबदल

पुष्कळ होते, म्हणून आर्थिकदृष्ट्या हा सण कामकरी लोकांना व व्यापारी वर्गाला चांगला वाटतो.

क्रिस्टमसचा सण सरासरी आठवडाभर चालतो. ता. २५ डिसेंबर हा सणाचा सुरवातीचा दिवस होय. या दिवसापासून लंडनमधले पुष्कळ गरीब लोक गाणीं म्हणून रस्त्यामधून सायंकाळचे व रात्रीचे हिंडत जातात व सुखवस्तू लोक या लोकांना भिक्षा नव्हे पण बाक्षिसी देतात. या चालीरीतिसंबंधानें डिकन्सनें 'क्रिस्टमस कराऊल' नांवाची सामाजिक कादंबरी लिहिली आहे. या दिवशीं प्रत्येक घरीं मेजवानीचें जेवण दोन-प्रहरीं होतें. सुंदर सुंदर क्रिस्टमस केक्स जेवणाच्या मेजावर ठेवतात. सुंदर फुलांचे गुच्छ फुलदाणींत ठेवतात. घरामध्यें क्रिस्टमस ट्री आणून त्यावर फुलें अडकवून शोभा आणतात. सर्व दुकानांतहि क्रिस्टमस ट्री आणून त्यावर विजेच्यां दिव्यांची माळचीमाळ अडकवून मजेदार रोषनाई करतात. क्रिस्टमस ट्री म्हणजे सदापानी सतेजपानी व किंचित् कांटेरीपानी हॉली नांवाच्या झुडपाच्या लहानमोठ्या खांद्या होत. आपल्या इकडे ज्याप्रमाणें धार्मिक व मंगलप्रसंगीं आंब्याचे डाहाळे घरभर आपण लावतों त्याप्रमाणें त्या झुडपाचे टाहाळे सर्व घरभर कोनाकोपऱ्यांना टांगून ठेवतात. याच दिवशीं जेवणानंतर दारूचा एकेक पेला घरांतील सर्व माणसांनीं घेऊन सर्वांचें आरोग्यचिंतन करण्याची रीत आहे. अर्थात् माझा मुलगा व मी दारूला न शिवणारे आहोंत हें घरधनिणीला माहिती असल्यामुळें तिनें बिनदारूचें (without alcohol) एक मधुर पेय तिकडे मिळतें त्याची बाटली मुद्दाम आमच्याकरितां आणिली होती. त्याचा एकेक पेला जेवणानंतर आम्हीं घेतला व मग सबंद दिवस फिरण्यांत घालविला.

ता. २६ डिसेंबरला लंडनमध्यें **बॉक्सींग डे** म्हणतात. या दिवशीं पोस्टखात्यांतील सर्व नोकर अर्थात् दोघादोघां तिघातिघांच्या टोळ्या करून दर घरीं जाऊन बाक्षिसी मागतात व या खात्यांतील लोकांच्या बिनतक्रार बिनसुटी वर्षभराच्या चाकरीबद्दल खुषीनें लोक बाक्षिसी देतात. आमच्या घरांतून सहा माणसांबद्दल बारा शिलिंग बाक्षिसी

नोकरांस मिळाली. क्रिस्टमसचे २५ व २६ हे दोन मुख्य दिवस व या दोन दिवशींच सर्व खात्यांना व बँकांना सुटी असते. पण बाकीच्या दिवशीं नेहमींचे व्यवहार चालू राहतात. उ. लंडनमध्यें वाचनालयें २५।२६ दिजंबर व १ जानेवारी अशा तीनच दिवस बंद असतात. म्हणून या तीन दिवसांखेरीज क्रिस्टमसमधल्या बाकीच्या दिवशीं मी इंडिया ऑफिसच्या वाचनालयांत नेहमीं सारखें दहापासून चारपर्यंत वाचनाचें काम करूं शकलों. म्हणजे हिंदुस्थानांत जितकी मोठी सुटी क्रिस्टमची घेतली जाते तितकी मोठी सुटी लंडनकर घेत नाहींत.

एक जानेवारी हा नव्या वर्षाचा पहिला दिवस व क्रिस्टमस सणाचा शेवटचा दिवस होय. या दिवशीं मेजवानीसारखें विशेष जेवण करतात. क्रिस्टमस सणाची समाप्ति होऊन सर्व लंडनकर आपआपल्या नेहेमींच्या व्यवसायाला लागतात. दुकानांची विशेष रोषणाई जाते; क्रिस्टमस ट्री वाळल्यामुळें वाईट दिसूं लागतें. त्याचेंहि विसर्जन होतें व सणानिमित्त सुरू असलेली धांदल व गर्दी कमी होते. भरती सरून जशी निखाराच्या वेळची शांतता समुद्राला व खाड्यांना प्राप्त होते त्याप्रमाणें लंडनलाहि नेहमींची शांतता व गंभीरता लाभते. याप्रमाणें लंडनच्या सुटी-सण-समारंभांचें वर्णन यथामति केलें. पुढील प्रकरणापासून लंडनमधील प्रेक्षणीय स्थळवर्णनास लागावयाचें आहे.

# प्रकरण ७ वें

## दक्षिण लंडनांतील प्रेक्षणीय स्थळें

**प्रवास** वर्णनाचा मुख्य भाग पाहिलेल्या प्रांतांतील प्रेक्षणीय स्थळांचें शब्दचित्र रेखाटणें हा होय. हें करण्याची मामुली वहिवाट म्हणजे परिचयपुस्तकांच्या साहाय्यानें मुख्य स्थळांचें वर्गवारीनें वर्णन करणें किंवा त्यांत दिलेल्या रोजनिशीच्या अनुरोधानें पहिल्या दिवशीं पहावयाचीं स्थळें व दुसऱ्या दिवशीं पहावयाचीं स्थळें इत्यादिकांचें वर्णन करणें होय. पण मी यांपैकीं कोणत्याच पद्धतीचा अवलंब करणार नाहीं. 'आधीं केलें मग सांगितलें' या प्रसिद्ध समर्थोक्तीप्रमाणें मीं प्रत्यक्ष पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळांचेंच फक्त वर्णन करणार आहें. लंडनमध्यें मी आठ महिने होतों खरा; पण **दृश्य-दर्शन** येवढाच माझा व्यवसाय नसल्यामुळें मी रोज कांहीं प्रेक्षणीय स्थळें पहात नव्हतों. यामुळें रोजनिशीच्या अनुरोधानेंहि मला वर्णन करतां येणार नाहीं. आठ महिन्यांच्या अवधीमध्यें माझ्या आवडीप्रमाणें व सवडीप्रमाणें मीं जीं लंडनांतील प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं त्यांचें वर्णन स्थलक्रमानें करण्याचें मीं मनांत योजिलें आहे.

**लंडन** शहराचे **टेम्सनदी**मुळें मुख्यतः दोन भाग पडतात असें मीं त्या शहराच्या सामान्यस्वरूपकथनांत म्हटलें होतें. पण प्रेक्षणीय स्थळांच्या वर्णनाच्या दृष्टीनें लंडनचे स्वाभाविक तीन भाग पडतात. पहिला भाग **दक्षिणलंडन** ( टेम्सनदीच्या दक्षिणेस वसलेलें नवें शहर; याच भागांत माझा आठमाही निवास होता; ) दुसरा भाग **उत्तरलंडन** ( टेम्सनदीच्या उत्तरेकडील नवीन वस्ती ) व तिसरा भाग **मध्यलंडन** ( हा जरी टेम्सनदीच्या उत्तरेस आहे. तरी हाच लंडनशहराचा फार जुना भाग असून तो नदीला अगदीं लागून आहे व

महालंडनचा तो गाभाच आहे.) लंडन शहराच्या नकाशांत जुन्या लंडनचा मध्यबिंदू—**चेरिंगक्रासस्टेशन**—येथपासून एक एक मैलाचे अंतरानें वर्तुळें काढून निरनिराळया प्रेक्षणीय स्थळांचें मध्यबिंदूपासून अंतर सहज समजेल अशी तजवीज केलेली आहे असें मागें सांगितलें आहे. तेव्हां दूरच्या वर्तुळापासून मध्यबिंदूकडे जाणें स्वाभाविक व सोयीचें आहे. प्रेक्षणीय स्थलवर्णनांत हाच क्रम मी स्वीकारीत आहें. दक्षिण लंडनांतलें दूरचें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे घोड्यांच्या शर्यतीचें **एपसन डाउन्स**—एपसन खेड्याच्या पलीकडचें डोंगराळ माळरान—होय. (सर्व प्रेक्षणीय स्थळें पहातांना माझा मुलगा माझ्याबरोबर होता म्हणून आम्हीं असा प्रयोग करीत आहें.) आम्हीं निरभ्र आकाश असलेल्या व म्हणून शुभ्र प्रकाशाच्या एका शनवारीं दोनप्रहरीं **हर्नेहिल** रेल्वे स्टेशनहून **एपसन** स्टेशनला गेलों. अंतर सुमारें दहा बारा मैल आहे. जातां-येतांचें भाडें १९ पेन्स (सुमारें १ रुपया) पडलें; दोन स्टेशनें गेल्यावर एके ठिकाणीं गाडी बदलावी लागली; आणखी दोन स्टेशनें गेल्यावर लंडन शहराच्या दाट वस्तीच्या घरांच्या रांगा संपून सपाट शेतजमिनीचा हिरवाहिरवागार भाग दृग्गोचर झाला व मनाला आनंद वाटला. इतक्यांत **एपसन** स्टेशन आलें. हें स्टेशन चमत्कार वाटण्यासारखें बांधलेलें आहे. याला चार प्लॅटफार्म्स असून त्या सर्वांवर कांचेचें सलग छप्पर आहे व कांचाहि मोठमोठ्या आहेत. यामुळें जिकडे तिकडे शुभ्र प्रकाशच प्रकाश पडतो व मनुष्य आश्चर्यचकित होतो. स्टेशनच्या बाहेर पडण्याचा लांबचलांब पण बराच प्रशस्त सखल मार्गहि कांचेच्या छपरानें आच्छादिलेला आहे. प्रसन्न मनानें आम्ही स्टेशनच्या बाहेर पडलों व **एपसन** गांवच्या पलीकडे असलेल्या शर्यतीच्या माळरानाला जाण्यास पायींच निघालों. स्टेशनला लागून गांवची बाजारपेठ लागते व पुढें रहातीं घरें लागतात. घरें लहान लहान असून नीटनेटकीं व सभोंवार सुंदर बागा असलेलीं आहेत. लंडनच्या घरांप्रमाणें हीं घरें धुरानें काळ-वंडलेलीं नाहींत. यामुळें अगदीं नुकतींच बांधलीं आहेत असा भास

होतो. आम्ही सरळ **अॅशले** रस्त्यानें गेलों तों गांवाच्या पलीकडे टेकडी-वजा उंचवट्याचा भूमिभाग लागला. अर्धी टेकडी चढल्यावर डाव्या हातास स्मशान—भूमि लागली व आम्ही आंत शिरलों. दोन्हीबाजूंस मृत माणसांच्या सारख्या स्मारक-शिलाच शिला दिसत होत्या. त्यांवर मृताचें नांव व मृत्युतिथि खोदलेली होती. प्रत्येक शिलेसभोंवतीं नाना-रंगाचीं भुईसपाट वाढणारीं फुलझाडें लावलेलीं होतीं. मृताच्या स्मरण-शिलेचें दर्शन घेऊन त्यांवर वाहिलेल्या फुलांच्या माळा व पुष्पगुच्छ दिसत होते. सर्व स्मशानभूमि हिरव्यागार हरळीनें आच्छादिलेली होती व मधून पांढरे स्वच्छ रस्ते होते. नीटनेटक्या फुलझाडांनीं युक्त अशा स्मशानभूमिदर्शनानें एक अवर्णनीय विकार माझ्या मनांत उत्पन्न झाला यांत शंका नाहीं. ही स्मशानभूमि पाहून झाल्यावर आम्ही पुनः त्या चढत्या रस्त्याला लागलों व टेकडीच्या माथ्यावर आलों तों सभोंवार दूरवरचा प्रदेश दिसूं लागला व आम्ही लवकरच शर्यतीच्या त्या प्रचंड मंडपाशीं आलों. छपरानें आच्छादिलेला विस्तीर्ण मंडप असून एकावर एक अशा बैठकीच्या रांगाचरांगा दूरवरपर्यंत पसरलेल्या होत्या व मंडपाचे खालीं उतरत्या पायऱ्या सारख्या बैठकीच्या जागाच जागा होत्या. आपल्या मोठ्या नदीला प्रचंड घाट असावा तसा हा देखावा दिसतो! **एपसनचें** शर्यतीचें मैदान हें पुण्यामुंबईकडे आप-ल्याला परिचित असलेल्या सपाट मैदानासारखें नाहीं. या दोन समा-न्तर अशा टेकड्या असून त्यांचे मध्यें चिंचोळी पण लांबच लांब अशी सखल एकपट्टी आहे व शर्यतीच्या घोड्यांना धांवण्याकरितां केलेला रुंदच रुंद हिरवागार मार्ग हा या टेकड्यांच्या माथ्यावरून वर्तुळाकार राखलेला आहे. अर्थात् टेंकड्यांच्या माथ्यावरील समांतर मार्ग दिसतो व दोन बाजूच्या सखल भागांतून गेलेला मार्ग दिसत नाहीं. शर्यतीचा तो हजारों माणसें मावण्यासारखा विस्तीर्ण मंडप व तें विस्ती-र्णतर माळरान प्रत्यक्ष शर्यतीच्या वेळीं माणसांनीं फुलून निघतें असें आम्हांला कळलें. दाटवस्तीच्या शहरांत राहणारा अशा ठिकाणीं

आला म्हणजे त्याला कितीतरी आनंद व उल्हास वाटतो याचा प्रत्यक्ष अनुभव आम्हांला आला. या मैदानावर आम्ही मनसोक्त हिंडलों; सभों-वारची सृष्टिशोभा पहात असल्यानें चालण्याचे श्रम वाटले नाहींत.

आपल्या इकडे यात्रेच्या दिवसांव्यतिरिक्त दिवसांत यात्रास्थानास गेल्यास ज्याप्रमाणें खरी सृष्टिशोभा सावकाश पहाण्यास मिळते त्या-प्रमाणें त्या दिवशीं आम्हांला तेथली शोभा सावकाशपणें पाहण्यास सांपडली कारण ते शर्यतीचे दिवस नसल्यामुळें तेथें चिटपांखरूहि आम्हांला भेटलें नाहीं. सायंकाळीं प्रमुदित मनानें आम्ही घरीं आलों. हें सुंदर ठिकाण पाहण्यास सकाळची किंवा दुपारची एक वेळ (सुमारें चार-पांच तास ) मोडते.

**एपसन डाउन्स**पेक्षां दोन मैल अलीकडचें प्रेक्षणीय स्थळ अगदीं अर्वाचीन आहे. तें म्हणजे **क्रॉयडन** येथील विमानबंदर ( air port ) होय ! याला ट्रामनें आम्ही गेलों. ट्रामच्या टरमिनसपासून विमान बंदर बरेंच दूर आहे. पण येथेंहि एपसन डाऊन्सप्रमाणें वस्ती मुळींच नाहीं. मात्र हा भूमिभाग विलक्षण सपाट आहे. जिकडे पहावें तिकडे हरळीची हिरवीगार सपाट जमीनच जमीन; जणूं कांहीं सर्वत्र हिरवे-गार गालिचेच गालीचे पसरलेले आहेत ! या भागांत झाडेंहि मुळींच नाहींत. यामुळें क्षितिजापर्यंत भूमिभाग दृग्गोचर होतो. डामराचा निर्धूळ रस्ता ( हाच रस्ता ब्रायटन या हवा-बंदराला जातो ) बराच वेळ चालल्यावर पांढऱ्या कांक्रीटच्या नव्या नीटनेटक्या इमारती उजव्या बाजूस लागतात. मुख्य इमारतीसमोर अर्धवर्तुळाकार हिरवीगार हिरवळीची खुली जागा असून त्यांत मधूनमधून फुलझाडें लावलेलीं आहेत. त्या वाटेनें गेलें कीं विमानाच्या बंदराची इमारत लागते. दरवाजांतून आंत गेलें कीं विस्तीर्ण, खुलें व भव्य असें मोठें दालन लागतें. व बाजूच्या दुकानवजा गाळ्यांत मार्गदर्शक पुस्तकांचें दुकान व विमानाचें तिकिट ऑफिस वगैरे दृष्टोत्पत्तीस येतात; मोठमोठ्या फळ्यांवर रेल्वे स्टेशना-

प्रमाणें विमानें निघण्याचीं वेळापत्रकें लटकवलेलीं दृष्टीस पडतात. त्या वेळापत्रकावरून विमानांचा किती विलक्षण प्रसार युरोपांत झाला आहे हें कळून येतें. उदा. लंडनहून पॅरिसला चारदां रोज विमानें जातात! त्याचप्रमाणें युरोपांतल्या इतर मुख्य शहरांत रोजची रहदारी चालू असते! नंतर आम्ही एक पेनी देऊन विमानें सुटण्याच्या आवारांत शिरलों; अर्थात् या आवाराला उंच लोखंडी खांबांचें कुंपण आहे पण येथून विमानांची ये-जा पाहण्यास सांपडते. आम्ही कठड्याशीं गेलों तों एक विमान निघण्याच्या तयारींत होतें; घाईघाईनें शेवटची मंडळी विमानाचे आंत शिरली व लवकरच विमानाचे एंजिनची घरघर सुरू होऊन विमान जमिनीपासून पुढें सरकूं लागलें; तें प्रथमतः फार हळूहळू पुढें पण हलकें हलकें वरवर सरकत जातें व बऱ्याच अंतरावर गेल्यावर पतंगासारखें वर जातें व मग वर्तुळाकार फिरूं लागतें व खूप उंच गेल्यावर चालूं लागतें. यंत्राचा खूप मोठा आवाज होतो. आकाशांत उंच गेल्या-वर विमान थेट मोठ्या पक्षासारखें दिसतें; दोन बाजूचे ते प्रचंड पंख, मागची ती लांबचलांब शेपटी व पुढची ती प्रचंड चोंच व मधलें माणसें बसण्याचें पोट! विमानाची कल्पना पक्षाच्या उडण्यावरून मनुष्यास सुचली असावी असें मला तो देखावा पाहून वाटलें. आणि जॉनसनच्या रासेलसमधील मनुष्याला पंख लावून उडण्याच्या काल्पनिक वर्णनाची आठवण झाली. एक विमान सुरू होऊन मार्गस्थ होई तोंच दुसरें विमान मुक्कामाला येत होतें. हळूहळू व वर्तुलाकार घिरट्या घालीत तें विमान खालीं आलें व शेवटीं तें जमिनीला येऊन थांबलें! याप्रमाणें अर्ध्या तासांत आम्हांला विमानांचें गमनागमन प्रत्यक्ष पाहण्यास सांपडलें व आम्हांला मोठी मजा वाटली. विमानाचे बंदराला खूप खुली जागा लागते यांत शंका नाहीं. त्यांत झाडें किंवा खांब किंवा उंच इमारती असतां कामा नये. **क्रॉयडनचें** हें मैदान असेंच निर्वृक्ष, खुलें, बिनइमारती व विलक्षण विस्तीर्ण आहे. हें मैदान सुमारें ३५० एकर आहे व तें अगदीं सपाट आहे. जिकडे तिकडे हिरवेंहिरवें गार गवत उगवलेलें

आहे. यामुळें तें पाहून मन अगदीं प्रसन्न होतें. निवळ आल्यावाटेनें परत न फिरतां आम्ही ब्रायटन रस्त्यानें पुढें पुढें चालत गेलों. हा रस्ता विमानबंदर सोडल्यानंतर चढता आहे. शेवटीं आम्ही लहानशा टेंकडीच्या माथ्यावर चार रस्त्यांच्या चौकाशीं आलों. येथून सभोंवारचा दूरवर-पर्यंत सर्व भूमिभाग दिसत होता. समोर खोल दरींत लहानसें खेडेवजा गांव दिसत होतें. घरांचीं तीं तांबडीं लाल छपरें मजेदार होतीं. दरीच्या पलीकडे मोठ्या उंच टेंकड्यांची रांग दिसत होती व ती टेंकडी तांब-डट रंगाच्या जमिनीची होती आणि भिंतीसारखी एकदम टेंकडी उंच झालेली होती व त्यावर जाणारा नागमोडी रस्ता स्पष्ट दिसत होता. खरोखरीच येथून दिसणारा देखावा डोळ्यापुढें मूर्तिमंत उभा आहे असें मला वाटतें. आम्ही हळूहळू उतरत्या रस्त्यानें दरीचे तळाशीं गेलों. जातांना उजव्या बाजूस सुबक बंगले दूरदूर लागत होते. शेवटीं आम्ही दरींत असलेल्या गांवांत आलों. मग मात्र पुनः दाट वस्तीच्या लंडनांत आलों असा भास झाला. रस्त्यांतील एका पाटीकडे पाहतां आम्ही **परलें** या **महत्तम लंडनच्या** शेवटच्या भागाला आलों असें कळलें. पोलीसजवळ चवकशीकरतां ५९ नंबरच्या **बसनें** आमच्या बिऱ्हाडापासून थोड्या अंतरावर असलेल्या **स्ट्रीथॅम कॉमन** या बागेजवळ जातां येईल असें कळलें. अर्थात् दोनतीन तास चालल्यानंतर **बसचा** सुखकर प्रवास व नंतर पुनः बिऱ्हाडापर्यंतचा पायीं प्रवास करण्याचा आम्हीं बेत केला. लवकरच ५९ नंबरची बस आली व त्यांत आम्ही बसलों. एका तासानें **स्ट्रीथॅम कॉमन** बागेजवळ उतरलों. या बाजूनें जातांना शहरची वस्ती सारखी लागलेली आहे असें दिसलें. **क्रॉयडनच्या** बाजूप्रमाणें मध्यें वस्तीला व घरांना खंड नाहीं. यामुळें खुद्द लंडनमध्यें जातांना ज्याप्र-माणें दोन्ही बाजूंस घरांच्या रांगांखेरीज कांहीं एक दिसत नाहीं तसेंच या वाटेनें जातांना होतें. **स्ट्रीथॅम कॉमनपासून** पुनः पायीं आम्ही बिऱ्हाडीं गेलों. हें प्रेक्षणीय स्थळ पाहण्यासहि चारपांच तास लागतात.

दक्षिण लंडनांतील सृष्टिसौंदर्याचें जणूं आगर असें प्रेक्षणीय ठिकाण म्हणजे **रिचमंड** गांव व **रिचमंड** बाग होय. या ठिकाणाला **बसनें** किंवा भुयारी रेल्वेनें जातां येतें. आम्ही भुयारी रेल्वेनें गेलों व **बसनें** परत आलों. स्टेशनपासून रिचमंड टेंकडीचा चढावाचा रस्ता सुरू होतो. या गांवांतील घरें चढत्या रस्त्याच्या दुतर्फा वसलेलीं आहेत. एक मैल चढावाचा रस्ता चालून गेल्यावर आम्ही टेंकडीच्या माथ्यावर आलों. आतां मात्र उजव्या बाजूला इमारतींची रांगचीरांग लागली. टेंकडीवर येतांना दुतर्फा दिसणारीं घरें नीटनेटकीं पण फार साधीं होतीं. परंतु टेंकडीच्या माथ्यावरील उजव्या बाजूच्या इमारती प्रचंड व सुंदर राजवाड्यासारख्या दिसल्या. येथें उन्हाळ्यांत श्रीमंत लोक येऊन राहतात. हीं अशा श्रीमंत लोकांकरितां बांधलेलीं विलासमंदिरें आहेत असें आम्हांला कळलें. रस्त्याच्या डाव्याबाजूस **रिचमंडटेरेस** बागेचें प्रवेशद्वार लागलें. या द्वारांतून आम्हीं आंत प्रवेश केला तों जिकडे तिकडे गर्द छायेचीं झाडेंच झाडें दृष्टीस पडलीं. हल्लीं मुंबईच्या मलबार टेकडीची ज्याप्रमाणें सर्व बाग बनविली आहे तशीच या सर्व टेंकडीची बागच बाग बनविली आहे ! जिकडे पहावें तिकडे गर्द छाया ! सर्व उतरता भूमिभाग हिरव्यागार हरळीनें आच्छादिलेला ! या हिरव्यागार उतरत जाणाऱ्या गालीच्यावर मधूनमधून नाना रंगांच्या फुलझाडांचे ताटवे केलेले दृग्गोचर झाले. टेकडीच्या पायथ्याशीं **टेम्स** नदीचा शांत व गंभीर वाहणारा प्रवाह व नदीचे पलीकडील झाडझाडोरा व त्याचेहि पलीकडे नीलवर्ण क्षितिज असा बहुरंगी देखावा एकसमयावच्छेदेंकरून आमच्या दृष्टीस पडला व मनाला विलक्षण आनंद वाटला. खरोखरी नंदनवनाच्या काल्पनिक वर्णनापेक्षांहि या बागेची वस्तुस्थिति अधिक विस्मयकारक आहे यांत शंका नाहीं. आम्ही या बागेच्या वनश्रीची शोभा पहात पहात टेकडीच्या मधल्या उताराशीं आलों तों तेथें एक छोटेंसें व साधें चहापानगृह लागलें. या चहापानगृहाच्या अरुंद पण लांबच लांब आंगणाच्या पट्टीच्या धारेवर पांचसात दाट छायेचे वृक्ष हारीनें

लावलेले होते. प्रत्येक झाडाच्या गर्द छायेखालीं एक मेज व सभोंवार चार खुर्च्या अशी चहापानगृहाची आकर्षक व्यवस्था केलेली होती. बराच वेळ चालणें होऊन या गार व गर्द छायेच्या सुंदर ठिकाणीं आल्यावर कोणास चहापानाची इच्छा होणार नाहीं ? तेव्हां आम्हांला तशी इच्छा झाली यांत नवल नाहीं. आम्हीं त्या सुंदर वृक्षमंडपांत चहापान केलें हें सांगावयास नको. आपल्या भाषेंत **वनभोजन** शब्द आहे. लंडनच्या सर्व बागांतून भोजनाची नव्हे पण चहापानाची व्यवस्था असल्यामुळें हजारों लोक **वनपान** करतात. ही **वनपानाची** पद्धत तिकडे सररहा चालू असते. तेव्हां तिकडलें यथार्थ वर्णन करण्याकरितां **वनपान** असा नवा शब्दप्रयोग मराठींत आणणें भाग आहे.

अर्थात् शीतल वृक्षाखालीं मौजेनें चहापान करून व ताजेतवाने होऊन आम्ही त्या बागेंतील खालच्या भागाकडे जात जात टेंकडीच्या अगदीं तळाशीं आलों. सर्वत्र फुलझाडें,सतेज फर्न झाडें, सदापानी झाडें, पानझाडें यांचे ताटवेंचे ताटवे लागत होते. बाग संपल्यावर बागेच्या दरवाजांतून बाहेरच्या रस्त्यावर आलों. त्या रस्त्याला लागून **टेम्स** नदीचा शांत गंभीर प्रवाह वाहतो. येथला देखावा अद्वितीय आहे. नदीला कॉंक्रीटचा धक्का घातलेला आहे व तेथें एक **होडीघर** आहे. येथें येऊन पुष्कळ लोक होडींत बसून वल्हविण्याचा व्यायाम व करमणूक करतात; किती तरी होड्या नदींतून जातांना दिसत होत्या. विलासी लोकांचे नानारंगी पोशाख पाहण्यालायक होते. नदीच्या वरच्या बाजूस **रिचमंड पूल** फार सुंदर दिसतो. हा अद्वितीय देखावा थोडा वेळ पाहून आम्ही पुनः बागेंत शिरलों व रिचमंड **टेरेस बागे**पलीकडच्या विस्तीर्ण रिचमंड पार्कमध्यें शिरलों. हा पार्क सुमारें सवादोन हजार एकर असून त्याचा घेर आठ मैलांचा आहे. हा पार्क प्रथम पहिल्या चार्लस राजानें केला. याच पार्कमध्यें **व्हाईट लॉज** म्हणून शुभ्ररंगी लहानसा राजवाडा आहे. दुसरा **जॉर्ज** राजा व राणी **कॅरोलाईन** यांचें हें वसंत ऋतूंतील आवडतें

राहण्याचें स्थान होतें. याला लागून ड्यूक ऑफ आरगाइलची मालमत्ता होती. या ठिकाणाचें हुबेहुब व मनोवेधक वर्णन सर वाल्टर स्कॉट या कादंबरीकारानें आपल्या विख्यात **हार्ट ऑफ मिडलोथियन** या कादंबरींत केलें आहे. त्या वर्णनाची सत्यता या पार्कमध्यें शिरल्यानें कळून येते. या पार्कमध्यें नानाविध मोठमोठे वृक्ष मधूनमधून लागतात व जिकडे तिकडे हिरवेंगार गवतचगवत दिसतें. हा पार्क फारच मोठा आहे व तो उंच सखल अशा भूमिभागाचा बनला आहे. त्यामध्यें कृत्रिम फुलझाडें वगैरे मुळींच नाहींत. यामुळें फार दाट नाहीं अशा रानाचा या ठिकाणीं भास होतो! येथें यथेच्छ हिंडावें व सृष्टीचें नानाविध रूप पहावें असा हा विस्तीर्ण पार्क आहे. हा हरिणांकरितां म्हणून पार्क करण्यांत आला होता. आतां सुद्धां येथें माणसाळलेले हरीण विश्रब्धपणें रवंथ करीत असलेले, चरत असलेले व स्वस्थ जमिनीवर पडलेले जागोजाग दिसले! हरणें तांबूस रंगाचीं व पिवळसर रंगाचीं आहेत व त्यांच्या अंगावर काळसर व पांढरट असे ठिपके ठिपके आहेत! या बागेंतलीं हीं हरणें, शेजारची ती **टेम्सनदी** व एकंदर वनश्री पाहिली त्यावेळीं कालिदासाच्या शाकुंतल नाटकांतील कण्व–आश्रम व त्या सभोंवारची वनशोभा व माणसाळलेलीं हरणें यांच्या वर्णनाची आठवण झाली व कालिदासाच्या कल्पनाशक्तीचें व हुबेहूब वर्णन करण्याच्या शैलीचें कौतुक वाटलें. हा पार्क सर्व हिंडून होणें अशक्य असल्यामुळें सायंकाळ होत चालली असें पाहून आम्ही परत फिरलों व येतांना **बसनें** विम्बल्डनी आलों.

**रिचमंड** पार्कच्या पश्चिमेस टेम्सनदी उत्तरवाहिनी आहे ती जराशी उत्तरेस वाहिल्यावर एकदम पूर्ववाहिनी बनते. नदीच्या उत्तरवाहिनी व पूर्ववाहिनी प्रवाहांमधल्या दुबेळक्या जागेंत व रिचमंड पार्कला लागून पण त्याच्या थेट उत्तरेस लंडनची जगविख्यात **क्युबाग** आहे. **रिचमंड** पार्कप्रमाणेंच ही बागहि पूर्वी इंग्लिश राजघराण्याच्या मालकीची होती. या बागेंतहि **व्हाईट हाऊसप्रमाणें** तांबड्या विटांचा **क्यु** राजवाडा आहे. हा राजवाडा तिसऱ्या जॉर्जचे



नं.५ लंडनःरिचमंड टेकडीच्या बाजूची बाग व टेम्स नदी पा.११६



नं. ६ लंडन : रिचमंड उपवनांतील हरणें पान ११६

आवडतें विश्रांतिस्थान होतें. पण मध्यलंडनमधील इतर मालकीच्या बागा व वाडे ज्याप्रमाणें राजमर्जीनें सार्वजनिक उपयोगाकरितां व करमणुकीकरितां राष्ट्राला बहाल करण्यांत आले त्याप्रमाणेंच या दोन्ही बागा हल्लीं सार्वजनिक असून लोकांचीं आवडतीं विश्रांतिस्थानें बनल्या आहेत. **क्यु बाग** सुमारें तीनशें एकरांची आहे. १८४१ मध्यें ही बाग वनस्पतिशास्त्रीय बाग म्हणून राष्ट्रीय संस्था करण्यांत आली व हल्लीं ही बाग शेतकी मंत्र्याच्या देखरेखीखालीं आहे. आम्हीं एका रविवारीं ही बाग पहाण्यास दोनप्रहरचे गेलों. भुयारी रेल्वेनें **व्हिक्टोरिया** स्टेशनपासून **क्युगार्डन्स** स्टेशनला गेलों. येथून **क्यु**बागेच्या पूर्वेस पण मधोमध असलेल्या व्हिक्टोरिया द्वारांतून आंत शिरलों. उजव्या बाजूला **झाडघर** आहे. हें नेहमीं ८० अंश उष्णतेवर ठेवलेलें असतें. यांत लहान मोठे नाना जातीचे व नाना देशांतले झाड लावलेले आहेत. प्रचंड कांचेचें उंच उंच दालन व त्यांत हारीनें हिरवेहिरवे गार सतेज पानांचे झाड सुंदर दिसतात. इंग्लंडसारख्या थंड देशांत आपल्याला चिरपरिचित असे वृक्ष पाहून आम्हांला आनंद वाटला. या झाडघराजवळ एक पदार्थसंग्रहालय आहे. या एकाच बागेंत वनस्पतिशास्त्रविषयक चार पदार्थसंग्रहालयें आहेत. तीं बागेच्या उत्तरेकडच्या अर्ध्या भागांतच आहेत. आम्हीं नमुना म्हणून एका संग्रहालयांत गेलों. तेथें निरनिराळ्या देशांतील नानाविध झाडांचीं, फुलांचीं वृक्षवेलींचीं सुंदर चित्रें व फोटो ठेविलेले आहेत; शिवाय प्रत्यक्ष नमुने ठेवलेले आहेत. हीं संग्रहालयें निव्वळ प्रेक्षणीय स्थळें नसून शास्त्रीय ज्ञान देणारीं मंदिरें आहेत. पण असें ज्ञान मिळविण्याकरितां एखाद्या वेळीं अर्धा तास येऊन काय उपयोग! आम्हीं अर्थात् ठेवलेल्या चिजांकडे भराभर दृष्टि टाकून बाहेर आलों. हें गृह एका तलावाच्यावरच आहे. त्या तलावाच्या बाजूनें गेलों व मग **ब्रॉडवॉकनें** (या नांवाचे गर्द छायेच्या वृक्षांच्या रांगेनें मंडपासारखे दिसणारे रस्ते बहुतेक सर्व लंडनच्या बागांमधून आहेत) आम्हीं नदीच्या किनाऱ्याकडे चालत गेलों तों उजव्या

बाजूला **ऊन-घरें** लागलीं. यांमध्यें उष्ण प्रदेशांत होणारीं झाडें कृत्रिम उष्णता ठेवून वाढविलेलीं आहेत. माडगृहाप्रमाणें हीं घरें पाहून व आपल्याला परिचित वृक्ष आंबे, केळी—वगैरे पाहून स्नेही भेटल्याप्रमाणें आनंद वाटला. ब्रॉड वॉकच्या टोंकाला तांबड्या विटांचा टुमदार राजवाडा आहे. याच राजवाड्यांत तिसरे जॉर्ज व त्यांचीं मुलें कधीं कधीं येऊन रहात असत. वाडा बंद असल्यामुळें आम्हांस पहावयास सांपडला नाहीं. या वाड्यावरून उत्तर दिशेनें गेलें म्हणजे बागेचा मुख्य दरवाजा लागतो; त्यांतून बाहेर पडलें म्हणजे बागेच्या थेट उत्तरेस असलेला बिनकमानीचा सुंदर क्यु पूल लागतो. येथून नदीकांठानें फिरण्याकरितां रस्ता केलेला आहे. त्या रस्त्यानें आम्ही गेलों. येथून नदी दक्षिणवाहिनी होते. तेव्हां हा वांकणाचा रस्ता मोठा मजेदार दिसतो; आम्ही बराच वेळ या रस्त्यानें फिरून मग पुनः बागेंत शिरलों, ते बागेच्या दक्षिण अंगाला आलों. इकडे एक लांबचलांब सरोवर आहे. त्याच्यासमोर पुनः **समशीतोष्ण** घर आहे. बागेच्या अगदीं आग्नेय कोपऱ्यांत चिनी देऊळ व जपानी बुद्ध देवळाचा प्रवेशद्वाराचा पूर्णप्रमाण नमुना आहे. दोन्ही बांधकलेचीं कामें प्रेक्षणीय आहेत. चिनी देऊळ १६५ फूट उंच आहे. या देवळाचे मजल्यावर मजले असून छपराचे कंगोरे एकावर एक पण शंकूप्रमाणें वर जातांजातां लहान लहान आकाराचे होत गेले आहेत. देवळाच्यावर उंच असा स्तंभ आहे. जपानी प्रवेशद्वाराची बांधणीहि विलक्षण आहे व त्यावरील शिल्पकलेचें नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. या बागेंतलें एकच **चहापानगृह** याच टोंकाला आहे. दोनतीन तास बागेंत सहल केल्यामुळें आम्हांला तहानभूक लागली होती. तेव्हां आम्ही चहापानगृहाकडे वळलों. तेथें विलक्षण गर्दी दिसली. तेव्हां तेथें चहा केक मिळण्यास वेळ लागेल असें पाहून आम्हीं बागेच्या या आग्नेय टोंकाला असलेल्या **लायनगेट** नांवाच्या दारानें बाहेर पडलों व चहापानगृह पाहूं लागलों. एक आळी टाकली तरी असें गृह दृष्टीस पडेना; दुसरी आळी टाकली तरी त्याचा पत्ता नाहीं. तेव्हां आम्हाला

आगींतून निघून फोपाटच्यांत पडल्याप्रमाणें झालें. कारण आम्ही चाललों इतका वेळ बागेंतल्या चहापानगृहीं आम्हीं वाट पाहिली असती तर तेथेंच आह्मांला चहा मिळाला असता. पण आतां परत जाणेंहि वेडे-पणाचें होतें. चहागृहांकरितां इतकें प्रसिद्ध असलेलें लंडन शहर पण आम्हांला चहापानगृह लागलें नाहीं याबद्दल अचंबा करीत आम्ही पुढें पुढें चालत गेलों, तेव्हां एका दुकानाच्या कांचेच्या दारावर ‘ येथें चहा दिला जाईल ’ अशी पाटी पाहिली व आमच्या जीवांत जीव आला. पण या पाटीचा अर्थ आम्हांला कळला नाहीं. तहानभुकेनें व्याकूळ झालेले आम्ही दुकानांत शिरलों तोंच दुकानदारानें आम्ही हिंदी आहोंत असें ओळखून आमच्याशीं हिंदुस्थानी बोलण्यास सुरवात केली, आम्हांला आश्चर्य व आनंद वाटला. आम्हीं त्याच्याजवळ चहा पाहिजे म्हणून सांगितलें. “आपल्याला हिंदुस्थानी कसें येतें ?” अशी आम्ही चवकशी केली. इतक्यांत त्यानें आपल्या बायकोस चहा तयार करण्यास सांगून आपली हकीकत सांगण्यास सुरवात केली. “ मी गेल्या लढाईच्या वेळीं सैन्यांत शिरलों होतों व दोन वर्षें हिंदुस्थानांत होतों; लढाई संपल्यावर सैन्य कमी झालें त्यांत मी कमी झालों व आतां मीं हें दुकान काढलें. या बाजूस चहापानगृह नसल्यामुळें ( कारण ही सर्व कुटुंबी लोकांची रहाती आळी आहे. ) **क्यु गार्डन**-मधून या बाजूस येणाऱ्या प्रवाशांची सोय व्हावी व माझ्याहि मिळक-तींत थोडी भर पडावी म्हणून मी **घरगुती** चहा देण्याची परवानगी मिळविली. माझें हें चहापानगृह नव्हे, माझी बेगमसाहेब ( यानें आपल्या बायकोसंबंधीं उपयोजिलेला हिंदुस्थानी शब्द ) येणाऱ्यास चहा करून देते; स्वतंत्र सेविका मी ठेवलेली नाहीं ” या बोलण्यानें पाटीच्या अर्थाचें व चहापानगृहाच्या अभावाचें गूढ आपोआप उकललें.

इतक्यांत ‘ बेगमसाहेबांनीं ’ चहा व केक्सचें ताट आमच्यापुढें आणून ठेविलें. ‘ या केक्स खोबऱ्याच्या चवाच्या आहेत व तुम्हांला आवडतील म्हणून मुद्दाम त्या आणिल्या आहेत ” असें दुकानदारानें सांगितलें.

यावेळीं आम्हीं त्या सुंदर, चवस व खुसखुशीत केक्सचा व चहाचा समाचार घेतला व दुकानदाराचें बिल देऊन व त्याचे विशेष आभार मानून आम्ही बाहेर पडलों. आमच्या भागाकडे जाणाऱ्या **बसच्या** ठिकाणीं येऊन आम्हीं **बस** गांठली व आम्ही प्रमुदित मनानें बिऱ्हाडीं ८॥ वाजतां पोहोंचलों. तो आदितवार असल्यामुळें रात्रीचें जेवण व्हावयाचें नव्हतें. सुमारें नऊ वाजतां अल्पाहार करून **क्यु** बागेंतील विविध प्रेक्षणीय गोष्टींची राहून राहून आठवण काढीत आम्ही आपल्या नित्यक्रमाला लागलों.

दक्षिण लंडनमधील जें प्रेक्षणीय स्थळ कोणीहि प्रवासी पाहिल्या· खेरीज रहात नाहीं तें स्थळ म्हणजे **स्फटिक प्रासाद** (Crystal Palace) हें होय. याला जरी **पॅलेस** म्हणतात तरी याचा मध्यलंडनांतील सार्व-जनिक इमारतींप्रमाणें राजवाड्याशीं व इंग्लिश राजांशीं कांहींएक संबंध नाहीं. हा स्फटिक प्रासाद मूळचा **हाईडपार्क** बागेंत १८५१ मध्यें भरलेल्या प्रसिद्ध प्रदर्शनाचा प्रशस्त मंडप होता. तें प्रदर्शन संपल्या-नंतर तो मंडप तेथून काढून आणखी त्याला वाढावे देऊन हा **स्फटिक प्रासाद** म्हणून **सिडनहॅम** या दक्षिण लंडनमधील सर्वांत उंच टेंकडीच्या माथ्यावर कायमचा उभारण्यांत आला ! या मंडपाचें मधलें दालन सोळाशें फूट लांब असून त्याच्या उत्तर व दक्षिण अंगास दोन आडवीं दालनें जोडलीं आहेत. त्यांचे टोंकांस दोन दोनशेंब्यायशीं फूट उंचीचे मनोरे आहेत; उत्तरेकडच्या मनोऱ्यावर विजेच्या पाळण्यानें वर जातां येतें. हा प्रासाद विलक्षण विस्तीर्ण आहे व तो सर्व कांचेचा असल्यामुळें त्याकडे पाहून मनुष्याचें मन थक्क होतें; याला सुमारें दहा हजार टन लोखंड लागलें आहे व कांच पंचवीस एकर जागा अडवील इतकी लागली आहे. याच्या मधोमध गायनाचें सभागृह आहे. त्यांतल्या वाद्याला चार हजार सुरांचे नळ आहेत; या सभागृहांत पांच सात हजार माणसें बसण्याची सोय आहे. येथल्या वाद्याचा आवाज इतक्या माण-सांना सहज ऐकूं जाण्यासारखा आहे.

या मधल्या प्रचंड व भव्य सभागृहाचे दोन्ही बाजूंस दालनापुढें दालनें लागतात व मधल्या खुल्या व उंचच उंच कांचेच्या छपराच्या रुंद पायवाटेंत संगमरवरी दगडाचे मोठमोठे प्रसिद्ध पुरुषांचे पुतळे व ग्रीक व रोमन पुराणांतील देवतांचे पुतळे हारीनें ठेवलेले आहेत. मध्यें पाण्याचा पाट वहात असून त्यांत व त्यासभोंवतीं सुंदर फुलझाडें लाविलीं आहेत. दालनें प्रशस्त असून त्यांत नाना देशांतील, नाना कालपर्वांतील बांधकामांचे हुबेहुब नमुने ठेविलेले आहेत. अर्थात् हे सर्व नमुने प्रदर्शनाचें वेळीं प्रदर्शनाकरितां करविलेले होते; तेच या कायमच्या पदार्थसंग्रहाल-यांत आणून ठेविले आहेत. या स्फटिक प्रासादांत करमणुकीकरितां एक सिनेमागृह आहे; अर्थात् एक सुंदर चहापानगृह आहे हें सांगाव-यास नको.

हा भव्य स्फटिक प्रासाद **सिडनहॅम** टेंकडीच्या माथ्यावर आहे व तो खालून दक्षिणोत्तर जाणाऱ्या रस्त्याला लागून आहे.रस्त्याचें पश्चिम बाजूला पायवाट असून तिला मोठा कमरभर दगडी भिंतीचा कठडा आहे. कारण त्या टेंकडीच्या खालून रेल्वे गेलेली आहे.रस्त्याला लागून जरा खालीं रेल्वे स्टेशन आहे. या पायवाटेवर उभें राहिलें म्हणजे लंडनचा कितीतरी भाग दृग्गोचर होतो. कारण ही टेंकडी खालपासून अडीचशें फूट उंच आहे. सिडनहॅम टेंकडीवर खालच्या बाजूस रहाते श्रीमंती बंगले असले तरी ते तुरळक असून या टेंकडीच्या आसपास पुष्कळ झाडी, वनें, बागा व खेळांचीं खुलीं मैदानें आहेत. यामुळें जिकडेतिकडे हिरवीगार झाडीच झाडी दृष्टीस पडते व लंडन शहरांत इतकी खुली जागा आहे हें पाहून आश्चर्य वाटतें. स्फटिक प्रासाद फारच लांब व उंच असल्यामुळें या प्रासादाचे मागें मोठी बाग आहे, याची प्रथम कल्पना होत नाहीं. पण सर्व प्रासाद पाहून मागच्या दारानें बाहेर गेलें म्हणजे विस्तीर्ण बाग, तलाव व झाडें दृष्टीस पडतात व माणसास मोठा अचंबा वाटतो. हा स्फटिक प्रासाद या टेंकडीवर उभारल्यानंतर या प्रासादाला जास्त आकर्षक स्वरूप येण्याकरितां दोनशें एकरांची ही बाग मागाहून जोडण्यांत आली. हा

भूमिभाग अर्थात् उतरता आहे म्हणून बागेच्या एकांखालीं एक अशा मजग्या बनविल्या आहेत. अगदीं खोलाच्या भागांत पायगाड्यांच्या शर्यतींकरितां नुसत्या काळ्या मातीचें वर्तुळाकार मैदान राखिलें आहे. या प्रासादाच्या समोरच पण खालच्या मजगीला प्लेन झाडांच्या रांगेचा एक गर्दछाय असा रस्ता आहे. येथें भर उन्हामध्येंसुद्धां सूर्याचा एक किरणहि खालीं जमिनीवर पडत नाहीं! इतकीं हीं झाडें विस्तृत, विपुलशाखी व विपुलपानी आहेत!

स्फाटिक प्रासाद हें प्रेक्षणीय स्थळ आमच्या बिऱ्हाडापासून पायचालीनें एक तासाचे अंतरावर असल्यामुळें मीं चार पांच वेळ तरी तें पाहिलें आहे. दक्षिण लंडनमधील पहिल्या प्रतीच्या प्रेक्षणीय स्थळांपैकीं तें एक आहे यांत शंका नाहीं. येथें उन्हाळ्यांत दर गुरुवारीं रात्रीं दारूकाम उडतें व तेंहि प्रेक्षणीय असतें. त्याचप्रमाणें या ठिकाणीं वारंवार निरनिराळ्या प्रकारचीं विशिष्ट पदार्थांचीं प्रदर्शनें भरतात. सरकशीचे खेळ येथेंच होतात. याप्रमाणें हें स्थळ दक्षिण लंडनमधील एक मोठें करमणुकीचें ठिकाण बनलें आहे व त्या सभोंवारची **वनश्री** आकर्षक असल्यामुळें या ठिकाणीं नेहमीं प्रेक्षकांची गर्दी असते.

दक्षिण लंडनमधील आतांपर्यंत वर्णिलेलीं स्थळें राजकृपेनें सार्वजनिक उपयोगास मिळालेलीं किंवा राष्ट्रीय तिजोरीच्या मदतीनें तयार झालेलीं किंवा सार्वजनिक आर्थिक सक्रिय सहानुभूतीनें निर्माण झालेलीं आहेत. पण पुढें वर्णावयाचीं स्थळें हीं खासगी व्यक्तींच्या दानशूरतेनें अस्तित्वांत आलीं व त्यांनीं तोडून दिलेल्या कायमच्या फंडांतून त्यांचा चालू खर्च भागविला जात आहे.

अशा प्रकारच्या स्थळांपैकीं तीनचार प्रेक्षणीय स्थळें एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींतील एका नटाच्या दानशूरतेनें निर्माण झालेलीं आहेत! **एडवर्ड एलन** नांवाचा एक अभिनयकुशल नट हा शेक्सपीयर, बेन जॉन्सन इत्यादि एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींतील प्रसिद्ध नाटक-



नं. ७ लंडन : कॉलेजरस्त्यावरील जकात नाकें पान १२३



नं. ८ लंडन : डलिच बागेचें प्रवेशद्वार पान १२३

कारांचा स्नेही होता. आपल्या अभिनयकौशल्यानें त्यानें पुष्कळ पैसा मिळविला. तो कित्येक नाटकगृहांचा मालक व म्यानेजर झाला. त्यानें आपले **डलिच** खेडेगांवांत ( जें पुढें लंडनशहरांत सामील करण्यांत आलें ) पुष्कळ मोठी इस्टेट केली व संततीच्या अभावीं सन १६१९ मध्यें ती सर्व इस्टेट व जागा देवदयेची संस्था म्हणून एक शाळा व धर्मशाळा स्थापन करण्याकरितां दान दिली. त्यांत ८० गरीब मुलांची शिकण्याची व्यवस्था करून शिवाय आल्यागेल्यास धर्मशाळेची सोय केली व या संस्थांच्या खर्चाकरितां आपली सर्व मालमत्ता व जमिनींचें उत्पन्न लावून दिलें ! एडवर्ड एलनची इस्टेट विस्तीर्ण होती. हल्लीं जेथें **हर्नेहिलस्टेशन** आहे तो भाग व **डेनमार्क** हिलपासून थेट **सिडनहॅम** हिलपर्यंतचा विस्तीर्ण भाग एलनच्या मालकीचा होता. लंडनच्या वाढी-मुळें या जामिनीला पुष्कळ किंमत आली व एलननें स्थापन केलेल्या संस्थांची पुष्कळ वाढ व भरभराट होऊं शकली. हा सर्व भाग खासगी मालकीचा होता. याचें एक निदर्शक अजूनहि त्या भागांत दृष्टोत्पत्तीस येतें. **डलिच** गांवांतून गेलेला **कॉलेज रोड** नांवाचा रस्ता सिडनहॅम टेंकडीकडे जातो. या शांत गर्द छायेच्या रस्त्यानें गेलें म्हणजे एक जकातनाकें लागतें. हें जकात नाकें खासगी असून या नाक्याचें सर्व उत्पन्न एलनच्या संस्थांस मिळतें. आतां या एलनच्या ट्रस्टमधून किती-तरी संस्था निघाल्या आहेत ! आधीं **डलिच कॉलेज** नांवाची टोलेजंग नवी इमारत बांधण्यांत आली आहे. या इमारतीच्या आसपास मोठ-मोठ्या वृक्षांची राईचराई लागून राहिलेली आहे. कॉलेजरोडवर लोखंडी भव्य मुख्य दरवाजा आहे. कॉलेजची इमारत तांबड्या विटांची असून तिला घड्याळाचा उंच टॉवर आहे व त्यावर सोनेरी आंकड्यांचें मोठें घड्याळ आहे. कॉलेजच्या मागच्या बाजूस प्रशस्त असें क्रीडांगण आहे.

लंडनच्या पुष्कळ शिक्षणसंस्थांना कॉलेज म्हणतात. पण त्या इक-डल्या **हायस्कूल**सारख्या किंवा इंग्लंडातील **पब्लिक स्कूल**सारख्या दुय्यम शिक्षणाच्या संस्था असतात. त्याप्रमाणें **डलिच** कॉलेज हें हल्लीं

मोठें पब्लिक स्कूल आहे व या इमारतींत अप्पर स्कूल असून लोअर स्कूल निराळ्या इमारतींत आहे. तसेंच ट्रस्टमधून एक मुलींची शाळाहि चालते. शाळेच्या सुपरिंटेंडेंटकरितां कॉलेजच्या आवारांत बंगला आहे. खरोखरी या शाळांसभोंवतीं इतकी मुबलक मोकळी जागा आहे व जागोजाग मोठमोठे वृक्ष आहेत कीं पाहणाराला शाळेचें ठिकाण पाहून आनंदी आनंद होतो. कॉलेजच्या दुसऱ्या बाजूस कॉलेजची सुंदर बाग असून त्यांत लहानसा तलाव आहे व त्यांत हंसपक्षी विहार करीत असतांना दिसतात ! त्याच्यापलीकडे टेनीस कोर्टें आहेत. शिवाय **डलिचरान** म्हणून एक मोठें क्षेत्र निसर्गस्थितींतच ठेवलेलें आहे. हें रान इतकें दाट आहे कीं, या रानांतून पायवाटेनें चाललें असतां आपण घनदाट जंगलांतून चाललों आहोंत असा भास होतो; व लंडनसारख्या दाट वस्तीच्या शहरांत इतकें मोठें रान कसें राहूं शकलें याचा अचंबा वाटतो ! पण एडवर्ड एलनची इस्टेट फार मोठी होती; त्यांतून ट्रस्टींनीं हें रान मुद्दाम ठेवून दिलें आहे. म्हणूनच तें असें निसर्गस्थितींत राहिलें आहे व दक्षिण लंडनच्या या भागाला या रानानें व इतर पुष्कळ खुल्या मैदानांनीं व सिडनहॅम टेकडीवर जाणाऱ्या साध्या शांत गर्दछायेच्या व बिनगर्दीच्या सडकेनें खेडवळ व स्वाभाविक सृष्टीचें स्वरूप आलेलें आहे. म्हणूनच हा रस्ता व हा भूमिभाग आमचा एक आवडता फिरण्याचा रस्ता होता. आठवड्यांतून एक दोन वेळ तरी आम्ही या भागाला फिरावयास येत होतों. पावसाळ्यांत व दिवस लहान झाल्यावर मात्र हा भाग किंचित् सर्द, भयाण व निर्मनुष्य वाटे यांत शंका नाहीं. लंडनमध्यें राहून निसर्गदेवीचा जास्त सहवास घडण्याजोगा हा भाग आहे व तो अत्यंत आल्हादजनक आहे यांत शंका नाहीं. या ट्रस्टमुळें या भागांत निसर्ग देवीचें साम्राज्य राहिलें आहे एवढेंच नव्हे तर या ट्रस्टमधून मनुष्यकृत सौंदर्याचें पोषण झालें आहे. तें **डलिच चित्रालय** ( Dulwich picture gallery ) व **डलिच बाग** यांमुळें होय. डलिच कॉलेज चित्रालय ही संस्था एडवर्ड एलनच्या स्फूर्तीनेंच झालेली

आहे. त्यानें आपल्या संग्रहाचीं चित्रें प्रथम कॉलेजला दिलीं; पुढें आणखी दोन गृहस्थांनीं आपआपले चित्रसंग्रह दिले. तेव्हां कॉलेज-करितां नवी इमारत बांधण्यांत आली व जुन्या इमारतींत स्वतंत्र चित्रालय स्थापण्यांत आलें व तें सर्वांना मोफत पाहण्याची सोय करण्यांत आली. ही लहानशी एकमजली दगडी इमारत आहे; पुढें छोटीशी फुलबाग आहे. चित्रालयांतला चित्रसंग्रह पाहण्यासारखा आहे; यांत दहा बारा दालनें आहेत. या चित्रालयाचा विशेष म्हणजे सतराव्या व अठराव्या शतकांतील प्रसिद्ध पुरुषांचीं चित्रें होत. येथें एडवर्ड एलन व त्यांची पत्नी यांचे फोटो असून एडवर्ड एलननें केलेलें मृत्युपत्र व ट्रस्ट यांची त्याच्या सहीची मूळ प्रत एका काचेच्या कपाटांत ठेविली आहे ! त्या चित्रांकडे व मृत्युपत्राकडे पाहून आम्हांला एलनच्या दानशूरत्वाचें मोठें कौतुक वाटलें. एक धंदेवाईक नट तो काय पण त्यानें १६१९ मध्यें आपली सर्व इस्टेट सार्वजनिक शिक्षणाला दिली व त्याच्या इस्टेटींतून सध्यां इतक्या लोकोपयोगी संस्था चालल्या आहेत असें पाहून आमच्या मनांत आलें कीं इंग्लंडमध्यें दत्तकाची चाल नव्हती व नाहीं ही किती राष्ट्रहितकर गोष्ट झाली आहे ! संततिरहित मरणारा सामान्य मनुष्यहि किती राष्ट्रहितपर संस्था या चालीच्या अभावीं काढूं शकतो याचें प्रत्यंतर दिसलें.

या ट्रस्टच्या योगानें दक्षिण लंडनला लाभलेली शेवटची गोष्ट म्हणजे **डलिच पार्क** होय. या बागेनें बहात्तर एकर जागा व्यापिली आहे. दक्षिण लंडनमधल्या सुंदर बागांपैकीं ही एक आहे यांत शंका नाहीं. या बागेचा सर्व भाग अगदीं सपाट आहे; इतर बागांप्रमाणें यांत होड्या वल्हवण्याजोगा नागमोडी तलाव आहे. त्यांतच अगदीं छोटें असें बेट केलें आहे; या बागेमध्यें सदापानी झाडें झुडपें खूप आहेत व वसंत-ऋतूंत फूलझाडेंहि पुष्कळ लावतात. गुलाब तर अतोनात आहेत ! या बागेंतले रस्ते रेतीचे व लहान लहान दगडांचे आहेत; ते डामराचे नसल्यामुळें पांढरे शुभ्र दिसतात व समुद्रकांठच्या पायवाटेप्रमाणें तीं

वालुकामय शुभ्र पायवाट व सभोंवारच्या हिरवळ गवताच्या मधूनमधून लावलेल्या नाना रंगीबेरंगी मोठमोठ्या फुलवृक्षांच्या राई यांनीं हा बाग मोठा चित्ताकर्षक वाटतो.

एडवर्ड एलनच्या दानशूरतेप्रमाणें **हार्निमन** नांवाच्या खासगी गृहस्थांच्या देणगीनें **हार्निमन** पदार्थसंग्रहालय व **हार्निमन बाग** हें प्रेक्षणीय स्थळ दक्षिण लंडनला लाभलें आहे.

हें ठिकाण सिडनहॅम टेंकडीच्या एका उंचवट्याच्या जागेवर बांधलेलें आहे. पदार्थसंग्रहालयाची इमारत पांढऱ्या दगडांची असून मोठी प्रशस्त आहे. या इमारतीला लागून बाग आहे. पण ही बाग उतरत्या भागापासून चढत चढत गेली आहे. यामुळें बागेच्या माथ्यावरून सभोंवारचा देखावा सुंदर दिसतो. असा देखावा डलिच बागेंतून मुळींच दिसत नाहीं. पण ही बाग लहानशी आहे. खरोखरीं हिला स्वतंत्र बाग म्हणतां येत नाहीं; तर पदार्थसंग्रहालयाचें तें, एक शोभेकरितां केलेलें अंग होय. एकदोन प्रहर करमणुकींत व विश्रांतींत घालविण्यासारखें हें स्थळ आहे यांत शंका नाहीं. या पदार्थसंग्रहालयाच्या आश्रयाखालीं सालाबाद दर आठवड्यास उन्हाळ्यांत व्याख्यानमाला चालते. या बागेचा व पदार्थसंग्रहालयाचा सर्व खर्च मूळ देणगीच्या व्याजांतून चालतो. इतकी मोठी देणगी हार्निमन साहेबांनीं दिली आहे.

दक्षिण लंडनमधील प्रेक्षणीय स्थळांत प्रमुख स्थान बागा व पार्क यांना आहे यांत शंका नाहीं. पण बऱ्याच बागांच्या वर्णनानंतर त्यांचें चर्वितचर्वण करण्यांत अर्थ नाहीं. तेव्हां राहिलेल्या बागांचा निव्वळ नामनिर्देश करून हा दक्षिण लंडनवर्णनाचा अध्याय संपवूं या.

आम्ही रहात होतों त्याच्या अगदीं नजीक **ब्राकवेल** म्हणून एक सुंदर बाग आहे. ही सुमारें १२५ एकर आहे. ही बाग तर आमची रोजची पायवाटेची बाग होती. हिला मधोमध एक उंचवटा आहे. बाकी भाग सखल आहे. ही बाग बऱ्यापैकीं आहे.

यापेक्षां मोठी पण अगदीं रानासारखी ठेवलेली बाग म्हणजे **स्ट्रीथॅम कॉमन** ही होय. ही खरोखरी बाग नव्हेच, तर हें एक मोकळें मैदान आहे व त्याचें माथ्यावर एक सपाट पठार असून मग तें उतरतें होत गेलें आहे. या भागांत एकहि झाड नाहीं. यामुळें हें मैदान खूप विस्तीर्ण दिसतें व सभोंवारचा देखावा स्पष्टपणें व खुलास दिसतो. पठाराचे मागें अगदीं रानटी झाडेंझुडपें आहेत व त्यांत निराळे रस्तेसुद्धां केलेले नाहींत. एक **रूकरी** नांवाची छोटेखानी फुलबाग मात्र पठाराच्या टोंकास आहे व ती पठाराच्या उतारावर केलेली आहे. यांत अतोनात फुलें ऋतूप्रमाणें असतात. येथें एक खडकावरला बाग ( Rock garden ) केलेला आहे. यामध्यें शेवाळ, नाना तऱ्हेचीं गवतें राखलेलीं आहेत व खडकांतून झुळूझुळू पाणी वाहत असतें.

यापेक्षां छोटी बाग म्हणजे डेनमार्क टेंकडीच्या टोंकाशीं असलेली **रस्किन** पार्क होय. प्रसिद्ध लेखक रस्किन हा डेनमार्क हिल या भागांत रहात असे, म्हणून त्याच्या स्मरणार्थ या बागेचे मूळचें **चॅंपियन** पार्क नांव बदलून त्याला **रस्किन पार्क** असें नवें नांव देण्यांत आलें आहे. ही छोटेखानी बाग प्रेक्षणीय आहे. दक्षिण लंडनांतील आम्हीं प्रत्यक्ष पाहिलेलीं प्रेक्षणीय स्थळें संपलीं. आम्हीं न पाहिलेलीं किती तरी आहेत पण आमच्या संकल्पाप्रमाणें येथें थांबणें रास्त आहे.

# प्रकरण ८ वें

## उत्तर लंडनमधील प्रेक्षणीय स्थळें

**महालंडनचा** दक्षिणलंडन हा भाग टेम्स नदीच्या विलक्षण वळणा-वळणाच्या प्रवाहानें स्वाभाविकपणें विभागला गेला आहे. पण मध्य-लंडन व उत्तरलंडन या भागांना विभागणारी अशी एखादी स्वाभाविक मर्यादा नाहीं. पण सामान्यतः असें समजण्यास हरकत नाहीं कीं लंडनपासून पश्चिम, उत्तर व ईशान्य दिशेला जाणाऱ्या मोठमोठ्या आगगाड्यांच्या स्टेशनांची रांग ही उत्तरलंडनची दक्षिण मर्यादा होय. निदान वर्णनाच्या सोयीकरितां तरी मी उत्तरलंडन व मध्यलंडन यांची ही मर्यादा धरून चालतों. ग्रेट वेस्टर्न रेल्वे ( G. W. R. ), लंडन मिडलंड स्कॉटिश रेल्वे ( L. M. S. R. ) व लंडन नॉर्थ ईस्टर्न रेल्वे ( L. N. E. R ) या तीन मोठ्या रेल्वे रस्त्यांची **पॅडिंग्टन, मेरिलीबोर्न, युस्टन, सेंट पॅंक्रिअस, किंग्जक्रॉस** व **लिव्हरपूल** हीं सहा स्टेशनें किंचित् धनुष्याकार अशा पूर्वपश्चिम जाणाऱ्या **मेरिलीबोर्न, युस्टन, पेंटनाव्हिली** व **सिटी** अशीं निरनिराळीं नांवें असणाऱ्या प्रशस्त राजमार्गाला लागून आहेत. हीं स्टेशनें मध्य लंडनाचीं जणूं कांहीं प्रवेशद्वारेंच होत. यांच्या उत्तरे-कडील सर्व वस्ती म्हणजे उत्तर लंडन होय.

उत्तर लंडनमधलें अत्यंत दूरचें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे चेरिंग क्रॉस-पासून बारा तेरा मैलांवर ईशान्य दिशेस असलेलें **एपिंग फॉरेस्ट** होय. उन्हाळयाच्या व लांब दिवसांच्या ऋतूमध्यें वनभोजनास व वनोपाहारास जाण्याचें लंडनकरांचें हें आवडतें ठिकाण आहे. पावसाळ्यांत व हिंवाळ्यांत तेथें जाण्याची सोय नसते. कारण त्या दिवसांत तेथें गारठा व चिखल अतोनात असतात व त्या ऋतूमध्यें दिवसां तीन चार वाजतांच काळोख पडत असल्यामुळें जंगलांत वाट

चुकण्याची फार धास्ती असते. पण साधारणतः मेपासून आक्टोबरपर्यंत एपिंग फॉरेस्टला शनवारीं रविवारीं लोक फार जातात. हें फॉरेस्ट म्हणजे सतराव्या शतकामध्यें साठहजार एकर इतक्या जागेवर पसरलेल्या **वॉल-थॅम** जंगलाचा अवशेष आहे. हल्लीं राखून ठेवलेलें जंगल सुमारें सहा हजार एकर आहे. हें लंडन कौंटी कौंसिलनें मूळ मालकांकडून विकत घेऊन लंडनकरांच्या उपयोगाकरितां राखून ठेविलें. लंडनकरांना हें जंगल अर्पण करण्याचा विधि व्हिक्टोरिया राणीनें ६ मे १८८२ रोजीं केला व त्या वेळीं समारंभाचें एक स्मारक म्हणून एक देवदार झाड राणीनें स्वहस्तें लाविलें. हें जंगल सुमारें सातआठ मैल लांब व दीडदोन मैल रुंद आहे. या जंगलाच्या थेट मधून दक्षिणोत्तर असा मोठा रस्ता केलेला आहे.

हें ठिकाण पाहण्यास आम्ही सर्व मंडळी गेलों होतों. मिसेस् बॅाट व मिस् विनी बॅाट, मिस्टर केकरे, माझा मुलगा मनोहर व मी अशी पांच मंडळी आम्ही होतों. सकाळची न्याहारी करून आम्ही घराहून सकाळीं नऊ वाजतां निघून व्हिक्टोरिया स्टेशनला आलों व तेथून **बसनें** एपिंग फॉरेस्टच्या दक्षिण टोंकाशीं सुमारें साडेअकरा वाजतां पोहोंचलों. तेथें साधारण वर्तुळाकार अशी विस्तीर्ण खुली जागा होती व तिन्ही बाजूंला जंगलाची जणूं कांहीं भिंतच झाली होती. कारण जंगल इतकें दाट होतें कीं त्यांतून पलीकडे कांहीं एक दिसत नव्हतें. फार दूरवर एखाददुसरें प्रार्थनामंदिराचें पांढरें शुभ्र उंच शिखर दृग्गोचर होत होतें. या विस्तीर्ण खुल्या जागेंत मधून मधून झाडांचे पुंजकेपुंजके होते. व स्त्रीपुरुषांच्या लहान लहान टोळ्या सहल करीत होत्या. **बसच्या** स्टँडनजीक एक साधें चहापानगृह होतें. त्या दिवशीं हवा चांगली सुखकर—जास्त ऊन किंवा जास्त थंड नव्हे—अशी होती. यामुळें आम्ही मोठ्या आनंदानें या खुल्या जागेच्या आस-पासच्या जंगलांत तास दीड तास हिंडलों. एकाच्या सुमारास गर्दछाय अशा एका झाडाच्या राईखालीं हिरव्यागार गवतावर वनोपाहारार्थ आम्ही

बसलों. अशा ठिकाणीं नेहमीचीं टेबलें, खुर्च्या कोठलीं ! पण हिरव्यागार स्वच्छ जमिनीवर मेजावर घालावयाच्या चादरेऐवजीं आम्हीं कागद हांतरले व मिसेस बॉटनीं बरोबर आणलेले फराळाचे पदार्थ सर्वांच्या पानावर—नव्हे—कागदावर वाढले. घराहून न्याहारी करून निघाल्यापासून चांगली सहल केल्यामुळें भूक चांगली लागली होती. आम्ही फराळाच्या पदार्थांचा चांगला चट्टामट्टा केला हें सांगावयास नको. नंतर चहावाल्याकडून आम्हीं चहा आणला व तोहि मोठ्या मजेनें घेतला. याप्रमाणें **वनोपाहार** व **वनपान** आटोपलें तों दोन वाजून गेले ! मग आम्हीं भिंतीसारख्या भासणाऱ्या दाट जंगलांत मनसोक्त फिरण्याकरितां त्यांत प्रवेश केला. खरोखरी जंगल इतकें दाट कीं एकदां आंत शिरल्यावर जिकडेतिकडे झाडझाडोरा, वृक्षवेली व गवताळ जमीन यांखेरीज कांहींएक दिसत नाहींसें झालें. आंत गेल्यावर मनुष्याची सहज दिशाभूल होते. निरनिराळ्या जातींचे लहानमोठे वृक्ष सारखे लागले. त्यांच्या वेड्यावांकड्या खांद्या अगदीं खालपर्यंत आलेल्या दिसल्या. पुष्कळ ठिकाणीं खांद्या बाजूला करून मार्ग काढावा लागला. किती तरी वृक्षांवर मोठमोठ्या रानवेली चढलेल्या दिसल्या. जमिनीवरहि वाढणाऱ्या वेलींचीं जाळींच्या जाळीं लागलीं; रुंद रुंद पानांच्या खुरट्या रोपांनीं कित्येक ठिकाणीं सर्व जागा व्यापलेली दिसली. अर्थात् केव्हां केव्हां तर पाऊलवाटहि दृष्टीस पडत नाहीं. मग कसा तरी मार्ग शोधून काढावा लागतो. अशा वेळीं भलत्याच बाजूला शिरल्यास वाट चुकण्याचा पुष्कळ संभव असतो. कारण या जंगलांत एकच बांधलेली सडक आहे व एकदां कां दिशाभूल झाली म्हणजे पुनः वाट मिळण्याची पंचाईत होते !

आम्हीं रस्त्याच्या डाव्या बाजूस शिरलों होतों व बरेच चालून गेल्यावर आम्हांला एक चढती अशी पायवाट लागली. ही वाट **हायबीच** म्हणून एपिंग फॉरेस्टच्या मध्यावर असलेल्या उंचवट्याच्या भागाला जाते. त्या वाटेनें आम्ही वर चढत चढत गेलों. इकडे वृक्ष

फारच प्रचंड व उंच होते. वाटेंत एकदोन झोंपडीवजा घरें लागलीं. एका घराच्या पुढें पुष्कळ गुलाबाचीं झाडें लावलेलीं दिसलीं व त्यांवर सुंदर नानारंगी गुलाबांचीं फुलेंच फुलें लागून राहिलीं होतीं. पुढें एक जरा बंगलेवजा घर लागलें. तें अर्थात् हॉटेल होतें. नंतर आम्ही त्या उंचवट्याच्या पठारावर पोहोंचलों. येथें साठसाठ फूट उंचीचे प्रचंड वृक्ष होते. पश्चिम बाजू खुली असून तेथून दूरवरचा देखावा सुंदर दिसत होता. जंगलांत शिरल्यापासून दोनअडीच तासांनीं प्रथमच आम्हांला दूरचा देखावा दृग्गोचर झाला. आतां अर्थात् परत फिरण्याची वेळ झाली म्हणून आम्हीं निरुपायानें तें **हायबीच** ठिकाण सोडलें व परत सडकेकडे वळलों. आतां मात्र पाय दुखूं लागले. कारण आमची चार-पांच तास चाल झाली होती. मिस **विनी** तर अगदीं दमलीच. अर्थात् ती वरकरणी न दमल्याचा आव आणीत होती. पण तिच्या किंचित् लाल झालेल्या चेहेऱ्यावरून, चालण्याच्या श्रमानें आलेल्या घर्मबिंदूंवरून व चालण्याच्या मंदगतीवरून तिची खरी स्थिति झाकत नव्हती. पण शेवटीं एकदांची सडक दृष्टोत्पत्तीस आली. तेव्हां श्रमपरिहार झाल्या-सारखें वाटून चालण्याला हुरूप आला व आम्हीं **बसच्या** स्टँडजवळ आलों व लागलीच **बसमध्यें** बसलों. थोड्या वेळानें **बस** चालू झाली व आम्हीं दीड दोन तासांनीं म्हणजे सुमारें आठ वाजतां मोठ्या प्रमुदित मनानें पण दमलेल्या शरीरानें सुखरूप परत आलों. **एपिंग फॉरेस्टची** सफर म्हणजे सबंध एक दिवसाची सफर होय यांत शंका नाहीं. अर्थात् या सफरीमध्यें सृष्टिदेवीचें स्वाभाविक व अकृत्रिम रूप पहावयास सांपडतें; मनुष्यकृतीच्या खुणा कांहीं काळ लुप्त होतात व अकृत्रिम वनश्री आप-ल्याला अनुभवण्यास सांपडते. लंडनच्या नजीक इतकें मोठें व इतकें दाट जंगल व तेंहि निसर्गस्थितींत कसें राहिलें याचें **एपिंग फॉरेस्ट** प्रथम पाहणाऱ्याला मोठें आश्चर्य वाटतें यांत शंका नाहीं. पण इंग्रज लोक जितके कलाप्रिय आहेत तितकेच निसर्गप्रिय आहेत. म्हणून अशीं मोठ-मोठीं निसर्गरमणीय ठिकाणें त्यांनीं सार्वजनिक खर्चानें राखून ठेविलीं

आहेत ! अशा प्रकारचे विचार त्या सर्व दिवसभर माझ्या मनांत सारखे घोळत होते.

उत्तरलंडनमधील आम्हीं पाहिलेलें दुसरें प्रेक्षणीय स्थळ **फिन्सबेरी** बाग होय. ही बागहि लंडन कौंटि-कौन्सिलच्या मालकीची आहे. लंडनच्या **ईस्ट एन्ड**ला राहणाऱ्या मजूर व गरीब लोकांचें तें आवडतें स्थान होय. या बागेनें ११५ एकर जागा व्यापिली आहे.

या बागेला आम्हीं एका निरभ्र व प्रकाशमय अशा आदितवारीं न्याहारीनंतर गेलों. आमच्या बिऱ्हाडाहून बसनें **एलिफंट आणि कॅसल** ( लंडनमधल्या एका मोठ्या गर्दीच्या चौकाचें हें हिंदुस्थानां-तल्या सारखें नांव आहे; कां पडलें ते शोधांतीं सुद्धां कळलें नाहीं ) या चौकाशीं आलों. येथून पांचसहा बाजूला मोठमोठे रस्ते जातात. भुयारी आगगाडी येथें फारच खोल आहे व तिला फिरत्या जिन्यानें खालीं जावें लागतें. खालीं गेल्यावर वांकडया तिकडया भुयारी पाय-वाटेनें **मुरगेट**ला जाणाऱ्या आगगाडीकडे जायला कितीतरी वेळ लागतो. जिकडे तिकडे विजेचे दिवे असतात म्हणून बरें. पण जुन्या काळच्या कादंबऱ्यांतील भुयारी चोरवाटेची येथून जातांना आठवण होते. **मुरगेट**ला पोहोंचल्यावर पुनः **मेट्रोपॉलिटन** भुयारी रेल्वेच्या **मुरगेट ते फिन्सबेरी** पर्यंत जाणाऱ्या फाट्याच्या प्लॅटफार्मला भुयारांतूनच जावें लागतें. ही भुयारी पायवाट तर चक्रव्यूहासारखी वाटते; प्रथम फिरत्या जिन्यानें भुयारांतच पण वर जावें लागतें. मग वाकणें व्राकणें घेऊन शेवटीं एकदां **मुरगेट-फिन्सबेरी** भुयारी फांट्याचा प्लॅटफार्म येतो. हा आगगाडीचा फांटा एकच एक लाइनीचा आहे व ट्रॅमप्रमाणें एकच एक आगगाडी फिन्सबेरीहून येते व लगेच परत जाते. यामुळें प्लॅटफार्मवर थांबावें लागतें; प्लॅटफार्म बोगद्याच्या टोंकाला आहे. आगगाडी प्लॅटफार्म-वर येते व लागलीच आल्या वाटेनेंच उलट चालूं लागते. ही अशी एकेरी लाइन असल्यामुळें इकडे इतर स्टेशनांप्रमाणें गर्दी दिसत नाहीं. साधारणपणें शुकशुकाट भासतो; अर्धा रस्ता गेल्यावर भुयारी मार्ग जमिनी-

वरून जातो त्याची मौज वाटते; पण रेल्वे मार्ग पुन: भुयारांत शिरतो. शेवटीं एकदां आम्हीं **फिन्सबेरी** स्टेशनला पोहोंचलों व साध्याच जिन्यानें वर आलों. **मुरगेट** ते **फिन्सबेरी** ही भुयारी आगगाडी खरी पण ती जमिनीखालीं फार खोल नाहीं असें वाटलें. तेथून आम्हीं चालत **फिन्सबेरी** बागेला गेलों. ही बाग लांबट चौकोनी आहे. हिचा अर्धाअधिक भाग जरा उंचावर आहे व बाकीचा जरा खोल आहे. बाग खुल्या हिरवळ मैदानाचीच आहे; डामर व क्रांक्रीटच्या काळसर रंगाच्या छोट्या पायवाटा सर्वत्र आहेत. बागेच्या लांब बाजूच्या मधोमध गर्द छायाच्छादित राजरस्ता आहे. हा लांबच लांब राजरस्त्यासारखा सरळ असून दोन्हीं बाजूंस **प्लेन** नांवाच्या पांढऱ्या रंगाच्या खोडाच्या व बहुपानी बहुशाखी झाडांची दुतर्फी रांगच रांग आहे. लंडनच्या बहुतेक प्रत्येक बागेंत **ब्राडवॉक** नांवाचा रस्ता असतो तसाच हा रस्ता आहे. पण त्याच्या लांबीमुळें, सरळपणामुळें व दोन्हीं बाजूंच्या सुंदर गर्दछायी वृक्षांनीं हा रस्ता फार रमणीय दिसतो यांत शंका नाहीं. पण या बागेचा विशेष म्हणजे फुलबाग होय. या ठिकाणीं किती रंगांचीं फुलझाडें होतीं म्हणून सांगावें ? इन्द्रधनुष्याच्या साती रंगांचीं तर फुलें होतींच; पण प्रत्येक जातीच्या रंगाच्या कमीजास्त छटा असलेल्या नानातऱ्हा होत्या. उ. लिली वेल घ्या; यांना सामान्यत: पांढरीं गुलछबूपेक्षां जरा मोठीं फुलें येतात. पण तेथें आम्हीं निळीं, पांढरीं, पिवळीं अशीं तीन रंगी लिली वेलीचीं फुलें पाहिलीं ! कितीतरी झाडांना जणूं कांहीं हार गुंफल्याप्रमाणें छोट्या खांद्यांना हारीनें फुलें आलेलीं होतीं. कांहीं झाडांवर फुलांच्या माळाच माळा टांगल्याप्रमाणें दिसत होत्या. कांहीं फुलझाडें जमिनीच्या आंत उगवणारीं व फक्त फुलें जमिनीवर आलेलीं दिसत होतीं. जणूं कांहीं मुद्दाम कोणी सर्व जमिनीवर फुलेंच फुलें पसरून ठेविलीं आहेत ! खरोखरी या बागेंतील नानाविध छोटीं व मोठीं फुलझाडें पाहून आम्हांला आनंद व आश्चर्य वाटलें. तीनचार तास हें प्रेक्षणीय स्थळ पाहून आम्हीं परत स्वगृहीं उपाहाराला आलों.

उत्तर लंडनमधलें तिसरें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे **हॅमस्टेड हीथ** होय. याचें एकंदर क्षेत्रफळ सुमारें एक हजार एकर आहे. या एकाच ठिकाणीं चार दृश्यें आहेत त्याचें यथाक्रम वर्णन करतों.

**हॅमस्टेड हीथला** जाण्याला भुयारी रेल्वेचीं दोन स्टेशनें आहेत; एक **हॅमस्टेड हीथ** व दुसरें **बेलसाईझ पार्क**. आम्हीं दोन्ही स्टेशनांकडून हीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्यास दोनदां गेलों होतों. **हॅमस्टेड हीथ हे बेलसाईझ पार्कच्या** पलीकडचेंच भुयारी स्टेशन आहे. बेलसाईझ पार्ककडून गेलें म्हणजे प्रथम पूर्व बाजूची **पार्लमेंट** टेकडी आधीं लागते. दक्षिण लंडनमध्यें जशी **सिडनहॅम** टेकडी बरीच उंच असून तेथून लंडन शहराचा देखावा चांगला दिसतो त्याचप्रमाणें या टेंकडीवरूनहि देखावा आश्चर्यकारक दिसतो. **सिडनहॅम** टेकडी ही एक टेकड्यांची ओळ असून त्यावर झाडी पुष्कळ आहे व स्फटिक प्रासादाच्या समोरून फक्त लंडनचा स्पष्ट देखावा दिसतो; पण **पार्लमेंट** टेकडी ही उंचसखल **हॅमस्टेड** या गवतांळ खुल्या मैदानाला लागून एकदम उंच झालेली टेकडी आहे व तिचा पठार वर्तुळाकार आहे. येथें झाडें नाहींत. जिकडे तिकडे हिरवेगार गवत आहे. या टेकडी-वरून लंडन शहर किती सपाट आहे व त्याची वस्ती किती दाट व विस्तीर्ण आहे हें पाहून आश्चर्य वाटलें. ही टेकडी उतरून खालीं आलें म्हणजे **हॅमस्टेड हीथ** मधून हवे तिकडे फिरत जावें. खोलगट भागांत तलावांची माळच माळ लागते. यामध्यें पोहण्याची व्यवस्था केलेली आहे. तलावाचे किनाऱ्यावर लाकडी प्लॅटफॉर्म व एक उंच जिना केलेला असतो व तेथून उड्या टाकण्याची सोय असते. तेथें स्त्रियांकरितां निराळी पोहण्याची सोय व व्यवस्था आहे. या खोलगट भागाकडून गेलें म्हणजे पुनः चढावाचा भाग लागतो व आपण **हॅमस्टेड हीथच्या** पठारावर येतों. येथें लहानशी फुलझा-डांची बाग केलेली आहे. येथूनहि लंडनची रमणीय शोभा दिसते. आणखी जरा पुढें गेलें म्हणजे खुलें गवताळ मैदान संपून **केनवुड**,

लागतें. हें मात्र खरोखरीच दाट वन आहे यांत शंका नाहीं. येथें उंच उंच प्रचंड वृक्ष सारखे लागतात. अगदीं गर्द छाया सर्वत्र असते. खुलें मैदान व त्याचे लगतच इतकें घनदाट रान यांचा विरोध विस्मयजनक वाटतो. हें दाट रान टाकून जरा पुढें गेलें म्हणजे **केनवन** राजवाडा लागतो. यामध्यें उत्तम चित्रसंग्रह आहे. पण हा वाडा बंद असल्यामुळें चित्रें पहाण्यास सांपडलीं नाहींत. पण खुद्द लंडन शहरांत इतकीं चित्रसंग्रहालयें आहेत कीं बागेंतले छोटे संग्रह पहाण्याची हौस वाटत नाहीं. या राजवाड्याच्या जरा पश्चिमेस गेल्यानंतर हें रान संपून पुनः खुलें मैदान लागतें व **स्पॅनियर्डस** नांवाचा रस्ता लागतो. हा रस्ता **हॅमस्टेड हीथच्या** पठारावरून गेला आहे. हा वलांडून गेलें म्हणजे पुनः उतार लागतो. तो टाकून खालीं आलें कीं सपाटी लागते व सपाट जागेवर **हॅमस्टेड गार्डन** गांव लागतें. हें गांव म्हणजे आरोग्यवर्धक पद्धतीवर नवी केलेली वसाहत होय. तीन बाजूंना लहान लहान सुबक घरें असून पुढली बाजू खुली ठेवलेली असते; तेथें व मधल्या सर्व खुल्या जागेंत सुंदर बाग केलेली असते. म्हणून अशा नव्या वस्तीला **गार्डन सबर्ब** किंवा **बागगांव** म्हणतात. येथें आल्यावर आम्हांला फार आनंद वाटला. तीं नीटनेटकीं सुबक घरें, त्यांच्यासमोर छोटेखानी बागा व मध्यें मोठी थोरली फुलझाडांची बाग हा एकंदर देखावा रमणीय आहे यांत शंका नाहीं. मुख्य लंडनपेक्षां हीं घरें थोडीं दूरदूर असल्यामुळें येथें गर्दी, दाटी किंवा घरांची खेचाखेची झाली आहे असें वाटत नाहीं; शिवाय घरांमध्यें पुष्कळ जागा मोकळी असल्यामुळें शांत व खुलास वाटतें व येथें राहणें लंडनपेक्षां जास्त आरोग्यकारक व आनंददायक असलें पाहिजे अशी तावडतोब खात्री पटते. हें सुंदर नवें गांव पाहून आम्ही परत फिरलों तों सरळ रस्त्यानें **गोल्डर्स ग्रीन** या भुयारी रेलवे स्टेशनला आलों ! पण पहातों तों या भुयारी रेलवे स्टेशनचा प्लॅटफार्म सभोंवारच्या जागेच्या वरच असून आम्हांला या भुयारी रेलवेच्या प्लॅटफॉर्मला जाण्याकरितां जिना चढून वर जावें लागलें. हें पाहून निव्वळ नांवावरून केव्हां केव्हां कशी फसगत होते असें मनांत आलें.

उत्तरलंडनमधल्या प्रेक्षणीय स्थळांतील मुकुटमणि म्हणजे अर्थात् रीजंट बाग होय. हें ठिकाण निव्वळ करमणुकीचें स्थान आहे असें मात्र नव्हे. क्युबागेप्रमाणें हें ठिकाण ज्ञानदायकहि आहे. क्यु बाग ही ज्याप्रमाणें वनस्पतिशास्त्राच्या ज्ञानाचें एक अपूर्व साधन आहे त्याप्रमाणें रीजंट बाग ही प्राणिशास्त्रज्ञानाचें एक उत्कृष्ट साधन आहे. कारण येथें जगांतील अत्यंत मोठें असें प्राणिसंग्रहालय आहे.

रीजंट बाग ही सामान्यतः वर्तुळाकार आहे व तिच्या सभोंवार दुतर्फा वृक्षराजी असलेला एक सुंदर रस्ता आहे. तो दोन मैलांच्या वरच आहे, याला औटर सर्कल म्हणतात. कारण या बागेच्या दक्षिण भागांत इनर सर्कल म्हणून एक रस्ता व कुडलेली जागा आहे व ती बोटॅनिकल सोसायटीला भाड्यानें दिली असून त्या बागेंत वनस्पतिशास्त्रोपयोगी असे पुष्कळ वृक्षांचे नमुने लावलेले आहेत. ही बाग पहाण्यास १ शिलिंग प्रवेशफी पडते. आम्हीं एके दिवशीं एवढी मोठी फी भरून बाग पहावयास गेलों. पण येथें आमची निराशा झाली. कारण क्यु बागेच्या मानानें येथें पुष्कळ कमीच झाडें आहेत व तीं म्हणण्यासारखीं वर्गीकरणानें लावलीं आहेत अशांतलाहि भाग नाहीं. शिवाय, या कुडलेल्या जागेंत पुष्कळ टेनीस कोर्टें दिसलीं; व एक मोठें चहापानगृहहि दिसलें. तेव्हां बोटॅनिकल सोसायटीच्या सभासदांकरितां ही सर्व व्यवस्था आहे असें आमच्या ध्यानांत आलें. पण वनस्पतिशास्त्रीय दृष्टीनें या बागेचें आम्हांस मुळींच महत्त्व वाटलें नाहीं. ज्ञानदानाच्या दृष्टीनें क्यु बागच लंडनमधील खरी शास्त्रीय व ज्ञानदायक बाग होय यांत शंका नाहीं. हें इनर सर्कल आम्हांला फारसें चित्ताकर्षक वाटलें नाहीं हें मात्र खरें आहे. पण मुख्य रीजंट बाग मात्र फारच रमणीय आहे. या बागेच्या प्रत्येक प्रवेशद्वाराच्या आसपास उत्तम फुलझाडें लावलेलीं आहेत; तसेंच नानारंगी क्रोटनचीं सुंदर पानांचीं झाडें लाविलीं आहेत; प्रचंड वृक्षराजीहि मधुन मधून आहेत. लंडनच्या इतर बागांप्रमाणें येथें ब्रॉडवे म्हणून एक गर्द छायेची प्रशस्त सरळ सडक आहे. येथें

दररोज शेकडोंशे लोक विश्रांतीकरितां व करमणुकीकरितां येतात. येथें सुंदर सरोवर आहे; त्याचा आकार इंग्रजी **वाय** अक्षरासारखा आहे. या बागेच्या वायव्यटोंकाला मुलींचें एक कॉलेज आहे. या बागेच्या उत्तर भागाचा त्रिकोनी भाग प्राणिसंग्रहालयाला दिलेला आहे. हें प्राणिसंग्रहालय फारच प्रचंड आहे. येथें तीन हजारांच्या वर प्राणी आहेत. कीटक, पक्षी व मासे यांची तर गणतीच नाहीं ! हें प्राणिसंग्रहालय पाहण्यास प्राणिशास्त्रवेत्त्याला दिवसानुदिवस. लागतील इतकें हें विस्तीर्ण आहे. यानें सुमारें पस्तीसचाळीस एकर जागा व्यापिली असून याचे **रीजंट कालवा** व **औटर सर्कल** यांनीं तीन भाग पडलेले आहेत. उत्तरबाग, मध्यबाग व दक्षिणबाग; उत्तरबागेचा चिंचोळा लांबट भाग, आलबर्ट रस्ता व रीजंट कालवा याचें दरम्यान आहे. **चॉक फार्म** स्टेशनकडून आलें म्हणजे **उत्तरद्वार** नांवाचें प्रवेशद्वार लागतें. या उत्तरभागांत लहानमोठ्या पक्षीवर्गांतील प्राण्यांचीं घरें, आवारें व जाळीच्या कुंपणानें कुडलेलीं कुरणें आहेत. येथें नाना रंगांचे, नाना आकारांचे, विचित्र पंखांचे व पिसाऱ्यांचे असंख्य लहानमोठे पक्षी उडत व किलबिल करीत असतांना दृष्टोत्पत्तीस येतात. या चिंचोळ्या बागेच्या दक्षिणेस मोठा रुंद असा कालवा लागतो; त्यावर दोन बाजूला दोन पूल आहेत. त्यावरून मधल्या बागेंत येतां येतें. या मधल्या बागेच्या मधोमध वानरगृह आहे व त्याच्या डाव्या बाजूस झीब्रा, जीराफ, हीपापोटामस् इत्यादि मोठे पशू आहेत. दुसऱ्या बाजूस हत्ती, कांगारू व लहानसहान वन्य पशू आहेत. या मध्यबागेच्या दक्षिणेस **औटर सर्कल** नांवाचा प्रशस्त रस्ता आहे. त्या खालून भुयारी वाटेनें दक्षिणबागेंत येतां येतें. या **औटर सर्कल** रस्त्याच्या मधल्याभागीं प्राणिसंग्रहालयाचा मुख्य दरवाजा आहे. या रस्त्याला लागून पुनः पुष्कळ पक्षीगृहें आहेत. पोपटघरांत किती रंगी पोपट आहेत याची गणतीच करतां येत नाहीं ! कांहीं कांहीं श्वापदांकरितां लहानशा टेंकड्या खडकाळ उंचसखल व घळी व गुहा असलेल्या केल्या आहेत व सभोंवार लोखंडी कुंपण घात-

लेलें आहे. या टेकड्यांच्या तळाशीं मत्स्यगृह आहे. बागेच्या दक्षिण कोपऱ्यांत व्याघ्रसिंहादि हिंस्र पशूंचीं भरभक्कम पिंजरेवजा घरें केलेलीं आहेत. या घरांकडून दक्षिणेस आलें म्हणजे या बागेचें दक्षिणद्वार लागतें. ही जंगी बाग वरवर व भरभर पहावयासहि आम्हांला चारपांच तास लागले. या प्राणिसंग्रहालयांत सर्व जगांतील स्थलचर, जलचर व आकाशचर या तीन मुख्य प्राणिवर्गांतील नानादेशचे प्राणी आणून ठेविले आहेत व त्यांच्या स्वाभाविक परिस्थितींत त्यांना राहतां येईल अशी सोय केली आहे; ऊष्ण हवेंतील प्राण्यांकरितां कृत्रिम तऱ्हेनें त्यांचीं घरें ऊबदार ठेवण्यांत येतात. प्रत्येक प्राण्याचें स्वाभाविक अन्न-पाणी त्याला पुरविलें जातें व प्राण्यांची राहण्याची उत्तम व्यवस्था केली जाते. म्हणूनच हजारों पशुपक्षी या प्राणिसंग्रहालयांत दृष्टीस पडतात. या प्राणिसंग्रहालयाचें सविस्तर वर्णन करणें म्हणजे प्राणिशास्त्राचा सारांश देण्यासारखें अवघड काम आहे. पण हा संग्रह पाहून मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें यांत संशय नाहीं.

या प्राणिसंग्रहाच्या वायव्य टोंकाला ऑलबर्ट रस्त्याच्या पलीकडे खुलें मैदान असून त्याच्यामध्यें एक लहानशी शंकूसारखी वाटोळी टेकडी आहे. तिला **प्रिमरोज** टेकडी म्हणतात. सखल व सपाट लंडनच्या या सर्व भागांत येवढीच एकाकी टेकडी आहे. हिच्या सभोंवार तर हिरवीगार हरळीच हरळी उगवलेली आहे. यामुळें ही जणूं कांहीं हिरव्या पाचूचीच टेकडी आहे असा भास होतो. हिच्यावर जाण्यास लहानलहान पाऊलवाटा आहेत. वरचा पठार वाटोळा पण फार लहान आहे. एथून मध्यलंडनची विलक्षण शोभा दिसते.

दक्षिण लंडनप्रमाणें उत्तर लंडनमध्येंहि आणखी कितीतरी सृष्टिकृत व मनुष्यकृत प्रेक्षणीय स्थळें आहेत. पण आम्हांला वर वर्णन केलेलीं स्थळेंच फक्त पाहावयास सांपडलीं. अर्थात् उत्तरलंडनचें आमचें दृश्य दर्शन एवढेंच.

---

# प्रकरण ९ वें

## मध्यलंडनमधील प्रेक्षणीय स्थळें

**उत्तरलंडन** व दक्षिणलंडन हे लंडनशहराचे भाग राजधानीच्या वाढत्या वस्तीच्या सोयीकरितां वसविले असल्यामुळें तेथें ' एकासारख्या एक ' घरांच्या रांगाच रांगा असाव्या व प्रेक्षणीय स्थळें तुरळक तुरळक व दूर दूर असावीं हें साहजिक आहे. पण मध्यलंडनची गोष्ट तशी नाहीं. मध्यलंडन हें निदान एक हजार वर्षें तरी सतत मूळ राजधानीचें शहर असल्यामुळें, इंग्रज लोकांच्या एक हजार वर्षांच्या इतिहासाचीं मूर्तिमंत स्मारकें येथें निर्माण झालेलीं आहेत; यामुळें या भागांत काय पहावें व काय न पहावें असें प्रवाशाला होऊन जातें. कारण पादचारी प्रवाशास पदोपदीं प्रेक्षणीय स्थळें दृष्टोत्पत्तीस येतात. तेव्हां मध्यलंडनच्या पूर्व टोंकापासून पश्चिम टोंकास पायीं चालत जाऊन क्रमानें प्रेक्षणीय स्थळांचें ओझरतें दर्शन घेणेंच प्राप्त आहे; व असें करणें अशक्य नाहीं. कारण, मध्यलंडन हें **टेम्स** नदीच्या उत्तरेस अगदीं नदीप्रवाहाला भिडलेलें शहर असून, त्याची रुंदी फारच थोडी मैल अर्धा मैल इतकी असून लांबी मात्र सहा मैल आहे. तेव्हां सहा मैल चालत गेलें म्हणजे झालें. लंडनसारख्या गारवा व हुरूप देणाऱ्या हवेंत सातआठ तासांचा पादचार म्हणजे क:पदार्थ आहे. मी प्रत्यक्ष इतक्या तासांचा पादचार कितीतरी वेळां केला आहे. बाकी, वाचकांना हा प्रत्यक्ष करावयाचा नसून माझ्याबरोबर कल्पनेनेंच करावयाचा आहे. तेव्हां त्रास होण्याची भीतिच नको. उलट, मी जीं प्रेक्षणीय स्थळें दाखविणार आहें त्यानें वाचकांस विलक्षण आनंद वाटणार आहे. चला तर मग आमच्या बिऱ्हाडापासून निघूं या. पण ज्या अर्थी आज आपणांस फक्त मध्यलंडन पहावयाचें आहे तेव्हां पहिल्यापासून पायीं चालावयाचें कारण नाहीं.

प्रथमत: आपण **बस** मध्यें बसूं व **लंडन** पुलावर उतरूं व मग तेथून सर्व **मध्यलंडन** पायींच पाहूं.

ही पहा २६९ नंबरची बस आमच्या **नार्वुड** रस्त्याच्या नाक्यावर आली. चला दुसऱ्या मजल्यावर उघडच्या हवेंत बसूं या. ही पहा डाव्या हाताला **ब्रॉकवेल** बाग लागली. केवढी प्रशस्त खुली व नानाविध फळझाडांनीं व फुलझाडांनीं नटलेली ही बाग आहे. हा पहा **हर्नहिलकडे** थेट उत्तरेस रस्ता वळला. हा लहानसा चढाव—टेकडी कसची—आहे. चढावाच्या दुसऱ्या बाजूला **डेनमार्क** हिल म्हणतात. त्याच्या उतारावर डावीकडेस ही पहा **रस्किन** बाग. ही बाग टेकडीच्या उतरणीवर बनविलेली असून फुलझाडांनीं व नानाविध रंगांच्या क्रोटन सारख्या झाडांनीं व नानाविध वेलींच्या लतामंडपांनीं सुशोभित केली आहे. बाग टेंकडीच्या उताराच्या शेवटपर्यंत आहे. पुढें जास्त दाट वस्तीच्या व मोठमोठ्या दुकानांच्या **कॅंबरवेल** व **वॉलवर्थ** रस्त्यामधून पहा आपण **एलिफंट आणि कासल** ( हत्ती व किल्ला हें इकडील नांवासारखें नांव कां पडलें याची माहिती मला मिळाली नाहीं. ) या फारच गर्दीच्या व गडबडीच्या चौकाला आलों. येथून सहा रस्ते निरनिराळ्या दिशेनें जातात पहा. आपली **बस** थेट उत्तरेस **बरोहाय स्ट्रीट** रस्त्यानें चालली. हा आलाच **लंडन ब्रिज** नांवाचा पूल. चला येथेंच आपण उतरूं या. येथेंच **टेम्स** नदीवरील पहिला पूल दहाव्या शतकांत बांधण्यांत आला होता. पण हल्लींचा पांच कमानींचा ग्रॅनाइट दगडाचा सुंदर पूल १८३१ मध्यें बांधण्यांत आला. पुलाची लांबी सुमार हजार फूट असून, रुंदी ६५ फूट आहे. दोन्ही बाजूंस सुंदर दगडी कठडे असून पायवाटा आहेत पहा.

पुलाच्या पूर्वेस लंडन बंदरास सुरुवात होते. येथें शेंकडोंशें जहाजांची सारखी रहदारी चालू असते ती पहा. पूल टाकून समोर जाऊं या. नदीच्या धक्क्याला लागून एक रस्ता जातो पहा. येथें लंडनचा मासळी-बाजार दर सकाळीं भरतो. त्याची खूण-वास व दर्प—अजून


आपल्या नाकाला येत आहे. हा पहा उजव्या हाताला केवढा स्मारक-स्तंभ उभारलेला आहे. हा मध्यलंडनमध्यें सन १६६६ मध्यें ज्या आगीनें सर्व शहर खाक झालें त्या आगीच्या उगमस्थानीं आगीचें स्मारक म्हणून बांधण्यांत आला आहे. हा सर **क्रिसटॉफर रेन**—लंडनच्या आगीनें केलेल्या राखरांगोळीनंतर यानें लंडन शहर व त्यांतील प्रमुख प्रार्थनामंदिरें यांची रचनायोजना केली—यानें बांधला आहे. हा पहा किती तरी उंच आहे. याची बांधणी अगदीं साधी आहे. हा पहा वाटोळा असून त्याला सारख्यासारख्या अंतरावर उभ्याच्या उभ्या खोबणी केल्या आहेत. याची उंची २०२ फूट आहे. तीन पेन्स देऊन वर जातां येतें, पण ३११ पायऱ्या चढाव्या लागतात! तेव्हां इतका त्रास घेण्याचें कारण नाहीं. हा स्मारकस्तंभ टाकून उजव्या हातास पूर्वेकडे वळलें म्हणजे **ईस्टचीप** स्ट्रीट व त्याच्याच पुढें **टॉवर** स्ट्रीट नांवाचा रस्ता येतो. चला या रस्त्यानें, हा पहा समोरच भुईकोट किल्ला दिसत आहे. हाच तो इतिहासप्रसिद्ध **लंडन टॉवर.** ही उंचवटयाची हिरवळ गवतानें आच्छादलेली खुली जागा पहा. हिला **ग्रेट टॉवरहिल** म्हणतात. किल्ल्याच्या तटाभोंवतीं पूर्वी खंदक होता. पण तो बुजवून तेथें पहा छोटीशी सुंदर बागेची पट्टी केली आहे व कवाइतीकरितां बाकीची जागा खुली ठेविली आहे. किल्ल्याचें प्रवेशद्वार नैऋत्य टोंकाला आहे. किल्ल्यांतले प्रेक्षणीय भाग पाहण्यास एकंदर एक शिलिंग सहा पेन्स पडतात. हें पहा तिकीट ऑफिस येथें पास व तिकिटें घेऊन **मिडलटॉवर** नांवाच्या बुरुजांतून पुलावरून (पूर्वी खंदकांत पाणी असून हा पूल काढता घालता होता) जाऊं या. येथें किल्ल्याचा पहिला तट लागतो. मध्यें खुली जागा आहे व लगेच दुसरा लागतो. हें काम फार नकशीचें नाहीं, पण खुब मजबूत व प्रचंड आहे. दुसऱ्या तटांतून आंत गेलें म्हणजे मोठा चौकोनी पांढऱ्या रंगाचा टोलेजंग वाडा लागला पहा. हाच विजयी **पहिल्या विल्यमनें** बांधलेला किल्ला. हाच **लंडन किल्ल्याचा** सर्वांत जुना भाग. दुहेरी तट, बुरुज व जागोजाग दिसणाऱ्या लहान-

मोठ्या इमारती या मागाहून वेळोवेळीं बांधलेल्या आहेत. लंडनाकिल्ला हा पूर्वकाळीं राजवाडा म्हणून बांधण्यांत आला व कितीतरी इंग्लिश राजे या किल्ल्यांत राहिलेले आहेत. पुढें याचा उपयोग राजकैद्यांचा तुरुंग म्हणून करूं लागले. **व्हाईट टॉवर** हा किल्ला किंवा राजवाडा चौकोनी चौमजली आहे. त्याची एक बाजू १०८ फूट आहे. त्याचा एक मजला तळघरवजा जमिनींत खोल बांधलेला आहे व जमिनीवर तीन मजले दिसत आहेत पहा. खरोखरीच हा राजवाडा फार भव्य दिसतो. तो कितीतरी उंच आहे. हल्लीं या सर्व किल्ल्यांत व त्याच्या सर्व मजल्यांत लढाऊ शस्त्रें व हत्यारें जुन्या काळपासून अर्वाचीन काळपर्यंतचीं ठेविलीं आहेत. तिसऱ्या मजल्यावर लहानसें पण सुबक असें प्रार्थनामंदिर आहे. राजघराण्यांतील मंडळी या किल्ल्यांत रहात तेव्हां ते या प्रार्थनामंदिरांत प्रार्थनेच्या वेळीं जमत असत. या किल्ल्याच्या भिंती पंधरा पंधरा फुट रुंदीच्या आहेत. बांधकाम वाकड्या तिकड्या बिनघडीव दगडांचें आहे. पण तें फार मजबूत काम ढासळलेलें नाहीं ! या किल्ल्याच्या सभोंवार हिंडूं या. किल्ल्यांतील रखवालदाराच्या राहण्याच्या चाळी व घरें जागोजाग लागतात. किल्ल्याच्या आंतल्या तटाच्या एका बुरुजाला हल्लीं **ब्लडी टॉवर** म्हणतात. कारण येथें तिसऱ्या **रिचर्ड** राजानें राजकुमाराचे खून करवून आपण राज्य बळकावलें. याच बुरुजामध्यें मोठमोठे कैदी ठेवीत असत. एलिझाबेथच्या वेळचा प्रसिद्ध मुत्सद्दी ग्रंथकर्ता व दर्यावर्दी **सर वाल्टर रॅले** याला येथेंच कोंडून ठेविलें होतें. येथेंच त्यानें आपला 'जगाचा इतिहास' ग्रंथ लिहिला. या बुरुजास लागून **वेकफील्ड** बुरुज आहे. हल्लीं या बुरुजांत इंग्रज राजघराण्यांतील जडजवाहीर, मुकुट व विशेष समारंभाचे वेळीं घालावयाचे दागिने ठेविलेले आहेत. येथें विजेच्या दिव्यांची सोय केली आहे. मजबूत लोखंडी कठडा करून त्याच्या आंत सर्व प्रेक्षणीय जवाहीर व्यवस्थेनें लावून ठेवलेलें आहे. प्रत्येक नगाची वर्णनपर चिट्ठी शेजारीं ठेविली आहे. येथें सोन्यामोत्यांनीं मढविलेले राजमुकुट आहेत; रत्नखचित म्यानांत


ठेवलेल्या तरवारी आहेत; हिरे माणकांनीं सुशोभित केलेले राजदंड आहेत; बहुमोल नानारंगी, नानारूपी अनेक अलंकार आहेत; येथें हिंदुस्थानांत नांवाजलेला कोहिनूर हिरा आहे व अर्वाचीन काळच्या आफ्रिकन खाणींत सांपडलेले त्या हिऱ्याशीं स्पर्धा करणारे 'आफ्रिकेचे तारे' नांवाचे जगांतील सर्वांत मोठे दोन हिरे आहेत; सारांश, या जवाहिरखान्यांत इंग्रजी राजांची व अप्रत्यक्षपणें ब्रिटिश साम्राज्याची सुंदर सुवर्णमय मूर्तिमंत प्रतिमाच जणूं कांहीं आपण पहात आहों असा क्षणभर भास होतो. या बुरुजांतून बाहेर आलें म्हणजे दक्षिण अंगाला समोरच बाहेरच्या तटांतील सेंट **टॉमस टॉवर** लागतो. त्या बुरुजाखालून नदीच्या पात्रापर्यंत खोल खोल पायऱ्या बांधलेल्या असून शेवटीं लोखंडी दरवाजा आहे. गलबतामधून राजद्रोही लोकांना या पाण्यापर्यंत पोंहोचलेल्या किल्ल्याच्या चोरदारांतून किल्ल्यांत कैदी म्हणून आणीत असत; म्हणून या दरवाजाला राजद्रोही फाटक म्हणतात. झालें. किल्ल्याच्या आंतील दृश्यदर्शन संपलें. तरी आपण किल्ल्याच्या आंतील प्रवेशद्वारांतून बाहेर येऊन नदीकिनाऱ्याच्या धक्यांवरील सुंदर सडकेनें **टॉवर** ब्रीज नांवाच्या पुलावर जाऊं या. डावीकडे किल्ल्याचा दुहेरी तट, मधला तो **व्हाईट टॉवर** नांवाचा पांढरा शुभ्र चार कोपऱ्याला चार मनोरे असलेला राजवाडा; सडकेच्या कडेची ती सतेज व दाट पालवीनें शोभायमान असलेली झाडांची रांग व त्यांच्याच पुढें गाडीवर बसविलेल्या जुन्या तोफांची माळची माळ; व उजवीकडे **टेम्स** नदीचा लाटायुक्त प्रवाह व इकडून तिकडे जाणारीं जहाजें व बोटी हा देखावा अत्यंत नयनमनोहर वाटतो.

या वाटेनें हे पहा आपण प्रत्यक्ष **टॉवरब्रीजवर** आलों. टेम्स नदीवरील हा पूल अगदीं अलीकडचा होय. हा सन १८९४ मध्यें व्यापाराला खुला करण्यांत आला. काय कौतुकाची गोष्ट आहे; लंडनपूल **टेम्स** वरचा पहिला पूल व **टॉवरपूल टेम्सवरचा** सर्वांत अर्वाचीन पूल हे शेजारीं शेजारीं आहेत; त्यांमध्यें फार तर चार फरलांगांचें अंतर असेल.

हा **टेम्सचा** भाग म्हणजे लंडनचें बंदर, ज्याला इंग्रजींत ‘तलाव’ (pool) म्हणतात. **टॉवरपूल** हें पुलाचें खरोखरींच अन्वर्थक नांव आहे. हा पूल सामान्यतः कमानीचे पूल असतात तसा कायमचा दगडी पूल नाहीं; तर हा लोंबता लोखंडी पूल आहे. टेम्सनदीच्या प्रवाहाच्या मध्यें प्रवाहापासून दोनशें फूट उंचीचे दोन प्रचंड बुरूज बांधले आहेत, त्यांच्या मधलें अंतर दोनशें फूट आहे; या दोन बुरुजांपासून प्रवाहाच्या किनाऱ्याच्या बाजूस **ॲबटमेंट** बांधले आहेत, प्रत्येकीं अंतर २७० फूट आहे. अर्थात् **टेम्सच्या** प्रवाहाचे २७०, २०० व २७० असे तीन भाग झाले. ॲबटमेंटपासून बुरुजापर्यंत कायमच्या लोखंडी तुळया टाकून पूल केला आहे;दोन बुरुजांमध्यें मात्र गोदीमध्यें ज्याप्रमाणें प्रचंड जाड लोखंडी पत्र्याचा उघडझांप करतां येणारा पूल करतात तसा पूल केलेला आहे. फार मोठमोठ्या व खोल पाणी लागणाऱ्या बोटी व गलबतें जावयाचीं असलीं म्हणजे ही शंभर फुटी पत्र्याचीं प्रचंड दारें उघडून बुरुजाला टेंकून ठेवतां येतात. असा हा विलक्षण पूल आहे खरा. आणखीहि या पुलाचा विशेष म्हणजे या गाडीच्या रस्त्याच्या वर १०० फुटांवर प्रचंड लोखंडी दोरखंडावरून पायवाट केलेली आहे. पण ही पायवाट बहुधा बंदच असते. पण प्रवाहापासून दीडशें फूट उंचीवर असलेल्या या पायवाटेनें जातांना **लंडन**शहराचा व **टेम्स** नदीचा आश्चर्यजनक देखावा दिसत असेल यांत शंका नाहीं. हीं जुनींनवीं दोन दृश्यें पाहून किल्ल्याच्या उजवीकडून **टॉवरहिल** नांवाच्या खुल्या हिरवळीवरून परत **टॉवर** रस्त्याला लागूं या. या रस्त्यानें थेट पश्चिमेस **कॅनन**स्ट्रीटनें पुढें गेलें म्हणजे आपल्या समोर भव्य व प्रचंड **सेंटपॉलचें** प्रार्थनामंदिर दिसूं लागतें. थोड्याच वेळांत आपल्याला प्रार्थनामंदिराचे मागली सुंदर बाग दिसते. कारण प्रार्थनामंदिर पश्चिमाभिमुख आहे व आपण पूर्वेकडच्या **कॅनन** रस्त्यानें येतों. तेव्हां प्रार्थनामंदिराची दक्षिणेकडची लांबचलांब बाजू पहात व त्यांच्या शिल्पकलेचें कौतुक करीत करीत आपण प्रार्थना-मंदिराच्या प्रवेशद्वाराकडे येतों. पुढें केवढा मोठा प्रशस्त व भव्य चौक



नं. ९ लंडन : टॉवर ब्रिज व लंडनचें 'पूल' (तलाव) पान १४४



नं. १० लंडन : सेंट पॉल प्रार्थनामंदिर (दर्शनी देखावा) पा. १४४

आहे ! ती प्रार्थनामंदिराचे समोर व वर्तुळाकार चौकाचे मधोमध, लहान वर्तुळाकार लोखंडी कठड्याच्या आंत पांढऱ्या दगडाच्या मनोहर मूर्तींनीं सुशोभित अशा भव्य व उंच उथळयावर बसविलेली पूर्ण आकाराची स्त्रीची सुंदर मूर्ति उभी आहे. हा **ॲन राणीचा** संगमरवरी पुतळा आहे. सर **क्रिस्टॉफर रेननें** आगीनें केलेल्या शहराच्या राखरांगोळीनंतर, हें सेंटपॉलचें प्रार्थनामंदिर बांधण्यास सुरवात १६७५ सालीं केली. दुसऱ्या **जेम्सच्या** कारकीर्दींत मंदिर बांधण्याचें काम चालूच होतें. त्यामध्यें पहिली प्रार्थना **विल्यम** आणि **मेरी** यांचे कारकीर्दींत १६९७ मध्यें झाली; व प्रार्थना मंदिर **ॲन राणीच्या** कारकीर्दींत म्हणजे सन १७१० मध्यें पूर्ण झालें; म्हणून त्या राणीचा पुतळा मंदिरासमोर बसविला आहे. प्रार्थनामंदिराचा दर्शनी देखावा फारच चित्ताकर्षक आहे. ते बाजूचे घंटांचे एकसारख्या बांधणीचे व उंचच उंच मनोरे, मनोऱ्यांपेक्षां मूळचा उंच पण ख्रिश्चनधर्माचा प्रचंड क्रॉस वर बसविल्यामुळें जास्तच उंच भासणारा तो मधला भव्य व वर्तुलाकार पांढरा शुभ्र घुमट; ते पहिल्या मजल्याचे व दुसऱ्या मजल्याचे सारख्या अंतरावर बसविलेले निरनिराळया नक्षीचे जोडखांब त्या मधील तो शोभिवंत खुला व्हरांडा व इमारतीच्या दोन्ही टोंकांचें कमानदार दुहेरी प्रवेशद्वार (त्यावर दुसरा मजला असून मग मनोरे केले आहेत) व त्या सोळा खांबांसमोर लांबचलांब त्या बावीस पायऱ्या हा सर्व एकसमयावच्छेदेंकरून दिसणारा प्रार्थनामंदिराचा पुरोभाग विलक्षण प्रमाणबद्ध असून फारच भव्य व सुंदर दिसतो. आश्चर्यचकित मनानें व्हरांड्यांतून प्रत्यक्ष मंदिराच्या सदा-बंद प्रवेशद्वारांतून आंत गेल्याबरोबर दृष्टीस पडणारा देखावा अवर्णनीय आहे. ती मोठमोठ्या खांबांची रांग व त्यांना जोडणाऱ्या उंच उंच कमानी, समोरासमोरच्या खांबांवर प्रचंड कमानींनीं झालेली अर्ध गोलाकार दगडी पटई व खांबाच्या आंतमध्यें वाट सोडून दुतर्फा लावलेलीं बसावयाचीं सुबक बाकें; बाकांचे रांगांच्या पलीकडे जाळीदार नक्षीकामाच्या पडद्यापलीकडे

उपाध्यायाला उभें राहण्याकरितां केलेली उंच बैठक, हें सर्व पाहून मन थक्क झाल्याखेरीज रहात नाहीं. या लांबच लांब व मुख्य प्रार्थना-मंदिराच्या दोन्हीं बाजूंस भिंतींमध्यें वर्तुळाकार व नक्षीच्या कठ-ड्यांनीं शोभायमान झालेलीं छोटीं छोटीं उपप्रार्थनामंदिरें सारखीं लागतात. या लांब प्रार्थनास्थानापलीकडे गेलें म्हणजे, मध्यें आठखांबी वर्तुळाकार गाभारा लागतो. या गाभाऱ्यावर प्रचंड घुमट बांधलेला आहे. मोठमोठ्या योद्ध्यांचीं भव्य स्मारकें या प्रार्थनामंदिरांत आहेत; **नेलसन, वेलिंग्टन, किचनेर** यांचीं स्मारकें फारच प्रेक्षणीय आहेत; इतर विख्यात लोकांचींहि आहेत. सर्व प्रार्थनामंदिराखालीं तळघर आहे. तेथें अर्थात् या सर्व विख्यात पुरुषांना पुरलें आहे. तेथें त्यांच्या थडग्यांवर स्मारकलेख लिहिलेले आहेत. खरोखरींच, हें प्रार्थनामंदिर ब्रिटिशबेटां-तील पहिल्या प्रतीचें प्रार्थनामंदिर आहे. याचा योजक व करविता सर **क्रिस्टॉफर रेन** याच्या शिल्पकलाकौशल्याची कमाल या प्रार्थनामंदिरांत झाली आहे हें खास. चला मंदिराचा खालचा व वरचा भाग पाहून झाला. आतां आपण घुमटाच्या जिन्यांनीं घुमटाचे आंत जाऊं चला. ज्याप्रमाणें विजापूरच्या गोलघुमटामध्यें आंतून **बोलती ग्यालरी** आहे तशी या घुमटामध्येंहि आहे. आम्ही वर चढून ग्यालरींत आलों. घुम-टाचे आठ भाग पाडले असून, त्यावर ख्रिश्चन धर्मातील पुष्कळ प्रसंगांचीं सुंदर चित्रें घुमटाच्या छतावर रंगविलेलीं आहेत; तसेंच घुमट खालून सरळ आलेल्या आठ खांबांच्या आधारावर बांधलेला आहे. घुमट आंतून विटांनीं बांधलेला असून, वरून लाकडी अस्तर व त्यावर जस्ताचा पत्रा मारलेला आहे; त्या पत्र्याला सोनेरी रंग दिला आहे. मोठा क्रॉस, गोळा व कंदिल विटांच्या बांधलेल्या शंकूवर बसाविलेले आहेत. अशी घुमटाची मोठी चतुराईची रचना आहे. विजापूरचा घुमट सबंद विटांचा असून तो फार रुंद आहे; तसेंच विजापूरचा घुमट चौकोनी भिंतींवर कमानी कमानी करीत आणून त्यावर बांधला आहे. सेंट पॉलची बोलकी ग्यालरी विजापूरच्याप्रमाणेंच आश्चर्यकारक आहे. अगदीं हलक्या आवाजांत

बोललें तरी पलिकडे स्पष्ट ऐकूं जातें. पण ही ग्यालरी विजापूरच्या इतकी खालपासून उंच आहे असें भासत नाहीं. ग्यालरी पाहून पुन्हां पायऱ्यांनीं घुमटाच्या अगदीं वर चढतां येतें. चला तेथें जाऊं. तेथून सर्व **लंडन** शहराचा सुंदर देखावा दिसतो. सर्व प्रार्थनामंदिर पहात असतांना बांधणाऱ्या **रेनसाहेबांच्या** योजकतेचें राहून राहून आश्चर्य वाटतें. लंडनांतील बहुतेक प्रार्थनामंदिरें त्याच्याच हातचीं आहेत. हा सरकारी नोकरींत असून त्याला सालीना २०० पौंड मिळत. हा सन १८२३ मध्यें ९१ व्या वर्षी वारला. पेन्शन घेतल्यावरहि दरवर्षी तो एकदां तरी **सेंटपॉलच्या** प्रार्थनामंदिरास येई. इतका या इमारतीवर त्याचा जीव होता. खरोखरी **रेनच्या** इमारतींमधील हा दैदीप्यमान मुकुटमणि आहे यांत शंका नाहीं.

प्रार्थनामंदिराचा पुढचा रस्ता **लडगेट** रस्ता होय. चला या रस्त्याच्या पायवाटेनें. हा रस्ता खोल खोल जातो पहा. कारण सेंटपॉलचें प्रार्थनामंदिर हें **लडगेट** टेंकडीवर आहे. लडगेट रस्त्यानें चाललों असतां हा पहा **लडगेट** चौक लागतो. हा चौक फार सखल जागेंत आहे. त्याचे जरा आधीं हा पहा डोकीवर प्रचंड रेलवेचा पूल लागतो. पण या पुलानें या सुंदर रस्त्याची व सभोंवारच्या एकंदर देखाव्याची शोभा कमी झाली आहे. कारण हा ओबडधोबड व काळा पट्टाच्यापट्टा दृष्टीआड येतो व त्यानें प्रार्थनामंदिराकडे जातांना मंदिराच्या उठावाचें दृश्य कमी मनोहर होतें यांत शंका नाहीं. **लडगेट** चौक हा **लडगेट–फ्लीट स्ट्रीट** या पूर्वपश्चिम रस्त्यानें व **टेम्स** नदीवरील तिसरा **ब्लॅकफ्रायर्स**–पूल यावरून येणाऱ्या दक्षिणोत्तर **ब्लॅक फ्रायर्स—फॅरिंगडटन** रस्त्यानें झाला आहे. आपण आतां **फ्लीट** स्ट्रीट नांवाच्या रस्त्याला लागलों. हा मध्यलंडनचा भाग न्यायमनसुब्याच्या इमारतींचा भाग होय. कारण या भागांत डाव्या हाताला **मिडल** टेंपल व **इनर** टेंपल नांवाच्या बॅरिस्टरांच्या मंडळया व त्या मंडळांचीं वाचनालयें, विद्यालयें, कचेऱ्या व प्रार्थनामंदिरें लागतात. ओझरती नजर

टाकली म्हणजे आंत कवढाल्या पुरातन इमारती दृष्टीस पडतात. उजव्या हाताला **चॅन्सरी** गल्लींतून जरा आंत गेलें म्हणजे **ग्रेज इन** व **लिंकन्स इन** नांवाच्या दुसऱ्या दोन बॅरिस्टरांच्या मंडळ्या, त्यांच्या इमारती व प्रशस्त बागा लागतात.


ब्रिटिश साम्राज्यभर वकिलीचा धंदा करतां येण्याचा हक्क मिळवून देणारी बॅरिस्टरीची परीक्षा घेण्याचा व त्यासंबंधानें शिक्षण देण्याचा सर्व मक्ता या चार मंडळ्यांना मिळालेला आहे. या परीक्षेला बसण्याची मुख्य अट म्हणजे या चार मंडळ्यांत होणाऱ्या बॅरिस्टर लोकांच्या रात्रीच्या जेवणाला हजर राहणें ही होय. तुम्ही कायद्याच्या व्याख्यानास हजर रहा अथवा राहूं नका, सबंद बॅरिस्टरीच्या तीन वर्षांच्या अभ्यासक्रमाची फी एकदम भरावी लागते. प्रत्येक तिमाहीमध्यें कांहीं जेवणाला हजर राहिलें पाहिजे. दररोजच्या जेवणाचे ठरीव पैसे द्यावे लागतात; पण येथें दारूचे पैसे दिलेच पाहिजेत असा नियम असल्यामुळें बॅरिस्टरांच्या परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांना येथेंच मद्यपानाची पहिली दीक्षा मिळते ! मोठमोठ्या नामांकित बॅरिस्टरांच्या कचेऱ्या याच भागांत आहेत. या पुराणप्रसिद्ध संस्थांकडे ओझरती नजर टाकून **फ्लीटस्ट्रीटच्या** पायवाटेनें पुढें गेलें म्हणजे उजव्या हातास न्यायमंदिरांचीं भव्य व विस्तृत लोखंडी प्रवेशद्वारें लागतात व न्यायमंदिरांच्या अवाढव्यतेची कल्पना न्यायमंदिराच्या कमानदार पायवाटेनें गेलें म्हणजे आपोआप येते. ही कमानदार पायवाट पांचशें फूट लांब आहे व न्यायमंदिराची आंतली रुंदी तर लांबीच्या दुप्पट आहे. या अवाढव्य इमारतीमध्यें लंडनमधलीं निरनिराळीं १९ कोर्टें आहेत. हीं न्यायमंदिरांची अवाढव्य इमारत संपली म्हणजे **फ्लीटस्ट्रीट संपला.** पूर्वीं येथें **टेंपलबार** म्हणून मोठें दगडी फाटक होतें. येथल्या रहदारीच्या गर्दीमुळें तें काढून दुसरीकडे बसविण्यांत आलें व त्या जागीं रस्त्याच्या मधोमध ग्रिफिन नांवाच्या काल्पनिक पक्ष्याचा पुतळा बसविला आहे. तो मनांत भरण्यासारखा नाहीं. येथून **स्ट्रँड** नांवाचा रस्ता सुरू होतो व त्याच्या प्रारंभीं व

रस्त्याच्या मधोमध **सेंट क्लीमंटस** नांवाचें रेनच्या बांधणीचें दुसरें छोटेंसें पण सुबक प्रार्थनामंदिर लागतें. हें मंदिर फार लहान आहे. पण याचा मनोरा सातमजली असून तो फार भव्य व मनोहर दिसतो. मंदिराच्या सभोंवार छोटीशी बाग असून त्याला लोखंडी कठडा आहे. त्याचे पूर्व टोंकाला **जॉनसन** या प्रसिद्ध ग्रंथकर्त्याचा ब्राँझचा पुतळा आहे; तर पश्चिमटोंकाला **ग्लॅडस्टन** या प्रसिद्ध मुत्सद्याचा तसलाच पुतळा आहे. येथून **स्ट्रँड** रस्ता किंचित् नैऋत्य दिशेस वळतो व **टॉवर** ब्रिजपासून थेट पूर्व पश्चिम असलेली **टेम्सनदी** एकदम वळण घेऊन दक्षिणोत्तर होते. यामुळें येथून मध्यलंडनचा दक्षिणोत्तर भाग खूपच रुंद बनतो. यामुळें **टॉवरब्रिजपासून स्ट्रँडपर्यंत** शहराच्या इमारतींची खेचाखेची, जागेचा संकुचितपणा रस्त्याचा संकुचितपणा, रस्त्याचा अरुंदपणा कमी होऊन प्रशस्त रस्ते, तशाच प्रशस्त पायवाटा, विस्तीर्ण चौक व टोलेजंग इमारती; सारांश लंडन राजधानीच्या खऱ्या वैभवास व शोभादायकत्वास सुरवात होते. ग्लॅड-स्टनचा पुतळा टाकला कीं, उजव्या बाजूला अर्धवर्तुळाकार असा **ऑलडिच** भाग व रस्ता लागतो. त्याच्या तोंडाशीं **ऑस्ट्रेलिया हाउस** म्हणून सुंदर इमारत लागते. ऑस्ट्रेलियन सरकारच्या हाय कमि-शनरची कचेरी येथें आहे. ही इमारत फार प्रचंड आहे; पण तिची मौज अशी आहे कीं, ती इतकी मोठी असेल अशी कल्पना तिच्या प्रवेशद्वारावरून होत नाहीं. या इमारतीचें प्रवेशद्वार फार सुंदर व मूर्तिकलेचा उत्तम मासला असला, तरी तें फार मोठें नाहीं. इमारत तोंडाला अरुंद पण मागें मागें रुंदावत गेलेली आहे व ती **स्ट्रँड** व **ऑलडिच** या दोन रस्त्यांच्या बाजूला खूब लांबच लांब आहे व त्या दोन्ही बाजू अगदीं सारख्या आहेत. यामुळें या इमारतीचा विलक्षण विस्तार प्रथमतः ध्यानांत येत नाहीं. पण **ऑलडिच** रस्त्यानें चालूं लागलें म्हणजे त्याची प्रचंडता मनांत भरते. त्याला लागून युनायटेड स्टेट्सची **बुशहाउस** म्हणून पांढऱ्या दगडांची विलक्षण लांबच लांब अशी


इमारत लागते. या दोन इमारतींचा विरोध विलक्षण आहे. **ऑस्ट्रेलियन** हाऊसची इमारत काळसर तांबूस दगडांची आहे तर **बुशहाऊसची** पांढऱ्या शुभ्र दगडांची आहे. **ऑस्ट्रेलियन** हाऊसची तिकोनी व म्हणून तिरकस अशी दुसोपी बांधल्यामुळें व तिचें प्रवेशद्वार तिकोनाच्या निमुळत्या जागीं असल्यामुळें सर्व इमारत एकदम दृग्गोचर होत नाहीं. **बुशहाऊसचे** दोन भाग एकापुढें एक व लांबच लांब बांधल्यामुळें व या दोन भागांमध्यें अवाढव्य उंचीची व भव्य कमान करून त्या कमानीमध्यें इंग्लिश भाषा बोलणाऱ्या दोन राष्ट्रांच्या मैत्रीचें द्योतक म्हणून हातांत हात घातलेल्या दोन बायकांच्या सुंदर मूर्तींचें प्रवेशद्वार केल्यामुळें **बुशहाऊस** ही इमारत एकदम दृग्गोचर होऊन तिच्या विलक्षण लांबीनें मन थक्क होऊन जातें. या इमारतीला लागून त्याच धर्तीवर **इंडिया हाऊस** म्हणून हिंदी हायकमिशनरच्या कचेरीकरितां नवी इमारत बांधण्यांत आली आहे. ह्या तिन्ही इमारती खरोखरच फार प्रेक्षणीय आहेत व आपआपल्या भव्यतेनें त्या प्रेक्षकांचें मन आकर्षित करतात यांत शंका नाहीं. **बुशहॉऊसच्या** प्रचंड कमानदार प्रवेशद्वारासमोरून **किंग्जवे** नांवाचा फार प्रशस्त रस्ता केलेला आहे. हा मध्यलंडनमधला अत्यंत सुंदर रस्ता आहे. याचे दोन्ही बाजूंचे पायरस्ते मुख्य रस्त्या-सारखे मोठे आहेत व दोन्ही बाजूंस मोठ्या दुकानांच्या उंच-उंच इमारती सारख्या बांधलेल्या आहेत. हा रस्ता टाकून **ऑलडिच** या अर्धवर्तुळाकार रस्त्यानें गेलें म्हणजे परत **स्ट्रँड** रस्त्याला आपण लागतों. येथें प्रसिद्ध **वॉटरलू**ब्रिज नांवाच्या टेम्सवरील पांचव्या पुला-वरून आलेला रस्ता **स्ट्रँड** रस्त्याला येऊन मिळतो. या पुलाच्या रस्त्याला वळलें म्हणजे **सॉमरसेट**हाऊस म्हणून प्रचंड सरकारी इमारत लागते. ही इमारत इतिहासप्रसिद्ध **डयूक ऑफ सॉमरसेट** यानें बांधली व पुढें ती सरकारी बनली. हल्लीं तिच्या पश्चिम भागांत, ऑडिट रजिस्ट्रेशन अशा प्रकारच्या कचेऱ्या आहेत व पूर्वभागांत किंग्ज कॉलेज आहे. इतकी ही इमारत मोठी आहे. **वॉटरलू**

**पूल** हा वाटरलूच्या लढाईचें स्मारक म्हणून बांधण्यांत आला. या पुलाच्या कांहीं खांबांचा पाया खचल्यामुळें सध्यां लोखंडी तात्पुरता जोड पूल बांधण्यांत आला आहे व जातांयेतां रहदारीची यायोगें विभागणी करण्यांत आली आहे. म्हणून पूर्वीसारखा हा पूल शोभिवंत दिसत नाहीं. कारण शालजोडीला घोंगडीचें ठिगळ असा सध्यां प्रकार झाला आहे. पण जुन्या पुलाच्या खांबांची दुरुस्ती होऊन पूल पूर्वीप्रमाणें पूर्ण रहदारीला खुला होऊन तात्पुरता लोखंडी पूल काढून टाकल्यावर पूर्वींची शोभा परत येईल. दक्षिणेकडून मध्यलंडनमध्यें या पुलावरून शिरलें म्हणजे फार आश्चर्यकारक देखावा दिसतो. पुण्याच्या नव्या **लॉईड पुलावरून** शनवार वाड्याकडे येऊं लागलें म्हणजे हल्लीं जो सुंदर देखावा दिसतो त्यावरून **वॉटरलू पुलावरून** दिसणाऱ्या देखाव्याची कांहींशी कल्पना करतां येईल. मुंबईचे माजी गव्हरनर जॉर्ज लॉईड यांना **शेकसल्ला** पुलाची कल्पना **वॉटरलू** पुलावरून सुचली असावी असें **वॉटरलू** पूल पाहून मला वाटलें. लंडनमध्यें ज्या प्रमाणें **वॉटरलू** पुलानें शहराचा दक्षिणोत्तर भाग जोडला गेला आहे त्याप्रमाणें पुणें शहराचा दक्षिणोत्तर भाग एका सुंदर पुलानें आपल्या पांच वर्षांच्या कारकीर्दींत जोडावा अशी महत्त्वाकांक्षा लॉर्ड लॉईड यांचे मनांत उभी राहून पुण्यांतील या पुलाचें कैक वर्षें भिजत पडलेलें काम त्यांनीं तडाकाफडकी करून टाकलें असावें असेंहि माझ्या मनांत आलें. **वॉटरलू** पुलाचा रस्ता टाकून **स्ट्रँड** रस्त्यानें पुढें आलें म्हणजे डाव्या हाताला **सेव्हॉय, सेसिल** व पुढें **चेरिंगक्रास हॉटेल** हीं बादशाही थाटाचीं हॉटेलें (प्रवाशास राहण्याजेवण्याची सोय करणारीं विलासमंदिरें) लागतात व लागलीच **चेरींगक्रास** नांवाचें साउथ रेल्वेचें मोठें स्टेशन लागतें. या स्ट्रँड रस्त्याला उजव्या बाजूस दुकानेंच दुकानें लागतात. **चेरिंगक्रॉस** स्टेशन टाकून जरा पुढें आलें कीं, लंडनमधला विलक्षण विस्तीर्ण व अत्यंत शोभिवंत असा **ट्राफलगार** चौक लागतो. हा चौक म्हणजे इंग्लंडच्या कीर्तीचा व वैभवाचा जणूं कांहीं ध्वजपट आहे. याच्या दक्षिण बाजूस पार्लमेंट गृहाकडे जाणाऱ्या व्हाईट

हॉल नांवाच्या रस्त्यासमोर नेलसन विजयस्तंभ बांधलेला आहे. हा स्तंभ एका मोठ्या चबुतऱ्यावर बांधलेल्या चौकोनी उंच उथळ्यावर बसविलेला आहे. तो ग्रनाईट दगडाचा असून उभ्या कंगोऱ्याचा कॉरिंथियन पद्धतीचा १६८ फूट उंचीचा भव्य स्तंभ आहे; व त्याचे माथ्यावर नक्षीची चौकोनी दगडी चवकट आहे व त्याचेवर आणखी बरीच उंच बैठक असून त्यावर १० फूट उंचीचा नेलसनचा पुतळा आहे. केवढें भव्य हें स्मारक आहे. जगज्जेत्या नेपोलियनचा नेलसननें ट्राफलगार येथें आरमारी लढाईत पराभव केला या प्रसंगाचें हें इंग्लंडच्या वैभवास व कीर्तीस साजेसें स्मारक आहे. या चबुतऱ्यासभोंवार चार प्रचंड सिंहांच्या मूर्ति बसविलेल्या आहेत. स्तंभाच्या उत्तरेस खोल हौदासारखी फरसबंदी जागा मोकळी ठेविली असून त्यांत समोरासमोर दोन सुंदर कारंजीं केलीं आहेत. त्यांतून पाण्याचे फवारे चालत असले म्हणजे विलक्षण शोभा दिसते. या हौदासभोंवार पुष्कळ फरसबंदी जागा खुली ठेविली असून चार बाजूला चार इंग्रजी इतिहासांतील प्रसिद्ध पुरुषांचे पुतळे ठेविलेले आहेत. या चौकाच्या उत्तरेच्या बाजूस **राष्ट्रीय चित्रालय** नांवाची भली मोठी इमारत आहे. त्याचे समोरच **सेंट मार्टिन** नांवाचे स्ट्रँडमधील **सेंट क्लीमंडच्या** प्रार्थनामंदिराच्या धर्तीवरचें पण त्यापेक्षां मोठें असें प्रार्थनामंदिर आहे. असा या चौकाचा देखावा आहे. हा आश्चर्यचकित करणारा चौक उजव्या बाजूस टाकून व डाव्या बाजूस पार्लमेंट गृहाकडे जाणारा व्हाईट हॉल रस्ता टाकून समोर गेलें म्हणजे **आडमिराल्टी आर्च** नांवाचें तीन कमानींचें प्रवेशद्वार लागतें. या दारांतून आंत शिरलें कीं, लंडनमधला **मॉल** नांवाचा सर्वांत रुंद रस्ता लागतो. हा रस्ता आधींच कितीतरी रुंद; शिवाय त्याचे दोन्ही बाजूस मोठमोठे पायरस्ते; त्या पायरस्त्याच्या दोन्ही बाजूस सारख्या अंतरावर लावलेल्या **प्लेन** नांवाच्या मोठमोठ्या सतेज पानांच्या वृक्षांची ओळचओळ, याप्रमाणें खुद्द रस्त्यामध्यें झाडांच्या सारख्या चार ओळी लागतात. शिवाय पायवाटेच्या



नं. ११ लंडन : ट्राफलगार स्क्वेअर ( चौक ) व नेलसन पुतळा पान १५२




नं. १२ | लंडन | पान १५२

व्हाईट हॉल राजवाड्यापुढील घोडेस्वार | आडमिराल्टी आर्च (कमानी) | महायुद्धाचा स्मारकस्तंभ | टॉवर ऑफ लंडनचा शुभ्र राजवाडा | रॉयल एक्स्चेंज व बँक ऑफ इंग्लंड

दोन्ही अंगांस असलेल्या भिंतींच्या पलीकडे असलेल्या बागांतील झाडांच्या ओळी निराळयाच; म्हणजे या रस्त्यांतून जातांना आपल्याला एकंदर झाडांच्या सहा रांगा दृष्टोत्पत्तीस येतात व या **मॉल** रस्त्याच्या विस्तृतपणाचें व त्याच्या गर्दछाय वृक्षराजीचें मोठें आश्चर्य वाटतें. या सुंदर व प्रशस्त सडकेच्या डाव्या बाजूस **सेंट जेम्स** बाग लागते. ही बाग ९३ एकरांची असून लांबट आहे व तिच्या मधोमध व सबंद लांबी-भर चिंचोळा लांब तलाव आहे. ही बाग फार सुंदर आहे. येथें वसंत-ऋतूमध्यें जिकडे तिकडे फुलेंचफुलें दृष्टीस पडतात. **मॉल** या सबंद रस्त्याच्या डाव्या बाजूस बाग आहे; तर त्याच्या उजव्या बाजूस मोठ-मोठे इतिहासप्रसिद्ध असे राजवाडे व सरदारवाडे आहेत. **कार्लटन** हाऊस, **मार्लबरो हाऊस, सेंट जेम्स पॅलेस** ( याच राजवाड्यांत, हिंदुस्थानच्या राज्यघटनेची वाटाघाट करण्याकरितां भरविलेल्या गोल-मेज परिषदेची पहिली बैठक झाली. ) व शेवटीं **लॅंकॅस्टर** हाऊस हे सर्व सुंदर व भव्य वाडे दुरून **मॉल** रस्त्यानें जातांना दिसतात. शेव-टच्या **लॅंकॅस्टर हाऊस**मध्यें **लंडन-पदार्थ-संग्रहालय** आहे. हें एक विशिष्ट स्थळाचें संग्रहालय आहे. यामध्यें अगदीं पूर्वकाळपासून सद्यः-काळापर्यंत लंडन शहराची माहिती करून देणाऱ्या सर्व वस्तू ठेविल्या आहेत, इतकेंच नव्हे तर लंडन शहराची रचना रोमनकाळापासून शतकानुशतकें कसकशी बदलली व लंडन शहराची वाढ कसकशी झाली म्हणजे लंडन शहराचीं निरनिराळ्या काळचीं स्थित्यंतरें हुबेहूब दाखविणारे शहराचे मातीचे नमुने ( Models ) करून येथें ठेविलेले आहेत. ज्याप्रमाणें निम्नोन्नतिदर्शक नकाशावरून एखाद्या प्रांताची हुबेहुब ठेवण व रचना ही मूर्तिमंत डोळ्यां-पुढें उभी राहते; त्याप्रमाणें त्यावरून निरनिराळ्या शतकांतील लंडनाची हुबेहुब रचना प्रत्यक्ष दृग्गोचर होते. या नमुन्यांमध्यें एक नमुना तर आश्चर्यानें तोंडांत बोटें घालविणारा आहे. तो नमुना म्हणजे १६६६ मध्यें लंडनमध्यें जी प्रचंड आग लागली त्याचा हुबेहुब

देखावा विजेच्या साहाय्यानें दाखविला आहे. या नमुन्याकडे पाहिलें म्हणजे जणूं कांहीं प्रत्यक्ष आगच आपण पहात आहों कीं काय असा भास होतो. तो आगीचा डोंब, तीं आळी आळीला पेटलेलीं घरें, धुराचा लोट, त्या भयंकर आगीच्या ज्वाळा; तीं अर्ध जळलेलीं व धडाधड कोसळणारीं घरें; हा सर्व देखावा भव्य पण भयप्रद भासतो. याप्रमाणें हा **मॉल** रस्ता म्हणजे प्रेक्षणीय स्थळांचें आगर आहे. या रस्त्याच्या टोकाला आलें म्हणजे समोर बकिंगहॅम राजवाडा व त्याच्या पुढच्या विस्तीर्ण चौकांत उभारलेलें व्हिक्टोरिया राणीचें स्मारक हीं आपलें मन आकर्षून घेतात. या राजवाड्यासमोर विस्तीर्ण वर्तुळाकार खुली जागा आहे. त्याच्या चारी बाजूला सोन्याच्या मुलाम्यानें मढविलेली भव्य व नक्षीदार अशीं लोखंडी फाटकें आहेत. वर्तुलाच्याबरोबर मध्यभागीं शंभर फूट परिघाचा पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडाचा चबुतरा आहे. त्यावर अशीच दगडाची मोठी थोरली बैठक असून त्याच्या चारी बाजूंस सुंदर सुंदर संगमरवरी मूर्ति बसविल्या आहेत व त्या बैठकीवर तेरा फूट उंचीचा व्हिक्टोरिया राणीचा संगमरवरी पुतळा उभारला आहे. या विस्तीर्ण चबुतऱ्याच्या सभोवार पुष्करणी बांधली असून त्यामधून कारंजाचे फवारे पडण्याची व्यवस्था केली आहे. शिवाय या स्मारकाच्या चारी बाजूस साम्राज्याच्या निरनिराळ्या घटकांनीं पाठविलेले मूर्तिकलेचे सुंदर नमुने बसविलेले आहेत. बकिंगहॅम राजवाड्यासमोरील हा सुंदर व विस्तीर्ण चौक व तेथलें स्मारक हें ब्रिटिश साम्राज्याच्या वैभवाला व इंग्रज लोकांच्या ललितकलाप्रियतेला साजेसें आहे असें वाटल्याखेरीज रहात नाहीं ! बकिंगहॅम राजवाड्याचीं प्रवेश–फाटकेंहि मोठीं सुबक व सोनेरी मुलाम्याचीं आहेत. बादशहाचा राजधानीमधला हा राहण्याचा राजवाडा असल्यामुळें आंत जाण्याची परवानगी नाहीं; दुरूनच त्याची शोभा पहावी लागते. या विस्तीर्ण चौकाच्या एका प्रवेश फाटकांतून पुढें गेलें म्हणजे **मॉल** रस्त्यासारखा प्रशस्त रस्ता **कॉन्स्टिट्यूशन हिल** नांवाचा लागतो. या रस्त्याचे उजवे हातास **ग्रीन पार्क** नांवाचें उपवन

लागतें. नांवाप्रमाणें हें ५३ एकराचें उपवन हिरव्या हिरव्या गार गवताचें आहे; मध्यें मध्यें गर्द छायेचे वृक्ष आहेत. कांहीं भागांत ते तुरळक आहेत तर कांहीं भागांत फार दाट राईप्रमाणें आहेत. या रस्त्याच्या डाव्या बाजूस बकिंगहॅम राजवाड्याची बाग आहे पण वाड्याच्या सीमेची भिंत बरीच उंच असल्यामुळें रस्त्यानें जातांना ही बाग मुळींच दिसत नाहीं. या **कॉन्स्टिटयूशन हिल** रस्त्याच्या टोंकाशीं डावीउजवी-कडील बागा संपतात व **हाइडपार्क कॉरनर** नांवाचा सहा मोठ्या रस्त्यांचा चौक लागतो. जिकडे तिकडे मोठमोठ्या इमारती दृष्टीस पड-तात व समोरच मध्यलंडनमधली प्रख्यात **हाइडपार्क** व तिलाच जोड-लेली **केन्सिंग्टन बाग** अशा सुमारें ६४० एकरांच्या बागा लागतात. **हाइडपार्क कॉरनर** चौक ओलांडला कीं आपण **हाइडपार्क** बागेच्या आग्नेय दिशेनें आंत शिरतों. आंत शिरल्याबरोबर डाव्या हातास **रॉटनरो** नांवाचा घोडदौडीचा गर्द झाडींचा लांबच लांब व प्रशस्त असा रस्ता लागतो व त्याचे पलीकडे मोटारींचा रस्ता लागतो. उजव्या बाजूस **ऍकिलीझ** या ग्रीक देवाचा भव्य पुतळा मन आकर्षण करून घेतो. प्रख्यात ड्यूक ऑफ वेलिंग्टनच्या स्मरणार्थ हा स्मारक पुतळा बसविलेला आहे. येथून **लेडीज माईल** नांवाचा सुंदर रस्ता लागतो. या रस्त्यावर सायंकाळीं सहल करणाऱ्या स्त्रीपुरुषांची फारच गर्दी असते. या मनोहर रस्त्यानें गेलें कीं **सर्पंटाईन** नांवाचें सर्पाकृति सरोवर लागतें: त्याच्या बाजू उत्तम क्रांकीटनें बांधून काढल्या असून सरोवराचें पाणी अगदीं कांठोकांठ असतें. यामुळें या सरोवराच्या सन्निधच्या सडकेनें जातांना सरोवराची अवर्णनीय शोभा दिसते. पुढें **होडीघर** ( boat-house ) व होडीपकटी ( boat-platform ) लागतें. येथें सरोवरावर सहल करण्यास भाड्यानें होड्या मिळतात. हौशी लोकांची होड्या वल्हवीत जा-ये चालू असते. हें होडीघर टाकून पुढें गेलें म्हणजे पांच कमानींचा सुंदर पूल लागतो. या पुलावरून डावीकडचें **सरपेंटाईन** सरोवर व उजवीकडचें **लॉंगवॉटर** नांवाचें सरोवर ( वस्तुतः एकाच सरोवराच्या वरच्या व खालच्या भागास


हीं दोन निरनिराळीं नांवें आहेत. ) यांचा एकसमयावच्छेदेंकरून मनोहर देखावा दिसतो. पूल ओलांडला कीं आपण **केन्सिंगटन** बागेंत शिरतों व **लाँग वॉटर** सरोवराच्या बाजूनें जातो. थोडेसें पुढें गेल्यावर **पीटरपॅन** नांवाचा ब्राँझचा पुतळा लागतो. या पुतळ्याचा चबुतरा खडबडीत व उंचसखल टेकडीच्या आकाराचा असून त्यावर नानाविध जनावरें व स्त्रीपुरुष यांचे पुतळे बसविले आहेत. टेकडीच्या माथ्यावर **पीटरपॅन** नांवाचा पुतळा बसविला आहे. या स्मारकाचा तो चकाकणारा तकतकीतपणा, त्याचा तो खडबडीत गुळगुळितपणा, नानामूर्तींचा हुबेहुबपणा व **पीटरपॅन** या बालमूर्तीची उभे राहण्याची ऐट व एका हातांत बिगूल धरून वाजविण्याचें कौशल्य हीं सर्व विस्मयकारक आहेत यांत शंका नाहीं. या **पीटरपॅनच्या** प्रख्यात पुतळ्यावरून जरा पुढें गेलें म्हणजे **लाँगवॉटर** सरोवराचा शेवट येतो. येथें सर्व भाग फरसबंदी केलेला असून मध्यें मध्यें कारंजीं केलीं आहेत व फुलझाडांचे ताटवे आहेत. येथें बागेची सीमा येते व पलीकडे पूर्वपश्चिम जाणारा **बेझवॉटर**, **ऑक्सफर्ड** व **न्यूऑक्सफर्ड** इत्यादि निरनिराळीं नांवें असलेला पण वस्तुतः एकच असलेला व थेट **बँक ऑफ इंग्लंड**समोर जाणारा सुंदर रस्ता लागतो. येथून तिरकस अशी एक पायवाट लागते. तिनें पुढें गेलें कीं नजरेंत भरण्यासारख्या व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याशीं आपण येतों. समोरच **केन्सिंगटन** राजवाड्याची पिवळसर रंगाची इमारत दृग्गोचर होते. तिच्यासमोर जमिनींत जरा खोल गेलेली सुंदर अशी फुलबाग लागते. ही पाहून **ब्रॉडवॉक** नांवाच्या प्रशस्त, दाट छायेच्या व बागेच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत दक्षिणोत्तर जाणाऱ्या रस्त्यानें आपण गेलों म्हणजे **केन्सिंगटन** बागेला बिलगून जाणाऱ्या रस्त्याला आपण येतों. हा रस्ता बागेच्या दक्षिण बाजूला लागून आहे व तो **पिकाडिली** या भागांतून जाऊन मग **हाइडपार्कच्या** उत्तरेकडून बँकेकडे जाणाऱ्या रस्त्याला मिळतो. या रस्त्यानें पूर्वेकडे गेलें म्हणजे डाव्या हाताला व उजव्या हाताला प्रख्यात व्हिक्टोरिया राणीचे

पति **प्रिन्स आल्बर्ट** यांच्या नांवाचीं दोन प्रचंड स्मारकें लागतात. डाव्या हाताकडे प्रत्यक्ष स्मारक पुतळा आहे. उजव्या हाताकडे **आल्बर्ट हॉल** लागतो. दोन्हींहि स्मारकें भव्य असून बांधकलेचे अपूर्व मासले आहेत. प्रिन्स आल्बर्ट यांचें स्मारक त्यांच्या बहुश्रुतपणाला साजेसें आहे. सर्व काम संगमरवरी आहे. तांबुस दगडाच्या सभोंवार पायऱ्या असलेला असा संगमरवरी प्रचंड चबुतरा आहे. त्याच्या चारी बाजूंस दगडावर कोरलेल्या विविध ललित कलावान् पुरुषांचीं १७८ चित्रें आहेत; चबुतऱ्याच्या चार कोपऱ्यांस कृषि, कारागिरी, व्यापार व बांधकला यांचे निदर्शक सांकेतिक संगमरवरी पुतळे आहेत व पायऱ्यांच्या पायथ्याशीं चारी खंडांचे निदर्शक रूपक पुतळे आहेत. चबुतऱ्यावर १२ फूट उंच ब्राँझ धातूचा मुलामा केलेला प्रिन्स आल्बर्टचा भव्य पुतळा बसलेला आहे. पुतळ्यावर चार सुंदर खांबांवर उभारलेली व माथ्यावर क्रिस्ताचा क्रास असलेली मेघडंबरी आहे. स्मारकाचें काम म्हणजे बांधकला व खोदकला यांचा नयनमनोहर मासला आहे. समोर **आल्बर्ट हॉल** आहे. ती इमारत वर्तुळाकार असून त्यावर मोठा थोरला घुमट आहे. यामध्यें १० हजार माणसें बसण्याची सोय आहे. यावरून ह्या इमारतीच्या विस्ताराची कल्पना येईल.


हीं दोन प्रचंड स्मारकें टाकून **प्रदर्शन** रस्त्यानें दक्षिणेकडे जाऊं लागलें म्हणजे लंडनमधील शिक्षणविषयक व ज्ञानप्रसारक संस्था एका पाठीमागून एक लागतात. या सविस्तरपणें व ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीनें पहावयाच्या म्हटल्या तर तसें करण्यास किती तरी आठवड्यांची अवधि पाहिजे. पण एका दिवशींच्या दृश्य दर्शनांत आपणाला त्यांचें ओझरतें दर्शन घेणें भाग आहे. प्रथमतः संगीतविद्या शिकविणारें विद्यालय लागतें. त्याचे पूर्वेस सिटी आणि गिल्ड औद्योगिक विद्यालयाची लांबचलांब इमारत लागते. संगीत विद्यालयाच्या दक्षिणेस इंपीरियल इन्स्टिट्यूट व त्याचें पदार्थसंग्रहालय लागतें. येथें साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांतील कलाकौशल्यांचे नमुने आहेत. त्यालाच लागून **लंडनविश्वविद्यालय**

व त्याचें मोठें ग्रंथसंग्रहालय लागतें. लंडनविश्वविद्यालयासमोर पूर्वपश्चिम जाणारा व **क्वीन्सगेट** रस्ता व **प्रदर्शन** रस्ता या दक्षिणोत्तर जाणाऱ्या रस्त्यांना जोडणारा **इंपीरियल इंस्टिट्यूट** रस्ता लागतो. या रस्त्याला व विश्वविद्यालयासमोर लंडन विश्वविद्यालयाचें भौतिक शास्त्रीय विद्यालय लागतें. त्याचे दक्षिणेस या विद्यालयाच्या उपयोगासाठीं बांधलेलें **नॅचरल हिस्टरी** म्युझियम लागतें व त्याचे पूर्वेस **व्हिक्टोरिया** व **ऑलबर्ट म्युझियम** लागतें. हीं या एका ठिकाणीं असलेलीं तीन पदार्थसंग्रहालयें व ब्रिटिश म्युझियम नांवाचें संग्रहालय या सर्वांमिळून जगांतील निसर्गकृत व मनुष्यकृत सर्व वस्तूंचें विश्वसंग्रहालय होतें. हीं सर्व सविस्तरपणें पाहिलीं असतां जगभर हिंडल्याचें श्रेय मिळून अपूर्व बहुश्रुतपणा मनुष्याचे अंगीं बाणेल यांत कांहीं शंका नाहीं. या संग्रहालयांत गेलें म्हणजे काय पाहू व काय न पाहू असें आपणाला होऊन जातें. सिनेमांतील चित्रपटाप्रमाणें भराभर दालनावर दालनें व त्यामध्यें व्यवस्थित ठेवलेल्या नानाविध वस्तू यांकडे नजर टाकून पुढें जावें लागतें; तरच आपल्याला इमारतीबाहेर पडण्याची आशा आहे. थोड्या वेळाकरितां आलेल्या प्रवाशांना या संग्रहालयाचा विशेष फायदा घेतां न आला तरी लंडनमध्यें स्थाईक राहणारांना या संस्थांपासून किती तरी फायदा करून घेतां येत असेल असें आमच्या मनांत आलें. खरोखरी अशा संस्था स्थानिक लोकांमध्यें सहजासहजीं बहुश्रुतपणा उत्पन्न करीत असतील यांत संशय नाहीं.

या संस्थांचे दक्षिणबाजूनें पण किंचित् ईशान्य दिशेनें **क्रॉमवेल ब्रायटन** व **नाईटस ब्रिज** नांवाच्या सुंदर रस्त्यानें पूर्वेकडे चालत गेलें कीं आपण परत **हाईडपार्क कॉरनर** नांवाच्या रस्त्याला पोहोंचतों. म्हणजे **हाईडपार्क** व **केन्सिंगटन** बागांचें सबंद चक्कर फिरून आपण पूर्वपदावर येतों. येथें **ग्रोस व्हेनार प्लेस** नांवाच्या रस्त्यानें दक्षिणेस आलें कीं सदर्न रेल्वेचें मुख्य स्टेशन **व्हिक्टोरिया** यांचें अजस्त्र आवार येतें. येथेंच युरोपकडून येणारे प्रवासी उतरतात व हिंदी प्रवाशांचें हेंच



नं १३ लंडन : रोमन कॅथालिक प्रार्थनामंदिर पान १५९



नं० १४ लंडन : १ हाऊस ऑफ लॉर्ड्स २ हाऊस ऑफ कॉमन्स ३ सेंट स्टीफन्स हॉल पान १५९

स्टेशन प्रथम परिचयाचें होतें. या स्टेशनवरून पूर्वेकडे **व्हिक्टोरिया स्ट्रीट** नांवाचा रस्ता लागतो. या रस्त्याच्या सुरवातीस पण जरा आंतल्या बाजूस उजवीकडे लंडनमधलें रोमन कॅथॉलिक पंथांचें प्रख्यात प्रार्थनामंदिर आहे. ही इमारत मुख्यतः तांबड्या विटांची आहे; पण तिची बांधणी व्हेनिस मधल्या **सेंट मार्क** प्रार्थनामंदिराच्या धर्तीवर आहे व तिच्या प्रवेशद्वारावर २८४ फुटांचा प्रचंड मनोरा बांधलेला आहे. हें प्रार्थनामंदिर फार अर्वाचीन आहे; त्याचा प्रारंभ १८९५ मध्यें झाला व सध्याची इमारत १९१० मध्यें पुरी झाली. पण पैसे मिळाल्यास संगमरवरी पातळ दगडांनीं मढवून तिला पांढरे शुभ्र संगमरवरी दगडी इमारतीचें स्वरूप देण्याचा कॅथॉलिकपंथी लोकांचा इरादा आहे. असें घडून आल्यास ही इमारत लंडनमधली सर्वोत्कृष्ट बनेल यांत शंका नाहीं. सध्यासुद्धां ही इमारत आश्चर्यचकित करणारी आहे; तिचे लहानमोठे मनोरे तिच्या नाना धर्तीच्या कमानी, ते नाना आकारांचे व उंचीचे खांब, त्या नक्षीदार जाळ्या व खिडक्या, ते भिंतींत दाखविलेले पट्यापट्याचे खांब व प्रार्थनामंदिराचा एकंदर विस्तार व रचनाचातुर्य हीं सर्व अंगें पाहिलीं म्हणजे मनुष्याचें मन थक्क होऊन जातें. ६ पेन्स दिले म्हणजे विजेच्या पाळण्यानें मनोऱ्याच्या माथ्यावर जातां येतें. तेथून लंडन शहराचा बहुविध देखावा दिसतो खरा. पण खिडक्यांना लोखंडी गज जवळजवळ घातल्यामुळें मनोऱ्याचा माथा पिंजऱ्यासारखा वाटतो व सभोंवारचा देखावा दिसण्याला थोडीशी अडचण भासते. पण हा मनोरा **सेंटपालच्या** घुमटापेक्षांसुद्धां जास्त उंच आहे खरा.

हें रोमनकॅथॉलिक पंथाचें प्रख्यात व अर्वाचीन प्रार्थनामंदिर पाहून **व्हिक्टोरिया** रस्त्यानें पुढें गेलें कीं, त्या रस्त्याचे शेवटीं उजव्या हातास इंग्लंडांतील फार जुनें व प्रोटेस्टंट पंथाचें प्रार्थनामंदिर **वेस्टमिन्स्टर ॲबे** समोर **वेस्टमिन्स्टर पार्लमेंटगृह** या दोन जणूं कांहीं जोड इमारती लागतात. ज्याप्रमाणें लंडनच्या पूर्व भागामधील प्रेक्षणीय

स्थळांचा मुकटमणि म्हणजे **सेंट पॉलचें** प्रार्थनामंदिर होय त्याप्रमाणें लंडनच्या पश्चिम भागांतील प्रेक्षणीय स्थळांचा मुकुटमणि म्हणजे या जोड इमारती होत.

**वेस्टमिन्स्टर राजवाडा** किंवा पार्लमेंटगृह व **वेस्टमिन्स्टर प्रार्थनामंदिर** या दोन इमारती खरोखरी जोड इमारतीप्रमाणें आहेत. त्या दोन्ही मूळच्या इंग्लंडच्या राजघराण्याच्या मालकीच्या. **एडवर्ड धी कनफेसर** यानें अकराव्या शतकांत प्रार्थनामंदिर व राजवाडा पुनः बांधला. राजवाडा व मंदिर दोन्ही राजघराण्याच्या उपयोगाकरितां अशा जोड इमारतीप्रमाणें होत्या. याच राजवाड्यांत राजा व त्याचे मंत्री यांची एकत्र बैठक होत असे व पार्लमेंट–स्थापनेनंतर याच राजवाड्यांत त्याच्या सभा भरूं लागल्या. **आठव्या हेन्रीनें** ह्या राजवाड्यांत राहण्याचें टाकलें व तो शेजारच्या **व्हाइटहॉल** राजवाड्यांत राहूं लागला. आणि **वेस्टमिन्स्टर** राजवाडा पार्लमेंट सभागृह व न्यायमंदिर बनलें. **वेस्टमिन्स्टर** ॲबे हें राजपुरुषांचें व इंग्लंडच्या प्रख्यात पुरुषांचें कबरस्थान बनलें. दोन्ही इमारती मध्ययुगीन बांधकलेच्या धर्तीवर बांधलेल्या आहेत खऱ्या; पण अकराव्या शतकापासून त्यांची सारखी वाढ होत गेली आहे. या इतक्या शतकांत नव्या जुन्या बांधकामाची इतकी भेसळ झाली आहे कीं, नव्या जुन्याचा फरक कळणें कठीण आहे. पण दोन्ही इमारतींचा बाह्य देखावा फारच सुंदर व भव्य असून त्यांना पुरातनकाळचा गंभीरपणा आलेला आहे.

**व्हिक्टोरिया** रस्त्यानें आलें म्हणजे प्रार्थनामंदिराचें पश्चिम प्रवेशद्वार लागतें. त्याच्या समोरच एक तांबूस दगडाचा, माथ्यावर पांढराशुभ्र पुतळा असलेला व अत्यंत कलाकुसरीचें उथळें असलेला व कळसदार माथ्याचा स्मारकस्तंभ दृष्टीस पडतो. प्रार्थना मंदिराचे ते दोन अरुंद पण उंच उंच चौकोनी मनोरे, मध्यें प्रार्थनामंदिराचें तिकोनी सखल छप्पर, त्या उंचच उंच नक्षीदार खिडक्या हा सर्व देखावा मनोहर आहे. **सेंट पॉलच्या** प्रवेशद्वाराइतकें हें द्वार भव्य नाहीं; पण तें जास्त नक्षी-


दार कलाकुसरीचें व जास्त पुरातन व म्हणून गंभीर भावना उत्पन्न करणारें आहे असें मला वाटलें. परंतु हें प्रवेशद्वार प्रेक्षकांनीं प्रवेश करण्याचें द्वार नव्हे. प्रवाशांना उत्तरेकडच्या द्वारानें शिरण्याची परवानगी देतात. आपण तसेंच आंत जाऊं या. आंत शिरल्याबरोबर इंग्लंडांतील प्रसिद्ध मुत्सद्यांचे भव्य स्मारक पुतळे लागतात व तसेंच समोर गेलें म्हणजे **'कवींचा कोपरा'** लागतो. येथें इंग्लंडमधील प्रसिद्ध कवींचीं व लेखकांचीं स्मारक चित्रें व चिन्हें ठेवलेलीं आहेत. नंतर प्रार्थनामंदिराचा पश्चिम द्वारापर्यंत गेलेला लांबच्च लांब भाग लागतो. येथेंहि दोन्ही बाजूंस निरनिराळया धंद्यांत प्रसिद्धीस आलेल्या पुरुषांचीं चित्रें व चिन्हें दृष्टीस पडतात.

प्रत्येक स्मारकाखालीं स्मारक पुरुषाची माहिती देणारा लेख कोरलेला आहे. जर हें प्रार्थनामंदिर सावकाशपणें व प्रत्येक लेख वाचून पहावयाचें म्हटलें तर त्या कामाला एक आठवडा पुरणार नाहीं. पण असें केल्यास इंग्लंडचा राजकीय, सामाजिक व वाङ्मयीन हजार वर्षांचा इतिहास सहज कळेल व स्मृतिपटावर वज्रलेप होईल; इतकीं येथें स्मृतिस्मारकें आहेत. सारांश, **वेस्टमिन्स्टर** प्रार्थनामंदिर म्हणजे इंग्लंडच्या इतिहासाचें मूर्तिमंत भांडार आहे असें प्रेक्षकांस वाटल्याखेरीज रहात नाहीं. या प्रार्थनामंदिराच्या उत्तर–प्रवेशद्वारांतून परत बाहेर आलें कीं, दक्षिण दिशेला व समोरच **वेस्टमिन्स्टर** राजवाडा किंवा पार्लमेंटगृहाची प्रचंड लांबलचक व नवीन इमारत दृष्टीस पडते. या राजवाड्यासभोंवार पूर्वीं पाण्यानें भरलेला खंदक होता. पण आतां तो भरून काढला असून त्या खोलगट जागेंत बाग केलेली आहे. तेथले **क्रॉमवेल** व **पहिला रिचर्ड** यांचे भव्य पुतळे मन आकर्षण करतात. तसेंच या प्रचंड इमारतीचे तीन उंच उंच मनोरे–घड्याळ–मनोरा, मध्य–मनोरा व व्हिक्टोरिया मनोरा–पाहणाराची दृष्टि वेधतात. याखेरीज लहान लहान मनोरे तर किती आहेत त्याची कल्पनाच होत नाहीं. एवढी ही इमारत प्रचंड आहे. ही लांबची बाजू जवळजवळ

हजार फूट आहे व या इमारतीची रुंदी तीनशें फुटांच्या वर आहे. यांत एकंदर ५०० च्यावर दालनें व खोल्या आहेत. एवढी प्रचंड इमारत अर्वाचीन काळीं बांधली गेली. मात्र **वेस्टमिन्स्टर हॉल** व **सेंट स्टीफन्स हॉल** व तळघर हे काय ते जुन्या राजवाड्याचे अवशेष आहेत. प्रेक्षकांना या प्रचंड इमारतीचा मधला भाग व पुरातन दोन हॉल इतकेच दाखविण्यांत येतात. या ठिकाणीं **टेम्स** नदी थेट दक्षिणोत्तर वाहते व म्हणून इमारतीची लांब बाजू दक्षिणोत्तर आहे. उत्तरेच्या टोंकाला **वेस्टमिन्स्टर** पुलाला लागून घड्याळ–मनोरा आहे व दक्षिणेच्या टोंकाला व्हिक्टोरिया मनोरा आहे. या मनोऱ्याच्या अलीकडे प्रेक्षकांचें प्रवेशद्वार आहे व त्यांतून आंत गेलें म्हणजे मधोमध व इमारतीच्या सर्व लांबीभर दालनेंच दालनें लागतात; त्यामध्यें कोपऱ्या कोपऱ्याला प्रसिद्ध पुतळे व त्याच्या छतावर व बाजूच्या भिंतीवर तैल रंगांतील नानाविध प्रसंगांचीं ऐतिहासिक चित्रें व प्रख्यात पुरुषांचीं चित्रें रंगविलेलीं दृष्टीस पडतात व सर्वांचे त्या त्या प्रसंगाचे व चित्रांचे परिचयलेख असतात. यामुळें इंग्लंडच्या इतिहासाची जणूं कांहीं उजळणी होत जाते. दक्षिणच्या टोंकाला प्रवेशद्वारांतून आंत गेलें कीं बादशहाची पोषाखाची खोली व बादशहाची वाटपाही ग्यालरी, पुढें सरदारांचें वाटपाही दालन व लागलीच हाऊस ऑफ लॉर्डस्चें प्रशस्त सभागृह लागतें. वैभवशाली राष्ट्राच्या सरदारी सभागृहाला शोभेल असें हें सभागृह आहे. सभागृहाचा शृंगार व राजा राणीचीं सिंहासनें व सभासदांच्या बसावयाच्या जागा श्रीमंती थाटाच्या आहेत. त्या पाहून मन थक्क होतें. पुढें लॉर्डची लॉबी (मतें देण्याकरितां जमावयाची जागा) लागते; पुढें अरुंद अशी वाट लागते. मग प्रेक्षक मधल्या दिवाणखान्यांत येतो. याचेवरच मोठा उंच मनोरा आहे. पुढें पुन्हां अरुंद वाट लागते व लागलीच कॉमन्सची लॉबी लागते व मग हाऊस ऑफ कॉमन्सचें सभागृह लागतें. सर्व जगाच्या प्रातिनिधिक संस्थांच्या मातृस्थानीं असलेल्या सभेच्या सभागृहाचा साधेपणा पाहून एक प्रकारचें



नं.१५ लंडन : पार्लमेंट गृहांतील जुना वेस्टमिनिस्टर हॉल पा.१६२



लंडनः सेंट स्टीफन्स तळघर (पार्लमेंट गृहामधील)

नं० १६ पान १६२

अनपेक्षित कौतुक वाटतें. विशेषतः नवलाची गोष्ट वाटते ती ही कीं, सहाशेंवर ज्या सभेचे सभासद त्या सर्वांना एकदम बसण्यास पुरे एवढें हें सभागृह मोठें नाहीं. कारण सर्व सभासद एकदम हजर राहिल्यास त्यांना गर्दीनें बसणेंसुद्धां अशक्य आहे. इतकें कमी प्रशस्त हें सभागृह आहे. पण सर्व सभासद हजर असण्याचे प्रसंग विरळा व त्यावेळीं सभासदांना उभे राहण्याचा संकोच किंवा कमीपणा वाटत नाहीं. या सभागृहाच्या दुसऱ्या मजल्यावर प्रेक्षकांच्या ग्यालऱ्या आहेत. या सभागृहाच्या पलीकडे प्रेक्षकांस जाण्याची परवानगी नाहीं. यामुळें आल्या वाटेनें मधल्या दिवाणखान्यांत परत येऊन मग पश्चिमेच्या अंगास असलेला **सेंट स्टीफन्स हॉल**, त्याचें खालचें तळवर व शेवटीं **वेस्टमिन्स्टर हॉल** पहातां येतो. हे पुरातन काळचे तिन्ही भाग पाहाण्यालायक आहेत. वेस्टमिन्स्टर हॉलची लांबीरुंदी व उंची प्रमाणबद्ध असल्यामुळें व तो अगदीं मोकळा असल्यामुळें फारच भव्य व आश्चर्यकारक वाटतो. या हॉलला लागून असणाऱ्या पोर्चमधून प्रेक्षकांस बाहेर पडण्याची वाट आहे.

**वेस्टमिन्स्टर प्रार्थनामंदिर** व **पार्लमेंट गृहें** हीं मध्यलंडनांतल्या प्रेक्षणीय स्थळांचे मुगुटमणि आहेत असें राहूनराहून मनांत येत असतां मोठ्या प्रमुदित मनानें आपण मध्यलंडनचा निरोप घेऊं या. पण जरा थांबा. इंद्राच्या ऐरावताच्या दर्शनानंतर श्यामभटाची तट्टाणी पहाण्यास नेणाऱ्या मार्गदर्शकाच्या दोषास मी पात्र होत असलों तरी जातां जातां आणखी एका खासगी प्रेक्षणीय स्थळाची भेट घेतल्याखेरीज वाचकांचा निरोप घेणें रास्त नाहीं. तें प्रेक्षणीय स्थळ सार्वजनिक नाहीं; तें खासगी आहे; त्याला पहावयास पैसे ( २ शिलींग ) द्यावे लागतात; तें हल्लीं अगदीं अर्वाचीन आहे. तरी पण लंडनला जाणारा प्रत्येक प्रवासी तें स्थळ पाहिल्याखेरीज रहात नाहीं. तें स्थळ म्हणजे **मॅडम टसाऊड** हिचें मेणाच्या चित्रांचें प्रदर्शन होय.

या बाईचा जन्म १७६० मध्यें **बर्न** शहरीं झाला. तिच्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ती मामाच्या कलाभवनांत मेणाचीं चित्रें करण्यास शिकली. पुढें ती पॅरिस शहरीं आली तेथें तिनें प्रख्यात पुरुषांचे हुबेहुब पुतळे केले व तिची **नेपोलियन** बादशहापर्यंत कीर्ति पसरली. १८०० मध्यें तिनें पॅरिस सोडलें व आपल्या आश्चर्यकारक व हुबेहुब पुतळ्यांचें व चित्रांचें प्रदर्शन तिनें लंडनमध्यें उघडलें. तें लोकप्रिय झाल्यामुळें ती बाई लंडनमध्यें स्थाईक झाली; व तिचें प्रदर्शन ही एक अत्यंत लोकप्रिय प्रेक्षणीय अशी कायमची संस्था बनली. तिला मेणाचीं चित्रें, पुतळे व नानाविध प्रसंगांचे चित्रसमूह हुबेहूब करण्याचें विलक्षण कसब होतें. यामुळें हें प्रदर्शन लहानथोर तत्रस्थ परस्थ स्त्रीपुरुष श्रीमंतगरीब अशा सर्व लोकांचें एक करमणुकीचें व ज्ञानप्राप्तीचें साधन बनलें; कारण तिचीं चित्रें इंग्लंडच्या इतिहासांतील स्त्रीपुरुषांचीं व प्रसंगांचीं असतच; पण जगांतील प्रख्यात पुरुषांची व जगांतील अनेकविध प्रसंगांचींहि असत. यामुळें या प्रदर्शनानें कितीतरी ज्ञान प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणें होतें. ही बाई १८५० मध्यें आपल्या वयाच्या ९० व्या वर्षीं वारली व तिच्या पुत्रपौत्रांनीं हाच धंदा चालवून या प्रदर्शनसंस्थेची कीर्ति वाढविली. १९२५ मध्यें हें प्रदर्शन व त्याची इमारत अग्निनारायणाच्या भक्ष्यस्थानीं पडली. पण **टसाऊड** गृहस्थांनीं थोड्याच काळांत सर्व प्रदर्शन पुनः जसेंच्यातसें तयार केलें. हें प्रदर्शन विलक्षण आश्चर्यकारक आहे यांत शंका नाहीं.

# प्रकरण १० वें

## टेम्सनदी व तिच्यावरील प्रेक्षणीय स्थळें


विराट शरीरी लंडनशहराचें सविस्तर वर्णन करतां यावें म्हणून मी लंडनचे **टेम्स नदीच्या** अनुरोधानें तीन भाग कल्पून त्यांचें वर्णन मागल्या तीन लेखांत केलें खरें; पण एखाद्या ठिकाणची एकंदर शिग्गणती करतांना स्वत:ला विसरणाऱ्या विसरभोळ्याची कृति माझ्या हातून झाली असें मला नंतर कळलें. कारण टेम्सनदी व त्यावरील प्रेक्षणीय स्थळें यांचें वर्णन अजिबात राहून गेलें. तरी लंडनवर्णनाच्या पूर्तीकरितां या लहानशा लेखांत तें वर्णन देऊन मी पुढच्या यात्रावर्णनास लागणार आहें. टेम्सनदीचें सामान्य वर्णन पूर्वीं आलें आहेच. येथें लंडनचें बंदर या नात्यानें टेम्स खाडीचें वर्णन व त्यावरील प्रेक्षणीय स्थळांचें वर्णनच फक्त करावयाचें आहे.

टेम्सनदी सपाट प्रदेशांतून गेल्यामुळें मंदवाहिनी पण सदावाहिनी आहे व म्हणून ती सदा नौकागमनक्षम असते. पण हिंवाळ्यांत कमी पाणी होतें व नदीच्या वरच्या भागांत केव्हां केव्हां पाण्याचा तुटवडा पडतो म्हणून नदीच्या सुमारें दोनशें मैलांच्या प्रवाहामध्यें चार सखल व वरून नेहमीं पाणीवाही असे बंधारे बांधले असून, पाण्याची उंची कमी जास्त करण्याकरितां वाटोवाट सत्तेचाळीस जलकुलुपें ( Water-locks ) केलीं आहेत. त्यायोगें लहान मोठ्या आगबोटी व गलबतें यांच्या रहदारीस केव्हांहि अडथळा होत नाहीं. अशा एका जलकुलुपाचें वर्णन पुढें करावयाच्या प्रेक्षणीय स्थलवर्णनप्रसंगीं येणार आहे.


टेम्सनदीच्या खाडीची व बंदराची पूर्व सीमा म्हणजे **रिचमंड** टेकडीच्या दक्षिणेस लागणारें पहिलें **टेडिंगटन** जलकुलूप होय.

**टेडिंगटनपासून लंडनपुलापर्यंत** खाडीचा व बंदराचा वरचा भाग होतो. यामध्यें मध्यम आकाराचीं गलबतें व आगबोटी चालतात. या खाडीच्या वीस मैलांच्या भागास दुथडी धक्केच धक्के बांधलेले आहेत व त्या धक्क्यांवर मालाची चढउतार सारखी चालू असते. **लंडनपुलापासून टिलबेरी** गोद्यांपर्यंत खाडीचा खालचा व खोल भाग आहे. हाहि सुमारें वीस मैलांचा असून यामध्यें **लंडन** बंदरांतील मोठमोठ्या गोद्या बांधलेल्या आहेत व प्रचंड धक्के असून नाना प्रकारच्या आयात मालाच्या विस्तीर्ण वखारी आहेत. लंडनपुलाला लागून व त्याच्या पूर्वेस असलेल्या **सेंट कॅथराईन** गोदीपासून तों प्रख्यात **टिलबेरी** गोदीपर्यंत गेल्या सव्वाशें वर्षांत बांधलेल्या गोद्या व वखारी वीस मैलपर्यंत पसरल्या आहेत. या गोद्यांमध्यें प्रचंड जहाजें व प्रचंड आगबोटी सर्व वेळीं व सर्व ऋतूंत सहज येऊं शकतात व कोट्यावधी रुपयांच्या मालाची ने आण करीत असतात. इंग्लंडमध्यें किती तरी बंदरें व खाड्या आहेत. तरी पण त्या सर्वांमध्यें लंडनबंदराचा अजून पहिला नंबर आहे. परंतु लंडनचें हें विस्तीर्ण बंदर, गोद्या व वखारी पहाण्याकरितां परवानगीची बरीच खटपट करावी लागते. म्हणून त्या भानगडींत न पडतां **टॉवरपुला**वरून विहंगमदृष्ट्या हें बंदर, गोद्या, वखारी; व गलबतांची व आगबोटींची चिकार गर्दी जी काय पहातां आली तितकी पाहूनच मी मनाचें समाधान केलें. पण **टॉवरपूलापासून हॅंपटनकोर्ट** राजवाड्यापर्यंत **टेम्सनदी** व तीवरील प्रेक्षणीय स्थळें आम्ही पायीं व आगबोटीनें प्रत्यक्ष पाहिलीं. त्याच्या वर्णनास आतां लागणें बरें.

हा सर्व नदीचा भाग दुथडी बांधूनच काढलेला आहे. शिवाय नदीला मिळणारे ओढे बुजवून त्यांची बांधीव व पाणी जाण्याचीं भूमिगत गटारें बनविल्यामुळें **टेम्स नदीला** आपल्या इकडल्या नद्यांच्याप्रमाणें उंच सखल दरडी व वाळवंटी किनारे मुळींच दिसत नाहींत; तर ती नदी पाण्यानें कांठोकांठ भरलेल्या व दुथडी धक्क्यांनीं बांधलेल्या प्रचंड कालव्यासारखी भासते. शिवाय, **टॉवर पुलापासून वेस्टमिन्स्टर**



नं. १७ लंडन : व्हिक्टोरिया एंबँकमेंट व गर्दछाय रस्ता पान १६७



लंडन : टेम्स नदीकाठचा व्हिक्टोरिया एंबँकमेंट ( धक्का ) व क्लिओपाट्राचा स्तंभ ( सुई )

पान १६७

नं. १८

पुलापर्यंत सुमारें चारपांच मैल नदीकांठाला उत्तम चिरेबंदी धक्का बांधला असून चिरेबंदी प्रशस्त पायवाट व रस्ता राखलेला आहे. **टॉवर पुलापासून ब्लॅकफ्रायर्स** पुलापर्यंत अपरटेम्स रस्ता व लोअरटेम्स रस्ता अशीं रस्त्याचीं नांवें आहेत. या रस्त्याला लागून गलबतें व माल उतरण्याकरितां धक्के राखलेले आहेत. हे दोन रस्ते बरेच जुने आहेत व त्यांचे पलीकडे फार दाट व खेचाखेचीची वस्ती असल्यामुळें व नदीमध्येंहि गलबतांची गर्दी असल्यामुळें या दोन रस्त्यांनीं जातांना फारसा प्रेक्षणीय देखावा दिसत नाहीं. पण **ब्लॅकफ्रायर्स** पुलापासून **वेस्टमिन्स्टर** पुलापर्यंत नदी बरोबर वाकलेल्या धनुष्याच्या आकाराची झाली असून, त्याला अर्ध वर्तुळाकार असा चिरेबंदी धक्का, चिरेबंदी सुंदर कठडा व चिरेबंदी प्रशस्त पायवाट बांधली आहे. हिला **व्हिक्टोरिया एम्बँकमेंट** किंवा नुसतें **एम्बँकमेंट** म्हणतात. या पायवाटेनें जाऊं लागलें म्हणजे लंडन राजधानीचें सर्व वैभव व शोभा मूर्तिमंत दृष्टीस पडते. प्रशस्त स्वच्छ फरसबंदी पायवाट, त्याचे पुढें तो प्रशस्त रस्ता, त्याचे पलीकडे बागबगीचे व त्याचेहि पलीकडे टोलेजंग दगडी इमारती हा एकसमयावच्छेदेंकरून दिसणारा देखावा अद्वितीय आहे यांत शंका नाहीं. या अर्धवर्तुळाकार भागामध्यें नदी ही खुली व संथपणें चाललेली दिसते. प्रवाहाच्या मधोमध मधूनमधून आगबोटी व होड्या जातांयेतांना दृष्टीस पडतात. या धनुष्याकार नदीच्या पूर्व टोंकास **ब्लॅकफ्रायर्स** पूल असून पश्चिम टोंकास **वेस्टमिन्स्टर** पूल असून धनुष्याच्या मधोमध **वाटरलू पूल** आहे. हा व **वेस्टमिन्स्टर** पूल यांच्यामध्यें मोठा लोखंडी आगगाडीचा **चेरिंगक्रॉस** पूल आहे. या एम्बँकमेंट पायवाटेनें जातांना कितीतरी स्मारकें लागतात. त्यांमध्यें ' **क्लिओपाट्राची सुई** ' नांवाचें स्मारक आश्चर्यकारक आहे. ही ' सुई ' म्हणजे हेलिओपोलीस ( इजिप्त ) येथील देवळापुढें असलेल्या एकसंधी तांबड्या दगडाच्या स्तंभांपैकीं एक होय. हा स्तंभ सुमारें एकुणसत्तर फूट उंच असून शेवटीं निमुळता केला आहे. याचे पायथ्याशीं दोन ब्रांझधातूचीं फिनिक्स

पक्षांचीं चित्रें आहेत. हा १८७८ मध्यें इजिप्तमधून दहा हजार पौंड खर्च करून आणला व येथें **एम्बँकमेंटच्या** कठड्यावर स्मारक स्तंभ म्हणून बसविला. **एम्बँकमेंट वेस्टमिन्स्टर** पुलाशीं संपतें. पायऱ्या चढून पुलाच्या टोंकाशीं आलें म्हणजे एक चित्ताकर्षक स्मारक दृष्टीस पडतें. हें स्मारक इंग्लंडांतील फार जुन्या काळच्या प्रसंगाचें आहे. इंग्लंडवर रोमन सत्ता चालू असतां रोमन लोकांनीं नॉरफोक परगण्याच्या एका छोट्या राजाच्या मरणानंतर त्या परगण्याचें राज्य कार्बीज केलें व त्याची विधवा राणी **बोडेशिया** हिनें विरोध केला म्हणून तिला चाबकानें मारून हाकून लावलें. म्हणून तिनें सैन्य जमवून लंडनपर्यंत जाळपोळ करून रोमन लोकांवर स्वारी केली. अर्थात् तिचा पराभव झाला. तिनें विष खाऊन प्राण दिला पण ती शत्रूच्या हातीं सांपडली नाहीं. अशा या पराक्रमी व अभिमानी राणीचा रथावर बसलेला सुंदर ब्रॉंझ पुतळा पुलाचे प्रवेश-कठड्यावर बसविला आहे. ते अगदीं चौखुर धावण्यास उत्सुक झालेले घोडे, रथाच्या चाकाला लावलेल्या तरवारी व राणीचा शिपाईबाण्याचा धीरोदात्त पुतळा हीं सर्व अवर्णनीय आहेत. येथपर्यंत **टेम्स** नदीवरचें पायीं पर्यटन पुरें झालें. आतां त्या नदीवरील जलपर्यटनानें पाहण्यास सांपडणारें अद्वितीय प्रेक्षणीय स्थळ **हॅम्पटन कोर्ट** राजवाडा याचे वर्णनाकडे वळूं या.

खुद्द लंडन व त्याच्या आसपास इंग्लिश राजघराण्याच्या मालकीच्या राजवाड्यांमध्यें हॅंपटन कोर्ट हा एक प्रख्यात व पुरातन राजवाडा असून त्याची पूर्वपीठिका अपूर्व आहे. लंडन शहराच्या नैऋत्य दिशेस वीस पंचवीस मैलांवर **टेम्स**नदीच्या अर्धवर्तुळाकार वाकणानें वेष्टिलेल्या निसर्गसुंदर अशा भूमिभागामध्यें **आठव्या हेनरी** राजाचा प्रख्यात प्रधानप्राय मुत्सद्दी व धर्माधिकारी **कार्डिनल वूल्से** यानें हा राजवाडा स्वतःकरितां सन १५१५ मध्यें बांधला. राजांच्या राजवाड्यांना लाजवील इतका सुंदर व भव्य असा हा वाडा बांधण्यांत आला. येथें **कार्डिनल वूल्से** मोठ्या राजवैभवानें आपल्या पांचशें अनुचरांच्या परिवारासह रहात असे.

येथें तो **आठव्या हेनरीला** व त्याच्या राणीला थाटाच्या मेजवान्या देऊन त्यांचें आदरातिथ्य करीत असे. सन १५२७ मध्यें फ्रान्सच्या वकिलाचा व त्याच्या चारशें अनुचरांचा अभूतपूर्व असा पाहुणचार कार्डिनल वूल्सेनें केला. **हेनरी राजाची** जाती मर्जी सुप्रसन्न करण्याकरितां **वूल्सेनें** हा राजवाडा **हेनरीला** १५२५ मध्यें अर्पण केला. तरी पण **वूल्सेची** सत्ता व अधिकार १५२९ मध्यें गेला तो गेलाच. **वुल्सेच्या** अधिकारच्युतीनंतर **हेनरीनें हॅम्पटेन कोर्ट** आपल्या ताब्यांत घेतलें. हा वाडा व हें ठिकाण त्याला फार आवडलें. त्यानें त्या वाड्याची पुष्कळ दुरुस्ती व पुस्ती केली. पुढें याच वाड्यांत **हेनरीनें** आपल्या एकामागून एक केलेल्या सहा राण्यांसह वस्ती केली. **हेनरी**नंतर सर्व इंग्लिश राजांचा हा आवडता राजवाडा होता. त्यांनीं वेळोवेळीं त्याची वाढ केली. **क्रॉमवेल**सुद्धां या वाड्यांत येऊन राहिला होता. पहिल्या **जेम्सच्या** कारकीर्दीमध्यें खुद्द **शेक्सपियरनें** आपलीं नाटकें आपल्या कंपनीमार्फत या वाड्याच्या मोठ्या दिवाणखान्यांत केलीं. १६०४ मध्यें प्यूरिटन व एपिसकोपेलियन या प्रोटेस्टंट पंथाच्या दोन शाखांमधील तंट्याचा तडजोडीनें निकाल करण्याकरितां भरलेली प्रख्यात कॉन्फरन्स येथेंच **जेम्सच्या** अध्यक्षत्वाखालीं भरली. ती इंग्रजी इतिहासांत **हॅम्पटन कोर्ट-कॉन्फरन्स** म्हणून प्रसिद्ध आहे. या कॉन्फरन्सचें एक काम म्हणजे बायबलचें नवें अधिकृत भाषांतर होय. **तिसरा विलियम व मेरी** यांना हा राजवाडा फार आवडला व त्यांनीं या राजवाड्याला तिसरा मोठा चौक जोडला. या राजवाड्याच्या विस्तीर्ण उपवनामध्यें सहल करीत असतांना **तिसरा विलियम** घोड्यावरून पडला व त्याच दुखापतीनें त्याला मरण आलें. **ॲन राणीच्या** कारकीर्दीतील **पोपच्या** रेप ऑफ धि लॉक नांवाच्या विनोदप्रचुर काव्याचा प्रसंग येथें घडला. **पहिला जॉर्ज व दुसरा जॉर्ज** यांचे कारकीर्दीपर्यंत हा राजवाडा इंग्लिश राजांचा राहता राजवाडा होता. पण **तिसरा जॉर्ज** राजा मात्र केव्हांहि या वाड्यांत राहिला नाहीं. त्याच्या दीर्घ कारकीर्दीमुळें हा राहता राजवाडा राहिला नाहीं व म्हणून त्या

वाड्यामध्यें पंधरा वीस दालनांचा एक एक स्वतंत्र गट करून, असे गट राजाच्या मर्जीनुरूप सरदार मंडळीस राहण्यास देण्याची पद्धति सुरू झाली व ती अद्यापपर्यंत चालू आहे. अशीं दालनें या राजवाड्यांत सुमारें हजार आहेत व तेथें पंचेचाळीस कुटुंबें राहण्याची सोय आहे. राजवाडा अर्थात् इंग्लिश राजांच्या मालकीचा आहे व अजूनहि त्यांना तेथें राहण्याचा अधिकार आहे. पण **व्हिक्टोरिया** राणी सिंहासनारूढ झाली तेव्हां तिनें आपल्या पूर्वजांचें व इंग्लिश इतिहासाचें मूर्तिमंत स्मृतिचिन्ह असा हा सुंदर व भव्य राजवाडा व त्या सभोंवतालचे बागबगीचे व उपवनें हीं सर्व सार्वजनिक करमणुकीला व विश्रांतीला मोफत खुलीं केलीं. **सातवे एडवर्ड** व सध्यांचे **पांचव जॉर्ज** बादशहा यांनीं तीच परवानगी आपापल्या कारकीर्दींमध्यें चालू ठेविली आहे. सार्वजनिक उपयोगाच्या दृष्टीनें व इंग्लिश राजांनीं आपल्या खासगी जमिनींचें उत्पन्न ब्रिटिश सरकारला बहाल केल्यामुळें इतर राजवाड्यांप्रमाणें या राजवाड्याची व्यवस्था व त्याचा चालू खर्च सरकारी तिजोरींतून होतो. हा राजवाडा सार्वजानिक प्रेक्षणीय स्थळ व दिवसभराचें विश्रांतिस्थान म्हणून किती लोकप्रिय आहे याची कल्पना दरवर्षी हें स्थळ पाहणाऱ्या माणसांच्या संख्येवरून येईल. लढाईनंतरच्या काळांत दरवर्षी सुमारें **सवासहा लाख** लोक हा राजवाडा पहावयास जातात. तेव्हां इतका प्रख्यात राजवाडा पाहिला म्हणजे इंग्लिश राजांचे सर्व राजवाडे पाहिल्याचें श्रेय पदरीं पडल्यासारखें आहे असें समजून, मी हा एक राजवाडा पहाण्याचें ठरविलें व तोहि जातांना जलमार्गानें व परत येतांना खुष्कीच्या मार्गानें पहाण्याचें निश्चित केलें.

**हॅम्पटन कोर्ट** राजवाडा पहाण्यास आम्ही तारीख पंधरा सप्टेंबर सन १९२९ रविवारीं सकाळीं न्याहारीनंतर निघालों. ते तीन नंबरच्या बसनें **वेस्टमिन्स्टर** पुलावर सकाळचे सवानऊ वाजतां आलों. या पुलाला लागून असणाऱ्या धक्क्यावरून आगबोट १० वाजतां निघावयाची होती. पण आम्ही आलों तों तेथें कोणीच नाहीं. आग-

बोटीचें तिकीटघर सुद्धां उघडें नाहीं. तेव्हां आम्ही वेळ चुकलों कीं काय असें आम्हाला वाटलें. मग आम्हीं त्या खालच्या धक्यावर व वरच्या **एम्बॅंकमेंटवर** हिंडलों व सभोंवारची सुंदर शोभा पहात पाव तास घालविला. बरोबर साडेनवाला आगबोटीचें तिकीटघर उघडलें व आम्हीं जातांचीं तिकीटें काढलीं तोंच भुरुभुरु माणसांची गर्दी होऊं लागली. आगबोटही धक्याला आली व वारुळांत ज्याप्रमाणें मुंग्या भराभर याव्या त्याप्रमाणें एका अर्ध्या तासांत बोटीवरल्या सर्व खुर्च्या पार भरून गेल्या व आमची आगबोट बरोबर दहा वाजतां सुरू झाली. बोटींत बसल्यापासून आमच्या **टेम्सनदी**वरील दृश्य-दर्शनाला सुरुवात झाली म्हणाना! आमच्या बोटीच्या धक्यासमोरच पण पलीकडच्या तीराला लंडन कौंटीकौंसिलची एक सुंदर दगडी इमारत दिसत होती. **वेस्टमिन्स्टर** पुलाच्या एका भव्य कमानीखालून आम्हीं पलीकडे गेलों तोंच उजवीकडे पार्लमेंटगृहाची ती विस्तीर्ण लांबचलांब इमारत व त्याच्या पुढला सुंदर दगडी कठड्याचा धक्का मन आकर्षित करीत होता; तर डाव्याबाजूला **सेंट टॉमस** इस्पितळाची त्याच्याहिपेक्षां लांबच लांब इमारत लक्ष वेधीत होती. या दोन सुंदर इमारती दृष्टीआड झाल्या नाहींत तोंच, उजवीकडे पार्लमेंटची बाग व त्यांतील रांगेनें लावलेले वृक्ष व हिरवी हिरवीगार खुली जागा दृष्टीस पडली व डाव्या हातास **लॅम्बेथ** वाडा ( आर्च बिशप ऑफ कॅंटरबरी यांचें लंडनमधलें राहण्याचें ठिकाण ) व त्यासभोंवारची बाग यानीं लक्ष वेधलें. या दोन्ही तीरांच्या सुंदर बागांचा देखावा संपतो तोंच, **लॅम्बेथ** नांवाच्या लोखंडी दोरखंडाच्या पुलाखालून आमची आगबोट गेली. हा पूल टाकल्यावर नदीच्या दोन्ही किनाऱ्यांस दगडी धक्क्यांच्या सुंदर पायवाटा लांबच लांब दिसतात; तोंच प्रचंड **व्हॉक्झहॉल** पुलाखालून आमची बोट जाते. पुढें कांहीं वेळ प्रेक्षणीय असें कांहीं लागत नाहीं. मग जवळ जवळ **चेलसी, आलबर्ट** व **बॅटरसी** असे तीन पूल लागतात व नदीच्या उजव्या बाजूस **चेलसी** इस्पितळाच्या इमारती व त्यासभोंवारची बाग व **चेलसी एम्बॅंकमेंट** दृष्टीस पडतें, व


विस्तीर्ण **बॅटरसी–बाग** लागते. या आगबोटींतून जात असतांना काय पाहूं व काय न पाहूं असें माणसास होऊन जातें. जिकडे पाहावें तिकडे सुंदर इमारती व बागा लागतात. **बॅटरसी** पुलापासून नदी दक्षिणोत्तर अशी वळणावळणांनीं जाते असें-आपल्या दृष्टीला पडतें. यामुळें एकदां उत्तरेकडे चाललों आहों असें दिसतें तों थोड्याच वेळांत उलट दिशेनें जात आहों असें वाटतें. विलक्षण वळणाच्या घाटानें मोटार जातांना ज्या प्रकारची दिशाबदल झालीशी दिसते तसाच या नदींतून जातांना भास होतो. सुमारें दोन तास याप्रमाणें पहातां पहातां निघून गेले व आमची आगबोट **क्युबागेच्या** लाकडी धक्याशीं थांबली व येथें उतारूंची चढउतर झाली. **क्युपूल** टाकल्यावर लवकरच टेम्सनदींतील पहिलीं **ब्रेंटफर्ड** बेटें लागलीं. येथून पुढें वाटोवाट लहानमोठीं बेटें आम्हांला लागलीं. त्या सर्वांवर लहान लहान टुमदार बंगले व छोट्या बागा असून तीं सर्व बेटें मनुष्यांनीं फुललेलीं दिसत होतीं. तसेंच येथून नदीमध्यें लहान लहान होड्यांमध्यें बसून व स्वतः होड्या वल्हवीत जातांना हौशी लोक दृष्टीस पडत होते. त्यांचे ते नानारंगी अंगाबरोबरचे गंजीफ्राकसारखे कपडे, त्या अति हलक्या होड्या व पिवळसर लांबट वल्हीं हा सर्व देखावा चित्ताकर्षक होता. इतक्या होड्या व लोक आम्हांला भेटत होते कीं, जणूं कांहीं सर्व लंडन बाहेर जलसहल करावयास निघालेलें आहे असें वाटलें. लंडनमध्यें सप्टेंबर हा महिना सार्वजनिक सुटीचा असतो. यामध्यें शाळा, कॉलेजें, न्यायमंदिरें व बरींच सरकारी खातीं बंद असतात; तसेंच, सुखवस्तु लोकांना हाच विश्रांतीचा महिना असल्यामुळें व या महिन्यांत हवाहि तिकडील उन्हाळ्याची ( म्हणजे आपल्या इकडल्या हिंवाळ्यासारखी ) व म्हणून उघड्यावर फिरण्याला व जलविहाराला सुखकर असल्यामुळें हजारों लोक या दिवसांत, विशेषतः रविवारीं, लंडनबाहेर दूरदूरच्या दृश्यदर्शनास जातात व म्हणून सर्व बेटें व सर्व नदी मनुष्यांनीं फुललेली दिसत होती.

**क्युबागेच्या** धक्क्यापासून डाव्या हातास ती बाग व पुढें **रिचमंड-पार्क** कितीतरी वेळ सारखी लागत राहते. येथला टेम्सनदीचा देखावा खरोखरी अवर्णनीय आहे; प्रत्यक्ष पाहिल्यावांचून त्याची कल्पना करतां यावयाची नाहीं. पुढें सुंदर **रिचमंडपूल** लागला. क्युपुलापासून नदी पूर्व-पश्चिम वळणें घेत पण सारखी दक्षिणेकडेस जाते व मग टेम्सनदीमधलें पहिलेंच **टेडिंगटन** जलकुलूप लागतें. येथें सखल असें नदीला धरण असल्यामुळें येथें पाण्याची पातळी उंचसखल होते. नदीच्या डाव्या किनाऱ्याच्या धक्क्याजवळ एक आगबोट राहील इतक्या अंतरावर दुसरी समांतर भिंत बांधली आहे. हा धक्का व भिंत यांना एक आगबोट लांबच्या लांब आंत राहील इतक्या अंतरावर दोन मोठमोठे उघडझापी लाकडी दरवाजे केलेले आहेत. आमची आगबोट अलीकडच्या खुल्या दरवाजानें आंत आल्यावरोबर तो दरवाजा बंद करण्यांत आला व वरचा दरवाजा उघडण्यांत आला. त्याबरोबर त्या ठिकाणीं पाण्याचा वरून प्रवाह सुरू होऊन आमची आगबोट वरवर येऊं लागली. ती नदीच्या वरच्या पाण्याच्या पातळीला आल्याबरोबर ती जलकुलुपांतून बाहेर खुल्या प्रवाहांत घेऊन पुनः चालू झाली. पुढें थोड्या वेळानें **हॅम्पटन** कोर्ट राजवाड्याच्या नजीकच्या लाकडी धक्क्याशीं आमची बोट लागली तोंच दोन वाजले व आम्ही मोठ्या आनंदानें जमिनीवर उतरलों.

आगबोटीवर असतांना आमचें लक्ष सभोंवारची सुंदर शोभा पहाण्यांत इतकें गढून गेलें होतें कीं बोटीवर फराळाची सोय असतांना आमचे मनांत तेथें फराळ करावयाचें आलें नाहीं. पण जमिनीवर उतरल्याबरोबर पोटोबाची आठवण झाली. "**आधीं पोटोबा मग विठोबा**" या म्हणीप्रमाणें आम्हीं फराळ करून येऊन मग राजवाडा पाहण्याचा बेत केला. "प्रसादचिन्हानि पुरःफलानि" याप्रमाणें आम्हांला प्रथमतः चहापानगृह लागलें. हें राजवाड्याच्या मागच्या बाजूच्या दरवाजाला लागून पण बाहेरच्या बाजूला एक सोपा होता त्यांत होतें. सोपा लांब व प्रशस्त असून पुढच्या बाजूस खुल्या कमा-

नीच कमानी होत्या. पुढें मोकळी जागा असून त्यांत सुंदर बाग होती. चहापानगृहाला केशरी रंग दिलेला होता; व तेथलें एकंदर सामान व सेविकांचा पोशाख दरबारी थाटाचा होता. प्रख्यात राजवाड्याच्या लगतचें चहापानगृह शोभेल अशा तऱ्हेची तेथली व्यवस्था, टापटीप व स्वच्छता पाहून मनाला फार आनंद झाला. मोठ्या प्रमुदित मनानें आम्हीं फराळ केला. त्याला दर माणशीं तीन शिलिंग व तीन पेन्स बक्षिसी मिळून सवातीन शिलिंग पडले.

चहापानगृह असलेल्या बाहेरच्या भागांतून आम्ही राजवाड्याच्या प्रवेशद्वाराशीं आलों. किल्ल्यासारखे दोन्ही बाजूंस उंच उंच बुरूज असलेलें कमानदार रुंद पण कमी उंच द्वार व त्यावरील मोठमोठ्या खिडक्या व शेवटीं कमानीवर उभारलेला मनोरा हा देखावा भव्य वाटला. प्रवेशद्वारांतून आंत गेलों तों केवढा तरी विस्तीर्ण चौक दृष्टीस पडला. या विस्तीर्ण चौकाला '**ग्रीन कोर्ट**' म्हणतात. चौकाच्या चारी बाजूंस कमानीच कमानी असून खुले सोपेच सोपे आहेत. त्यांतून दुसऱ्या चोकांत शिरलों तोहि असाच विस्तीर्ण चोक आहे. त्याला '**घड्याळ चोक**' म्हणतात. येथें **आठव्या हेनरी** राजाच्या वेळचें ज्योतिषेय घड्याळ आहे. यामध्यें वर्षाचे दिवस, बारा राशी, चंद्राच्या रोजच्या कला, व रोजची वेळ वगैरे सर्व एकदम व एकत्र दाखविण्याची कौशल्यानें व्यवस्था केली आहे. हें जुनें घड्याळ फार आश्चर्यकारक आहे. हा दुसरा चोक टाकून आम्ही तिसऱ्या चौकांत गेलों. हा पहिल्या दोन्ही चौकांपेक्षांहि अधिक विस्तीर्ण आहे. हा प्रचंड चौक तिसऱ्या विलियम राजानें बांधविला. या चौकांत कारंजींच कारंजीं केलेलीं आहेत. फ्रान्सच्या राजांचा **व्हरसेलस** येथें जो प्रचंड राजवाडा आहे त्याचे नमुन्यावर हा चोक व हीं कारंजीं वुलियम राजानें बांधविलीं. हा वाडा विटांचा बांधलेला आहे. इतक्या काळानंतर विटांना काळसर जुनाटपणा आल्यामुळें एकंदर राजवाड्याचें दृश्य आपल्या इकडील जुन्या राजवाड्याप्रमाणें वाटतें. नंतर आम्ही एका रुंद जिन्यानें वरच्या मजल्यावर



नं. १९ हँपटन कोर्ट राजवाड्याच्या आवारांतील जुनाट द्राक्षवेल पान १७५



लंडन : हॅम्पटन कोर्ट राजवाड्याच्या बागेतील मेरी राणीचा वृक्षमंडप

नं. २०

पान १७५

गेलों. तेथें दालनांवर दालनें, खोल्यांवर खोल्या सारख्या लागत होत्या. प्रत्येक दालनांत व खोलींत भिंतींवर चित्रें टांगलेलीं होतीं; तसेंच पुष्कळ भिंतींवर निरनिराळ्या प्रसंगांचीं रंगीत चित्रें काढलेलीं होतीं; वरच्या लाकडी तक्तपोशीवरहि तेल्या रंगानें नक्षीकाम व चित्रपट काढलेले होते. पुष्कळ खोल्यांत राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांचे बिछाने, बसावयाच्या खुर्च्या, आरसे, इतर सामान आणि पोशाख, अशीं नानाविध स्मारकें व्यवस्थेनें मांडून ठेवलेलीं होतीं. कित्येक दालनांत सबंद भिंतीच्या आकाराचे नानारंगी लोकर, रेशीम व सूत यांनीं विणलेल्या सुंदर चित्रांनीं युक्त असे गालिचे ( Tapestry ) लटकविलेले होते; सारांश, राजवाड्याचीं सर्व दालनें जणूं कांहीं त्या त्या काळच्या वस्तूंचीं पदार्थसंग्रहालयें होतीं. राजवाडा एवढा मोठा कीं, दालनें संपतां संपेनात. निरनिराळ्या दालनांना बाहेरच्या बाजूला खिडक्या होत्या; त्यांमधून राजवाड्यासभोंवारच्या बगिच्यांची विविधरूप शोभा दिसत होती. शेवटीं आम्हीं एकदांचे वाड्याचे बाहेर पडलों व राजवाड्याच्या आवारांतील इंग्लिश राजांच्या खासगी व सखल बागांत हिंडलों. तेथें नानारंगी फुलझाडें, नाना आकार दिलेल्या वेली व झुडपें होतीं व सर्व बागेंतून स्वच्छ अशा छोट्या पायवाटा होत्या; मध्यें मध्यें लहान लहान पुष्करणी होत्या. याच बागेंत एक प्रचंड द्राक्षाचा वेल आहे. हा द्राक्षवेल सन १७६८ मध्यें लावलेला आहे. या वेलाचा वेढ चार फूट असून याची मुख्य खांदी ११४ फूट लांब आहे. येवढा प्रचंड द्राक्षाचा वेल युरोपामध्यें दुसऱ्या कोठेंहि नाहीं. याला दोन हजार द्राक्षांचे घड येतात! येथें प्रत्यक्ष राजवाड्याचें दृश्य संपतें. पण या राजवाड्यासभोंवतीं विशेषतः समोर केवढें तरी मोठें उपवन आहे. आधीं राजवाड्यासमोर घुमटासारखीं व एकसारखीं कापलेलीं मोठमोठीं झाडें सारख्या हारीनें लावलेलीं आहेत; त्यांची विलक्षण शोभा दिसते. पुढें ब्रॉडवॉक म्हणून एक अर्ध्या मैलाचा सरळ व रुंद रस्ता आहे; त्याचे दोन्हीं बाजूंस गर्द छायेचे प्रचंड वृक्ष लावलेले आहेत; व मधून मधून

फुलांनीं फुललेलं फुलझाडांचे ताटवेच्या ताटवे लावलेले आहेत. हा ब्रॉड-वॉक फारच चित्ताकर्षक आहे. या उपवनाच्या एका बाजूस २०० फूट लांब व चवदा फूट उंचीचा वृक्षमंडप आहे. हे वृक्ष मोठे असून त्यांच्या दाट छायेच्या खांद्या वळवून कमानी बनविल्या आहेत. जणूं कांहीं वृक्षांनीं हा एक बोगदाच तयार केला आहे. हीं झाडें फार जवळ जवळ लावलेलीं आहेत. यामुळें केव्हांहि उन्हाचा कवडासा येणें शक्य नाहीं. या उपवनांतील आणखी एक आश्चर्यकारक देखावा म्हणजे लांब कालवा हाय. हा कालवा पाऊण मैल लांब व दीडशें फूट रुंद आहे. यांत नानारंगीं पाणवेली, पाणवृक्ष व कमळें आहेत. खरोखरी हा कालवा विलक्षण आकर्षक वाटतो.

पण या राजवाड्याच्या उपवनांतील सर्वांत नवलाची गोष्ट म्हणजे सिंहदरवाजा नांवाच्या राजवाड्याच्या खुष्कीच्या रस्त्याकडील दरवाजानजीक असलेला ‘ चक्रव्यूह ’ होय. मी चक्रव्यूह हा शब्द ‘ **चक्रव्यूह रचिला द्रोणांनीं** ’ या बायकांच्या गाण्यामध्यें लहानपणीं ऐकला होता व महाभारताच्या गोष्टीमध्यें तो येतो. पण अशा प्रकारचा वृक्षांचा चक्रव्यूह हिंदुस्थानांत कधीं पाहिला नव्हता व ऐकला नव्हता. तेव्हां अशा चक्रव्यूहाची विलक्षण मौज वाटावी यांत काय आश्चर्य ! या चक्रव्यूहानें सारी एक एकर जागा व्यापिली आहे पण त्याच्या आंतली एकंदर पाऊलवाट अर्ध्या मैलाची आहे. या चक्रव्यूहाला इंग्रजींत Maze म्हणतात. हा चक्रव्यूह सात आठ फूट वाढणाऱ्या बिन फांद्यांच्या पण दाट पानांच्या सदापानी हॉर्नबीम, हॉले वगैरे झुडुपांच्या कुंपणानें बनविला आहे. या चक्रव्यूहाचे मधोमध जाण्याची खुबी अशी कीं आंत शिरल्यावर सारखें डाव्या हाताकडेस वाट वळत जाते; तसें सारखें डाव्या हातास जावें; पण जेव्हां प्रथमच डावीकडे व उजवीकडे वाटा फुटतात त्या पहिल्या व दुसऱ्या वेळीं मात्र उजव्या हाताकडे वळावें म्हणजे मनुष्य चक्रव्यूहाचे मधोमध जातो; नाहींतर तो सारखा घाण्याच्या बैलासारखा चक्रव्यूहांत गुरफटलेला राहतो व चालतां चालतां दमून जातो. परत येतांना किती वांकणें

आहेत याचा बरोबर आंकडा ध्यानांत ठेवला नाहीं तर शेवटच्चीं दोन उजवीं डावीं वळणें कोणचीं हें ध्यानांत येत नाहीं; मग मनुष्य परत चक्रव्यूहांत सांपडतो. मार्गदर्शक पुस्तकावरून चक्रव्यूहाच्या या खुब्या ध्यानांत धरल्यामुळें आम्ही चक्रव्यूहाचें आंत जाऊन न चुकतां परत बाहेर आलों व चक्रव्यूहाच्या कौशल्याच्या रचनेचें कौतुक करीत सिंह-दरवाजांतून बाहेर पडलों व लवकरच **बसच्या** थांबण्याच्या ठिकाणीं आलों. चारपांच तासांच्या मनोवेधक देखाव्याचें चिंतन करीत करीत आम्ही **बसमध्यें** बसलों व रात्रींच्या जेवणास बिन्हार्डी परत आलों.

या हॅम्पटन कोर्ट राजवाड्याची आम्हांला राहून राहून आठवण होत होती. विचार करतां हें प्रेक्षणीय ठिकाण अद्वितीय आहे असें मनाला वाटलें आणि हें **टेम्स** नदीवरील सुंदर स्थळ पसंत करणारा व तेथें सुंदर वाडा बांधणारा गृहस्थ एक हौशी, हुषार, सुसंस्कृत व राजकीय व धार्मिक अशी दुहेरी सत्ता हातांत असल्यामुळें पाण्यासारखा पैसा खर्च करण्यास समर्थ असा ब्रह्मचारी धर्माधिकारी होता हें पाहून तर जास्तच नवल वाटलें. आपल्या हौशीप्रमाणें हें स्थळ निर्माण केल्यावर तें त्यानें विलासप्रिय व सामर्थ्यवान् अशा इंग्लिश राजाला बाक्षिस दिलें व तेव्हांपासून इंग्लिश राजवंशानें त्याची वेळोवेळीं आपल्या हौशीप्रमाणें वाढ केली. अशा तऱ्हेचें स्थळ एक अद्वितीय दृश्यदर्शन बनावें यांत काय नवल?

झालें. माझें जें यथाप्रकाश लंडनाचें दृश्यदर्शन घडलें त्याचें यथा-मति वर्णन मीं गेल्या चार लेखांत केलें. तेव्हां येथें माझ्या यात्रा-वर्णनाचें लंडनखंड आटपलें.

# प्रकरण ११ वें

## ऑक्सफर्ड

हल्लीं विलायतेंत एकंदर वीस विद्यापीठं आहेत. तीं सर्व प्रत्यक्ष पाहून तेथल्या विद्येच्या अध्ययनाध्यापनाचें व शास्त्राच्या संशोधनसंवर्धनाचें कार्य कसें चाललें आहे, याची समक्ष माहिती मिळवून सविस्तर वर्णन करणें हें एका स्वतंत्र साहामाही सफरीचें काम आहे. मी ज्या वाङ्मयीन कामाकरितां विलायतेस गेलों व तेथें आठ महिने राहिलों तें काम संभाळून सर्व विद्यापीठांच्या निरीक्षणाचें काम करणें मला शक्य नव्हतें. पण 'भाताची परीक्षा शितावरून' या न्यायानें विलायतेंतील दोन विद्यापीठांचें प्रत्यक्ष अवलोकन करून मी जी माहिती मिळविली ती वाचकांस सादर करणार आहें. हीं दोन विलायतेंतलीं विद्यापीठें फार पुरातन असून त्यांची सर्व जगभर प्रख्याति आहे. शिवाय, आमच्या आंग्लविद्याविभूषितांना त्यांचा श्रुतिपरिचय पुष्कळ दिवसांचा आहे. हीं चिरपरिचित विद्यापीठें ऑक्सफर्ड व केंब्रिज या शहरांतील होत. या दोन शहरांमधलें साधर्म्यवैधर्म्य आश्चर्यकारक आहे व त्याचें प्रथमतः निरूपण करूं.

ऑक्सफर्ड शहर लंडनच्या वायव्य दिशेस आहे; तर केंब्रिज उत्तर दिशेस आहे; ऑक्सफर्ड ग्रेट वेस्टर्न रेलवे (G. W. R.) रस्त्यावर असून लंडनपासून त्रेसष्ट मैल दूर आहे; तर केंब्रिज लंडन नॉर्थ ईस्टर्न रेलवे रस्त्यावर (L. N. E. R.) असून पंचावन मैल दूर आहे; ऑक्सफर्ड टेम्स व चेरवेल या दोन नद्यांच्या दुबेळक्यांत वसलेलें आहे; तर केंब्रिज हें कॅम नदीच्या कांठावर वसलेलें आहे; ऑक्सफर्डची लोकसंख्या अठ्ठावन हजार आहे; तर केंब्रिजची लोकसंख्या साठ हजार आहे. पण दोन्ही विद्यापीठांचा उदय तेराव्या शतकांत झाला; दोन्हींची वाढ सारखी आज-


तागाईत चालू आहे; दोन्ही विद्यापीठांनीं इंग्लंडाला प्रख्यात पुरुष पुरविले आहेत; दोन्ही विद्यापीठांच्या अंमलाखालीं सुमारें सारखींच म्हणजे पंचवीस विद्यालयें चालू आहेत; दोन्हींमध्यें स्त्रियांकरितां स्वतंत्र दोन दोन विद्यालयें आहेत; दोन्ही विद्यापीठांना इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींतील सन १५७१ च्या एकाच कायद्यानें समान हक्क व समान संमति दिली आहे.

हिंदुस्थानांतील माझ्या एका स्नेह्याच्या मुलाला ऑक्सफर्ड विद्यापीठामध्यें पुढील अभ्यासाकरितां प्रवेश व पहिल्या वर्षाच्या परीक्षेची माफी पाहिजे होती व त्या करितां ऑक्सफर्ड मधील इंडियन इन्स्टिटयूटच्या मुख्याला समक्ष भेटून परवानगी मिळविण्याबद्दल खटपट करण्याविषयीं माझ्या मित्राकडून मला लिहून आलें होतें. मी त्या गृहस्थांना ( त्याचें नांव व पत्ता माझ्या मित्राच्या पत्रांत होता ) पत्र लिहून भेटण्याची वेळ व दिवस कळविण्याबद्दल विनविलें होतें; त्याप्रमाणें ता. १२ मार्च १९३० रोजीं ११॥ ला भेटावें असें त्यांचेकडून उत्तर आलें होतें; तेव्हां हें मित्राचें काम व ऑक्सफर्डचें दृश्यदर्शन एकदम करून टाकावें म्हणून मी सदर दिवशीं सकाळीं न्याहारी करून ग्रेट वेस्टर्न रेल्वेच्या पॅडिंग्टन स्टेशनला आलों व ऑक्सफर्डच्या **नथांबत्या** ( non-stop ) पावणेदहाच्या आगगाडींत तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत बसलों. एका दिवसाच्या जातांयेतांच्या परत तिकिटाचें भाडें ८ शिलिंग पडलें. या आगगाड्यांना पहिला व तिसरा असे दोनच वर्ग असतात. पण तिसऱ्या वर्गाची बसण्याची सोय आपल्या इकडच्या दुसऱ्या वर्गाच्या इतकी चांगली असते; हल्लीं डेक्कन क्वीनच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यांची जशी व्यवस्था असते, तशी व्यवस्था या आगगाड्यांतून असते.


माझी गाडी बरोबर पावणेदहाला सुटली व भर वस्तीच्या लंडनमधून आम्ही भराभर जाऊं लागलों. स्टेशनामागून स्टेशनें लागत; पण गाडी **नथांबती** असल्यामुळें स्टेशनचीं नांवेंसुद्धां गाडीच्या वेगामुळें वाचावयास सांपडत नव्हतीं. पुढें हिरवीं हिरवीं शेतें व मैदानें लागूं लागलीं.

कांहीं शेतांत लांबच लांब कांचगृहें दिसलीं. तीं भर थंडींत सुद्धां भाज्याचीं पिकें करतां यावीं म्हणून केलेलीं असतात असें कळलें. सुमारें पाऊण तास याप्रमाणें गाडी चालल्यावर रीडींग गांव लागलें व जिकडे-तिकडे हंटले आणि पामर्स बिस्कीट फॅक्टरीच्या प्रचंड पाट्या दिसूं लागल्या. गाडी चालूच होती पण या भागांतून जातांना जरा वेग कमी केलेला असल्यामुळें व पाट्या फारच मोठ्या अक्षरांच्या असल्या-मुळें त्या सहज वाचतां येत होत्या. ज्या गांवच्या बिस्कीटांनीं हिंदु-स्थानांतील पुराणाभिमानी हिंदू भटजीच्या घरांतहि प्रवेश केला आहे त्या गांवचा मुख्य व्यवसाय बिस्कीटें करण्याचा आहे असें धांवत्या गाडींतून जातांनासुद्धां माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें; व त्यावेळीं आमच्या विद्यार्थि-दशेंतील एका थट्टामस्करीची मला आठवण झाली. एका खेडेगांवांतून नुकतेच डेक्कन कॉलेजांत आलेले साधेभोळे तरुण विद्यार्थी होते. त्यांना एका शहरांत राहून निर्ढावलेल्या विद्यार्थ्यानें हंटले आणि पामर्सचा Reading Biscuitsचा उत्तम डबा आणून दिला व त्याला म्हटलें "हीं पहा वाचतांना खावयाचीं बिस्किटें; हा डबा घ्या; रोज तुम्हीं आम्हीं बरोबर वाचतांना खात जाऊं." त्या तरुणानें आश्चर्यानें विचारलें "काय वाचतांना खावयाचीं स्वतंत्र व खास बिस्कीटें असतात? काय तरी आश्चर्य!" बिस्कीटांचा डबा आणणारा विद्यार्थी म्हणाला, "हो, स्वतंत्र व खास बिस्कीटं असतात." असें म्हणून त्यानें डब्यावरील Reading Biscuits असें नांव दाखविलें. त्या तरुणाला ती गोष्ट पटली व त्यानें तो डबा विकत घेतला. ही पूर्वकाळची थट्टामस्करीची स्मृति मनापुढें येत आहे तोंच रीडिंग गांव टाकून आमची गाडी भराभर पुढें चालली व थोड्याच वेळानें म्हणजे बरोबर अकरा वाजून आठ मिनिटांनीं मी ऑक्सफर्ड स्टेशनला येऊन पोहोंचलों.

माझ्याजवळ कांहीं सामान नव्हतें; फक्त ऑक्सफर्डचें एक नकाशा-सहित मार्गदर्शक पुस्तक कोटाच्या खिशांत होतें व त्यांतील नकाशाच्या मदतीनें मला ऑक्सफर्ड पहावें लागलें. कारण दुसऱ्याच्या भरंवशावर



नं. २१ ऑक्सफर्ड-बॉडालियन पुस्तकालय पान १८१



नं. २२ ऑक्सफर्ड-रॅटक्लिफ कॅमेरा [वाचनगृह] पान १८१.

विसंबून त्याच्या मित्राला मला स्टेशनवर येऊन भेटण्याच्या केलेल्या तजवीजीची लावी पक्षीण आणि तिचीं पिलें या इसाबनीतीतील गोष्टी-प्रमाणेंच स्थिति झाली. कां कीं, मला स्टेशनवर कोणीहि येऊन भेटलें नाहीं.

आधीं इंडियन इन्स्टिटयूटच्या सेक्रेटरीला भेटण्याचें काम उरकून मग दृश्यदर्शनाच्या नादाला लागावयाचें असें मीं मनाशीं ठरविलें व स्टेशनच्या बाहेर पडलों व उजव्या हाताच्या मोठ्या प्रशस्त रस्त्यानें चालूं लागलों तोंच दुसरें एक मोठें स्टेशन लागलें. तें एल्. एम्. एस्. आर.(लंडन मिडलंड स्कॉटिश रेल्वे ) रेलवेचें स्टेशन होतें. तें स्टेशन डाव्या बाजूस टाकून पुढें गेलों तों दोन रस्ते लागले. तेथें इंडियन इन्स्टिटयूटच्या ठिकाणाची एका वाटेनें जाणाऱ्याजवळ चवकशी केली. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं "डाव्या हाताच्या रस्त्याला वळून जॉर्ज स्ट्रीटनें थेट समोर जा म्हणजे ब्रॉडस्ट्रीट लागेल; त्याच्या डाव्या बाजूस खूप मोठमोठ्या इमारती लागतील; त्या बॉडलीयन वाचनालयाच्या इमारती होत. त्या टाकून पलीकडे गेल्यावर उजव्या हातालाच आडव्या रस्त्याचे कोपऱ्यावर लहानशी इमारत लागेल ती इंडियन इन्टिटयूटची इमारत." ही माहिती सांगितल्याबद्दल मी त्या गृहस्थाचे आभार मानून डाव्या हाताला वळलों व मीं मनांत म्हटलें "देवाजवळ एक डोळा मागतां त्यानें दोन दिल्यागतच झालें. ऑक्सफर्डचे प्रसिद्ध वाचनालयानजीक ही वाट जाते; काम संपल्याबरोबर प्रथम वाचनालय पाहूं."

त्या गृहस्थानें सांगितलेला जॉर्ज स्ट्रीट प्रशस्त आहे. दोन्ही बाजूंस नानापद्धतीच्या दगडी इमारतीं व प्रार्थनामंदिरें लागलीं. पुढें फारच मोठा चौक लागला. येथून डाव्या उजव्या बाजूस फारच भव्य व सुंदर इमारती व शोभायमान असे प्रशस्त रस्ते दृष्टीस पडले व समोरचा रस्ता नांवा-प्रमाणें खूपच रुंद दिसला. त्या **ब्रॉडस्ट्रीटच्या** शेवटीं आलों व उजव्या बाजूच्या प्रचंड इमारती वाचनालयाच्या असें न विचारतांच समजलें. पुढच्या रस्त्याच्या कोपऱ्यावर इंडियन इन्स्टिटयूटची इमारत होती तींत

शिरून सेक्रेटरीला भेटून माझ्या मित्राचें पत्र दाखविलें. त्यानें सहानुभूतिपूर्वक माझें म्हणणें ऐकून घेतलें व मित्राच्या मुलाच्या प्रवेशाबाबत "मला करतां येईल जितकें मी करतों व त्याप्रमाणें तुम्ही आपल्या मित्राला पत्र लिहा" असें सेक्रेटरींनीं सांगितलें. झालें; माझें काम पांच मिनिटांत आटोपलें व मी बाहेर पडून बॉडलीयन वाचनालयाच्या आवारांत आलों.

बॉडलीयन वाचनालय हें ऑक्सफर्डमधलें फार जुन्यापैकीं एक पुस्तकालय आहे. त्याचा प्रारंभ सन १३२० मध्यें बिशप **कॉबहॅम** यानें विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांकरितां सेंट मेरीच्या प्रार्थनामंदिराशेजारीं लहानशी खोली बांधून केला. तेथें पुस्तकसंग्रह हळूहळू वाढत गेला. पण प्रॉटेस्टंट धर्माच्या प्रसारानंतर सहाव्या एडवर्डच्या कारकिर्दींत या पुस्तकालयाची बरीच नासाडी करण्यांत आली व पुस्तकालय नामशेष झालें. पण १६०२ मध्यें **टॉमस बॉडले** या **मॅगडेलेन** कॉलेजच्या तरुण गृहस्थानें या विद्यापीठाच्या पुस्तकालयाचा जीर्णोद्धार करावयाचा निश्चय करून जन्मभर त्याबद्दल खटपट केली व म्हणून या पुस्तकालयाला **बॉडलीयन** पुस्तकालय असें अन्वर्थक नांव मिळालें. प्रत्येक छापलेलें पुस्तक मोफत मिळण्याची सवलत पुस्तकालयास मिळाली. पुढें या पुस्तकालयाला पांच पंचवीस लोकांनीं पुस्तकसंग्रहद्वारां व पैशाच्या रूपानें मदत केली. पुढें जेव्हां कॉपीराईट कायदा अस्तित्वांत आला तेव्हांपासून ब्रिटिश बेटांतील एकंदर सहा पुस्तकालयांना मोफत प्रति मिळण्याचा हक्क कायद्यानें दिला. तीं सहा पुस्तकालयें म्हणजे ऑक्सफर्डचें बॉडलीयन पुस्तकालय, ब्रिटिश पदार्थसंग्रहालय, कॅंब्रिज विद्यापीठ पुस्तकालय व स्कॉटलंड वेल्स व आयर्लंड येथील राष्ट्रीय विद्यापीठांचीं पुस्तकालयें होत.

या पुस्तकालयाची वाढ पुष्कळ शतकांपासून सुरू असल्यामुळें या पुस्तकालयाकरितां जवळजवळ असलेल्या पुष्कळ इमारती वेळोवेळीं बांधाव्या लागल्या व यांमुळें येथें जुन्या नव्या बांधकलेची खिचडी

झालेली आहे. पुस्तकालयाशेजारीं संशोधन व अभ्यास करणाऱ्या लोकांकरितां स्वतंत्र वाटोळी व फारच सुंदर घुमटाकार नवीन इमारत बांधण्यांत आली आहे. तिला **रॅडक्लिफ** नांवाच्या डॉक्टरनें चाळीस हजार पौंड दिलें. तिला **रॅडक्लिफ कॅमेरा** म्हणतात. येथेंच वाचनालय पहावयाचें तिकीट मिळतें व इमारतीच्या घुमटावरच्या गॅलरीवरून सर्व शहराचा उत्तम देखावा दिसतो. इतकेंच नाहीं तर, बहुतेक सर्व कॉलेजांच्या इमारतींचे घुमट व शिखरें तरी दिसतात असें पोर्टरनें सांगितलें व दोन पेन्साचा एक नकाशा विकत घेण्यास सुचविलें; व त्याप्रमाणें मीं तो घेतला. हा चित्रमय नकाशा होता. होकायंत्राच्या तबकडीवर ज्याप्रमाणें दिशा दाखविलेल्या असतात, त्याप्रमाणें या नकाशांत एकंदर सोळा टांचणीसारख्या टोकांनीं निरनिराळ्या दिशेकडील कॉलेजांच्या इमारतींचीं छोटीं चित्रें दाखविलेलीं होतीं. जिन्याचें गॅलरीचें वरचें प्रवेशद्वार दाखविलेलें होतें. त्यायोगें जिन्यानें वर चढून गेलें व नकाशा हातांत धरला; व गॅलरीचे सभोंवार एकदां फिरलें कीं ऑक्सफर्डमधलीं बहुतेक सर्व कॉलेजें व सार्वजनिक इमारती यांचें एकसमयावच्छेदें करून व दुसऱ्याच्या मदतीवांचून दर्शन घडतें. खरोखरीं या नकाशाच्या साहाय्यानें सर्व कॉलेजचें मला ओझरतें दर्शन घेतां आलें. व नकाशाच्या सोयीचें व साहाय्याचें आश्चर्य वाटलें. त्या गॅलरीभोंवतीं मी दोन फेऱ्या घातल्या व ऑक्सफर्ड शहराच्या एकंदर शोभेचें अवलोकन केलें व मग खालीं आलों व बॉडलीयन पुस्तकालयाच्या प्रचंडतेचें आश्चर्य करीत इमारतींतून हिंडलों व मग बाहेर पडलों.

रॅडक्लीफ चौकासमोर सेंट मेरीचें प्रार्थनामंदिर आहे. या मंदिराचें प्रवेशद्वार फार सुंदर आहे; ती प्रमाणशीर कमान; ते पीळदार दगडी खांब; कमानीवरील कुमारी मेरी व तिचें मूल यांची ती सुंदर जोडमूर्ति; त्या उंच उंच कमानदार नक्षीच्या खिडक्या; तो लांबचलांब नक्षीदार गलथा; मधूनमधून उभारलेले काटेरी खोदकामाचे अणकुचीदार छोटे मनोरे व शेवटीं तो लहानलहान नक्षीदार मनोऱ्यांनीं सुशोभित केलेला

मधला गगनचुंबी व चिंचोळा होतहोत अगदीं टांचणीच्या अग्रासारखा दिसणारा उंचचउंच गेलेला मुख्य मनोरा; हे सर्वच भाग पहाणाराला आश्चर्यचकित करतात यांत शंका नाहीं. हें प्रार्थनामंदिर ऑक्सफर्ड विद्यापीठाचें मूळचें व पहिलें प्रार्थनामंदिर होय. कॉलेजाची स्थापना होण्यापूर्वी याच्या आसपास विद्यार्थी रहात. पुढें ज्याला **बॉडलीयन** पुस्तकालय नांव मिळालें तें विद्यापीठाचें पुस्तकालय येथें होतें. या दृष्टीनें ऑक्सफर्ड विद्यापीठाचा हा भाग म्हणजे गाभा होता. या प्रार्थनामंदिराचे उजव्या हाताला व **कॅथराईन** रस्त्याला लागून **ऑलसोल्स कॉलेजची** भव्य इमारत आहे. प्रार्थनामंदिराच्या पद्धतीचेंच या कॉलेजचें बांधकाम आहे व तें फार प्रेक्षणीय आहे. हें कॉलेज पंधराव्या शतकांत स्थापन झालेलें असून तें विशेषतः पदवीनंतरच्या शिक्षणाकरितां प्रसिद्ध आहे. डेक्कन कॉलेजांत माझ्या विद्यार्थीदशेंत नवे आलेले प्रो. बेन यांचे तोंडून **ऑलसोल्स कॉलेजची** वाखाणणी मी ऐकत असें तिची मला आठवण झाली. बेनसाहेब डेक्कन कॉलेजच्या इमारतीला भिकार बराकी-वजा इमारत म्हणत तें **ऑलसोल्स कॉलेज** पाहून माझ्या मनाला पटलें. खरोखरींच ऑक्सफर्ड व केंब्रिज येथील विद्यापीठांतील कॉलेजांत शिकून आलेल्या पदवीधरांना हिंदुस्थानांतील संस्था सर्व तऱ्हेनें कमी दर्जाच्या वाटाव्या यांत नवल नाहीं. सुंदर सुंदर व प्रचंड इमारती, त्यासभोंवार हिरव्यागार बागा व उपवनें, प्रचंड पुस्तकालयें इत्यादि सोयी होण्याजोगीं उत्पन्नें व देणग्या कॉलेज स्थापन करणारांनीं व त्या मागून येणाऱ्या उदार दात्यांनीं तिकडील विद्यापीठांना व विद्यालयांना दिल्या-मुळें तिकडील संस्था उत्तम दर्जाच्या झालेल्या आहेत. त्या मानानें आमच्या इकडील संस्था म्हणजे कःपदार्थ आहेत हें खोटें नाहीं.

मागें उल्लेख केल्याप्रमाणें ऑक्सफर्ड शहरीं मी एकटाच गेलों होतों व नकाशाच्या साह्यानें व वाटेनें भेटणाराजवळ तोंडी चवकशी करीत करीत तें शहर पाहिल्यामुळें थोडा वेळ जास्त लागला व दृश्यदर्शन आपाततः जसें झालें तसें झालें. एकटा फिरतांना ऑक्सफर्ड दृश्यदर्श-

नाची एक अडचण, मला अशी भासली कीं, येथल्या कॉलेजच्या इमारतीवर किंवा इतर सार्वजनिक इमारतींवर नांवाच्या पाट्या किंवा नांवाचीं अक्षरें खोदण्याची मुळींच रीत दिसली नाहीं. यामुळें मोठीशी इमारत दिसली म्हणजे आंत शिरून " ही काय इमारत आहे व ती पाहूं काय" असें द्वारपालाला विचारावें लागत असे.

**ऑलसोल्स** कॉलेज पाहिल्यावर मी नकाशाकडे पाहिलें तों मी **कॅथराईन** रस्त्यावर आहें व तो रस्ता थेट उत्तरेकडे जात आहे असें दिसलें. तेव्हां त्या रस्त्यानेंच मी चाललों; आपल्या इकडे बाजारपेठेंत दुकानालादुकान लागून जशी दुकानांची रांग लागते तशीच इकडे कॉलेजाला लागून कॉलेजें दृष्टोत्पत्तीस येतात. कारण लांबचलांब असलेली **ऑलसोल्स** कॉलेजची इमारत संपते तोंच **हर्टफर्ड कॉलेज** लागतें. पण आतां प्रत्येक कॉलेज पहाणें शक्य नाहीं, असें मनांत आणून मी तसाच पुढें गेलों. मी इंडियन इन्स्टिट्यूटवरून समोर **पार्कस** रस्त्याला लागलों तो एक छोटेसें टुमदार कॉलेज लागलें. ते **वार्डम कॉलेज** होतें. माझे डेक्कन कॉलेजांतील गुरु प्रो. सेल्बीसाहेब या कॉलेजचे होते याची मला आठवण झाली, म्हणून या कॉलेजांत जरा शिरून त्याची छोटी व सुबक इमारत पाहून मी पुढें गेलों तों रस्त्याच्या दोन्ही बाजूंस बागाच बागा लागल्या. स्टेशनपासून मी सारखा इमारतींनीं गच्च भरलेल्या रस्त्यांनीं चालल्यामुळें या ठिकाणीं आल्यावर मनाला जरा खुलास वाटलें व या विस्तीर्ण बागा पाहून मनाला फार आनंद वाटला. बरेंच चालून गेल्यावर उजव्या हातास पुनः पुष्कळ इमारती लागल्या. ऑक्सफर्ड विद्यापीठाचें पदार्थसंग्रहालय व निरनिराळ्या शास्त्रांचीं प्रयोगालयें या आवारांत असून पलीकडे विद्यापीठाचें विस्तीर्ण उपवन आहे. पण हें पहाण्यास वेळ नाहीं म्हणून **केबल कॉलेज** डाव्या हातास टाकून मी **केबल** रस्त्यानें पश्चिमेकडे वळलों. त्या रस्त्याच्या समोर **सेंटजाईल्स** प्रार्थनामंदिर आहे. हें प्रेक्षणीय आहे. येथून रस्ता थेट दक्षिणेकडे **टेम्सनदी**पर्यंत जातो. तेव्हां त्या रस्त्यानें मी परत

फिरलों, तों एक स्मशानवाटिका लागली व त्याचेपुढें दोन मधल्या तिकोनी तुकड्यांवर सन १९१४–१८ च्या महायुद्धाचें कोरें करकरीत दिसणारें स्मारक दृष्टीस पडलें. तिकोनी जागेभोंवतीं लहान खांबाचें व एकेरी लोखंडी दोरखंडाचें सुंदर कुंपण केलें आहे व तिकोनी तुकड्याच्या मधोमध अष्टपैलू चबुतरा बांधला असून त्याला सभोंवार सहा-सहा पायऱ्यांची रांग बांधली आहे व चबुतऱ्यावर सुमारें वीस फूट उंचीचा शुभ्र दगडाचा खांब बसविला आहे व खांबावर ख्रिश्चनधर्माचा निदर्शक क्रॉस ( चवकाटणें ) बसविलें आहे. एकंदर काम वाखाणण्याजोगें आहे. हें स्मारक टाकून बरेंच चालून आल्यावर ऑक्सफर्ड मधील फार पुरातन प्रसिद्ध कॉलेजांचीं आवारें व इमारती लागतात. त्यांपैकीं **सेंट जॉन्स** कॉलेजची इमारत प्रथम लागते. या इमारतीवरून हीं कॉलेजें बरींच प्राचीन आहेत असें ताबडतोब ध्यानांत येतें. **सेंट जॉन्स** कॉलेजचे दोन प्रचंड चौक आहेत. एका चौकाला सुंदर कमानदार व्हरांडा आहे. या कॉलेजची बाग फारच विस्तीर्ण असून, ऑक्सफर्डमध्यें तिच्या वरचढ बागच नाहीं. **सेंट जॉन्स** कॉलेजला लागून **बेलीयल** कॉलेजची लांबचलांब इमारत लागते. या कॉलेजची लांब बाजू सेंट जाईल्स रस्त्यावर असून कमी लांब बाजू ब्रॉड स्ट्रीट रस्त्यावर आहे व त्या बाजूला लागून **ट्रीनिटी** कॉलेजचें प्रवेशद्वार आहे. पण कॉलेजची इमारत **बेलीयल** कॉलेजच्या पश्चिम बाजूच्या मागें येते. असें हें तीन कॉलेजांचें त्रिकूट आहे. हीं तिन्हीं कॉलेजें फार जुनीं व फार नांवाजलेलीं आहेत व त्यांचीं विस्तीर्ण आवारें व बागा आहेत. तेव्हां येथें काय पहावें व काय सोडावें असें मनुष्यास होऊन जातें. बाकी एका दिवसांत पहाणाराला चौकांतून ओझरती नजर टाकून पलीकडे जाण्याखेरीज गत्यंतर नसतें. बॅलीयल कॉलेजच्या समोर व रस्त्याच्या मधोमध नव्या महायुद्धाच्या स्मारकाप्रमाणें हुतात्मे **लॅटिमर रिडले** व **क्रॅन्मर** या प्रसिद्ध प्रॉटेस्टंट धर्मोपदेशकांचें स्मारक आहे. याला सभोंवार पायऱ्यांच्या रांगा, नंतर अष्टपैलू कमानदार असे दोन मजले आहेत व कमानीच्या आंत या धर्मो-


पदेशकांच्या मूर्ति असून शिवाय इतर सांकेतिक मूर्ति आहेत. महायुद्धाच्या स्मारकापेक्षां हें स्मारक शिल्पकलेच्या दृष्टीनें जास्त भव्य व सुंदर असून त्याचा मनोरा पुष्कळ उंच असून त्यावर मग क्रॉस बसविला आहे. या स्मारकासभोंवार सुंदर छोटीशी बाग आहे. या स्मारकाच्या पुढें सेंट जाईल्स रस्त्याला सेंट **मॅगडेलेन स्ट्रीट** म्हणतात. कारण त्या नांवाचें प्रार्थनामंदिर या रस्त्याच्या समोर आहे. हें मंदिर टाकलें कीं त्या रस्त्याला लागून जॉर्जस्ट्रीट व ब्रॉडस्ट्रीट पूर्व पश्चिम जातात व तेथें एक मोठा चौक बनतो. दक्षिणेच्या रस्त्याला कॉर्नमार्केट रस्ता म्हणतात. येथें कॉलेजें नाहींत तर हा रस्ता बाजारासारखा असून या रस्त्यावर पुष्कळ मोठमोठीं दुकानें आहेत. आतां एक वाजलाच होता म्हणून मी एका रेस्टोरॉंटमध्यें फराळ केला व मग पुन: बाकीचें ऑक्सफर्ड पहाण्यास निघालों. कॉर्नमार्केट स्ट्रीटच्या टोकाशीं आलें म्हणजे **कॅरफॅक्स** म्हणून ऑक्सफर्ड मधला सर्वांत प्रख्यात.चौक लागतो. हा चौक म्हणजे ऑक्सफर्ड शहराचा तुंबा होय. येथून पूर्वेकडे हायस्ट्रीट नांवाचा सर्वांत मोठा व सुंदर रस्ता जातो व त्याच्या पूर्व टोकाला **चेरवेल** नदीवर **मॅगडेलेन** पूल आहे. पूर्वेस क्विन्स स्ट्रीट लागतो व तो न्यू रोडला मिळून पुढें रेलवे स्टेशनला जातो, व दक्षिणेला **सेंट ऑल्डेट** स्ट्रीट असून तो थेट टेम्सनदीपर्यंत जातो व तेथें त्या नदीवर **फॉली** नांवाचा पूल लागतो. हा चौक खरोखरीं फार सुंदर आहे. समोर तो जुना चौकोनी आकाराचा **कॅरफॅक्स** नांवाचा भव्य बुरूज दिसतो. त्यावर एक मोठें घड्याळ आहे. चारी बाजूस मोठमोठ्या उंचउंच इमारतींनीं शोभायमान झालेले चौफेर रस्ते दृग्गोचर होतात. येथें मी किती तरी वेळ उभा राहिलों व मार्गदर्शक पुस्तकांतील नकाशा काढून पाहिला. हा चौक खरोखरीं ऑक्सफर्ड शहराचें हृदय आहे. सर्व बाजूंचें दळणवळण या चौकामधून होत असलें पाहिजे असें वाटलें व तसा प्रत्यक्ष अनुभवहि आला. काय त्या चौकांतून वाहनांची व मनुष्यांची गर्दी जात होती! नंतर मी **फॉलीपुलापर्यंत** जाऊन मग परत येऊन हाय

स्ट्रीटमधून **मॅगडेलेन** पुलापर्यंत जाऊन यावयाचें असें मनाशीं ठरवून सेंट ऑल्डेट रस्त्यानें दाक्षिणेकडे वळलों. कांहीं वेळ चालल्यावर पुनः कॉलेजें लागतात. रस्त्याच्या उजव्या हाताला **पेंब्रोक** कॉलेज लागतें. तें जरा रस्त्याच्या मागें आहे, पण त्याचेपुढें रस्त्यावर **सेंट जाइल्स**-प्रमाणें **सेंट ऑल्डेटस** प्रार्थनामंदिर लागतें. पण रस्त्याच्या डाव्या हाताला फार प्रचंड कॉलेजचा चौक व मोठा बुरूज नजरेंत भरतो. म्हणून मीं प्रवेशद्वारानें आंत जाऊन चवकशी केली तों तें प्रसिद्ध **क्राइस्ट चर्च कॉलेज** (आठव्या हेनरीच्या काळचा प्रख्यात धर्माधिकारी व मुत्सद्दी **कार्डिनल वुलसे** यानें स्थापन केलेलें कॉलेज) असें समजलें. इतक्यांत दुसरेहि दोन गृहस्थ कॉलेज पहाण्यास आंत शिरत होते, तेव्हां माझीहि सहज सोय झाली व म्हणून मला हें कॉलेज सावकाशपणें पहातां आलें. कॉलेजचें प्रवेशद्वार व त्यावरचा बुरूज आश्चर्यकारक आहे. त्याचें शिल्पकाम अवर्णनीय आहे यांत शंका नाहीं. आंत शिरलें कीं केवढा मोठा चौक दृष्टीस पडतो! त्याच्या विस्तीर्णतेनें मन आश्चर्यानें थक्क होतें. या चौकाची आंतली एक बाजू २६४ फुटांची आहे. हा भव्य चौक हिरव्यागार हरळीनें आच्छादिलेला आहे. मध्यें एक सुंदर कारंजें असून त्यापासून चार दिशेला चार फरशीच्या पायवाटा केल्या आहेत. हा चौक ऑक्सफर्ड मधल्या सर्व कॉलेजच्या चौकांत मोठा आहे. या चौकाच्या एका बाजूस मोठा प्रशस्त जिना असून त्यानें आम्ही भोजनाच्या दिवाणखान्यांत गेलों. हा दिवाणखाना ११५ फूट लांब, ४० फूट रुंद व ५० फूट उंच आहे. केवढा भव्य दिवाणखाना दिसतो! याचे भिंतीवर कॉलेजांतील प्रख्यात विद्यार्थ्यांच्या तसबिराच तसबिरा लावलेल्या आहेत. दिवाणखान्याच्या समोर व रुंद बाजूला किंचित् उंच प्लॅटफार्मवर कॉलेजांतील शिक्षकांकरितां भोजनाचीं मेजें मांडलेलीं होतीं. व दिवाणखान्याच्या लांबट्या दोन्ही बाजूस मेजांच्या लांबच्यालांब रांगाचरांगा होत्या व मेजांच्या दोन्ही बाजूंस सारखीं बाकें ठेविलीं होतीं. येथें कॉलेजांतल्या सर्व विद्यार्थ्यांचें व शिक्षकांचें रात्रीचें

स्थळ प्रत
सं. ...... नं
ता.
ठा पं.



नं. २३ ऑक्सफर्ड-कॅरफॅक्स बुरूंज व चौक पान १८९




नं.२४ ऑक्सफर्ड : सेंट मेरीचें प्रार्थनामंदिर पान १८६

मुख्य जेवण होतें व या जेवणाला प्रत्येक विद्यार्थ्यानें ठरलेल्या वेळीं हजर असलें पाहिजे असा नियम आहे. हिंदुस्थानांतल्या कॉलेजाप्रमाणें येथें निरनिराळे क्लब नाहींत; हवे तेव्हां येण्याची मुभा नाहीं. सर्वांनीं एकत्र व एकाच वेळीं जेवलें पाहिजे असा नियम आहे. खरोखरींच ही व्यवस्था पाहून विलायतेंतील उच्च शिक्षणामुळें समाजांतील निरनिराळ्या दर्जाच्या विद्यार्थ्यांमध्यें अशा एकत्र राहणीनें एकीची व समानतेची भावना कशी व कां उत्पन्न होते हें माझ्या ध्यानांत आलें. नंतर आम्हीं पुस्तकालय पाहिलें. तेंहि प्रचंड आहे. हें कॉलेज ऑक्सफर्डमध्यें फारच मोठें आहे, यांत शंका नाहीं; याचे बरोबर मागें **कार्पसक्रिस्टी** कॉलेज आहे व त्याचे मागें **मर्टन** कॉलेज आहे. व मग या सर्व कॉलेजांच्या पूर्वेस व दक्षिणेस चेरवेल व टेम्स् नद्यांच्या संगमापर्यंत बागाचबागा आहेत ! ऑक्सफर्डच्या **कॅरफॅक्स** बुरुजाच्या उत्तरेस ज्याप्रमाणें **सेंटजॉन्स बेलीयल** व **ट्रीनिटी** या तीन कॉलेजांचें त्रिकूट व त्यांच्या विस्तीर्ण बागा आहेत तसेंच थेट दक्षिणेकडे • या तीन कॉलेजचें त्रिकूट व त्यांच्या बागा आहेत. पुढें त्या रस्त्यानें गेलें म्हणजे डाव्या बाजूला कॉलेजांचीं हिरवींगार मैदानें लागतात. उजव्या बाजूला इमारती लागतात. पण त्या फारशा मोठ्या नाहींत. **फॉलीपुलावरून** पलीकडे गेलें म्हणजे नदीकांठाला कॉलेजांचीं होडींघरें लागतात व होड्या वल्हवतांना विद्यार्थी दृष्टीस पडतात. इतकें पाहून मी त्याच रस्त्यानें परत **कॅरफॅक्सशीं** आलों व मग पूर्वेकडे हायस्ट्रीटनें गेलों. हा रस्ता लंडनच्या **रिजंटस्ट्रीटसारखा** दिसतो. रिजंटस्ट्रीटप्रमाणें या रस्त्याला थोडेंसें वाकण आहे व त्यानें तो जास्त खुलून दिसतो. कारण रस्त्याचा थोडा थोडाच भाग दृष्टिपथांत येतो व इमारती स्पष्ट व उठावांत दिसतात. या रस्त्यानें गेलें म्हणजे दोन्ही बाजूंस कॉलेजेंच कॉलेजें लागतात. ऑक्सफर्ड **विद्यापीठ** म्हणजे एक **विद्यापेठ** आहे असें भासतें. डाव्या हाताला **लिंकन** कॉलेज व **ब्रेसनोझ** कॉलेज लागतात. व लागलीच **सेंट मेरीचें** प्रार्थनामंदिर लागतें व मग **ऑलसोल्स** कॉलेजच्या दक्षिण

चौकाची बाजू लागते. उजव्या हाताला आंतल्या बाजूला **ओरिअल** कॉलेज लागतें व त्याच्यामागें **कारपस क्रिस्टी** कॉलेज. म्हणजे तें कॉलेज एका बाजूनें **क्राईस्ट चर्च** कॉलेजच्या मागें येतें, तर दुसऱ्या बाजूनें **ओरिअल कॉलेजच्या** मागें येतें. ऑलसोल्स कॉलेजच्या दक्षिण चौकाच्या समोर उजव्या हाताला **युनिव्हर्सिटी** कॉलेज लागतें. **मटन, बेलीयल** व **युनिव्हर्सिटी** हीं तीन ऑक्सफर्डचीं तेराव्या शतकांतील पहिलींच कॉलेजें होत. फार जुनें कॉलेज म्हणून आंत शिरलों तोंच हॉलमध्यें डेक्कन कॉलेजचे पहिल्या पिढींतले प्रिन्सिपॉल डॉ. एडविन आरनोल्ड यांचें स्मारकचित्र सहज दृष्टीस पडलें. डेक्कन कॉलेजाशीं संबंध असलेले तीन प्रख्यात प्रोफेसर **आरनोल्ड, सेल्बी** व **वेन** हे तिघेहि ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या तीन निरनिराळ्या विद्यालयांतील विद्यार्थी होते व सहजगत्या का होईना, पण तीं तिन्हीं कॉलेजें माझीं प्रत्यक्ष पाहून झालीं हा एक विलक्षण योगायोग खरा असें माझ्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं. डाव्या हाताला **ऑलसोल्स** कॉलेज टाकल्यावर लागलीच **क्वीन्स** कॉलेज लागतें. उजव्या हाताला पुढें कॉलेज लागत नाहीं. पण कॉलेजांत न राहतां स्वतंत्रपणें विद्याभ्यासाकरितां राहणाऱ्या विद्यार्थ्यांचें वसतीगृह लागतें. चेरवेल नदीच्या कांठीं व रस्त्याच्या डाव्या हाताला पुनः मोठें कॉलेज लागतें. हें **मॅगडेलेन** कॉलेज होय. क्राईस्ट चर्च कॉलेजप्रमाणें हें कॉलेजहि ऑक्सफर्डमधलें एक मोठें कॉलेज आहे, व त्याच्या इमारती तर अप्रतिम आहेत. या कॉलेजाला तीन मोठमोठे मनोरे आहेत; व त्या सर्वांचींच कामें फार प्रेक्षणीय आहेत; या इमारतीचा दगड तांबडसर आहे व तो स्वाभाविक रंग व त्या रंगाच्या निरनिराळ्या छटा फारच बहारीच्या दिसतात. ऑक्सफर्ड मधील कोणत्याहि कॉलेजला अशी नैसर्गिक सौंदर्याची जागा नाहीं. या कॉलेजच्या पूर्वेस **चेरवेल** नदीचा प्रवाह आहे व या ठिकाणीं त्यांचे दोनतीन फांटे झाले आहेत. शिवाय येथें नदी उत्तर दक्षिण वाहिनी असल्यामुळें कॉलेजच्या दोन्ही बाजूंस नदीचा सुंदर देखावा दिसतो.



नं. २५ ऑक्सफर्ड : मॅकडेलेन कॉलेज पान १९०



नं. २६ ऑक्सफर्ड : क्राईस्टचर्च कॉलेज पान १९०

कॉलेजच्या समोरच मोठी थोरली वनस्पतीशास्त्राची बाग लागते; कॉलेजच्या मागें व नदीच्या पलीकडे हिरवींगार खुलीं मैदानें आहेत. यामुळें सर्वत्र खुलीं हिरवींगार मैदानें व बागा व मध्यें तांबूस रंगाच्या कॉलेजच्या इमारती हा देखावा विलक्षण चित्ताकर्षक वाटतो. **मॅगडेलेन** पुलावर उभें राहिलें म्हणजे जिकडे तिकडे नदीचे फांटे दिसतात व नदीच्या कांठीं कॉलेजचीं होडीघरें दिसतात. येथून दिसणारा देखावा अद्वितीय आहे. येथें उभें राहून त्या देखाव्याकडे कितीहि वेळ पहात राहिलें तरी मनाचें समाधान होत नाहीं. मी येथें किती तरी वेळ उभा राहिलों व मग नदीच्या बाजूच्या पायवाटेनें बराच चालत गेलों. तो नदीचा सुंदर देखावा, सभोंवारची तीं हिरवीगार मैदानें व दूरवर दिसणारे प्रार्थनामंदिराचे मनोरे हा मनोवेधक देखावा सारखा दिसत राहातो. यामुळें चालण्याचे श्रम वाटत नाहींत. ऑक्सफर्ड पहातांना माझीच गोष्ट घ्या न्म. ११ वाजल्यापासून सायंकाळपर्यंत मी सारखा फिरत होतों; पण नवेनवे देखावे पाहण्याच्या नादांत मला चालण्याचे श्रम वाटले नाहींत. याप्रमाणें नदीच्या वाटेनें बराच चालल्यावर मी परत आलों व पहातों तों सायंकाळचे सहा वाजले. मग थेट **मॅगडेलेन** पुलावरून **हायस्ट्रीटनें क्वीन्स** रस्त्यावरून नव्या रस्त्यानें थेट स्टेशनवर आलों तों लंडनला जाणारी गाडी प्लॅटफार्मवर तयार होती. माझें परत तिकिट होतें तेव्हां मी लागलाच गाडींत जाऊन बसलों व आमची गाडी लगेच चालू झाली. मी नऊ साडेनवास बिन्हार्डी येऊन पोहोंचलों.

वाटेनें मनांत राहून राहून आजच्या दृश्य दर्शनाबद्दल विचार येत ते. अर्वाचीन काळच्या हिंदी सुशिक्षितांना ऑक्सफर्ड विद्यापीठ ऐकूनें ार्थीदशेपासून ठाऊक असतें. कारण इंग्लंडांतल्या कितीतरी प्रसिद्ध ांच्या चरित्रामध्यें ऑक्सफर्डचा उल्लेख येतो. सर्व जगाला ऑक्सं- विद्यापीठानें मुत्सद्दी पुरविले आहेत अशी या विद्यापीठाचे भक्त ही देतात, व एका दृष्टीनें तें खरें आहे. कारण या विद्यापीठाच्या

प्रख्यातीमुळें जगांतल्या सर्व देशांतले लोक येथें शिकण्यास येतात व कालेंकरून ते मुत्सद्दी बनतात.

असें हें प्रख्यात विद्यापीठ घाईघाईनें ओझरतें कां होईना पण पहावयास सांपडलें याबद्दल माझ्या मनाला राहून राहून साश्चर्य आनंद वाटत होता. माझ्यासारख्या एक दिवस पाहून जाणाऱ्या प्रवाशाच्या मनावर जर हें विद्यापीठ व येथलीं अनेक विद्यालयें आपली मोहिनी टाकतात तर ज्यांना तरुणपणीं अशा विद्यालयांत विद्याभ्यास करण्याची संधि लाभली असेल त्यांच्या मनावर या ठिकाणाचा ठसा वज्रलेप राहावा यांत काय नवल आहे ?

# प्रकरण १२ वें

## केंब्रिज.

**ऑ**क्सफर्ड व केंब्रिज या दोन प्रख्यात विद्यापीठांपैकीं **केंब्रिज** हें आमच्या महाराष्ट्रीयांना चिरपरिचित आहे. अव्वल इंग्रजींत श्रीपाद बाबाजी ठाकूर सिव्हिल सर्विस परीक्षेला गेले तेव्हांपासून आजतागाईत जे जे विद्यार्थी या परीक्षेला गेले त्यांपैकीं पुष्कळ केंब्रिज विद्यापीठाचे विद्यार्थी होते व आहेत. शिवाय, गणिताच्या पारंगततेची **निळी फीत** पहिल्यादां मिळविणारे **रँगलर परांजपे** केंब्रिजचे विद्यार्थी ! त्यांचेनंतर गणितामध्यें त्यांच्या तोडीचे प्रावीण्य मिळविणारे विद्यार्थी तेथले; **शिष्यात् इच्छेत्पराजयम्** या नात्यानें रँगलर परांजपे यांचेपेक्षां वरचढ गणितांत पदवी मिळविणारे **डॉक्टर महाजनी** हेहि केंब्रिजचे विद्यार्थी. केंब्रिजमधील ट्रायपासच्या' परीक्षेंत अर्थशास्त्रांत पहिल्या वर्गांत येऊन केंब्रिजमधील शिष्यवृत्ति व रतनटाटाची शिष्यवृत्ति अशा दुहेरी शिष्यवृत्त्या मिळवून अर्थशास्त्रांत डॉक्टरची पदवी संपादन करण्याकरितां परत विलायतेस जाणारे श्री. आडारकर हेहि केंब्रिजचे विद्यार्थी. यामुळें आम्हां महाराष्ट्रीयांना केंब्रिज विद्यापीठाबद्दल एकप्रकारचा आपलेपणा वाटावा हें साहजिक आहे. केंब्रिजला जातांना माझ्या मनाची हीच भावना होती. तेव्हां अधिक प्रस्तावना न करितां मी माझ्या केंब्रिजच्या दृश्यदर्शनाच्या वर्णनास लागतो.

ता. १४ मार्च सन १९३० रोजीं सकाळीं बिऱ्हाडाहून भुयारी रेल्वेनें एल्. एन्. ई. आर. रेल्वेच्या **लिव्हरपूल** स्टेशनला आलों व साडेआठ वाजतांच्या केंब्रिजला जाणाऱ्या **नथांबत्या** आगगास- बसलों व लवकरच आगगाडी शीट करून सुटली. लंडनहून ला ज छपन्न मैल लांब असून थेट उत्तरेस आहे. लंडन शहरानजीया

कचा भाग सोडल्यावर शेतजमीन लागूं लागली व लांबच लांब काचेचीं कमरभर ठेंगणी घरें दृष्टीस पडलीं. हे भाजीपाल्याचे व फळफळावळीचे मळे होत व हिवाळ्यांत बर्फानें नुकसानी होऊं नये व वर्षभर सारखीं पिकें काढतां यावीं म्हणून हीं घरें केलेलीं असतात असें समजलें. शेतीचें उत्पन्न नैसर्गिक कारणांनीं नासूं नये म्हणून केवढा खर्च विलायतेंत करतात याचें मला आश्चर्य वाटलें. सभोंवारची सृष्टिशोभा व मधून-मधून लागणाऱ्या गांवांची नगरशोभा पाहतां पाहतांच दहा वाजून पांच मिनिटांनीं केंब्रिज स्टेशन आलें व माझ्या मुलाचे मित्र श्री. मणेरीकर ( हे त्या वर्षी गणिताच्या ट्रायपासच्या परीक्षेंत यश मिळवून रँगलर झाले ) हे मला येऊन भेटले. ऑक्सफर्ड विद्यापीठ मला दुसऱ्याच्या मदतीशिवाय पहावें लागलें तसें येथें झालें नाहीं म्हणून व ठरल्याप्रमाणें श्री. मणेरीकर ताबडतोब भेटले म्हणून मला फार आनंद झाला. माझ्याजवळ एका छोट्या हँडबॅगेशिवाय सामान नव्हतें म्हणून आम्हीं लागलींच स्टेशनबाहेर येऊन **बसमध्यें** बसलों. केंब्रिज शहराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर **बर्डबोल्ट हॉटेल** आहे; तेथें रात्रीं निजावयाची सोय व दुसऱ्या दिवशीं सकाळच्या न्याहारीची सोय पाहिजे असें हॉटेलच्या धनिनीस सांगितलें व तिनें तें कबूल केलें. मला दिलेल्या खोलींत बॅग ठेवून व खोलीची किल्ली घेऊन आम्हीं लागलीच दृश्यदर्शनाला बाहेर पडलों.

**केंब्रिज** शहर **कॅम** नदीच्या कांठाला आहे व नदी सामान्यतः उत्तरवाहिनी आहे. प्रथमतः ती दक्षिणेकडून उत्तरेकडे वहात जाते व शहराच्या उत्तर टोंकाला ती एकदम पूर्ववाहिनी होते. रेल्वेस्टेशन शहराच्या आग्नेय ( पूर्व-दक्षिण ) दिशेला असून स्टेशनपासून पश्चिमेकडे जो रस्ता जातो तो शहराच्या मुख्य रस्त्यास मिळतो. हा रस्ता थेट वायव्य दिशेला जाऊन **कॅम** नदीवरील मोठ्या पुलावरून पुढें **हंटिंगटन** गांवा जातो. लंडनच्या रस्त्याप्रमाणें या एका लांबचलांब रस्त्याला हिल्स **रीजंट स्ट्रीट, सेंट ऍण्ड्र्यूज स्ट्रीट, सिडने स्ट्रीट, व ब्रिज स्**

अशीं वेगवेगळीं नांवें आहेत. हा मोठा रस्ता व नदी यांचे दरम्यान असाच एक दुसरा मोठा रस्ता आहे. त्याला **ट्रंपिंग्डन, किंग्स परेड, ट्रिनिटी स्ट्रीट व सेंट जॉन्स** स्ट्रीट अशीं नांवें असून तो रस्ता मोठ्या पुलाच्या अलीकडे ब्रिजस्ट्रीटला मिळतो. या दोन रस्त्यांनीं शहराच्या तीन लांबचलांब दाक्षिणोत्तर पट्ट्या पडतात. केंब्रीजमधलीं बहुतेक सर्व कॉलेजें या तीन पट्ट्यांत आहेत. पश्चिमेस नदीच्या पलीकडे कांहीं नवीं कॉलेजें झालीं आहेत. पण तिकडे बहुतेक कॉलेजांचीं क्रीडांगणें व मैदानें आहेत.

**बर्डबोल्ट** हॉटेल टाकून जरा पुढें गेलें कीं डाव्या हाताला रोमन कॅथॉलिकपंथी प्रार्थनामंदिर मनुष्याचें मन आकर्षित करतें. त्याचा तो उंचचउंच अणकुचीदार मनोरा, तें रेखीव नक्षीदार काम, तें सुंदर प्रवेशद्वार; मनोऱ्याच्या दुसऱ्या मजल्यावर पुढें आलेलें तें मोठें घड्याळ; त्या कमानदार व कांचेच्या दाराच्या खिडक्या; हा सर्व देखावा स्पृहणीय आहे यांत शंका नाहीं. अर्थात् या प्रार्थनामंदिराचें बाहेरून ओझरतें दर्शन घेऊन आम्ही पुढें गेलों. रीजंटस्ट्रीटच्या डाव्या बाजूला **डाउनिंग कॉलेज** लागतें. या कॉलेजचें प्रवेशद्वार अगदीं साधें आहे. कॉलेजची इमारत नवी, साधी व बैठी आहे. पण कॉलेजच्या आसपास फार प्रशस्त असें हिरवेंगार मैदान असून मधूनमधून सुंदर फुलझाडें व फुलवृक्ष आहेत. कॉलेजच्या इमारती व त्यांच्या सभोंवारची खुली जागा यांचा मनावर मोठा अनुकूल परिणाम होतो. हें कॉलेज केंब्रिजमधील बरेंच अर्वाचीन आहे. त्याची सनद १८०० मधली आहे. या कॉलेजला लागूनच डाव्या बाजूस केंब्रिज विद्यापीठाचीं बरींचशीं प्रयोगालयें, पदार्थसंग्रहालयें व शेतकी, जंगल, वनस्पती इत्यादिकांबद्दल संशोधन करणाऱ्या शाळा **डाउनिंग स्ट्रीटनें** दुभंगलेल्या आवारांत आहेत असें समजलें. तीं मागें टाकून आम्ही पुढें गेलों तों उजव्या बाजूस रस्त्याला लागून लांबच लांब **इमान्युएल कॉलेजचा** मोठा चौक लागला. याच्यासमोर हिरव्यागार गवताची खुली अरुंद पट्टी आहे. मधले तीन

कमानींचें दुमजली प्रवेशद्वार, त्यावर तिकोनी नक्षीदार बांधकाम व त्याचे मधोमध वाटोळा मनोरा हा देखावा मनोहर आहे. या तीन कमानीच्या दोन्ही बाजूंस पांच पांच कमानींचा व्हरांडा असलेल्या चौकाच्या बाजू आहेत. हा कॉलेजचा भाग फार प्रमाणबद्ध असल्यामुळें अति सुंदर दिसतो. हें कॉलेज केंब्रिजमधलें बरेंच मोठें कॉलेज आहे; याचे एकंदर तीन मोठे चौक आहेत. उत्तर चौक व पहिले दोन चौक यांमध्यें **इमान्युएल स्ट्रीट** नांवाचा आडवा रस्ता गेला आहे. या कॉलेजची बाग इमारतीच्या मागें पूर्वेकडे आहे. हें कॉलेज सोळाव्या शतकांत स्थापन झालेलें आहे.


या कॉलेजचा उत्तर चौक टाकला कीं **क्राईस्टलेन** म्हणून आडवा रस्ता लागतो व मग लागलींच **क्राईस्ट कॉलेज** लागतें. हें कॉलेज अगदीं रस्त्याला भिडलेलें आहे. याचें प्रवेशद्वार एखाद्या किल्ल्यासारखें भव्य आहे; प्रवेशद्वाराच्या भल्या मोठ्या कमानीच्या दोन्हीं बाजूंस मोठाले बुरूज आहेत; कमानीवर इंग्रजी राजाच्या ढालीप्रमाणें दोन सिंहाचीं चित्रें असून त्याचेवर पेट्रनसेंटची भव्य मूर्ति आहे; एकंदरींत, हें प्रवेशद्वार शिल्पकलेचा एक उत्तम मासला आहे यांत संशय नाहीं. या कॉलेजाची बाग मोठी असून कॉलेजच्या मागें पूर्वेस आहे.

या कॉलेजचा पुढला चौक संपतो तोंच मुख्य रस्त्याला जरा बाक येतो व त्याला उजवीकडून व डावीकडून दोन रस्ते येऊन मिळतात. यामुळें येथें मोठा चौक बनतो; पण समोरच्या रस्त्यानें पुढें गेलें म्हणजे दुसऱ्या कांहीं इमारती लागतात व मग **सिडनेससेक्स कॉलेज** लागतें. हें छोटें कॉलेज आहे. पण दिसण्यांत सुबक आहे. आम्हीं चौकांतून हिंडलों व मग बागेंतहि गेलों. या कॉलेजची बाग छोटीशी पण सुंदर आहे. नुकतीच बागेंत **क्रॉकसेसचीं** नानारंगी फुलें फुललीं होतीं. हीं फुलें भुईसरपट येतात व झाड जमिनींत असतें. त्यामुळें हीं फुलें उगवलेलीं आहेत असें वाटत नाहींत तर वरून जमिनीवर फुलांचा कोणीं वर्षाव केला आहे असा भास होतो.

यांप्रमाणें या मुख्य रस्त्याच्या उजव्या हाताला तीन कॉलेजें लागतात. हीं सर्व सोळाव्या शतकांत स्थापन झालेलीं आहेत. पण केंब्रिजमधलीं पुष्कळ कॉलेजें या रस्त्याला समांतर असलेल्या **ट्रंपिंग्डन** रस्त्याच्या दोन्ही बाजूंस असल्यामुळें आम्ही परत फिरलों व पश्चिमेकडच्या छोट्या रस्त्याला आलों. या रस्त्यास **मार्केट स्ट्रीट व सेंट मेरी स्ट्रीट** अशीं दोन नांवें आहेत. रस्त्याच्या अलीकडच्या टोंकाला **ट्रिनिटी प्रार्थनामंदिर** आहे, तर दुसऱ्या टोंकाला **सेंट मेरीचें** मोठें प्रार्थनामंदिर आहे. या इमारती बऱ्याच जुन्याकाळच्या आहेत. हा रस्ता **किंग्सपरेड** रस्त्याला मिळतो. येथें आम्ही येतों तों श्री. आडारकर विलिंग्डन कॉलेजमधून इंटरआर्टस परीक्षा पास झालेले व बी. ए. होऊन किंग्सकॉलेजमध्यें अर्थशास्त्राचा अभ्यास करीत असलेले विद्यार्थी भेटले व त्यांना पाहून मला फार आनंद झाला. (हेच यंदा अर्थशास्त्राच्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत येऊन त्यांनीं जोड शिष्यवृत्ति मिळविली व पुढील अभ्यासाकरितां ते नुकते परत, केंब्रिजला गेले.) अर्थात् ते आमच्याबरोबर आले. या रस्त्याला मात्र कॉलेजांची गर्दीचगर्दी आहे. येथें आल्यावर केंब्रिज विद्या**पीठ** नव्हे तर विद्या**पेठ** आहे असें मला वाटलें. ज्याप्रमाणें आपल्या इकडे बाजार पेठ असावी अशी येथें विद्यापेठ आहे. किंग्सपरेड रस्त्याच्या पुढच्या भागाला ट्रिनिटी स्ट्रीट म्हणतात. त्या स्ट्रीटला थेट लागून डाव्या हाताला **गॉनव्हिल व कायस कॉलेज** आहे. हें बरेंच जुनें जोड नांवाचें कॉलेज आहे. याचे तीन मोठमोठे चौक असून प्रार्थनामंदिर मधल्या चौकामध्यें आहे. या कॉलेजाच्या चौकाच्या प्रवेशद्वारांना सांकेतिक नांवें दिलेलीं आहेत. उ. सिनेटहाऊस पायवाटेकडच्या द्वाराला **मानधनद्वार** असें नांव आहे. दुसऱ्याचें **सद्गुणद्वार** असें नांव आहे; तर तिसऱ्याचें **नम्रताद्वार** असें नांव आहे. याचेमागें **ट्रिनिटी हॉल** नांवाची संस्था आहे. ही **गॉनव्हिल कायस** कॉलेजच्या वेळची म्हणजे चवदाव्या शतकांतील आहे. या कॉलेजच्या समोर सेनेट हाऊस पायवाट आहे. ही खरोखरी फार अरुंद बोळासारखी

आहे. त्या बोळाला लागून सेनेट हाऊस आहे. पण त्याचें प्रवेशद्वा दक्षिणाभिमुख असून तें सेनेट हाऊस केंब्रिज विद्यापीठाच्या ग्रंथाल याच्या आवाराच्या उत्तरेस आहे. तेव्हां आम्ही किंग्सपरेड रस्त्यावर येऊन सेनेट हाऊसमध्यें शिरलों. हा एकमजली दिवाणखाना आहे. पण त्याची लांबी, रुंदी व उंची हीं फार प्रमाणशीर असल्यामुळें हा हॉल फार सुंदर दिसतो. पांढरी शुभ्र सपाट अशी वरची तक्तपोशी, एकसारखे व सारख्या अंतरावरील कॉरिंथियन खांब, त्यामध्यें त्या दुमजली काचेच्या खिडक्या; दिवाणखान्याच्या मधोमध जरा पुढें आलेले ते चार खांब व त्यावरील तिकोनी बांधकाम व कोनाचे बरोबर वर तो छोटासा मनोरा, सबंद दिवाणखान्याच्या लांबीभर ती सुंदर नक्षीदार पानपट्टी; सारांश हें सिनेट हाऊस केंब्रिजसारख्या प्रख्यात विद्यापीठाला शोभण्यासारखें सुंदर व भव्य आहे व तें पाहून सानंद आश्चर्य वाटलें. नंतर आम्हीं श्री. आडारकरांच्या **किंग्स कॉलेजचें** प्रार्थनामंदिर पाहिलें. हें विद्या-पीठाच्या ग्रंथालयाच्या बाजूला व कॉलेजच्या आवाराच्या उत्तरेस आहे. कॉलेज पूर्वाभिमुख आहे. बांधकलेच्या दृष्टीनें **किंग्स कॉलेजच्या प्रार्थनामंदिरा**इतकी उत्तम इमारत सर्व केंब्रिज शहरांत नाहीं. त्या मंदिराचा बाहेरचा दृश्य भाग काय किंवा आंत शिरल्यावर दिसणारा आंतर भाग काय, एकापेक्षां एक सुंदर आहेत. या इमारतीशीं आलें म्हणजे मनुष्य आश्चर्यानें थक्क होतो. त्याला काय पहावें व काय न पहावें असें होऊन जातें; कारण या इमारतीचें सर्वच काम अप्रतिम आहे. प्रार्थनामंदिराप्रमाणें कॉलेजच्या इमारतीहि मोठ्या प्रेक्षणीय आहेत!

इतकें पाहून होत आहे तों एक वाजण्याचा सुमार झाला; म्हणून श्री. आडारकर आपल्या खोलीकडे गेले व श्री. मणेरीकर व मी केंब्रिज युनियन सोसायटीमध्यें दोन प्रहरच्या फराळास गेलों व तेथें आम्हीं मोठ्या मजेंत शुद्ध वनस्पत्याहार केला. कारण श्री. मणेरीकर हे केंब्रिज-मध्यें असतांना सुद्धां शाकाहारी राहिले होते.




नं. २७ केंब्रिज : किंग्स कॉलेजचें प्रार्थनामंदिर पान १९८



नं. २८ केंब्रिज : ट्रिनिटी कॉलेजचा पूल पान १९९

फराळ आटोपल्यावर आम्हीं लागलींच पुनः दृश्यदर्शनास निघालों तो **सेंट जॉन्स स्ट्रीटला** आलों. या रस्त्याला लागून **सेंट जॉन्स कॉलेजचें** भव्य प्रवेशद्वार आहे. हें प्रवेशद्वार **क्राईस्ट कॉलेजच्या** धर्तीवर आहे व त्या प्रवेशद्वाराप्रमाणें भव्य आहे. या कॉलेजाचे एकामागें एक असे चार चौक आहेत; चवथा चौक तर नदीच्या पलीकडे आहे. याच एका कॉलेजचा विस्तार नदी पलीकडे गेला आहे. तिसरा चौक व चौथा चौक यांना जोडणाऱ्या पुलाला 'दुःखाश्रु पूल' ( Bridge of Sighs ) म्हणतात. व्हेनीस शहरांतील ड्यूकचा राजवाडा व तुरुंग यांना जोडणाऱ्या पुलावरून या पुलाला हें नांव देण्यांत आलेलें आहे. शिवाय **रेननें**, बांधलेला जुना पूल या पुलाच्या जवळच वरच्या अंगाला असून त्या पुलापलीकडे कॉलेजच्या विस्तीर्ण उपवनांतून गर्दछाय वृक्षराजींनीं शोभायमान झालेला सुंदर रस्ता मोठ्या **क्वीन्स** रस्त्याला मिळाला आहे.

हें कॉलेज प्रत्यक्ष सोळाव्या शतकांत स्थापलें असलें तरी कॉलेजची जागा ही सेंट जॉन नांवाच्या दवाखान्याची जागा होय व हा दवाखाना बाराव्या शतकांतील होता. तेव्हां स्थापनेच्या दृष्टीनें **पीटर हाऊस** हेंच केंब्रिजमधलें तेराव्या शतकांतील पहिलें कॉलेज असलें तरी जुन्या जागेच्या मानानें **सेंट जॉन्स** हें सर्वांत जुनें कॉलेज आहे. कॉलेजचें आवार विस्तीर्ण आहे. त्यामध्यें गगनचुंबी मोठमोठे वृक्ष अनेक आहेत व सृष्टिसौंदर्यामध्यें या कॉलेजच्या उपवनाचा नंबर पहिला लागेल यांत शंका नाहीं. दोन्ही पुलांवरून दिसणारा नदीच्या व सभोंवारच्या बागांचा व इमारतीचा देखावा अद्वितीय आहे. अर्वाचीन काळीं गणित-विषयांत प्रावीण्य मिळविलेले बरेच महाराष्ट्रीय विद्यार्थी या कॉलेजांत शिकून तयार झालेले आहेत. विशेषतः फर्ग्युसन कॉलेजचे दोन प्रिन्सिपाल डॉ. परांजपे व डॉ. महाजनी हे या कॉलेजचे विद्यार्थी असल्यामुळें हें कॉलेज पहातांना विशेष आपलेपणाची भावना माझ्या मनांत उद्भूत व्हावी हें स्वाभाविक आहे.

**सेंट जॉन्स** कॉलेजला लागून **ट्रिनिटी** कॉलेज आहे. केंब्रिजमधील हें सर्वांत मोठें कॉलेज असून याचें आवारहि फार विस्तीर्ण आहे. याचें प्रवेशद्वार फार भव्य व नक्षीदार आहे. याला किल्ल्याच्या तटाच्या बुरुजाप्रमाणें दोन बाजूला दोन बुरूज आहेत. पहिला चौक विलक्षण मोठा असून त्याच्या मधोमध एक सुंदर कारंजें आहे. दुसरे दोन चौक यापेक्षां लहान आहेत. या कॉलेजचा पूलहि सुंदर आहे व पुलाचे पलीकडे वृक्षराजींनीं युक्त असा मोठा रस्ता आहे व तो **क्विन्स रोडला** मिळाला आहे.

केंब्रिजमध्यें आल्यापासून इतकीं कॉलेजें व मोठमोठ्या इमारती पाहिल्या कीं मला सुद्धां अधिक पाहण्याची इच्छा राहिली नाहीं. मग श्री. मणेरीकरांसारख्या एक वर्ष केंब्रिजमध्यें राहिलेल्या विद्यार्थ्याला तर वीट आला असेल यांत शंका नाहीं. तेव्हां आम्ही मनुष्यकृत बांधकला-सौंदर्य टाकून केंब्रिजमधलें सृष्टिसौंदर्य पहाण्याकरितां नदीच्या पलीकडे आलों! नदीपलीकडून उत्तर दक्षिण असा **क्वीन्स** रोड नदीला समांतर असा जातो. याच रस्त्याला केंब्रिजचे विद्यार्थी **मागील मार्ग** (Backs) म्हणतात. कारण हा रस्ता नदीच्या पूर्व कांठाला जी कॉलेजांची रांगच-रांग आहे तिच्या पाठीमागचा मोठा रस्ता होय. सर्व कॉलेजांची ठेवण अशी आहे; प्रथम कॉलेजच्या इमारती; त्याचे मागें कॉलेजची फुलबाग; मग कॉलेजचा पूल; नंतर कॉलेजचें विस्तीर्ण उपवन मग कॉलेजच्या उपवनाचें सुंदर लोखंडी फाटक; त्याचे मागें पायवाटेसह हा **क्वीन्स रस्ता** (मागील मार्ग) व रस्त्याच्या पलीकडे पुन: कॉलेजचीं क्रीडांगणें व खुलीं मैदानें. या रस्त्याचें सौंदर्य व सृष्टिशोभा खरोखरींच अवर्णनीय आहेत. आधीं मध्यें मोठा लांबचलांब प्रशस्त रस्ता, त्याचे दोन्ही बाजूंस साधी पायवाट, हारीनें लावलेले मोठमोठे गर्दछायेचे उंच वृक्ष; छाया इतकी गर्द व दाट कीं भर दोनप्रहरीं सुद्धां उन्हाचा कवडसा आंत येणें शक्य नाहीं; डाव्या हाताला कॉलेजांचीं निरनिराळ्या आकारांचीं नाना रंगी लोखंडी फाटकें; त्यांचे आंत कॉलेजचीं उपवनें; झाडांच्या गर्द

छायेंतून डोकावणाऱ्या कॉलेजच्या इमारती व ती सारखी वाहणारी नदी व तिच्यावरील मधूनमधून दिसणारे पूल हा सर्व देखावा एकसमयावच्छेदेंकरून पाहिला म्हणजे हें ठिकाण सृष्टिदेवीचें माहेरघर आहे असें कोणास वाटणार नाहीं ? मलाहि तसाच अनुभव आला. या रस्त्यानें किती वेळ चाललें तरी शीण वाटत नाहीं. कारण सर्वत्र झाडी व गवत असल्यामुळें व शेजारीं पाण्यानें भरलेली नदी वाहत असल्यामुळें हा भाग शहरापेक्षां पुष्कळ थंड असतो. याप्रमाणें या मागील मार्गाची शोभा पहात आम्हीं **सिजविक** नांवाच्या गर्दछाय वृक्षांनीं अलंकृत रस्त्याशीं आलों. तोंच श्री. मणेरीकर म्हणाले "केंब्रिजमधल्या स्त्रियांच्या दोन कॉलेजांपैकीं गर्टन कॉलेज गांवापासून दोन अडीच मैल दूर आहे. पण दुसरें **न्युन्हॅम** कॉलेज या रस्त्याच्या टोंकाला आहे." तेव्हां पुष्कळशीं कॉलेजें पाहिलीं असतांना सुद्धां हें पाहण्याचा मोह आवरेना; म्हणून आम्हीं हें कॉलेज पाहिलें; व गर्टन दुसऱ्या दिवशीं सकाळीं पाहण्याचा मीं मनांत बेत केला. हीं दोन्ही कॉलेजें अर्थात् अर्वाचीन एकोणिसाव्या शतकांतील आहेत. **न्युन्हॅम** कॉलेजची इमारत नवीन आहे. तेथें एकंदर सहाशें विद्यार्थिनी असून त्यांच्या जेवणाचे व राहण्याचे दीड दीडशें विद्यार्थिनींचे स्वतंत्र चार चौक केलेले आहेत; या कॉलेजच्या सभोंवार सुंदर बाग व मोठमोठ्या वृक्षवेलींनीं शोभायमान झालेलें उपवन आहे.

हें कॉलेज पाहून आम्ही परत येऊन मग नदीच्या कांठानें जाणाऱ्या एका अगदीं छोट्या पायवाटेनें नदीची शोभा पहात गेलों; एके ठिकाणीं नदींतून मोठ्या जोरानें पाण्याचा प्रवाह बाहेर सोडला होता; व त्यावर अगदीं साधे लाकडाचे ओंडे टाकून पूल केला होता; त्यावरून पुढें गेलों व मग आम्हाला कॅम नदीवर बांधलेला पांढऱ्या दगडाचा कोरा करकरीत पूल लागला, तो ओलांडून आम्ही गांवाकडे आलों. तो मोठा **ट्रंपिंग्डन** रस्ता लागला; त्याच्या डाव्या हातास बांधलेला कालवा होता; रस्ता फार प्रशस्त व खुलास होता. या रस्त्यानें बराच वेळ चालल्यावर आम्हीं डाव्या हाताला वळलों तों **ब्रूकलँटस ॲव्हेन्यू** नांवाचा सरळ

रस्ता लागला. केंब्रिजमधला हा गर्दछायाच्छादित रस्ता फार रमणीय आहे. हा रस्ता स्टेशनच्या पलीकडे **हिल्स रस्त्याला** मिळतो. आतां बरीच संध्याकाळ झाली म्हणून आम्ही **हिल्स** रस्त्यानें परत गांवांत आलों, तों साडेसात झाले. तेव्हां श्री. मणेरीकरांनीं मला एक स्वच्छ व स्वस्त असें रेस्टोरेंट दाखविलें व तेथें रात्रीचें जेवण करून निजावयास **बर्डबोल्ट** हॉटेलमध्यें जाण्यास सांगितलें. दुसरे दिवशीं ते सकाळींच लंडनला जाणार होते. म्हणून सबंद दिवस माझ्याबरोबर घालवून बहुतेक सर्व केंब्रिज दाखविण्याची तसदी घेतल्याबद्दल मी त्यांचे आभार मानले व त्यांचा तेथें निरोप घेतला. ते आपल्या बिऱ्हाडीं गेले व मी रेस्टोरेंटमध्यें जेवणास गेलों. जेवण आटोपून रात्रीं साडेआठच्या सुमारास मी आमच्या हॉटेलमध्यें विश्रांति घेण्यास आलों.

आठदहा तासांच्या सर्व दिवसभरच्या दगदगीनें मला विश्रांतीची जरूरी होती. तेव्हां कपडे काढून निजावयाच्या तयारीस मी लागणार तों माझ्या खोलीची सेविका आली व तिनें सकाळीं केव्हां न्याहारी करणार व आधीं शेजचहा ( bed tea ) पाहिजे कां म्हणून विचारलें. " शेजचहा सहासाडेसहाला हवा व न्याहारी साडेआठला मिळाली तरी चालेल" असें मीं सांगितलें. सेविकेनें माझे आभार मानून व मला शिवरात्र (good night ) करून ती निघून गेली. मी कपडे काढून व रात्रीचा पायजमा व कुडतें घालून बिछान्यावर पडलों. इतक्या श्रमानंतर निद्रादेवीनें लवकर माझ्यावर अनुग्रह केला हें सांगावयास नको. सकाळीं सहाच्या सुमारास मी माझ्या एकसंधि झोपेंतून जागा झालों. मुखमार्जन आटोपतों तोंच **शेजचहा** आला. मोठ्या आनंदानें मीं चहापान केलें व मग नेपथ्यविधीला लागलों. साडे आठला न्याहारी केली. " आज सायंकाळीं मी परत लंडनला जाणार व आतां येथें परत येणार नाहीं " असें सेविकेस सांगून बिल मागविलें. बिल दहा शिलिंग झालें. तें देऊन मी आपली हँडबॅग घेऊन बाहेर पडलों. प्रथमतः गांवाबाहेरील स्त्रियांचें **गर्टन कॉलेज** पहावें असा बेत करून मी गर्टनला जाणाऱ्या **बस**मध्यें बसलों. ही **बस**

शहराच्या मुख्य मुख्य रस्त्यानें जात असल्यामुळें आदल्या दिवशीं पाहिलेलीं कॉलेजें व इतर इमारती यांचें ओझरतें कां होईना पुनर्दर्शन घडलें. आमची **बस** मोठ्या पुलाजवळ आली; हा पूल मी आदल्या दिवशीं पाहिला नव्हता. येथपासून सर्व देखावा पूर्वीं न पाहिलेला होता. पूल टाकल्यावर तुरळक इमारती लागतात. नंतर शहर संपतें व शेतें व मळे लागूं लागतात. मध्येंमध्यें एखादा बंगला दृग्गोचर होतो. गर्टन कॉलेजच्या अलीकडे **बसचें** शेवटचें थांबण्याचें ठिकाण आहे. येथून आलेली **बस** परत जाते.

मी थोडासा चालत पुढें गेलों तों झाडींतून कॉलेजच्या प्रवेशद्वाराचा उंच मनोरा दिसूं लागला. जरा पुढें गेल्यावर कॉलेजच्या मोठ्या आवाराचें फाटक लागलें. त्यांतून आंत शिरून प्रवेशद्वाराशीं गेलों. ही इमारत विटांची आहे व इमारत नवीन असल्यामुळें विटा तांबड्यालाल दिसत होत्या. दिसण्यांत इमारत सुबक दिसते. आंत गेल्यावर द्वारपालाला कॉलेज पहावयाचें आहे; तेव्हां परवानगी कोठें मिळेल म्हणून विचारलें. त्यानें समोरच्या वाटपाही खोलींत बसण्यास सांगितलें. थोड्या वेळानें एक बाई हंसतमुख आली. माझी चवकशी करून तिनें कॉलेज दाखविण्याचें कबूल केलें. प्रथमतः तिनें मला प्रार्थनामंदिराला नेलें. हें प्रार्थनामंदिर केंब्रिज कॉलेजच्या प्रार्थनामंदिराप्रमाणें मोठ्या कलाकौशल्याचें व नक्षीचें मंदिर नाहीं. इमारत अगदीं साध्या बांधणीची व बिननक्षीची आहे; पण त्याची लांबीरुंदी व उंची प्रमाणशीर असल्यामुळें मंदिर सुबक दिसतें. नंतर आम्हीं कॉलेजच्या जेवणाच्या दिवाणखान्यांत गेलों. न्युन्हमप्रमाणें येथें चार निरनिराळे दिवाणखाने नाहींत; तर इतर मुलांच्या कॉलेजाप्रमाणें सर्व विद्यार्थिनी एकाच दिवाणखान्यांत एकदम जेवावयास येतात; नंतर मुलींच्या राहाण्याच्या खोल्या पाहिल्या; त्या नीटनेटक्या व सुबक सामानानें शृंगारलेल्या होत्या. या कॉलेजांत त्या बाईनें एक प्रशस्त खोली दाखविली; त्या खोलीच्या सर्व भिंतभर लोकरी व जरतारी नक्षी

काम केलेले पडदे किंवा गालीचे (Tapestry) टांगलेले होते; त्या पडद्यांचें काम फार कलाकुसरीचें होतें; त्यांवर निरनिराळया पशुपक्षांचीं हुबेहुब चित्रें विणकामांत काढलेलीं होतीं; नाना तऱ्हेच्या वेली, झाडें व कमळें यांचीं सुंदर चित्रें होतीं. सारांश, आपल्या इकडे काश्मीरांत ज्या प्रकारचें सुबक काम शालीवर करतात त्यापेक्षांहि सुंदर असें काम पडद्यांवर केलेलें होतें. हे सर्व पडदे एका बाईनें आपल्या हातानें विणलेले आहेत व त्या बाईचा फोटो त्या खोलींत टांगलेला आहे असें मार्गदर्शिकेनें सांगितलें. तेव्हां मी आश्चर्यानें थक्क झालों. काय विलक्षण कौशल्य! किती किचकट हें काम! त्या कुशल बाईची चिकाटी तरी किती विलक्षण! मोठमोठे पडदे विणण्यास त्या बाईस वर्षानुवर्षें लागलीं असलीं पाहिजेत असें माझ्या मनांत आलें. याप्रमाणें त्या विणकामाचें आश्चर्य करीत मी मार्गदर्शिकेचे आभार मानून कॉलेजच्या प्रवेशद्वाराशीं आलों. तेथून मी परत **बसच्या** ठिकाणाकडे गेलों; तों **बस** निघावयाच्या तयारींत होती. आतां मी मोठ्या पुलाशीं उतरावयाचें तिकीट घेतलें व पुलाजवळ येतांच मी खालीं उतरलों.

या पुलाला मोठा पूल किंवा **मॅगडेलेन** पूल असें म्हणतात. कारण **मॅगडेलेन कॉलेज** नदीच्या पलीकडे व नदीला लागून आहे. **गर्टन** कॉलेजकडून मी आल्यामुळें अर्थात् तें मला नदीच्या अलीकडे व डाव्या हाताला लागलें. या कॉलेजाचे दोन चौक एकामागें एक असे आहेत; व शेवटीं मॅगडेलेनचा विद्यार्थी प्रसिद्ध रोजनिशी लिहिणारा **पेपीज** यांच्या नांवाचें ग्रंथालय आहे. या कॉलेजाच्या इमारती विटांच्या आहेत. त्या विटा काळसर बुरसट झाल्यामुळें इमारती पहातांक्षणीं जुन्यापुराण्या दिसतात. हें कॉलेज पाहून झाल्यावर गांवांत न शिरतां पश्चिमेकडे जाणाऱ्या **नॉरदॅमटन** स्ट्रीटनें मी पुनः केंब्रिजचा प्रख्यात **मागील मार्ग** या रस्त्यानें जाण्याचा बेत केला. कारण आदले दिवशीं या रस्त्याला आम्हीं मधूनच लागलों होतों. **नॉरदॅमटन** स्ट्रीट हा रस्ता प्रख्यात **मागील मार्गाच्या** तोंडालाच मिळतो. व मग तो **मागील मार्ग** नदीला

समांतर व थेट दक्षिणेस जातो. " पुनः पुनः पाहिलें तरी ज्याचा नवीनपणा जात नाहीं तें खरें रमणीय होय. " अशा अर्थाच्या संस्कृत सुभाषिताची या **मागील मार्गा**मधून जातांना मला राहून राहून आठवण होत होती. काय तो सुंदर देखावा; तो सारखा सरळ रस्ता; ते मोठमोठे गर्दच्छाय वृक्ष, ज्यानीं जणूं तो सर्व रस्ता कमानदार बोगदा बनविला आहे; जाळीदार कपडयाच्या पडद्याआडून ज्याप्रमाणें वस्तू अंधुक अंधुक दिसाव्या त्याप्रमाणें गर्द झाडींतून मधून मधून डोकावणाऱ्या त्या कॉलेजच्या इमारती व त्यांचीं सुंदर सुंदर शिखरें व मनोरे; तीं कॉलेजाचीं लोखंडीं फाटकें; ते नाना आकाराचे व नाना प्रकारच्या दगडांचे कॉलेजांचे पूल व तुडुंब भरून वाहणारी ती नदी, सभोंवारची ती हिरवीगार व सपाट जमीन; किती अप्रतिम हा देखावा ! आदल्या दिवशीं डाव्या बाजूस क्रीडांगणाखेरीज मला कांहीं एक दिसलें नव्हतें; पण दुसऱ्या दिवशीं पहातपहात जातांना डाव्या बाजूस मला एक नवी इमारत दिसली; म्हणून मी आंत शिरलों. ही इमारत **क्लेअर कॉलेजची** महायुद्धानंतर बांधलेली इमारत असें कळलें. ही कोरी करकरीत शुभ्र इमारत त्या खुल्या व हिरव्यागार जागेवर फार उठावांत दिसते. ही इमारत फार लांबट आहे; इमारतीच्या बरोबर मध्यें मोठ्या थोरल्या खांबावर भली मोठी कमान असून तिच्या खालून मागें जाण्यास खुला मार्ग ठेवलेला आहे. या प्रशस्तमार्गामुळें मागचापुढचा दूरवरचा देखावा एकदम दिसून पाहणाराला सानंद आश्चर्य वाटतें ! आंत गेल्यावर दुरून एकच दिसणाऱ्या इमारतीचे दोन सारखेसारखे भाग आहेत असें कळून येतें.

केंब्रिजच्या सुंदर वनश्रीचें याप्रमाणें पुनर्दर्शन घेत घेत मी नवा **फेन कॉजवे** पूल ओलांडून **ट्रंपिंग्डन** रस्त्याला येऊन मिळालों. या रस्त्यानें गांवांत शिरतांना डाव्या हाताला **फिट्झवुइल्यम** पदार्थसंग्रहालय लागतें. तेव्हां तें पदार्थसंग्रहालय पहावें म्हणून मी आंत गेलों. या पदार्थसंग्रहालयाचा बाह्य देखावा थेट ब्रिटिश म्युझियमच्या इमारतीसारखा आहे. अर्थात् ही इमारत ब्रिटिश म्युझियमपेक्षां लहान आहे.

पण बांधण्याची धर्ती व बांधकाम अगदीं सारखें आहे. विलायतेंतील कोणतेंहि पदार्थसंग्रहालय पहा; त्याची साधारण मांडणी व व्यवस्था सारखीच असते; कॅटलॉग विकत घेतला कीं त्याच्या मदतीनें आपल्याला वाटेल तो भाग पहातां येतो; प्रत्येक संग्रहालयाला चित्रालयाचें एक दालन असावयाचें व त्यामध्यें प्रसिद्ध चितार्‍यांचीं प्रख्यात चित्रें किंवा त्यांच्या हुबेहुब नकला ठेवलेल्या असावयाच्याच. पण हीं पदार्थसंग्रहालयें इतकीं मोठीं व नानाविध वस्तूंनीं भरलेलीं असतात कीं तीं सर्व पाहीन म्हटलें तर तें काम कधीं संपावयाचें नाहीं. तेव्हां अंथरूण पाहून हातपाय पसरावे या म्हणीप्रमाणें वेळ पाहून पहावें असें करण्याखेरीज गत्यंतर नाहीं. दुपारच्या एकाच्या सुमारास मी संग्रहालयाबाहेर पडलों. मग **ट्रंपिंग्डन** रस्त्याच्या वाटेनें लागणार्‍या कॉलेजाकडे पुनः एकदां नजर टाकीत व कितीतरी हीं येथें कॉलेजें आहेत असें राहून राहून मनांत म्हणत मी पुनः मुख्य रस्त्याला आलों. जेथें आदल्या रात्रीं जेवण केलें होतें त्याच रेस्टॉरँटमध्यें दोनप्रहरचा फराळ केला; तोंच दोन वाजले. आतां केंब्रिजमध्यें पहावयाचें कांहीं एक राहिलें नाहीं. निदान दीड दिवसांत ओझरतें कां होईना पण केंब्रिज विद्यापीठाचें प्रत्यक्ष दर्शन घडलें म्हणून मोठ्या प्रमुदित मनानें मी चालत स्टेशनला आलों. तीन बावन्नाच्या गाडीनें निघालों तों बरोबर सहा वाजतां **लिव्हरपूल** स्टेशनला पोहोंचलों. भुयारी रेलवेनें व **बसनें** बरोबर सात वाजतां रात्रीच्या जेवणाच्या वेळेला बिन्हाडीं आलों. माझा मुलगा व आमची घरधनीण माझी वाट पहात होती. मी केंब्रिज पाहून सुखरूप परत आलों हें पाहून त्यांना आनंद झाला व केंब्रिजबद्दल बोलतबोलत मोठ्या मजेनें आमचें भोजन झालें.

याप्रमाणें एका आठवड्यांत मी ऑक्सफर्ड व केंब्रिज हीं दोन जुनीं विद्यापीठें व तेथलीं सुमारें पन्नासावर कॉलेजें पाहिलीं व त्याबद्दलची माहिती मिळविली. यामुळें कितीतरी अधिक गोष्टी मला कळल्या.

आधीं एकच नांवाच्या कॉलेजांचें मला नवल वाटलें. कॉलेजांच्या याद्या पहातां सात कॉलेजांना दोन्ही विद्यापीठांत सारखींच नांवें आहेत असें दिसलें. तीं कॉलेजें म्हणजे **क्विन्स, मॅगडेलन, कॉरपस क्रिस्टी, ट्रिनिटी, सेंट जान्स, जीजस** व **पेंब्रोक** हीं होत. पण यांचे संस्थापक एकच आहेत अशांतला भाग नाहीं. हीं सारखीं नांवें यदृच्छया व आपाततः पडलीं आहेत. दोन्हीं विद्यापीठांतील बहुतेक सर्व कॉलेजें निरनिराळया व्यक्तींनीं मोठमोठ्या देणग्या देऊन स्थापन केलेलीं आहेत. त्यांमध्यें राजेराण्या आहेत; धर्मोपदेशक व धर्माधिकारी आहेत; मुत्सद्दी राजकारणी पुरुष आहेत व दानशूर खासगी गृहस्थ व स्त्रिया आहेत. प्रथमतः या संस्था धार्मिक बुद्धीनें अस्तित्वांत आल्यामुळें बहुतेक सर्व कॉलेजांना जोडलेलीं प्रार्थनामंदिरें आहेत.

शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा खर्च भागविण्याकरितां सर्व संस्थापकांनीं पैशाची कायमची तरतुद केलेली आहे. बहुतेक सर्व कॉलेजांच्या स्थापनेच्या इतिहासांत ‘ अमुक इतके शिक्षक व अमुक इतके विद्यार्थी यांचा योगक्षेम चालेल इतकी देणगी कॉलेजला देऊन कॉलेज स्थापन केलें ’ अशा प्रकारचा मजकूर सांपडतो. अर्थात् या दोन विद्यापीठांतील कॉलेजांची सांपत्तिक स्थिति हिंदुस्थानांतील कॉलेजांपेक्षां अगदीं निराळी आहे. इकडल्या. कॉलेजांना सरकारी मदत व विद्यार्थ्यांची फी या दोन्हींवर सर्वस्वीं अवलंबून राहावें लागतें. पण ऑक्सफर्ड व केंब्रिजमधील कॉलेजांना सरकारच्या मदतीची जरूरी नाहीं व विद्यार्थ्यांच्या संख्येचीहि गरज नाहीं. यामुळें इतकीं कॉलेजें एकमेकांजवळ असून त्यामध्यें जीवजाई चढाओढ नाहीं; सर्वांना गुण्यागोविंदानें राहतां येतें. अहमहमिका असली तर ती निरनिराळया विषयांत विद्याभिवृद्धि व ज्ञानसंशोधन अधिक कोणत्या कॉलेजांत होतें याबद्दल असते. शिवाय, या कॉलेजांमध्यें विद्यार्थ्यांच्या मानानें शिक्षकवर्ग बराच मोठा असतो. प्रत्येक विद्यार्थ्यावर कोणाना कोणा शिक्षकाची प्रत्यक्ष व सतत नजर व विचारपूस असते. खेरीज, प्रत्येक कॉलेजाचा ग्रंथसंग्रह व इतर विद्याभि-

वृद्धीचीं साधनें विपुल असतात. यामुळें तिकडल्या कॉलेजांत विद्याभ्यास व शास्त्रज्ञान अव्वल दर्जाचें होतें. खेरीज तिकडे विषय कोणतेहि व कितीहि निरनिराळे असले तरी बोधभाषा एकच इंग्रजी असते व ती भाषा शिक्षक व विद्यार्थी यांची मातृभाषा असते. अर्थात् परदेशाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांना किंवा परदेशच्या शिक्षकांना ही गोष्ट लागू नाहीं. पण असे इसम अपवादात्मक होत.

कोठें तीं स्वतंत्र वृत्तीचीं, विद्यावृद्धि हेंच ध्येय ठेवणारीं, ज्ञानदान व संशोधन या संबंधींच्या उपकरणांनीं युक्त, अशीं संपन्न कॉलेजें व कोठें हिंदुस्थानांतील सरकारी मदतीवर व मुलांच्या फीवर सर्वस्वी अवलंबून असणारीं, कायदे व नियम यांनीं जखडलेली; परीक्षेंत अधिक मुलें कशी पास होतील येवढेंच ध्येय ठेवणारीं, विद्येच्या उपकरणांची कशी बशी जमवाजमव करणारीं अशीं धनहीन कॉलेजें ! तेव्हां या दोन प्रकारच्या कॉलेजांतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व नैतिक सामर्थ्यामध्यें जमीनअस्मानाचें अंतर पडावें यांत काय नवल ? पण आमच्या इकडील श्रीमंत पुत्रहीनाचें लक्ष या कॉलेजांकडे वळून त्यांनीं कुपुत्र निपजणाऱ्या मुलांना दत्तक घेण्याऐवजीं अशा कॉलेजरूपी संस्थांना दत्तक घेतलें तर पांचपंचवीस वर्षांत आमच्या कॉलेजांची सुस्थिति कां होणार नाहीं असें माझ्या मनांत आलें. पण आतां विचारतरंगांचें जाळें अधिक न विणतां येथेंच त्याला निर्गांठ मारून पुरें करतों.

# प्रकरण १३ वें

## स्कॉटलंडची राजधानी एडिंबरा.

मी परदेशीं एकंदर दहा महिने काढले खरे; पण त्या मानानें मी देशाटन फारसें केलें नाहीं. खुद्द विलायतेंत मी आठ महिने राहिलों. परंतु विलायतेंतल्या तीन देशांपैकीं आयर्लंडचें मी नखसुद्धां पाहिलें नाहीं. स्कॉटलंड देशाचा दक्षिणभाग **फोर्थ खाडीपर्यंत** फक्त पाहिला. इंग्लड देशाचा दक्षिणोत्तर सर्व भाग–**ब्रायटनपासून न्यू कॅसल** व **कोल्डस्ट्रीम** या सरहद्दीवरील गांवापर्यंत–ओझरता कां होईना पण पाहिला. हें दर्शन घडण्याचें कारण मी एडिंबरा शहर पाहण्याकरितां निघालों, तो रात्रींच्या आगगाडीनें न निघतां दिवसा निघणाऱ्या मोटार सर्व्हिसनें गेलों. यामुळें इंग्लंडचा उत्तर सरहद्दीपर्यंतचा सर्व भूमिभाग चालतां चालतां पाहतां आला. लंडनपासून एडिंबरा ४०० मैल आहे. हा एवढा लांबचा प्रवास आम्हीं मोठ्या मौजेंत मोटारनें केला. एडिंबरा शहराची व आमच्या जाता येताच्या मोटार प्रवासाची रोजनिशीवार हकीकत या प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे.

माझा मुलगा मनोहर व मी ता. २२ मार्च १९३० रोजीं सकाळीं न्याहारी करून व बरोबर दोन कातड्याच्या बॅगा घेऊन १४ ग्रँड बिल्डिंग्स ट्रॅफलगार स्क्वेअर डब्ल्यू. सी. २ येथें मोटारीशीं आलों. लंडन ते एडिंबरा मोटारचें दर माणशीं भाडें एक पौंड पडलें. आम्ही आठाचे पूर्वीं स्टँडवर आलों होतों. भराभर इतर प्रवासीहि जमले. मोटारींत पंचवीस माणसांची सोय होती. आम्हीं बावीस माणसें होतों. आठवाजून पांचसात मिनिटांनीं मोटार चालू झाली. लांब प्रवासाच्या इकडील मोटारी-ज्यांना शॅर्बंक म्हणतात–या अलीकडे मुंबईस नव्या चालू झालेल्या '**बस**' प्रमाणें थेट असतात. दोन दोन माणसांना बसण्यासारखीं कोचें दोन्ही बाजूला

असतात व मधून जाण्यायेण्यास लहानसा कॉरिडर असतो. माणसांचें सामान मोटारच्या माथ्यावर व्यवस्थितपणें ठेवण्याची सोय असते. बसण्याच्या जागीं सामान ठेवण्याची मनाई असते; अगदीं लहान हँडबॅगा ठेवण्याकरितां मोटारच्या दोन्ही बाजूंस लहानलहान रॅक्स असतात. अशा सर्व सोयी केलेल्या असल्यामुळें व ठरलेल्या माणसांपेक्षां जास्त माणसें न घेण्याचा निर्बंध नेहेमीं पाळल्यामुळें लांबचा प्रवास सुद्धां फार सुखकारक होतो असा आम्हांला प्रत्यक्ष अनुभव आला.

वर सांगितल्याप्रमाणें आम्हीं आठ सव्वा आठ वाजतां मार्गस्थ झालों. भराभर लंडन शहरांतील गर्दीचे रस्ते टाकून आम्हीं शहराबाहेर आलों व **उत्तरापथ** नांवाच्या ( Great North Road ) राजरस्त्यानें जाऊं लागलों. हा राजरस्ता हिंदुस्थानांतील बादशाही रस्त्याएवढा सुद्धां प्रशस्त नाहीं; हा रस्ता दोन गाड्या किंवा मोटारी एकमेकांच्या बाजूनें जेमतेम जातील इतकाच रुंद आहे. समोरून दुसरी मोटार आली म्हणजे आमच्या मोटार हांकणाराला थोडासा वेगसुद्धां कमी करावा लागे; इतका अरुंद हा राजरस्ता आहे. मात्र रस्त्याच्या दोन्ही बाजूंला चारपांच इंच उंचीच्या पायवाटा सर्व रस्ताभर आहेत. तो सबंद डामराचा निर्धूळ काळसर रस्ता, त्याच्या दोन्ही बाजूस पांढऱ्या दगडांची चारपांच इंचाची पट्टी व पलीकडे त्या हरळीनें हिरव्यागार गालीचाच्या पट्या-सारख्या दिसणाऱ्या पायवाटा; हा देखावा मोठा मनोवेधक वाटतो. या राजरस्त्याला दुतर्फा झाडें नाहींत; पण तिकडल्या थंड हवेमुळें झाडांची आपल्या इकडल्यासारखी आवश्यकता वाटत नाहीं. अशा या सुंदर, सरळ व सपाट रस्त्यानें जातांना मोठी मौज वाटते. मोटारीला गचके मुळींच बसत नाहींत. इंग्लंड हा देश बहुतेक सपाट व सखल असल्यामुळें फारसे चढउतार किंवा दऱ्या खोरीं लागत नाहींत; जिकडे पहावें तिकडे हिरवीं हिरवींगार अशीं मैदानें लागतात; मधूनमधून लहान गांवें लागतात; त्या गांवांतील सार्वजनिक बागा, प्रार्थनामंदिरें हीं दृग्गोचर होतात. याप्रमाणें मोठ्या प्रमुदित मनानें आम्ही सभोंवारची शोभा पहात चाललों

होतों. सारखे तीन तास चालल्यावर बरोबर सवाअकरा वाजतां आमची मोटार **स्टोक रॉचफर्ड** येथील उपाहारगृहाशीं थांबली. हें ठिकाण **ग्रँथॅम** या मोठ्या गांवाचें अलीकडे पांचच मैल असून लंडनपासून १०५ मैलांवर आहे. येथें गांव वगैरे कांहीं नाहीं. पण ठिकाण फार सुंदर आहे. आधीं तें किंचित् उंचवट्याच्या जागीं आहे. समोरच जरा अंतरावर मोठी थोरली गर्दछायेची गर्द आहे. उपाहारगृहाच्या मागें हिरवेंगार खुलें मैदान असून त्यावर गोल्फ खेळण्याची सोय केलेली आहे. याप्रमाणें सभोंवारचा सर्वच देखावा मोठा चित्तार्षक होता. उपाहारगृह या निसर्गरमणीय स्थानाला शोभेसें साधें पण सुंदर होतें. खरोखरीं तें झोंपडीवजा होतें. लांकडी कैच्यांनीं उभारलेलें कोलारू छपर असलेला लांबचलांब दिवाणखाना होता; त्याला एकविटी भिंती व मोठमोठ्या कांचेच्या खिडक्या होत्या; दोन्ही बाजूला रुंद व्हरांडे होते; दिवाणखाना व व्हरांडे या दोन्ही ठिकाणीं ओळीनें जेवणाचीं मेजें मांडलेलीं होतीं; भिंतींना सुंदर रंग दिला असून त्यावर वेलबुट्या काढलेल्या होत्या. दिवाणखान्याच्या एका टोकाला भली थोरली कमान व धुराडें असून शेकोटीची जागा तयार केली होती; त्यमध्यें मोठमोठ्या लाकडांचे ओंडके जळत होते; यामुळें सर्व दिवाणखाना ऊबदार झालेला होता. एकंदर त्या उपाहारगृहाचा स्वच्छपणा, सुबकपणा व टापटीप हीं प्रवाशांचें मन सुप्रसन्न करणारीं होतीं. हा देखावा पाहून प्रवासाचा शीण तावडतोब नाहींसा व्हावा हें स्वाभाविक आहे. येथें आमची मोटार सुमारें पाऊणतास थांबली. आम्हीं येथें दोनप्रहराचा फराळ केला. फराळाचे पदार्थ रुचकर होते. बरोबर बारा वाजतां आम्ही पुढल्या मार्गाला लागलों. आणखी तीन सवातीन तास सारखे चालल्यावर एका खुल्या मैदानावरील उपाहारगृहाशीं आम्हीं चहाकरितां थांबलों. तेव्हां सवातीन वाजले होते. हें ठिकाण म्हणजे एक एकाकी सपाट व सखल अशा खुल्या माळावर उभारलेलें उपाहारगृह होय. हें **स्टोक रॉचफर्ड** इतकें निसर्ग रमणीय नव्हतें. उपाहारगृह सामान्य झोपडीवजा होतें. येथें आम्हीं फार वेळ थांबलों नाहीं. पुनः

मार्गस्थ झाल्यावर लागलीच **डॉंकॅस्टर** शहर लागलें. हें शहर बरेंच मोठें व गजबजलेलें आहे असें दिसलें. येथें आम्हीं विजेची '**बस**' सर्व्हिस पाहिली; ही ट्रॅम सारखी विजेच्या उंचउंच तारांच्या साहाय्यानें चालत असे; पण रस्त्यावर रूळ नव्हते. म्हणजे हिला बिन-रुळी विजेची ट्रॅम म्हणतां येईल. अशाप्रकारची ट्राम किंवा बस सर्व्हिस मीं पूर्वीं कोठेंहि पाहिली नव्हती. पण त्यावेळीं माझ्या मनांत अशी कल्पना आली कीं आपल्या हिंदुस्थानांत जेथें विजेचे कारखाने झाले आहेत व जेथून दूरवर विजेच्या तारा नेल्या आहेत अशा भागामध्यें अशी विजेची '**बस**' सर्व्हिस कां काढतां येऊं नये. येथें व दुसऱ्याही दोनतीन शहरांत आम्हांला वाहनांचें नियमन विजेच्या साहाय्यानें बिनपोलीस करण्याची सोय केलेली दिसली. जेथें जेथें मोठमोठे चौक असून चार रस्त्यांनीं वाहनें येतात तेथें चौकाच्या मधोमध मोठा खांब असून त्या खांबावर '**थांबा, जा,**' अशा अक्षरांच्या पाट्या मिनिटा दोन मिनिटांच्या अंतरानें आपोआप रस्त्यासमोर येत. म्हणजे कोणत्याहि वाहनानें '**जा**' अशीं अक्षरें दृष्टीस पडल्यावांचून पुढें जातां कामा नये. या वाहननियमनाचें प्रथम पहाणाराला मोठें आश्चर्य वाटतें. **डॉंकॅस्टर** शहर टाकून आम्हीं पुढें मार्गस्थ झालों तों पावणेसहा वाजतां **न्यु कॅसल** या मोठ्या शहरीं आलों. शहराच्या एका प्रशस्त रस्त्याला लागून मोटारस्टँड होता. येथें पाऊण तास थांबावयाचें आहे व येथें जेवण उरकून घ्यावें असें मोटार ड्रायव्हरनें आम्हांला सांगितलें. Carrying coals to New castle ही म्हण हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांना दुय्यम शिक्षण चालू असतांपासून माहिती होते; त्याप्रमाणें ती मलाही माहीत होती. तेव्हां विद्यार्थीदशेपासून श्रुतिपरिचित **न्यु कॅसल** शहर प्रत्यक्ष पाहण्यास मिळालें म्हणून मला विलक्षण आनंद झाला. बाकी शहराच्या आसपास काळसर जमीन, धुरकट वातावरण व कोळशाचे ढीग यांखेरीज कोळशाच्या खाणीचें हें आगर आहे असें समजण्याला दुसरें कांहींएक साधन नाहीं. आम्हीं एका मोठ्या रस्त्यावरील फॅशनेबल उपाहारगृहामध्यें

जेवण केलें. मग जरा इकडे तिकडे हिंडलों; तोंच आमची निघण्याची वेळ झाली; म्हणून आम्हीं मोटारींत बसलों. सुमारें साडेआठ वाजतां आमची मोटार मद्यपानप्रिय प्रवाशांच्या सोयीकरितां एका दारूदुकाना-जवळ थांबली. आम्हां दोघांतिघांखेरीज बहुतेक प्रवासी आपआपलें आवडतें पेय पिऊन आले व लागलीच मोटार पुढें चालू झाली. एव्हां-पासून थंडी खूप लागूं लागली व पायावर ब्लँकेट घेण्याची आवश्यकता वाटूं लागली; एका कोचाला एक ब्लँकेट याप्रमाणें तजवीज लांबच्या प्रवासांत केलेली असते.

आम्हांला इतकी थंडी कां वाजावयास लागली याचें कारण आम्हीं काचेच्या खिडकींतून पाहतां तावडतोब ध्यानांत आलें. तो अद्वितीय देखावा मी आमरणांत विसरणार नाहीं. जिकडे पहावें तिकडे पांढरें पांढरें शुभ्र बर्फ पडलेलें होतें; आजूबाजूचीं झाडेंझुडपें, कुंपणी, उंच-वटच्याच्या जागा या सर्व बर्फमय झाल्या होत्या. जिकडे नजर टाकावी तिकडे बर्फच बर्फ! रस्त्यावर फूटफूट बर्फाचा थर; रस्त्याच्या बाजूच्या पायवाटा बर्फानें आच्छादिलेल्या होत्या. रस्ता व पायवाट यांचा भेद दिसत नव्हता. आमची मोटार बर्फावरून जातांना बर्फामध्यें चकारी पाडून जात होती; यामुळें कांहींएक अपूर्व असा आवाज होई. याप्रमाणें मैलचे मैल हिमधवल रस्त्यांतून आम्ही जात होतों. प्रथमतः माझें मन आश्चर्यचकित झालें, पण थोडच्या वेळानें या विलक्षण अनुभवाची आम्हांला मौज वाटत गेली. पुढें बर्फ कमी झालें आहे असें दृष्टीस पडूं लागलें. कारण मधूनमधून साधा व भिजलेला रस्ता लागूं लागला. थोडयाच वेळानें आम्ही एडिंबरा शहरानजीक आलों असें समजलें. बरोबर रात्रींचे सवादहा वाजतां आम्हीं ६३ **प्रिन्सेस स्ट्रीट** या मोटारच्या विश्रांतिगृहाशीं पोहोंचलों. चारशें मैलांचा प्रवास आम्हीं बरोबर चवदा तासांत केला. तो प्रवास बिनत्रासाचा बिनअपघाताचा झाला म्हणून आम्हांला फार आनंद वाटला. आम्हीं मोटारींतून बाहेर येतों तोंच माझ्या मुलाच्या एडिंबरा येथें राहणाऱ्या एका विद्यार्थी मित्रानें ( याला

आम्हीं आमच्या येण्याचा दिवस व वेळ आधीं कळविली होती व त्यानें आमची राहण्याची सोय करून ठेविली होती ) आमचें स्वागत केलें. तेव्हां आमचा आनंद द्विगुणित झाला. आम्हीं आपल्या बॅगा घेऊन आमच्या मित्राबरोबर त्यांनीं ठरविलेल्या ऍंड्र्यूज हॉटेलमध्यें नंबर ५२ च्या **दोन–माणशी** खोलींत प्रवेश केला. आमचें जेवणखाण आटोपलें होतें. आमच्या मित्रानें दुसऱ्या दिवशीं सकाळीं न्याहारीनंतर दृश्यदर्शनाकरितां येण्याचें कबूल केलें व आम्हांला '**शिवरात्र**' करून तो आपल्या बिऱ्हाडीं गेला. चारशें मैलांच्या मोटार प्रवासानें आम्हांला विश्रांतीची जरूरी होती; तेव्हां आंथरुणावर आंग टाकतांच निद्रादेवीनें आमच्यावर अनुग्रह केला.

आम्हीं एडिंबरा येथें तीन दिवस राहिलों. तेव्हां आमच्या येथल्या दृश्यदर्शनाचें वर्णन मी रोजनिशीवार करणार आहें. पण प्रथमतः एडिंबरा शहराचें सामान्य स्वरूप, त्याची भौगोलिक ठेवण व त्याची पूर्वपीठिका यांचें संक्षेपतः निरूपण करणें गैर होणार नाहीं.

एडिंबरा हें शहर अगदीं चौकोनी आकाराचें आहे; त्याची पूर्व-पश्चिम व दक्षिणोत्तर लांबी सारखीच म्हणजे पांचपांच मैल आहे. अर्थात् लंडनपेक्षां हें पुष्कळ लहान आहे. याची लोकसंख्या सवाचार लाख आहे. या शहराचे जुनें शहर व नवें शहर असे दोन भाग आहेत; जुनें शहर दक्षिणेकडे असून बऱ्याच उंचवट्यावर आहे; नवें शहर उत्तरेस असून तें बरेंच सखल आहे. एकंदर शहराच्या भूमिभागाचा उतार दक्षिणेकडून उत्तरेस आहे. कारण एडिंबरा शहराचें बंदर गोद्या बोटींचे धक्के वगैरे सर्व जलमार्गाच्या सोयी शहराच्या उत्तरेस असलेल्या **फोर्थ** खाडीवर आहेत. म्हणून भूमिभागाचा उतार स्वाभाविक उत्तरेकडे आहे. शहराच्या पश्चिमभागाकडून **लीथ** नावाचा ओढा दक्षिणोत्तर वहात जातो. शहराच्या दक्षिण पश्चिम व पूर्व अशा तिन्ही दिशांना अनुक्रमें माथ्यावर बादशाही वेधशाळा असलेल्या **ब्लॅकफर्ड** टेकड्या, सर्वांत उंच टोंक असलेली **प्रख्यात**

**आर्थरसीट,** व प्राणिसंग्रहालय असलेल्या **कॉरस्ट्रोरफाईन** टेंकड्या आहेत; शिवाय खुद्द नव्या व जुन्या शहराच्या मधोमध नैऋत्य व ईशान्य दिशेला अनुक्रमें **किल्ल्याची** टेकडी व **काल्टन** टेकडी नांवाच्या दोन टेकड्या आहेत. म्हणून एडिंबरा शहर टेकड्या-टेकड्यांमध्यें वसलेलें आहे; जणूं कांहीं टेकड्यांचें त्या शहराला कोंदणच केलेलें आहे. या हिरव्यागार टेकड्यांवरून शहरांची आश्चर्यकारक शोभा दिसून येते; हिवाळ्यांत बर्फ पडल्यावर या सर्व टेकड्या हिममय होऊन धवलवस्त्र परिधान करतात. जणूं कांहीं निसर्गदेवी केव्हां हिरवा शालू पांघरते; तर केव्हां पांढरा शुभ्र शालू पांघरते! एडिंबरा शहराच्या या भौगोलिक विशेषामुळें " ब्रिटिश बेटांतील सर्वांत सुंदर व चित्ताकर्षक शहर " अशी त्या शहराची सर्वतोमुखी कीर्ति पसरली आहे.

एडिंबरा शहराची पूर्वपीठिका लंडनइतकी जुनी नसली तरी या शहराला राजधानीचा मान सातव्या शतकांत मिळाला. सन ६१७ मध्यें **एडविन** हा **नार्दंब्रियाचा** राजा झाला व त्यानें किल्ल्याच्या टेकडीभोंवतीं गांव बसविलें व त्याला एडविन्सबर्ज ( Edwin's burg ) असें नांव ठेवलें. या नांवाचें रूपांतर अर्वाचीन एडिंबरा ( Edinburgh ) या नांवांत झालें आहे. पण एडिंबरा शहराची खरी वाढ स्टुअर्ट घराण्यांतील दुसरा जेम्स याचे कारकीर्दीपासून झाली. कारण एव्हांपासून स्कॉटलंडचे राजे येथें सतत राहूं लागले व त्यांनीं नवे राजवाडे व इतर इमारती बांधण्यास सुरवात केली व मग सरदार मंडळीही राजांचें अनुकरण करूं लागली. चवथ्या जेम्स राजाची कारकीर्द म्हणजे एडिंबरा शहराचें **सुवर्णयुग** होय. कारण या राजाला वैभवाची हौस होती; शिवाय त्यानें इंग्लंडच्या सातव्या हेन्रीच्या कन्येशीं विवाह केला; याप्रमाणें इंग्लंड व स्कॉटलंड यांचा निकट संबंध घडून आला व लंडन शहराप्रमाणें आपली राजधानी सुशोभित करण्याचें राजानें मनावर घेतलें. एडिंबराचा इतिहासप्रसिद्ध **होलीरूड** राजवाडा यानेंच बांधला. पुढील दोन्ही राजांच्या कारकीर्दींत एडिंबरा शहराची भरभराट होत

गेली. परंतु स्कॉटलंडचा सहावा जेम्स हाच इंग्लंडचा पहिला जेम्स राजा झाला व तो लंडन शहरीं राहूं लागला. त्यामुळें एडिंबरा शहराची राजधानी ही पदवी नाहींशी झाली. तरी पण स्कॉटलंडचें निराळें पार्लमेंट होतें तेथपर्यंत एडिंबरा शहराचें पूर्वीचें महत्त्व कमी झालें नाहीं. इंग्लंड व स्कॉटलंड देशाचें पूर्ण एकीकरण १७०७ मध्यें घडून आल्यापासून तें महत्त्व नाहींसें झालें खरें. याप्रमाणें एडिंबरा शहराचें राजकीय महत्त्व नाहींसें झालें. पण स्कॉटिश लोकांमध्यें प्रतिभावान् लेखक, प्रख्यात गणिती, ओजस्वी धर्मोपदेशक मोठमोठे तत्त्ववेत्ते, प्रख्यात इतिहासकार, परिणामकारक वक्ते व विद्वान् कायदेपंडित, या सर्व काळांत उदयास आल्यामुळें व त्यांनीं एडिंबरा शहर आपलें निवासस्थान केल्यामुळें एडिंबरा शहराला लंडन राजधानीपेक्षां जास्त बौद्धिक महत्त्व आलें व एडिंबरा शहराची '**अर्वाचीन ॲथेन्स**' म्हणून प्रसिद्धी होऊं लागली व त्यामुळें शहराची विलक्षण वाढ होऊं लागली व जुन्या शहराच्या उत्तरेस पटासारखे सरळ व प्रशस्त असलेलें नवें शहर झपाट्यानें वाढत वाढत बंदराला जाऊन भिडलें. अशा इतिहासप्रसिद्ध शहरांतील दृश्यदर्शनाच्या वर्णनास आतां लागूं या.

तारीख २३ मार्च सन १९३० : लांब प्रवासानंतरच्या सुखनिद्रेंतून आम्हीं सकाळीं साडेसहाच्या सुमारास जागे झालों तोंच सेविकेनें **शेजचहा** आणून दिला. चहापानानंतर आम्हीं आमच्या नित्याच्या नेपथ्यविधीला लागलों व पोशाख करून न्याहारीची वाट पहात बसलों तोंच न्याहारीची वर्दी आली व आम्हीं मोठ्या आनंदित अंतःकरणानें खालच्या मजल्यावर असलेल्या खाण्यापिण्याच्या दिवाणखान्यांत गेलों व तेथली व्यवस्था व टापटीप पाहून आमच्या मनाला जास्तच आनंद वाटला. त्या हॉटेलाचा दिवाणखाना प्रशस्त होता; त्याला रस्त्याच्या बाजूला मोठमोठ्या तावदानाच्या खिडक्या होत्या; व त्या दिवशीं आकाश अगदीं निरभ्र असल्यामुळें सर्व दिवाणखानाभर पांढरा शुभ्र प्रकाशच प्रकाश पडला होता; हारीनें जेवणाचीं मेजें मांडलेलीं होतीं;

त्यांवर स्वच्छ चादरी टाकल्या असून प्रत्येक टेबल फुललेल्या कमलवेलीच्या पितळी फुलदाण्यांनीं सुशोभित केलेलें होतें; दिवाणखान्याच्या रुंदीच्या भिंतीमध्यें मोठ्या कमानींत कोळसे जाळण्याकरितां चुलाणें होतें; त्यांतील लाललाल दिसणारे कोळसे सर्व दिवाणखान्याभर उष्णता पसरीत होते. अशा सुंदर व मनाला आनंद देणाऱ्या दिवाणखान्यामध्यें आम्हीं न्याहारी केली व परत आमच्या खोलींत गेलों. थोड्याच वेळानें आमचे मित्र आले व आम्ही लागलीच दृश्यदर्शनास निघालों; रात्रीच्या जेवणापर्यंत आम्ही मध्यें येणार नाहीं असें हॉटेलच्या म्यानेजरास सांगून आम्ही बाहेर पडलों.

आमचें हॉटेल **सेंट अँड्र्यूस** रस्त्यावर होतें. त्या रस्त्यानें आम्ही दक्षिणदिशेनें एडिंबरा शहराचा अलौकिक अलंकार जो प्रख्यात **प्रिन्सेस स्ट्रीट** त्याच्या पूर्वटोकाला आलों. आम्हीं तो देखावा पाहून आश्चर्यचकित झालों; व स्कॉच लोक या रस्त्याला जगांतील सुंदर रस्त्याचा मुकुटमणि कां समजतात हें माझ्या ध्यानांत आलें. हा राजरस्ता पूर्वपश्चिम असून एल्. एन्. ई. आर. रेलवेचें **वेव्हरले** स्टेशन व एल्. एम्. एस्. रेलवेचें **प्रिन्सेसस्ट्रीट** स्टेशन यांना जोडतो; हा राजरस्ता बरोबर एक मैल लांब असून तो इतका सरळ बांधलेला आहे कीं पूर्वटोकापासून सबंद रस्ता स्पष्टपणें दिसतो. या रस्त्याच्या पूर्वेस **काल्टन** टेकडी आहे. उजव्या बाजूला प्रशस्त अशी फरसबंदी पायवाट आहे. त्याला लागून मोठमोठ्या दगडी इमारतींची रांगचरांग दिसते; त्या नानारंगी व नानाआकारांच्या उंच उंच इमारतींची शोभा अवर्णनीय आहे. रस्त्याच्या डाव्या बाजूस बागाचबागा आहेत. राजरस्ता व बागा या एकाच पातळीवर आहेत. पण बागांच्या पलीकडे सुमारें पन्नास पाऊणशें फूट खोल अशी दरी आहे व त्या दरींत **वेव्हरले स्टेशन** व आगगाडीचा रस्ता आहे. दरीच्या पलीकडे एडिंबराचा मूळ किल्ला व उंचवट्यावर वसलेलें जुनें एडिंबरा शहर आहे. अशी या राजरस्त्याची विलक्षण ठेवण आहे.

येथें मनुष्यकृत कलासौंदर्य व देवकृत सृष्टिसौंदर्य यांचा अनुपमेय असा संगम झाला आहे. यामुळें हा अद्वितीय देखावा किती वेळ पाहिला तरी मनाची तृप्ति होत नाहीं; आमच्या मनाची तीच स्थिति झाली. बराच वेळ त्या सुंदर राजरस्त्याची विलक्षण शोभा अनुभवून आम्ही **वेव्हरले** स्टेशनकडे वळलों.

**वेव्हरले** स्टेशन फार खोलांत आहे हें वर सांगितलें आहे. खालीं उतरण्यास लांबचलांब अशा किती तरी पायऱ्यांची रांग लागते. याला **वेव्हरले पायऱ्या** म्हणतात. या पायऱ्यांच्या उजव्या बाजूस **वेव्हरले** बाजार आहे. पायऱ्या उतरून आम्ही स्टेशनाच्या जिन्यावर आलों. हें स्टेशन खोलांत असल्यामुळें खालीं प्लॅटफॉर्मवर उजेड येण्याकरितां स्टेशनचें सर्व छप्पर कांचेचें केलेलें आहे. हें कांचेच्या छपरांचें प्रचंड स्टेशन पाहून मला लंडनमधल्या स्फटिक प्रासादाची आठवण झाली. तो प्रासाद टेकडीच्या माथ्यावर आहे; तर हें स्टेशन दरींत आहे. पण त्या प्रासादाप्रमाणें लांबचलांब असें हें स्टेशन आश्चर्यकारक वाटलें. स्टेशनच्या जिन्यानें आम्ही पलीकडे गेलों. वाटेंत आम्हांला युनायटेड फ्री चर्च कॉलेज लागलें; तें नजरेखालीं घातलें. त्याचेसमोर प्रख्यात धर्मोपदेशक **जॉन नॉक्स** याचा भव्य पुतळा बसविलेला आहे. त्या उंच ठिकाणावरून प्रिन्सेस स्ट्रीटची निराळीच शोभा दिसते. येथून आम्ही अगदीं अरुंद जिन्यावजा पायऱ्यांनीं आणखी उंच गेलों तोंच **हाय स्ट्रीट** नांवाच्या जुन्या शहरांतील सुंदर रस्त्याला आलों. हा रस्ताहि वाखाणण्यासारखा आहे; याचे दोन्ही बाजूंस इमारतीच इमारती आहेत. हा रस्ता किल्ल्यापुढील उंचवट्यापासून निघून **होलीरुड** नांवाच्या स्कॉटिश राजांच्या राजवाड्यापर्यंत गेलेला आहे.

हा रस्ता टाकून आम्ही थेट दक्षिणेकडे चाललों. शहराचा गर्दीचा भाग टाकून शहराबाहेर पडलों तोंच उंच उंच पण हिरवीगार टेकडी लागली; आमच्या मित्रानें तिचे माथ्यावरून फार सुंदर देखावा दिसतो म्हणून सांगितलें; तेव्हां पायवाटेची वाट न पाहतां तसेंच टेकडी चढूं

लागलों तों खडकाच्या खिंडारांतून बर्फ दिसूं लागलें व जसजसे जास्त वर जाऊं लागलों तसतसें जास्त जास्त बर्फ लागूं लागलें. त्यावरून जातांना पाय वसरण्याची भीति वाटे; कांहीं ठिकाणीं तर आम्हांला चढतांना हातापायाचा उपयोग करावा लागला. शेवटीं एकदांचे आम्ही टेकडीच्या माथ्यावर आलों. या टेकडीचें नांव **ब्लॅकफर्ड टेकडी.** माथ्यावरून शहराचा अद्वितीय देखावा दिसत होता. जिकडे पहावें तिकडे पांढऱ्या शुभ्र बर्फमय टेकड्या व डोंगर दिसूं लागले. स्कॉटलंड हा देश इंग्लंडसारखा सपाट नसून दऱ्या खोऱ्यांनीं, टेकड्या डोंगरांनीं विखुरलेला आहे हें या टेकडीच्या माथ्यावरून आमच्या ध्यानांत आलें. खुद्द एडिंबरा शहरसुद्धां टेकड्यांमध्यें वसलें आहे असें दिसलें. शहराच्या तीन्ही बाजूंस टेकड्या दिसत होत्या. उत्तरेस मात्र उतार असून शहर **फोर्थ** खाडीपर्यंत पसरलेलें दिसत होतें; दाट वस्तीच्या मध्य शहरांतसुद्धां **किल्ला व काल्टन** टेकडी समोरासमोर शहराचे जणू कांहीं संरक्षण करणारे जयविजय उभे आहेत असें मला वाटलें. या **ब्लॅकफर्ड** टेकडीच्या खालीं एका बाजूंस सुंदर तलाव दिसत होता. याप्रमाणें शहराची विलक्षण शोभा पहात पहात आम्ही त्या टेकडीच्या माथ्यावर कितीतरी वेळ उभे होतों. परत येतांना टेकडीच्या एका बाजूस असलेल्या वेधशाळेच्या पायवाटेनें आम्ही खालीं आलों; येथें सुद्धां बर्फ वितळून पायवाट चिखलट झाली होती व मधूनमधून बर्फहि दृष्टीस पडत होतें. टेकडीचे पायथ्याशीं आलों तों बारा वाजून गेले होते. म्हणून आम्ही **बस**मधून युनिव्हर्सिटी युनियनच्या ठिकाणीं आलों. स्कॉटिश युनिव्हर्सिटीच्या जुन्या नव्या विद्यार्थ्यांनीं बांधलेली ही चौकोनी सुंदर इमारत आहे; येथें आम्हीं दोनप्रहरचा फराळ केला. तळमजल्याच्या चारी सोप्यांमध्यें जेवणाचीं मेजें मांडलेलीं होतीं; अधिक लोक आल्यास वरच्या गॅलरींतहि बसण्याची सोय केलेली होती. सकाळपासून सारखे तीन तास फिरण्यानें आम्हांला उत्तम भूक लागली होती तेव्हां आम्हीं तेथल्या सुग्रास अन्नाचा चांगला समाचार घेतला हें सांगावयास नको.

फराळ आटोपल्यावर अर्धा तास विश्रांति घेऊन आम्ही आमच्या दृश्य दर्शनास पुनः बाहेर पडलों. प्रथमतः युनियनशेजारीं असलेल्या स्कॉटिश विद्यापीठाची प्रचंड व भव्य इमारत व त्या पीठाचा मोठा पुस्तकसंग्रह यांवर नजर टाकली व मग नजीक असलेलें रॉयल स्कॉटिश पदार्थसंग्रहालय पहाण्यास गेलों. ही इमारत बाहेरून दगडी दिसते; पण आंत गेल्यावर ती लांबचलांब व बरीच अरुंद अशी हलकी लोखंडी तिमजली कांचेच्या छपराची इमारत आहे असें कळून येतें; या इमारतीचे लोखंडी खांब तर इतके बारीक वाटतात कीं एवढी तिमजली व उंचउंच इमारत येवढ्याशा खांबावर राहिली कशी असें आश्चर्य वाटतें. हें पदार्थसंग्रहालय जगांतील नानाविध वस्तूंनीं खचून भरलेलें आहे. विशेषतः सर्व प्रकारचे लहान मोठे पशूपक्षी ( जीवंत नव्हे पण जीवंत वाटतील अशा तऱ्हेनें उभारलेले ( Stuffed birds and animals ) यांचा फारच मोठा संग्रह येथें पाहिला. हा भाग पाहिला म्हणजे एका दृष्टीनें प्राणीसंग्रहालय पाहिल्यासारखें वाटतें. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील नानाविध वस्तू व त्यांचे नमुने येथें ठेविले आहेत. येथें मी सांची येथील स्तूपाचें प्रसिद्ध पूर्वेचें तोरण याचा हुबेहुब नमुना पाहिला; दिल्लीच्या लोखंडी लोहस्तंभाचा नमुना पाहिला. ज्याप्रमाणें हल्लींच्या काळीं एकाच ग्रामोफोनमध्यें हारमोनियम, बँड, मानवी गायन, सनई वगैरे नाना तऱ्हा ऐकावयास सांपडतात त्याप्रमाणें या एका संग्रहालयांत हिंदुस्थान व इतर देश येथील कलाकौशल्य एकत्र पहावयास सांपडलें असें मला वाटलें.

हें पदार्थसंग्रहालय पाहिल्यावर पुनः आम्ही एडिंबरा शहराच्या एका प्रख्यात निसर्गरमणीय स्थानाकडे वळलों. या ठिकाणाचें वर्णन स्कॉटनें आपल्या प्रख्यात '**हार्ट ऑफ मिडलोथीयन**' या कादंबरींत केलेलें आहे. तें ठिकाण म्हणजे **आर्थर सीट** नांवाचा निसर्गसुंदर असा एका उंच टेकडीचा माथा होय. पदार्थसंग्रहालयाच्या थेट पूर्वेस ही टेकडी आहे. आम्ही चालत टेकडीच्या पायथ्याला गेलों. समोर **सॅलीसबरीक्रॅग्स** नांवाचा टेकडीचा सुळक्यासारख्या भीषण खडक दृग्गोचर

होतो. त्याला डावीकडे टाकून एक पायवाट टेकडीवर जाते. त्या वाटेनें आम्ही गेलों. साधारण दीडएकशें फूट उंच गेल्यावर आम्हांला एक सुंदर मोटार रस्ता लागला. येथून शहराचा देखावा मोठा रमणीय दिसला. हा सुंदर रस्ता थोड्या थोड्या चढवानें जणूं कांहीं टेकडीला प्रदक्षिणा घालीत जातो; यामुळें टेकडी चढण्याचे श्रम वाटत नाहींत व चढत्या पण निरनिराळ्या बाजूनें शहराची शोभा निरनिराळ्या प्रकारची दिसते. या रस्त्यानें जातांना आम्हांला म्हैसूर शहराच्या नजीकच्या चामुंडी टेकडीच्या चढणीची आठवण झाली. एडिंबरा शहर व त्याची **आर्थर सीट** टेकडी व म्हैसूर शहर व त्याची **चामुंडी** टेकडी यांत विलक्षण साम्य आहे असें मला वाटलें. दोन्ही टेकड्यांवर चढतांना शहराचा **नवोनवोऽयमक्ष्णोः** असा देखावा दिसतो. आम्ही जसजसे टेकडीवर जाऊं लागलों तसतसें बर्फानें शुभ्र केलेले टेकडीचे कानेकोपरे दिसूं लागले. टेकडीच्या सुमारें अर्ध्यावर गेलों तेव्हां थोडीशी खोलगट जागा लागली; तेथें एक छोटासा तलाव होता. त्या तलावावर अंगठ्या येवढा जाड बर्फाचा थर झाला होता. टेकडीच्यावर अझून इतकी थंडी होती. आम्ही तलावाच्या कांठावर जाऊन भाकरीसारखे जाड बर्फाचे शुभ्र तुकडे काढले; बर्फाची अशी विलक्षण मौज मला अननुभूत होती, तेव्हां त्या गोष्टीचें किती नवल वाटलें असेल याची वाचकांना सहज कल्पना येईल. आम्ही असे तुकडे घेऊन तलावाच्या बर्फमय पृष्ठभागावर फेकले; बर्फाच्या गुळगुळीत व सपाट पापुद्र्यावरून ते तुकडे कितीतरी लांबवर जात. तलावाच्या पाण्यावर दगड फेकून भाकऱ्या करण्याच्या खेळाचें मला यावेळीं स्मरण झालें; तलावाच्या पाण्यावर फेकलेला दगड ज्याप्रमाणें दूरवर जातो त्याप्रमाणें बर्फाच्या भाकऱ्या बर्फमय तलावाच्या पापुद्र्यावरून सरकन जात होत्या. याप्रमाणें आह्मीं थोडा वेळ त्या तलावाजवळ खेळत बसलों; त्यानें मौज वाटली व चढण्याच्या श्रमाचाहि आपोआप परिहार झाला व मग **आर्थरसीटवर** चढण्याला हुरूप आला. थोड्याच वेळानें आम्ही टेकडी-

च्या माथ्यावर त्या **आर्थरसीटवर** आलों. येथून एडिंबराच्या आसपासचा देखावा विलक्षण दिसत होता; दूरवरच्या टेकड्या पांढऱ्या पांढऱ्या शुभ्र दिसत होत्या. **आर्थरसीटवर** छातीइतका एक चौकोनी खांब बांधलेला आहे, व त्याच्या माथ्यावर वर्तुळ काढून बाणाच्या टोंकांनीं शहरांतील प्रख्यात स्थळें दर्शविलीं आहेत. ज्याप्रमाणें **ऑक्सफर्डमधील कॅमेराच्या** वर गेल्यावर नकाशाच्या साहाय्यानें शहरांतील प्रख्यात स्थळें पाहण्याची सोय केली आहे तशी कायमची व फुकटची या खांबावरील वर्तुळाकार नकाशाची सोय आहे. याठिकाणीं कितीवेळ पहात राहिलें तरी मनाची तृप्ति होत नाहीं. काय तो अवर्णनीय देखावा उत्तरेस **फोर्थ**खाडीचें लांबचलांब नीलवर्ण पाणी दृग्गोचर होतें; दक्षिणेस **ब्लॅकफर्ड** व **ब्रेड** नांवाच्या टेकड्या दिसत होत्या, पश्चिमेसहि **कॉरस्टोरफाईन** टेकड्यांची रांग दृष्टीस पडत होती. शहर या कोंदणामध्यें जणूं कांहीं बसलं आहे असें वाटतें. आर्थर टेकडीच्या दक्षिण पायथ्याला **डॅडिंग्टन** सरोवर आहे व त्याचा सुंदर देखावा वरून दिसतो. याप्रमाणें शहराची नानाविध शोभा पहातां पहातां सायंकाळ झाली म्हणून आह्मांला निरुपाय ह्मणून घाईघाईनें खालीं उतरावें लागलें व मग आम्ही **बसनें** आमच्या बिऱ्हाडीं पोहोंचलों. दुसऱ्या दिवशीं पुनः न्याहारीनंतर येण्याचें ठरवून आमचे मित्र आपल्या बिऱ्हाडीं गेले.

ता. २४ मार्च सन १९३०:—कालच्याप्रमाणें आजचा दिवस निरभ्र होता. आम्हीं साडेनऊ वाजतां बिऱ्हाडाहून निघालों व चालत प्रिन्सेसस्ट्रीट बागेच्या वरच्या मजगीपासून पहात पहात बागेच्या अगदीं खोलांतील भागापर्यंत गेलों. या उतरत्या बागेची विलक्षण शोभा दिसते. बागेच्या अगदीं खोल गेलें म्हणजे किल्ल्याच्या खडकाच्या तळाशीं आपण जातों; तेथून हा किल्ला किती दुर्भेद्य आहे याची खरी कल्पना येते. भिंतीसारखा एकजात खडकाचा जणूं कांहीं तट बनला आहे व त्यावेवर किल्ल्यांतील इमारती आहेत असें दिसून येतें. किल्ल्याचें प्रवेशद्वार मागल्या बाजूस असल्यामुळें आम्हांला किल्ल्याला प्रदक्षिणा


घालून प्रवेशद्वाराशीं जावें लागलें. प्रवेशद्वारासमोर लांबच लांब पण चढती अशी फरसबंद खुली जागा आहे. त्याला **एस्प्लनेड** म्हणतात.

या खुल्या जागेवर कितीतरी स्मारकें व स्मारक पुतळे आहेत. सर्वांत अर्वाचीन म्हणजे गेल्या महायुद्धाचे सेनापति **फील्डमार्शल अर्ल हेग** यांचा घोड्यावरचा मोठा भव्य पुतळा नुकताच बसविलेला प्रेक्षकाचें लक्ष वेधणारा आहे. हा पुतळा मुंबईच्या एका धनाढ्य पार्शी गृहस्थानें दिला आहे ही जास्त नवलाची गोष्ट वाटली. हें एस्प्लनेड टाकून पूर्वीच्या खंदकावरील एका पुलावरून प्रवेशद्वारांतून आम्हीं आंत गेलों. तेथें किल्ल्यांतील प्रेक्षणीय स्थळें पहावयाचा पास घेतला. तटाच्या भिंतींतून आंत शिरल्याबरोबर उजव्या हाताला समोर एक नवी सुंदर इमारत लागली. हें महायुद्धामध्यें कामास आलेल्या एक लाख स्कॉटिश शिपायांचें नवें स्मारक होय. इमारत काळसर तांबूस दगडाची आहे. त्यावर खूब नक्षीकाम केलेलें असून जागोजाग कमानींत सांकेतिक पुतळे आहेत. प्रवेशद्वार दक्षिणाभिमुख असून समोर वर्तुळाकार पायऱ्या आहेत. इमारतीच्या बाह्य देखाव्यापेक्षांहि आंतलें काम जास्त श्रीमंती थाटाचें व अप्रतिम कलाकौशल्याचें आहे; इमारत ख्रिश्चन क्रॉसच्या आकाराची असून तिचा गाभारा खूब आंत आहे; सर्व इमारतींत जिकडे तिकडे शिपायांचीं नांवें, चित्रें व त्यांच्या पराक्रमांचे वर्णनात्मक लेख आहेत. अगदीं शेवटीं मखरासारख्या सुंदर चबुतऱ्यावर क्रॉस बसविलेला आहे. या राष्ट्रीय स्मारकाकरितां स्कॉटलंडच्या लोकांनीं अतोनात पैसा खर्च केला आहे व हें स्मारक एडिंबरा शहराचा सर्वोत्तम अलंकार व्हावा अशा प्रकारचें त्याचें कलाकुसरीचें काम केलें आहे यांत शंका नाहीं. खुद्द लंडनमध्यें सुद्धां अशा प्रकारचें महायुद्धाचें स्मारक नाहीं. हें स्मारक पाहिल्यावर आम्हीं किल्ल्यांतील जुना राजवाडा पाहिला. जेथें स्कॉटिश पार्लमेंट भरे त्या विस्तीर्ण लांकडी छपराच्या दिवाणखान्यांत हल्लीं जुनीं नवीं हजारों शस्त्रास्त्रें ठेविलीं आहेत; नंतर स्कॉटिश राजेराण्यांचे म्हणून लहान मोठ दिवाणखाने पाहिले. एक लहानसें प्रार्थनामंदिर पाहिलें.

**आरगाईल टॉवर** म्हणून राजवाड्याचा एक जुना भाग आहे; येथून सर्व शहर चांगलें दृष्टीस पडतें.

याप्रमाणें किल्ल्यांतील प्रेक्षणीय स्थळें पाहून आम्हीं परत **प्रिन्सेस-स्ट्रीटला** आलों व या रस्त्याच्या बागेमध्यें असलेलें प्रख्यात सर **वाल्टर स्कॉटचें** स्मारक पाहिलें. एका चौकोनी चार कमानीच्या उंच चबुतऱ्यावर स्कॉटच्या शेजारीं त्याचा आवडता कुत्रा असलेला असा **स्कॉटचा** बैठा पुतळा बसविलेला असून त्यावर तीन मजली मनोरा उभारलेला आहे. प्रत्येक मजला ५० फूट उंच आहे. प्रत्येक मजल्यावर गॅलरी असून त्याच्या सभोंवार हिंडतां येतें; एकंदर मनोरा २०० फूट उंच आहे. सर्व मनोऱ्याभर जिकडे तिकडे पुतळे कोरलेले आहेत. स्कॉटच्या कादंबऱ्यांतील व काव्यांतील प्रख्यात स्त्रीपुरुषांचे निदर्शक ते पुतळे आहेत. या मनोऱ्यांमध्यें नक्षीकाम व कलाकुसरीचें काम अतोनात आहे. ज्यानें स्कॉटिश लोकांचा इतिहास जगप्रसिद्ध केला अशा मोठ्या कवीला व कादंबरीकाराला साजेल असें हें मोठें मनोहर स्मारक आहे; व प्रिन्सेसस्ट्रीटच्या खुल्या बागेंत केल्यामुळें तें फारच उठावांत दिसतें.

हें स्मारक पाहून झाल्यावर आम्हीं **काल्टन** टेकडीला गेलों. ही टेकडी प्रिन्सेसस्ट्रीटच्या पूर्व टोंकाला आहे. टेकडी खालपासून १०० फूट उंच आहे; वर गेल्यावर **नेल्सन** स्मारक स्तंभ पाहिला. हा दीडशें फूट उंच आहे. याचें काम साधारण दिसलें. या स्तंभाचे माथ्यावर एक लांकडी गोळा आहे तो बरोबर एक वाजतां उचलून खालीं केला जातो व त्याबरोबर एक तोफ होते; या तोफेच्या आवाजावरून सर्व लोक आपलीं घड्याळें लावतात. आम्ही स्तंभाचे माथ्यावर गेलों तों एक वाजायला एकदोन मिनिटें होतीं. तेव्हां त्या गोळ्याची गति आम्हांस पहावयास सांपडली. या टेकडीवर एक अर्धवट बांधलेलें स्मारक आहे. हें अपुरें स्मारक **सांची** येथील मोडक्यातोडक्या इमारतींसारखें दिसतें. या टेकडीवरून एडिंबराची नवी वस्ती सुंदर व स्पष्ट दिसते; ते सोंगट्याच्या पटासारखे रस्त्याचे चौकोन मोठे मजेदार दिसतात. इतकें दृश्यदर्शन झाल्यावर आम्हीं



नं. २९ एडिंबरा : प्रिन्सेस स्ट्रीट ( राजरस्ता ) पान २२४



एडिंबरा : सर वाल्टरस्कॉटचा स्मारकमनोरा

नं. ३० पान २२५


दीड वाजतां इंडियन विद्यार्थ्यांच्या युनियनमध्यें फराळास गेलों. येथें पांचपन्नास विद्यार्थी खाण्यापिण्यास येतात. आम्हांला कांहींजण त्यावेळीं भेटले व तेथें आम्हांला डाळरोटी व दहीभात खावयास मिळाला. पुष्कळ महिन्यानें असें जेवण मिळाल्यानें मनाला आनंद वाटला.

दोनप्रहरीं आम्हीं जुन्या व नव्या शहराला जोडणारा **मौंड** म्हणून भाग आहे तेथें असलेलीं राष्ट्रीय चित्रालय व ॲकॅडमी हीं दोन स्थळें ओरझतीं पाहिलीं व मग बसनें फोर्थखाडीवरील पूल पहाण्यास गेलों. '**बस**' मौंडपासून निघते. **फोर्थपूल** येथून सुमारें दहाअकरा मैल आहे. हा रस्ता साधारण सपाटीवरून जातो. मधून मधून शेतें लागत होतीं व बागाहि बऱ्याच लागत. हा रस्ता **क्वीन्सफेरी** ( राणीची तर ) म्हणून खाडीच्या कांठाला जो जुना तर लागण्याचा धक्का आहे तेथपर्यंत थेट जातो. तेथून पुलाचा विलक्षण देखावा दिसतो खरा.

हा पूल सुमारें दीडमैल लांबीचा आहे; या ठिकाणीं खाडीच्या पलीकडे भुशीरासारखा एक भाग पुढें आला आहे., त्याचा फायदा घेतल्यामुळें तरी पूल दीडमैलांत भागला. कारण भुशीराच्या दोन्हीं बाजूंची खाडी तीनचार मैल रुंद असावी. लांबीप्रमाणें हा पूल जगांतील सर्वांत उंच पूल आहे. हा पूल लोखंडी असून अलीकडे दहा दगडी खांब दोन-अडीचशें फूट उंचीचे बांधलेले आहेत व त्यावर गर्डर टाकून आगगाडीचे रूळ घातले आहेत. ही झाली खाडीच्या किनाऱ्याकडील व्यवस्था. प्रत्यक्ष खाडी फारच खोल आहे. तेथें खांब बांधणें शक्य नव्हतें. म्हणून खाडींत असलेल्या लहानशा खडकाळ बेटाच्या दोन्हीं टोंकांजवळ तीनसाडेतीनशें फूट खोल असे चार दगडी खांब बांधून त्यावर लोखंडी ब्रॅकेट बसवून त्यावर लोखंडी गर्डर घालून त्यांचा एकजीव केलेला आहे. ह्मणजे लोखंडाच्या चार प्रचंड कमानी बनविल्या आहेत; दोन कमानींमध्यें प्रत्येकीं अंतर ७१० फूट आहे व दुसऱ्या दोन कमानींमध्यें प्रत्येकीं अंतर ६८० फूट आहे व बाकीच्या किनाऱ्यावरील खांबांमधलें अंतर त्याचेहिपेक्षां कमी

आहे. पहिल्या दहा खांबांवरील गर्डर व आगगाडीचा रस्ता एखाद्या खेळांतल्या रेलवे रस्त्याप्रमाणें भासतो; इतका हा पूल उंच आहे. पलीकडच्या लोखंडी कमानींचा अजस्रपणा पाहून तर प्रेक्षकाला आश्चर्यानें तोंडांत बोटें घालण्याची वेळ येते. हा पूल पाहून आम्ही खरोखरींच आश्चर्यानें थक्क झालों. असें प्रचंड एंजिनीयरिंग काम मीं अद्यापपर्यंत पाहिलें नव्हतें. येथें तत्काळ फोटो काढणारे लोक फार पाठीस लागतात. आह्मीं तिघांचा फोटो काढून घेतला. तीन प्रतीला दोन शिलिंग पडले. नंतर आह्मीं येथल्या उपाहारगृहांत चहापान केलें तोंच आमची '**बस**' आली व आह्मीं परत येण्यास निघालों. पण वाटेंत पंक्चर झाल्यामुळें आह्मांला अर्धा तास बिन्हाडीं पोहोंचण्यास उशीर झाला. त्याच रात्रीं आह्मीं एडिंबरामध्यें दररोज चालू असलेल्या **७७ पार्कलेन** नांवाच्या नाटकाला गेलों. लंडनच्या फॅशनेबल व जुगारी आयुष्यक्रमाबद्दल तें नाटक होतें. **७७ पार्कलेन** घराचा मालक उमराव बरींच वर्षें दूरदेशीं गेला होता. त्याच्या मुखत्यारीनें त्या घरांत जुगाराचा गुप्त अड्डा काढला व तेथें श्रीमंत स्त्रीपुरुषांचा गुप्तपणें सर्व व्यवहार चाले; पुढें तो उमराव मुखत्यारास न कळवितां परत आला व पहातो तों आपला बंगला गजबजलेला! नाटक हास्यकारक प्रवेशांनीं भरलेलें होतें; पात्रांचा अभिनय व सीनरी वाखाणण्यासारखी होती. **हाईडपार्क** या प्रख्यात बागेवरील **७७ पार्कलेनचा** हुबेहूब देखावा पाहून मला वाटलें एडिंबरांत लंडन आलें व 'पुण्यांत म्हैसूर' या आपल्याकडील जाहिरातीची मला आठवण झाली.

ता. २५ मार्च सन १९३० आमच्या एडिंबराच्या मुक्कामाचा शेवटचा दिवस होता म्हणून, व आम्हीं आदल्या दिवशीं सकाळीं नऊ वाजतां ३६ मैल दूर असलेल्या **सर वाल्टर स्कॉटच्या ॲबट्सफर्ड** या ठिकाणाला **बसनें** जावयाचें ठरविलें होतें म्हणून आमच्या मित्राला आम्हीं आमच्या हॉटेलांत न्याहारीला बोलाविलें होतें. आठ वाजतां ते आले व आम्ही मोठ्या प्रमुदितमनानें एका मेजावर न्याहारी केली.




नं. ३१ एडिंबरा : काल्टन टेकडी व नेलसन स्तंभ पान २२६



नं. ३२ एडिंबरा : मौंड व राष्ट्रीय चित्रालय पान २२७

वगैरे नऊ वाजतां **अॅबट्सफर्डला** जाण्यास निघालों. छत्तीस मैलाला जातांयेतांचें दरमाणशीं पांच शिलिंग भाडें पडलें. **अॅबट्सफर्ड** हें एडिंबरा शहराच्या दक्षिणेस असून, ट्वीड नदीच्या कांठीं आहे. केल्सोहून सर्व रस्ता ट्वीड [illegible] नदीच्या [illegible] जात होता. दहा मैल गेल्यानंतर जिकडे तिकडे बर्फचबर्फ दिसूं लागलें. या भागांत तां. १६ व २१ मार्च असे दोन दिवस बर्फ पडलें होतें असें कळलें व तें अजून वितळलें नव्हतें. म्हणून येतांना आम्हांला सर्व बर्फमय प्रदेश दिसला; पण त्या वेळीं रात्र असल्यामुळें फारसा दूरवरचा प्रदेश दिसला नाहीं. पण आम्हीं आतां भरदिवसा जिकडेतिकडे बर्फमय झालेल्या प्रदेशांतून जात होतों. तेव्हां त्या वेळचा देखावा काय विचारतां? झाडाझुडपांवर बर्फाच्या जणूं कांहीं माळाच टांगल्या आहेत असा भास होई; शेवटीं हा बर्फमय प्रदेश संपून आम्हीं **अॅबट्सफर्ड फेरी** स्टेशन जवळ सव्वा अकरा वाजतां आलों. एक वाजतां परत जायला येईन असें सांगून बसचा हांकणारा पुढें गेला. आम्हीं स्टेशनच्या आवारांत गेलों. तेव्हां नदीपलीकडे जायला स्टेशनच्या माणसानें एक होडी ठेविली होती. तिकडे आम्ही गेलों. **ट्वीड** नदी तुडुंब भरली होती; नदी कांहीं मोठी नव्हती; पण प्रवाह जोराचा होता. पलीकडे जाण्यास सुलभ पडावें म्हणून त्या मनुष्यानें पलीकडच्या एका झाडाला एक तार अडकवली होती व अलीकडे एक लांकडी तिकाटणें जमिनींत पुरून त्याला ती तार घट्ट बांधली होती; तारेला लहानशी कप्पी लावून त्याला दोरी लावून ती तो होडीला बांधी. या साध्या युक्तीनें होडी सहज समोर पलीकडे जाई. होडींत चढतांना त्या मनुष्यानें आम्हांला सांगितलें कीं तुम्हांला **अॅबट्सफर्ड** पहावयास मिळणार नाहीं. कारण घराचे मालक नेहमींप्रमाणें यंदा अजून बाहेर गेले नाहींत. हें ऐकून आमची फार निराशा झाली; मार्गदर्शकपुस्तकाप्रमाणें मार्च १६–१७ तारखेपासून **अॅबट्सफर्ड** सार्वजनिक दर्शनाला मोकळें असतें असें आम्हीं वाचलें होतें. म्हणून आम्ही निःशंकपणें इतक्या लांब आलों होतों. तरी पण

आल्यासारखे **ॲबट्सफर्ड** दुरून तरी पहाण्याचा आम्हीं बेत केला व नदीपलीकडे गेल्यावर रस्त्यानें चालूं लागलों. ही एक लहानशी टेकडी होती व तीवर उंच उंच वृक्ष वाढलेले होते; यामुळें गर्द छाया होती. अशा गर्दछायेच्या नैसर्गिक सौंदर्याच्या भागांतून दीडमैल गेलों तोंच आम्ही **ॲबट्सफर्डच्या** विस्तीर्ण बागेच्या प्रवेशद्वाराशीं आलों. तेव्हां '**ॲबट्सफर्ड** सार्वजनिक दर्शनास खुलें नाहीं.' अशी मोठी पाटी दिसली व होडीवाल्याच्या म्हणण्याचें प्रत्यंतर आलें. इतक्यांत त्या प्रवेशद्वारावर राहणारा मनुष्य आमच्या दृष्टीस पडला. त्यानेंहि बंगला पाहण्यास सांपडणार नाहीं असें सांगितलें; पण आम्हीं फार दूर देशाहून आलेले जाणून त्यानें बागेच्या एका टोंकास आम्हांस नेलें व तेथून **ॲबट्सफर्डचा** राजवाड्यासारखा पांढरा शुभ्र बंगला दुरून दाखविला. सभोंवार पुष्कळ बाग व झाडझाडोरा होता. **ट्वीड** नदी ओलांडल्यापासून लागणारीं सर्व झाडें **स्कॉटनें** स्वतःच लावलेलीं आहेत म्हणून रखवालदारानें सांगितलें. बंगल्याच्या खालीं **ट्वीड** नदी जोरानें वहात होती. सर वाल्टर स्कॉटसारख्या निसर्गदेवीच्या निस्सीम भक्ताला आवडणारें तें ठिकाण आहे एवढें आम्हांला त्या ठिकाणाच्या दुरून दर्शनानें सुद्धां समजून आलें. **ॲबट्सफर्डचा** अंतर्भाग नाहीं तर नाहीं पण त्याचा बाह्य देखावा व सभोंवारची शोभा तरी पहावयास सांपडली एवढ्यावर समाधान मानून आम्ही परत फिरलों. बरोबर आणलेली सँडविचेस व केक्स आम्हीं खाल्ल्या व **बसची** वाट पहात बसलों. **बस** एक वाजून दहा मिनिटांनीं आली व आम्ही लागलींच चालू झालों. एडिंबरास आम्हीं सवातीन वाजतां पोहोंचलों. आज फराळ वाटेंत कसाबसा झाल्यामुळें आम्हीं एका उपहारगृहांत गेलों व तेथें उपाहार केला व चहा घेतला. नंतर शहराच्या पश्चिम भागाला एका टेकडीच्या बगलेवर असलेलें प्राणिसंग्रहालय पहावयास ट्रामनें गेलों. हें प्राणिसंग्रहालय लंडनच्या प्राणिसंग्रहालयाप्रमाणें बरेंच विस्तीर्ण आहे व नाना तऱ्हेचे व नाना देशांतले पशुपक्षी येथें होतां होईल तितक्या नैसर्गिक स्थितींत



नं. ३३ एडिंबरा : फोर्थ खाडीवरील लोखंडी पूल पान २२८



नं. ३४ ॲबट्स फर्ड : सर वाल्टरस्कॉटचा वाडा पान २२९

ठेविलेले आहेत. येथें एक नवें मत्स्यगृह बांधलेलें आहे. तेथेंहि नाना रंगाचे नाना आकाराचे लहान मोठे जलचर प्राणी व मासे ठेविलेले आहेत. गोड्या पाण्यांत राहणाऱ्या माशाला गोडें पाणी; खाऱ्या पाण्यांत राहणाऱ्या माशाला खारें पाणी; तसेंच त्यांच्या नेहेमींच्या राहणीसारखी होतां होईल ती व्यवस्था केलेली; अशा प्रकारचें येथलें मत्स्यगृह फार प्रेक्षणीय आहे. या टेकडीच्या माथ्यावरून शहराची सर्व शोभा दिसली. आमचें एडिंबराचें दृश्यदर्शन संपत आलें होतें म्हणून या प्राणिसंग्रहालयांत व त्याच्या टेकडीच्या माथ्यावर आम्हीं कितीतरी वेळ घालविला व प्राणिसंग्रहालय बंद व्हावयाची घंटा झाली तेव्हांच आम्ही बाहेर पडलों. मग लागलींच बिऱ्हाडीं परतलों. दुसरे दिवशीं म्हणजे ता. २६ मार्च सन १९३० रोजीं सकाळीं आमच्या मित्रांचे फारफार आभार मानून व त्यांचा निरोप घेऊन मोटारींत बसलों; पाहतों तों आम्ही आलों त्याच मोटारनें परत जाणार होतों. यामुळें हांकणारा व कंडक्टर यांनीं आम्हांला ओळखलें व गेल्या वाटेनें पूर्वी पाहिलेल्या प्रेक्षणीय गोष्टींचें पुनर्दर्शन घेत घेत आम्हीं रात्रीं सव्वा दहा वाजतां बिऱ्हाडीं पोहोंचलों. आमचा हा चार रात्रींचा प्रवास व दृश्यदर्शन मोठ्या मजेनें झालें हें ऐकून आमच्या घरधनीणीस आनंद झाला. आम्हीं मोठ्या प्रमुदित मनानें कॉफीपान केलें व निद्रादेवीची आराधना केली आणि लवकरच गाढ झोंपी गेलों. झालें. माझ्या यात्रावर्णनाचा एडिंबरा अध्याय संपला.

# प्रकरण १४ वें

## विलायतचें हवापाणी, ऋतुमान व सृष्टिचमत्कार

आपल्या देशापासून हजारों मैल दूर असलेल्या विलायत देशाचें हवापाणी आपल्या लोकांना कसें काय वाटतें व मानवतें आणि तेथें आपल्याला अपूर्व असे सृष्टिचमत्कार काय काय दृष्टीस पडतात या परदेशाहून परत आलेल्या प्रवाशाला विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना मीं आजच्या प्रकरणांत सविस्तर उत्तर देण्याचें मनांत आणिलें आहे.

विलायतेंत जिकडे तिकडे पाण्याचा सुकाळ आहे. कारण साधारण थोडा फार पाऊस वर्षभर पडतो; शिवाय हिंवाळ्यांत बर्फ पडतें व त्याचें पाणी होऊन तें जमिनींत मुरतें. यामुळें नदीनाल्यांना व विहिरी-तलावांना मुबलक पाणी असतें. अशा पाण्याच्या विपुलतेमुळें गांवो-गांवीं व खेडोखेडीं सुद्धां घरोघर नळाचें पाणी मिळण्याची व्यवस्था केलेली आहे. यामुळें विलायतेंत कोठेंहि प्रवास करा; रानावनांतील एकाकी उपाहारगृहांत सुद्धां जा; तुम्हांला स्फटिकासारखें शुभ्र, शुद्ध व स्वच्छ पाणी पिण्यास मिळतें. मात्र तिकडलें तें गारगार पाणी फारसें पिववत नाहीं व थंड हवेमुळें पाणी पिण्याची इच्छाहि होत नाहीं, याबद्दल वाईट वाटतें. पण पिण्याच्या पाण्याच्या बाबतींत तिकडे याप्रमाणें उत्तम व्यवस्था असल्यामुळें विलायतेंत पिण्याच्या पाण्यापासून होणारे रोग व सांथी यांचा उपद्रव नाहींच म्हटलें तरी चालेल. तरीसुद्धां तिकडील लोक टायफॉईड तापाचे जंतू पाण्याच्याद्वारें पोटांत जाण्याचा संभव असतो म्हणून निवळ पाणी पिण्यास भितात; नव्हे तिकडे असे कित्येक लोक सांपडतात कीं ते साधें पाणी कधींच पीत नाहींत. पाण्याची तहान ते चहानें किंवा बिअरनें भागवितात! विलायतेंत कांहीं ठिकाणचें पाणी निरोगी व

रोगनिवारक असल्याची प्रसिद्धी असल्यामुळें तेथें लोक मुद्दाम रहाण्यास जातात व तें पाणी मुद्दाम पितात; किंवा त्या ठिकाणचें पाणी बाटल्यांतून आणवून मुद्दाम औषध म्हणून घेतात. एकंदरींत विलायतेमध्यें पाणीपुरवठा व सांडपाण्याची व्यवस्था आरोग्यशास्त्रानुसार उत्तम तऱ्हेनें केलेली आहे असें प्रवाशाच्या ध्यानांत आल्यावांचून रहात नाहीं. म्हणून विलायतेंतील राहणी आरोग्यवर्धक आहे असा सरहा अनुभव येतो. तसेंच तिकडे भंग्याचा वर्ग नाहींच म्हणाना. कारण सर्व संडास पाण्याच्या प्रवाहानें मळ आपोआप धुवून जावा अशा तजविजीचे असतात; ते संडास सर्व संगमरवरी भांड्याचे असतात व दररोज घरचीं माणसें ते पुसून स्वच्छ ठेवतात.

विलायतच्या थंड हवेबद्दल तर सर्वत्र ख्याति आहे. या हवेच्या थंडपणामुळें ऊष्ण प्रदेशांत ज्यांचा सर्वत्र सुकाळ व सुळसुळाट असतो असे डांस, पिसवा, चिलटे, ढेकूण इत्यादि रोगकारक व त्रासदायक कृमिकीटक यांचें नांवहि ऐकूं येत नाहीं. अर्थात् रोगबीजें शरीरांत शिरकवणाऱ्या या जंतूंच्या अभावीं तिकडील थंड हवा आरोग्यवर्धक व्हावी यांत नवल काय ? पण तिकडल्या हवेंत वारंवार विलक्षण फेरबदल होतात हें खरें. म्हणून विलायतेंतल्या हवेला संस्कृत सुभाषितकारांनीं नृपनीतीला दिलेल्या वारांगनेची उपमा उत्तम शोभेल यांत शंका नाहीं. ज्याप्रमाणें वारांगना सकाळीं निळें पातळ नेसेल; तर दोनप्रहरीं शुभ्र पांढरें पातळ नेसेल; सायंकाळीं केशरी पातळ नेसेल; तर रात्रीं काळीभोर चंद्रकळा नेसेल; एकावेळीं बारिक कुंकवाची टिकली लावील तर, दुसऱ्या वेळीं चंद्रकोरीप्रमाणें कुंकवाची अरुंद कोर लावील; घटकेंत हंसतमुख दिसेल तर घटकेंत रुसलेली दिसेल; एकदां खूब बडबडेल तर दुसऱ्यांदा मुखस्तंभ राहील; केव्हां ओरडेल तर केव्हां रडेल असे नाना रंगढंग ती करील त्याचप्रमाणें विलायतची हवा मोठी रंगीढंगी आहे. एका दिवसांत ती तीनतेरा रंग करील. घटकेंत चकचकीत सूर्यप्रकाश पडेल; तर दोन घटकेनें जिकडे तिकडे ढगच ढग येतील; आणखी घटकेनें खूब दाट धुकें पसरेल

तर थोड्या वेळांत झीम् झीम् पाऊस पडेल; आणि लागलीच वादळ होऊन हवा कुंद होईल; घटकेंत उकडूं लागेल तर लागलींच गारठा भासूं लागेल; एका दिवशीं उन्हाळी हवा तर दुसऱ्या दिवशीं पावसाळी हवा; तर तिसऱ्या दिवशीं हिंवाळी हवा; असे विलायतेंतील हवेंत वारंवार विलक्षण फेरबदल होतात. म्हणून विलायती हवा फार लहरी आहे असे म्हणण्याचा प्रघात आहे व तिकडे कपड्याबद्दल जास्त काळजी घ्यावी लागते. यामुळें इंग्रजी माणसाच्या संभाषणाचा एक ठराविक भाग हवेबद्दल होत असतो. तरी पण एकंदरींत विलायतची हवा बिलकूल रोगट नाहीं; तर उलट काळजीपूर्वक खाणेंपिणें व कपडेलत्ते ठेवल्यास ती हवा आरोग्यवर्धक असून त्या हवेंत काम करण्याला नेहमीं चांगला हुरूप राहतो व तेथें मनुष्याकडून दररोज आपल्या इकडल्यापेक्षां जास्त व जास्त वेळ काम होतें असा नेहमीं अनुभव येतो. या गोष्टीचें प्रत्यक्ष प्रत्यंतर म्हणजे माझा विलायतेंतील आठ महिन्यांचा निवास होय. माझ्या वयाच्या साठ वर्षांनंतर मीं विलायतेला प्रथम प्रवास केला व व तेथें निवास केला; तरीसुद्धां मीं तेथें एकहि दिवस आजारी पडलों नाहीं किंवा माझ्या कामांत खळ पडला नाहीं; उलट इथल्यापेक्षां जास्त मानसिक व शारीरिक श्रम करीत असतांना माझें १५ पौंड वजन वाढलें व तें माझ्या विलायतेंच्या सर्व निवासभर कायम राहिलें. इतकें विलायतचें हवापाणी उत्तम आहे. आतां तिकडल्या ऋतूंकडे वळूं या.

आपल्या इकडल्या साहाचे ऐवजीं विलायतेंत चारच ऋतु मानतात; पण तिकडील ऋतू चान्द्रमासाशीं निगडित नसून पृथ्वीच्या वार्षिक गतिचक्रामध्यें जे चार बिंदू अचल आहेत, त्यापासून ते मोजण्याची रीत आहे. यामुळें हे चार ऋतू तीन तीन महिन्यांचे असून ठराविक तारखेपासून सुरू होतात. बावीस मार्च पासून बावीस जूनपर्यंतचे तीन महिने विलायतेंतील वसंतकाळ होय; बावीस जून ते बावीस सप्टेंबर हा तिकडील ग्रीष्मऋतु ( उन्हाळा ) होय; तेवीस सप्टेंबर ते तेवीस दिसेंबर हा तिकडचा वर्षाऋतु ( पावसाळा ) होय; व तेवीस डिसेंबर ते तेवीस

मार्च हा तेथला शिशिरऋतु ( हिंवाळा ) होय. या प्रत्येक ऋतूचें हवामान परस्परापासून भिन्न भिन्न असून निरनिराळया ऋतूंमध्यें सृष्टीच्या रूपांतहि विलक्षण फरक दिसून येतात. यामुळें आपल्याला अपूर्व असें सृष्टिचमत्कार दृष्टोत्पत्तीस येतात. मी विलायतेला ग्रीष्मऋतूच्या मध्याला पोहोंचलों व मी विलायतच्या वसंतऋतूला प्रारंभ झाल्यावर विलायत सोडली. म्हणजे मी विलायतेंत आठच्च महिने राहिलों, तरी तिकडील चारी ऋतूंतील सृष्टिशोभा मला प्रत्यक्ष पाहतां आली.

विलायतेला पहिल्यादां गेलेल्या माणसाला पहिली नवलाची गोष्ट वाटते ती तिकडील ऋतुमानाप्रमाणें होणारा दिवसरात्रीचा कमीजास्तपणा होय. आपल्या इकडेसुध्दां उन्हाळयांत दिवस मोठा होतो व हिंवाळ्यांत दिवस लहान होतो खरा, पण हा फरक फारसा नसतो. फक्त एक तासाचा कमीजास्तपणा होतो. म्हणजे मोठ्यांत मोठा दिवस तेरा तासांचा होतो व तेव्हां रात्र अकरा तासांची होते; उलट मोठ्यांत मोठी रात्र तेरा तासांची होते; तर तेव्हां दिवस अकरा तासांचा होतो. पण विलायतेंतील दिवसरात्रींचा फरक आश्चर्यकारक वाटतो; तिकडला सर्वांत मोठा दिवस म्हणजे बावीस जून हा होय व तो सुमारें साडेसोळा तासांचा असतो; व तेव्हां रात्र साडेसात तासांची असते. म्हणजे सुमारें पावणेचार वाजतां उजाडतें व सव्वाआठ वाजतां मावळतें. उलट तेवीस डिसेंबर हा सर्वांत लहान दिवस; या दिवशीं सुमारें सव्वाआठ वाजतां उजाडतें व सुमारें पावणे चार वाजतां मावळतें ! काय हा दिवसरात्रींत विलक्षण फरक ! आमच्या देशांत ‘ संध्याकाळीं येईन ’ या म्हणण्यास अर्थ आहे. कारण संध्याकाळ तास पाऊणतासाच्या फरकानें वर्षानुवर्ष साहासातच्या सुमारास असतो; पण विलायतेंत ‘ संध्याकाळीं येईन ’ या म्हणण्याला कांहीं अर्थच नाहीं. कारण तिकडे केव्हां संध्याकाळ आठ वाजतां होणार तर केव्हां चार वाजतां होणार. हा विलक्षण फरक पाहून मला असें वाटलें कीं युरोपमध्यें घड्याळांचा शोध यामुळें लवकर लागला व तिकडे नियमितपणाची सर्वत्र संवय झाली. आमच्या इकडे

घड्याळाची तितकी आवश्यकता भासली नाहीं व लोकांना नियमितपणाची संवय लागली नाहीं. उलट तास अर्धातास 'उशीर' म्हणजे कांहींच नाहीं असें आमच्या लोकांना वाटतें.

मी विलायतेस आगष्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत गेलों म्हणजे अर्ध्या उन्हाळ्यांत गेलों. तेव्हांसुद्धां साडेचार वाजतां उजाडे व पावणे-आठ वाजतां मावळत असे. याचें मला किती नवल वाटे. विशेषतः रात्रीच्या जेवणाच्या वेळेचा चमत्कार वाटे. तिकडे साडेसात वाजतां रात्रीची जेवणाची वेळ; पण मी गेलों तेव्हां साडेसातला चांगला उजेड असे व आमचीं रात्रीचीं जेवणें आपल्या इकडच्या साडेपांच वाजतांच्या वेळांइतक्या उजेडीं होत आहेत असें वाटे. अशा दिवसरात्रीच्या फरका-मुळें तिकडील सर्व व्यवहार ठरलेल्या तासाला होतात; मग उजेड असो वा अंधार असो. शाळा सकाळीं नऊ पासून चारपर्यंत सर्व वर्षभर चालतात; कचेऱ्या दहा पासून पांचापर्यंत असतात; दुकानें नऊ पासून सहापर्यंत असतात. कारखाने आठपासून पांचपर्यंत असतात. पण रात्रंदिवसांत विलक्षण फरक होत असल्यामुळें व धुकें ढगें पाऊस हीं वारंवार येत असल्यामुळें तिकडे सर्व इमारतींत व शाळागृहें, दुकानें, कारखाने वगैरे सर्व ठिकाणीं दिव्याची व्यवस्था काय-मची करावी लागते. कारण हिंवाळ्यांत दोनप्रहरीं तीन वाजल्यापासून जिकडेतिकडे दिवे लावावे लागतात. कांहीं वेळां धुक्याची मळभी व पावसाळी हवा असल्यास सर्व दिवसभरसुद्धां दिवे लावावे लागतात व दिवसाचें काम रात्रीं चाललें आहे असा भास होतो. जेव्हां दिवस मोठा होतो तेव्हां उजेड साडेसातपर्यंत असतो, म्हणून दिव्याची काट-कसर करण्याकरितां एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत घड्याळ एक तास पुढें ढकलतात. पण एक तास पुढें ढकलतात म्हणजे पाचाचें ऐवजीं साहापर्यंत कचेऱ्या चालतात. पण एक तास पुढें ढकलला तरी कचेरीची पांचाची वेळ कायम राहते! पण पुढें पावसाळ्यांत आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत एक तास घड्याळ मागें ढकलतात.

मी विलायतेंत होतों त्यावर्षी पांच आक्टोबरच्या रात्रीं तीन वाजतां घड्याळ एकतास मागें ढकलण्यांत आलें; आम्हीं बिऱ्हाडाच्या घड्याळानें सात वाजतां उठलों तों आमच्या घड्याळांत आठ वाजले होते.

आगष्ट सप्टेंबर हे विलायतेंत ग्रीष्मऋतूचे अगर उन्हाळयाचे दिवस होत. या दिवसांत काम आटोपल्यावर फिरावयास पुष्कळ वेळ असतो व साधारण या दोन महिन्यांत पुष्कळ दिवस चकचकीत सूर्यप्रकाशाचे असतात. आपल्या इकडून गेलेल्या माणसाला हे दिवस आपल्या इकडल्या फेब्रुवारी मार्चसारखे वाटतात. आगष्ट महिना साधारण कोरडा गेला; आगष्टच्या मध्याला थोडासा झिमझिम पाऊस पडला इतकेंच; मात्र एकतीस आगष्ट हा सर्वांत अधिक उष्णतेचा दिवस होता. त्या दिवशीं दोन वाजतां सत्त्याऐंशी (फॅरनहाइट) अंशावर पारा चढला; वर्तमानपत्रांतून कित्येक वर्षांत इतका उन्हाळा झाला नव्हता असा मजकूर आला; त्या दिवशीं बागांतून व उपवनांतून लोक हिरव्या गवतांत जमिनीवर पडलेले दृष्टीस पडत होते. आम्हांला सुद्धां त्या दिवशीं किंचित् उकडल्यासारखें वाटलें. पण विलायतेंल्या लोकांना हा असह्य उन्हाळयाचा दिवस वाटला. अर्थात् विलक्षण उन्हाळयाबद्दल जेवतांना गोष्टी निघाल्या. तेव्हां मी आमच्या धनिनीस म्हटलें "आमच्या देशांत उन्हाळयांत दिवसचे दिवस शंभर अंशाच्यावर उष्णता असते; व हिंदुस्थानांत कांहीं ठिकाणें अशीं आहेत कीं तेथें एखादे वेळेस एकशेंदहा ते एकशेंवीसपर्यंत उष्णता होते;" तेव्हां ती बाई म्हणाली "तेथले लोक इतक्या उष्णतेंत जगतात तरी कसे"? तिकडील उन्हाळा व आपल्या इकडील उन्हाळा यांत असा विलक्षण फरक आहे. मात्र या दोन महिन्यांत तिकडे सृष्टिशोभा अवर्णनीय असते. जिकडेतिकडे झाडांना पानें फुलें व फळें यांचा बहर आलेला असतो. सडकेच्या बाजूच्या फुलझाडांना फळांचे घोसचेघोस लागलेले दिसत. बागांत फुलझाडांचे ताटवेच्या ताटवे नानारंगांच्या फुलांनी त्रिफुल्ल झालेले दिसत. सर्वत्र हिरवें गवत दिसे. यामुळें सर्व सृष्टि नयनमनोहर वाटे.

सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून नाताळ सुटीच्या सुरुवातीपर्यंत विलायतेंतील वर्षाऋतू किंवा पावसाळा असतो; या अडीच तीन महिन्यांत पुष्कळ पाऊस पडतो. साधारण महिन्याचे निम्मे दिवस पावसाचे असतात; केव्हां केव्हां दोन दोन तीन तीन दिवस सारखा पाऊस पडतो; मात्र हा पाऊस बारिक व झिमझिम असा पडतो. आपल्या इकडल्यासारखा मुसळधार पाऊस तिकडे फार क्वचित्. माझ्या आठ महिन्यांच्या निवासांत मुसळधार पाऊस असा मी एक दिवस पाहिला व त्या दिवशीं मात्र लंडनच्या रस्त्यावर मुंबईप्रमाणें पाणीच पाणी दिसत होतें. विलायतेंतील हे तीन महिने पावसाळ्याचे खरे; पण या काळांत वारंवार धुकें येतें; ढगें पुष्कळ वेळ असतात व थंडीहि वाढत जाते, ज्यांना इंग्रजींत **ग्रीष्मवर्ण** म्हणतात अशा प्रकारचे रंग झाडाच्या पानांना येतात. ज्याप्रमाणें वसंत ऋतूंमध्यें आपल्या इकडे झाडांना नवी पालवी फुटते व त्या वेळीं झाडांना तांबूस तजेलदार अशीं नवीं पानें येतात, त्याप्रमाणें इकडे पावसाळ्यांत पानाचे रं हळूहळू बदलत जातात; हिरव्याच्या ऐवजीं पानें तांबूस होतात; मग पिवळीं बनतात व पुढें पांढरट होऊन मग तीं पार गळून पडतात. पण या हिवाळ्यापूर्वीच्या संधि काळांत वनशोभा कांहीं विलक्षण होते खरी. पण लवकर त्यावर हिवाळ्याची छाया पडते; मग मात्र वनदेवता कांहीं अंशीं नग्नस्वरूप धारण करते. कारण झाडांचीं पानें पार गळून जातात; केवढाले प्रचंड वृक्ष पण त्यावर औषधालाहि पान रहात नाहीं; झाडाच्या निवळ काळ्या पांढऱ्या खांद्या व शिरपुट्या राहातात. वनश्रीची वस्त्रहीन, मलीन, रोडकी, पाण्याचे पितर अशी अनुकंपनीय स्थिति होते; मात्र कांहीं **सदापानी** लहानलहान झाडेंझुडपें व वेली या थोड्या फार हिरव्या दिसतात; पण त्या काळांत बागेंत कोठें फूल नाहीं; पान नाहीं; झाडें जळून गेल्यासारखीं काळसर व रखरखीत दिसतात. नयनमनोहर भाग म्हणजे हिरवी गवताळ जमीन होय.

या काळांत आपल्या इकडल्या लोकांना अदृष्टपूर्व असे सृष्टिचमत्कार दिसतात. उदाहरणार्थ माझ्या लंडननिवासामध्यें पंधरा नवंबर हा फार

थंडीचा दिवस होता. त्या दिवशीं रात्रीं बत्तीस अंशांवर पारा गेला होता; म्हणजे पाणी गोठण्याइतकी त्या रात्रीं थंडी होती; व सर्व दिवसभर छत्तीस सदतीस अंशांवर पारा गेला नाहीं. त्या दिवशीं सकाळीं नऊ साडेनऊ वाजतां मी इंडिया ऑफीसमध्यें जाण्यास **ब्रॉकवेल** पार्कमधून गेलों तों तेथला देखावा अवर्णनीय झाला होता! ब्रॉकवेलपार्कच्या सर्व विस्तीर्ण हिरव्यागार गवताळ जमिनीवर हिमकण ( frost ) पसरले होते. जणूं कांहीं वनदेवीनें विरविरित शुभ्रवर्ण आच्छादन गवताळ मैदानावर टाकिलें आहे. पण तें आच्छादन पारदर्शक असल्यामुळें आंतला हिरवा रंग नयनमनोहर दिसत होता. सर्व बाकें व झाडांचीं खोडें पांढरीं पांढरीं शुभ्र झालीं होतीं; जणूं कांहीं वनदेवीनें रातोरात या सर्वांवर चांदीचा मुलामा केला. जिकडे पहावें तिकडे शुभ्रवर्ण; मात्र त्यांत मधून मधून हिरव्याची लकेर मारीत होती. हे हिमकण म्हणजे बर्फ नव्हे. आपल्या इकडे थंडीमध्यें ज्याप्रमाणें हवेंतील वाफेचें पाणी होऊन त्याचें द्रव जमिनीवर व झाडांवर पडतें त्याप्रमाणें हे हिमकण ( frost ) हवेंतील जास्त थंडीमुळें जडकणरूप पावलेली वाफ होय. कारण या हिमकणांना हात लावल्याबरोबर ते वितळून जाऊन त्याचें पाणी होतें; यामुळें हे हिमकण जादूनें केलेले आहेत कीं काय असा भास होतो; कारण ते हातांत घेतल्याबरोबर नाहींसे होतात!

तारीख १८ नवंबर रोजीं दुसरा अदृष्टपूर्व चमत्कार पाहण्यास सांपडला. आजच्या सर्व दिवसभर दाट धुकेंच जिकडे तिकडे पसरलें होतें. हें धुकें इतकें दाट होतें कीं चारपांच फुटांच्या पलीकडे कांहीं एक दिसत नव्हतें. जणूं कांहीं पातळ पिंजलेला कापूस वनदेवीनें फुंकून फुंकून सर्वत्र पसरविला आहे. या दिवशीं बसमधून जातांना सर्व दुकानें व दुकानांच्या पाट्या जाळीदार पातळ कापडानें मढविल्या आहेत कीं काय असा भास होत होता; या जाळीदार कापडांतून अंधुकपणें पाटीवरील अक्षरें वाचतां येत होतीं इतकेंच! अशा दाट धुक्यामध्यें सर्व वाहनांना सावकाश जावें लागतें. दुसऱ्या दिवशींच्या सकाळच्या वर्तमानपत्रांत लाग-

ळींच या दाट धुक्याबद्दल बातम्या प्रसिद्ध झाल्या. दाट धुक्याचें वर्णन करतांना वर्तमानपत्रांनीं असे उद्गार काढले कीं काल न्यायाधीशांनासुद्धां कोर्टांत येण्यास उशीर झाला ! तिकडे नियमितपणाचें उपमान म्हणजे न्यायाधीश दिसतात !

मळभी, धुक्याची किंवा पावसाची असणें हा विलायती हवेचा सामान्य नियम होय. निरभ्र चकचकीत सूर्यप्रकाश हा अपवादात्मक होय. म्हणून तिकडल्या रोजच्या वर्तमानपत्रांत दिवसांतील उष्णतामान व पाऊस यांच्या आंकड्यावरोवर दिवसांतील सूर्यप्रकाशाचा आंकडा दिलेला असतो. तिकडे निरभ्र अशा क्षितिजावरील सूर्यास्त व सूर्योदय फार क्वचित् दृष्टीस पडतात व कधींकाळीं तसा देखावा दिसल्यास फार नवल वाटतें. इंडिया ऑफीसच्या वाचनालयांतून परत येतांना ब्रॉकवेल पार्कच्या खुल्या मैदानाच्या क्षितिजापाशीं रमणीय असा सायंकाळचा सूर्यास्त मला केव्हां केव्हां पहावयास सांपडे त्यावेळीं मनाला फार आनंद होई. पण डिसेंबर महिन्यांत एकंदरींत धुक्याचा व हिमकणांचा देखावा वारंवार दिसतो व सूर्यप्रकाश फार क्वचित् पडतो हें खरें; या दिवसांत थंडीहि पुष्कळ वाटते. पण तिकडील अव्वल हिंवाळा म्हणजे जानेवारी ते मार्च हा तिमाहीचा काळ होय.

याच काळांत अतिशय थंड हवेचे चमत्कार वारंवार दृष्टोत्पत्तीस येतात. ज्या वर्षी जास्त पाऊस पडतो त्या वर्षी बहुधा बर्फ फार कमी पडतें असा तिकडला अनुभव आहे. माझ्या लंडननिवासाच्या वर्षीं पहिला हिमवर्षाव जानेवारी अकरा रोजीं तिसऱ्या प्रहरीं चार वाजतां झाला. बर्फ हें गारांसारखें जड स्वरूपांत पडत नाहीं. तर आपल्या इकडे ज्याप्रमाणें अतिबारीक पडतो न पडतो असा पाऊस पडतो त्याप्रमाणें तिकडे हिमवर्षाव होतो. अत्यंत बारिक विरविरीत पांढऱ्या शुभ्र कापसाच्या जणूं कांहीं धारा आकाशांतून खालीं पडत आहेत असें वाटतें. त्या धारा विलक्षण जलद पडतात; पावसाप्रमाणें त्यांचा आवाज मुळींच होत नाहीं; जिकडे तिकडे अगदीं सामसूम असतें. पण भराभर हिमवर्षाव होत असतो

व सभोंवारच्या देखाव्यांत विलक्षण फेरबदल होतो. जिकडे पहावें तिकडे पांढरें पांढरें शुभ्र दिसूं लागतें; व अर्ध्या तासामध्यें सर्व भूमिभाग बर्फमय होऊन जातो. अकरा जानेवारी रोजीं अर्धा तास हिमवर्षाव झाला खरा; पण त्यानें सर्व लंडन शहर रुपेरी करून टाकलें. हिमवर्षाव हा थंड प्रदेशांतील एक अद्वितीय देखावा आहे व त्याची कल्पना प्रत्यक्ष पाहिल्यावांचून येत नाहीं हें खरें. तुम्हीं त्या देखाव्याचें कितीहि वर्णन करा किंवा दुसऱ्यानें केलेलेंहि वाचा तें अपुरेंच पडतें. येथें **चक्षुर्वैसत्यं** हीच म्हण खरी ठरते.

जानेवारी हा सर्वांत महिना म्हणजे हिवाळ्याचा खरा प्रारंभ होय. पण तिकडला फेब्रुवारी हा जानेवारीपेक्षांहि जास्त थंडीचा वाटतो. मात्र या महिन्यांत पाऊस क्वचित् पडतो; पण हिमवर्षाव पुष्कळ वेळां थोडा फार होतो; सर्वांत थंड दिवस याच महिन्यांत बहुधां अनुभवास येतो. मला फेब्रुवारीचे प्रारंभीं तिकडेहि क्वचित् दिसणारा व आपल्याइकडे तर ज्याचें नांव ठाउक नाहीं असा एक सृष्टिचमत्कार पहायला सांपडला. ता. ३ फेब्रुवारी १९३० रोजीं मी ब्रिटिश म्युझीयमच्या वाचनालयाला जाण्याकरितां नेहमींप्रमाणें सवानऊ वाजतां बिऱ्हाडांतून निघालों व ब्रिटिश म्युझीयमकडे जाणाऱ्या रस्त्याला दहाचे सुमारांस **बस** मधून उतरून पायीं चालूं लागलों; बसमधून उतरलों तेव्हां चांगला प्रकाश होता; पण क्षणार्धांत आकाशांतील प्रकाश नाहींसा झाला; व एकाएकीं रात्र झाली असें वाटूं लागलें. फूट दोन फुटांवरचें कांहीं एक दिसेना; इतक्यांत रस्त्यांतले दिवे लागले व मग चालतां तरी येऊं लागलें. हा विलक्षण देखावा **काळ्या धुक्यानें** उत्पन्न होतो. असें **काळें धुकें** लंडनमध्यें केव्हां केव्हां पडतें; पण या दिवशींचें काळें धुकें चांगले तीन चार तास सारखें राहिलें होतें. असें धुकें पडलें म्हणजे दिवसाची रात्र बनते. तें धुकें पाहून जयद्रथ वधाच्या वेळच्या सुदर्शनचक्राच्या दंतकथेची मला आठवण झाली. अशा प्रकारच्या सृष्टिचमत्काराचें रूपांतर श्रीकृष्णाच्या सुदर्शनचक्राच्या दिव्य दंतकथेंत झालें असण्याचा संभव आहे असें मला वाटलें. जयद्रथवधाची

कथा महशूर आहे. जयद्रथानें अभिमन्यूचा असावधस्थितींत वध केला, हें ऐकून अर्जुन फार संतापला व त्यानें रागाचे भरांत संध्याकाळापूर्वीं जयद्रथाला ठार मारण्याची प्रतिज्ञा केली व तसें न घडल्यास चिताप्रवेश करून स्वतः मरून जाण्याचा निर्धार केला. अर्जुनासारख्या रणधुरंधराच्या या निर्धारानें कौरवांस हर्षवायु झाला व सबंद दिवसांत जयद्रथाचें नखहि पार्थाच्या दृष्टीस न पडेल असा सैन्याचा कडेकोट बंदोबस्त कौरवांनीं केला. त्या दिवशीं अर्जुनानें लढण्याची शिकस्त केली. तरी त्याला सैन्याची फळी फोडून जयद्रथाचा वध करतां आला नाहीं; सूर्य अस्तास गेला. प्रतिज्ञेप्रमाणें पार्थानें चिता तयार करून तींत प्रवेश करण्यास तो सज्ज झाला. आपला आतां जीव खात्रीनें बचावला असें वाटून जयद्रथ अर्जुनाचा अग्निप्रवेश पाहण्याकरितां त्या ठिकाणीं आला तोंच सूर्य क्षितिजावर दिसूं लागला व '**हा सूर्य व हा जयद्रथ**' अशी आरोळी उठली. तो चमत्कार पाहतांच अर्जुनानें आपल्या धनुष्यबाणानें जयद्रथाचा तत्काळ शिरच्छेद केला. काळ्या धुक्याच्या उत्पत्तिलयाच्या सृष्टिचमत्कारानें अर्जुनाची प्रतिज्ञा पुरी पडली असावी. पुढें त्याला दैवी चमत्काराचें श्रीकृष्णाच्या सुदर्शनचक्रसामर्थ्याचें स्वरूप प्राप्त झालें असावें असें मला वाटलें.

या सृष्टिचमत्काराला चारपांच दिवस झाले नाहींत तोंच म्हणजे फेब्रुवारी सात आठ व नऊ सन १९३० हे लंडन मधले अत्यंत थंडीचे दिवस आले. या दिवशीं थोडं फार बर्फहि पडलें. तारीख दोन रोजीं तर पाणीहि गोठलें होतें. त्या दिवशीं आम्हीं भर दोनप्रहरीं चार पांच तास पायीं फिरण्यांत व त्यावेळचा अद्वितीय देखावा पाहण्यांत घालविले. भर दोनप्रहरीं सदतीस अडतीस अंशांवर उष्णता गेली नव्हती. तलावावर बर्फाचा थर झाला होता; जागोजाग बर्फ दिसे; बंगल्यांचीं कौलारें पांढरी शुभ्र दिसत; बागांतील कुंड्यांमध्यें बर्फ सांचलेलें दिसे; सारांश, हा दिवस पाणी गोठणाऱ्या थंडीचा दिवस आहे असा पदोपदीं प्रत्यय

येई. तरी पण बर्फ हातांत घेतल्यास तें फार थंड लागत नसे व आम्ही सारखें चालत असल्यामुळें थंडीहि फारशी भासली नाहीं.

मार्च महिना हिंवाळ्याचा खरा; पण तो कोरड्या थंडीचा व जास्त सूर्यप्रकाशाचा वाटतो; मी होतो त्या वर्षांत तर मार्चच्या मध्यापासून वसंतऋतु उद्‌योन्मुख दिसूं लागला. **क्रॉकस** नांवाचीं पांढऱ्या, निळ्या, पिवळ्या रंगाचीं फुलें जमिनींतून उगवूं लागलीं. हींच विलायतेंतील पहिलीं वसंतऋतूचीं फुलें होत. बदामाच्या झाडांची वसंतऋतूची शोभा आश्चर्य करण्यासारखी वाटली. मार्चच्या शेवटच्या आठवड्यांत या झाडांना एकदम पानें व फुलें येतात. जें झाड सारखे तीन महिने जणूं कांहीं निर्जीव काटक्या बनलेलें असतें तें वसंताचे प्रारंभीं पांढऱ्या शुभ्र फुलांनीं व काळसर तांबड्या पानांनीं सतेज दिसूं लागतें. विलायतेंत वसंतऋतूचा प्रारंभ सर्व वनस्पतींचे बाबतींत असा आश्चर्यकारक असतो. काष्ठवत् बनलेल्या वनस्पती एकदम सतेज, हिरव्या तांबड्या पल्लवांनीं एकदम सजीव बनतात. या त्यांच्या स्वरूपांतील रूपांतराचें नवल वाटतें. एप्रिलच्या प्रारंभीं तर वनदेवता हिरव्यागार रंगाचा पुष्पमय बुटीदार शालू नेसली आहे कीं काय असा भास होतो. हिंवाळा व वसंत यांमधला विरोध विलक्षण खरा.

झालें. येथें माझें विलायतेचें ऋतुवर्णन संपलें. पुढल्या प्रकरणांत माझ्या लंडननिवासाच्या अखेरच्या आठवड्याचें रोजनिशीवर वर्णन देऊन मी माझ्या विलायतच्या यात्रावर्णनाची समाप्ति करणार आहें.

# प्रकरण १५ वें

## माझा लंडननिवासाचा अखेरचा आठवडा

माझ्या लंडननिवासाच्या पहिल्या आठवड्याप्रमाणें अखेरचा आठवडाहि चिरस्मरणीय होता. त्यामध्यें काम व करमणूक यांचें मोठें मनोहर मिश्रण झालें होतें. तेव्हां या माझ्या अखेरच्या आठ-वड्याचा वृत्तांत या शेवटच्या प्रकरणांत स्वतंत्रपणें व रोजनिशीवार देण्याचें मनांत आणिलें आहे.

मागल्या एका प्रकरणांत एडिंबरा शहर पाहून आम्ही बुधवार ता. २६ मार्च सन १९३० रोजीं रात्रीं दहा वाजतां लंडनला परत आलों असें सांगितलें होतें. बुधवार ता. २६ ते बुधवार तारीख २ एप्रिल १९३० हाच माझ्या लंडननिवासाचा अखेरचा आठवडा होय. तरी आतां प्रत्येक दिवसाची रोजनिशी देतों.

तारीख २७ मार्च सन १९३० हा लंडनांतला धुक्याचा दिवस होता. यामुळें सारा दिवस सर्द वाटत होतें. या दिवशीं सकाळपासून मी परत प्रवासाच्या बांधाबांधीस लागलों व माझ्या दोन कातड्याच्या बॅगा बांधून तयार केल्या. नित्याप्रमाणें इंडिया ऑफिसच्या वाचनालयांत जाऊन वाङ्मयविषयक काम आटपीत आणलें व सायंकाळीं डलीच बागेंत फिरावयास गेलों; तेथें वृक्षांना मनोहर पालवी फुटूं लागली होती व ती फूट वसंतऋतु सुरू झाला असें स्पष्टपणें दाखवीत होती. पण आतां ही वसंताची शोभा मला पुनः पहावयास मिळणार नाहीं असें मनांत येऊन वाईट वाटे तर अचानकपणें विलायतच्या यात्रेचा योग जुळून विलायतेंतील सर्व ऋतूंची शोभा पहाण्यास मिळाली याचें सानंद समाधान वाटे.

ता. २८ मार्च सन १९३०. आज मी लवकर इंडिया ऑफिसच्या वाचनालयांत गेलों व तेथलें करावयाचें सर्व काम आटोपलें; म्हणून वाचनालयाकडून घेतलेलीं मराठी पुस्तकांच्या छापील याद्यांचीं पुस्तकें परत केलीं. वाचनालयाच्या अधिकाऱ्याची शेवटची भेट घेऊन देशीं परत जाणार म्हणून त्याला सांगितलें. त्यानें तुमचा प्रवास सुखकर होवो असें म्हणून मला निरोप दिला. सायंकाळीं आम्ही आमच्या **रोझनडेल रस्त्याच्या** आवडत्या फिरतीला जाऊन आलों.

ता. २९ मार्च १९३० शनिवार हा आमचा नेहमींचा दृश्यदर्शनाचा दिवस म्हणून आम्हीं न्याहारी झाल्याबरोबर घराहून निघालों तो **वेस्ट मिन्स्टर** पुलाशीं उतरलों. उजव्या बाजूला ती लंडन कौंटि कौंसिलची प्रचंड दगडी इमारत व त्याचें तें भव्य प्रवेशद्वार याकडे एकदां शेवटची नजर टाकून पाऊल वाटेनें पुलावरून चालत गेलों. खरोखरीं लंडन राजधानीचा हा भाग म्हणजे तिचें हृदय होय यांत शंका नाहीं. खालून वाहणारी ती धीर गंभीर **टेम्स** नदी; तिच्यावरील तो प्रशस्त पूल व नदीच्या दोन्ही किनाऱ्यांकडील त्या प्रचंड इमारती उजवीकडे **व्हिक्टोरिया एम्बँकटमेन्ट** व डावीकडे **पार्लमेंटगृह** व त्याचे पुढील तो दगडी लांबच लांब धक्का हा विलक्षण देखावा सारखा पहात रहावेंसें वाटतें. **वेस्टमिन्स्टर** पूल टाकला कीं डाव्या हाताला तें विस्तीर्ण पार्लमेंटगृह व त्याचे ते उंच उंच मनोरे व विशेषतः **बिगबेन** नांवाचें प्रचंड घड्याळ याकडे मीं दृष्टि दिली व आम्हीं **पार्लमेंट स्क्वेअर** नांवाच्या हिरव्यागार वर्तुळाकार मोकळया चौकाशीं आलों. या चौकांत प्रसिद्ध मुत्सद्यांचे पुतळे ठेवलेले आहेत. नंतर आम्हीं **वेस्ट मिन्स्टर** प्रार्थनामंदिरांत शिरलों व मग **व्हाईट हॉल प्लेस** रस्त्यानें **सेंट पॉलच्या** प्रार्थनामंदिराला गेलों. याप्रमाणें पूर्वीं वर्णन केलेलीं लंडनमधलीं पुराणप्रसिद्ध प्रेक्षणीय स्थळें पुनः एकदां पण शेवटचीं पाहिलीं. या वेळीं आनंद व खेद असे मिश्र मनोविकार माझ्या मनांत येत होते. माझ्या प्रवासप्रियतेनुरूप मला विलायतचा प्रवास घडला व तेथल्या प्रेक्षणीय स्थळांचें सावकाश

व पुनः पुनः दर्शन घडलें म्हणून आनंद वाटत होता; तर आतां लवकर ही राजधानी आपण सोडणार व अशा सुंदर राजधानीचें पुनर्दर्शन घडे, ण्याचा संभव नाहीं म्हणून खेदहि वाटत होता. अशा मिश्रमनोविकारांनीं मी चिरपरिचित मित्राप्रमाणें लंडनच्या पुराणप्रसिद्ध स्थळांचा निरोप घेऊन चाराच्या सुमारास घरीं आलों.

मला हिंदुस्थानांत असतांना सिनेमा पाहण्याचा नाद नव्हता. तेव्हां मी लंडनमध्यें असतांना आजतागाईत सिनेमा पाहिला नव्हता. हल्लीं तिकडील सर्व सिनेमा बोलके झालेले आहेत. काशीमध्यें कांहीं महिने राहून मीं गंगास्नान केलें नाहीं असें सांगण्याची पाळी येणें जसें लज्जास्पद, त्याप्रमाणें लंडनमध्यें आठ महिने राहून बोलका सिनेमा पाहिला नाहीं असें सांगणें लज्जास्पद होईल, म्हणून आम्हीं आजरात्रीं ७॥ वाजतां पहिला व शेवटला सिनेमा पाहिला. आम्हीं लंडनच्या ज्या भागांत राहत होतों त्या भागांत सुमारें एका महिन्यापूर्वीं एक नवें कोरें " **रिगल** " नांवाचें सिनेमागृह उघडण्यांत आलें होतें. तें **नारवूड** या प्रख्यात रस्त्यावर होतें. गृहाची दुमजली इमारत पांढऱ्या शुभ्र दगडाची आहे. इमारतीसमोर खूब खुली जागा ठेविली आहे. यामुळें इमारतीचें काम उठावदार दिसतें. प्रवेशद्वारालाहि पांढरा शुभ्र रंग दिला असून त्यावर सोनेरी वेलबुट्टी काढलेली आहे; प्रवेशद्वारांतून आंत गेलें कीं तांबड्या रंगाच्या पिळदार खांबांनीं सुशोभित केलेला व रंगीत छतानें आच्छादिलेला **वाटपाही** दिवाणखाना लागतो. आम्हीं वरच्या ग्यालरीचीं तिकिटें काढलीं होतीं. ही ग्यालरी खुपच उंच आहे.

ग्यालरींत गेल्याबरोबर सर्व गृह एकदम दृग्गोचर झालें व त्याच्या सौंदर्यानें आम्ही थक्क होऊन गेलों. हें गृह जणूं कांहीं **द्राक्षलतामंडप** आहे असा भास झाला. कारण दोन्ही बाजूच्या भिंतीच्या कोपऱ्यांना मोठमोठ्या द्राक्षवेलीच्या जुनाट व जाड बुंधाच्या व खोडाच्या आकाराचा रंग दिला होता; व त्या खोडापासून द्राक्षाच्या वेलांच्या

अनेक शाखा छताला मिळून त्या सर्व शाखांचा एक सपाट मंडप बनला आहे व त्या मंडपापासून द्राक्षाचे घोंसचे घोंस लोंबत आहेत असा भास होई, अशा तऱ्हेनें सर्व छत चित्रित केलें होतें. छताच्या मधला भाग लांब वर्तुळाकार दाखविला असून त्याला आकाशाचा नीलवर्ण दिला होता; त्यामध्यें कांहीं भाग तुरळक ढगांनीं व्याप्त तर कांहीं भागांमध्यें चांदण्या चमकत असलेल्या असा देखावा होता. सारांश, सिनेमाच्या अंतर्गृहाची रचना म्हणजे निसर्गदेखाव्याचा एक प्रचंड चित्रपट होता. यामुळें आपण नंदनवनांतील एखाद्या द्राक्षलतामंडपांत खरोखरीं आलों कीं काय असें वाटलें. इतक्यांत तांबड्या मखमाली रंगाचा पडदा उघडला गेला व त्याची सुंदर कमान बनली व दिवे मालविले जाऊन सिनेमाच्या पड्यावर जाहिराती व त्या दिवशींच्या प्रयोगाच्या कर्त्यांचें नांव व पात्रांचीं नांवें झळकलीं. लागलींच ताज्या बातम्या, घोड्याच्या शर्यती, मुलांच्या पायगार्डीच्या शर्यती इत्यादि प्रसंगांचीं चित्रें भराभर नजरेपुढून जाऊं लागलीं. विलायतेंतल्या बोलक्यां सिनेमामध्यें मधून मधून प्रत्यक्ष नाचाचे व संगीताचे प्रवेश असतात असें मला दिसून आलें. तसेंच हे प्रवेश सुरू होतांना व संपतांना सुरुवातीच्या रेशमी पड्याला विजेच्या साहाय्यानें नाना रंग दिले जात असत व सर्व सभा-गृहाचा विलक्षण देखावा दिसे. एकच पडदा पण तो केव्हां निळा, केव्हां केशरी, केव्हां तांबडा, केव्हां हिरवा असा दिसे व सर्व सभागृह त्या त्या रंगानें जणूं कांहीं मढविलें जाई. विजेच्या साहाय्यानें असे चमत्कार या सिनेमागृहांत दाखविण्याची सोय केलेली आहे. सिनेमांतली मुख्य गोष्ट एका रेडिओ गाणारणीची होती. भाषणें अगदीं खऱ्या बोलणाऱ्या व्यक्तीच्या प्रमाणें वाटतात. पण पुष्कळ वेळां तीं संभाषणें आपल्याला बरोबर कळत नाहींत हें मला कबूल केलें पाहिजे. पण एकंदरीनें या सिनेमादर्शनानें विलायतेंत सिनेमाच्या धंद्यांत किती विलक्षण व आश्चर्य-कारक प्रगति झाली आहे याची यथार्थ कल्पना मला आली.

ता. ३० मार्च सन १९३० रविवार हा माझा विलायतेंतील शेवटला दृश्यदर्शनाचा दिवस होता. विलायतेंतील **हवापाण्याचीं स्थळें**

( Watering places ) मीं मुळींच पाहिलीं नव्हतीं. तेव्हां अशा **स्थळांचा मुकुटमणि ब्रायटन** शहर पाहण्याचा आम्हीं शनिवारीं रात्रीं बेत केला. तद्नुरूप आदितवारची सकाळची न्याहारी करून आम्हीं ९॥ वाजतां **ब्रिक्सटन** पेठेंतील मोटारच्या अड्ड्यावर आलों व तेथें **ब्रायटनला** जाणाऱ्या शाराँबँकमध्यें बसलों. जातांयेतांचें माणशीं भाडें ५ शिलिंग पडलें. आमची मोटार बरोबर १०॥ वाजतां चालू झाली व आम्हीं बरोबर १ वाजतां **ब्रायटनला** पोहोंचलों. **ब्रायटन** हें हवा-पाण्याचें ठिकाण लंडनच्या थेट दक्षिणेस एक्कावन मैल दूर आहे. रस्ता **क्रॉयडन** या हवाबंद्रावरून व **परले** या गांवांतून जातो. **परले**-पर्यंतचा रस्ता आमच्या पूर्वपरिचयाचा होता. पुढें थोड्या वेळानें डोंगराळ मुलुख लागतो व **ब्रायटनच्या** किंचित् आधीं आपण डोंग-राळ मुलुखांच्या मुखांतून समुद्रसपाटीवर खालीं उतरतों व दोन्हीं बाजूला हिरव्यागार बागांमधून जणूं कांहीं मोटारचा रस्ता जातो असें वाटतें. मोटारचा स्टँड अगदीं समुद्रकिनाऱ्यालगत आहे.

**ब्रायटन** हें हवापाण्याचें ठिकाण मूळ मच्छीमारी कोळी लोकांचें खेडें होतें. पण अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास **रिचर्ड रसेल** नांवाच्या डॉक्टरनें या ठिकाणाला महत्त्व आणिलें. तो **ब्रायटनच्या** आरोग्यकारक हवापाण्याकरितां रोग्यांस तेथें जाऊन राहण्याची शिफा-रस करूं लागला व तेथील राहणीनें रोग्यांची प्रकृति सुधारते असा प्रत्यक्ष अनुभव येऊं लागल्यामुळें **ब्रायटनची** कीर्ति वाढत चालली. सन १७८३ मध्यें त्यावेळचे प्रिन्स ऑफ वेल्स—पुढें चवथे जॉर्ज झाले. हे **ब्रायटनला** प्रथम आले. त्यांना हें ठिकाण फार आवडलें. त्यांनीं लागलीच येथें राजवाडा बांधण्याचा बेत केला. हल्लीं समुद्रकांठावर असलेल्या भव्य व प्रचंड राजवाड्याला ( Royal pavilion ) त्यांनीं सुरवात केली व वेळोवेळीं त्याची वाढ होऊन त्याला हल्लींचें बांध-कलेच्या निरनिराळ्या पद्धतीच्या खिचडीचें स्वरूप आलें. पण या राजाश्रयानें **ब्रायटन** हें सर्वांचें आवडतें विश्रांतिस्थान बनलें.

हल्लींचें ब्रायटन हें तीन गांवांच्या–पश्चिमेस **होव** मध्यें खुद्द **ब्रायटन** व पूर्वेस **किंग्सक्लिफ**–त्रिकुटानें बनलेलें सलग शहर आहे. त्याची पूर्व-पश्चिम लांबी पांच मैल व दक्षिणोत्तर रुंदी दोन अडीच मैल आहे. याची वस्ती जवळजवळ दोन लाख आहे. **ब्रायटन** हें समुद्रकिनाऱ्यावरील लहान लंडन आहे म्हणाना. त्यामुळें रस्ते, इमारती, बागा वगैरे बाबतींत आपण लंडनमध्यें जणूं कांहीं आहों असा पदोपदीं भास होतो. पण **ब्रायटनचें** खरें वैभव म्हणजे पांच मैल लांबीचा सरळ सुतासारखा पसरलेला समुद्रकिनारा होय. मुख्यतः तोच पाहण्याकरितां आम्हीं **ब्रायटनला** आलों होतों. तेव्हां त्याच्या वर्णनाकडे आतां वळणें बरें.

मागें सांगितल्याप्रमाणें ब्रायटनचें मोटार ठेवण्याचें ठिकाण समुद्र-कांठावर **पॅलेसपिअर** नांवाच्या समुद्रामध्यें घुसलेल्या धक्क्या शेजारीं आहे. तेथें आम्हीं एक वाजतां पोहोंचलों. फराळाची अगदीं वेळ झाली होती म्हणून आम्हीं आधीं **लायन्सच्या** उपाहारगृहामध्यें ( या कंपनीच्या शाखा विलायतेंत शहरोशहरीं आहेत ) फराळ केला; व मग **ब्रायटनच्या** दृश्यदर्शनाला निघालों.

प्रथमतः **पॅलेसपिअर** पाहिला. हा सुंदर धक्का पांच मैल समुद्र-कांठाच्या साधारण मध्यें आहे. हा धक्का समुद्रामध्यें हजार फूट लांब आंत घुसलेला आहे. त्याची रुंदी सर्वसाधारण पंचावन्न फुटांचे वर असून मध्यें तर ती एकशेंपन्नास फुट असून धक्क्याच्या शेवटास दोनशें फूट आहे. एवढें प्रचंड हें काम आहे. धक्क्याच्या दोन्ही बाजूंस व शेवटीं लहानमोठ्या बोटी व होड्या लावण्याची सोय केली आहे. भरती कमी जास्त असेल त्या मानानें वर खालीं जाण्याकरितां पायऱ्या आहेत. या प्रशस्त धक्क्याला जायची व यायची अशा खुल्या निरनिराळ्या वाटा आहेत. मध्यें कांचांची भिंत असून मधूनमधून कांचेच्या छपराचे खुले मंडप केलेले आहेत. तेथें विश्रांतीकरितां व हवाखाण्याकरितां बाकें ठेविलेलीं आहेत. मधूनमधून दुकानें आहेत; करमणूक व मनोरंजन होईल अशा प्रकारचे पैसे टाकले कीं सुरू होणारे नानाविध खेळ व

खेळणीं ठेवलेलीं आहेत; धक्क्यावर एक प्रशस्त नाटकगृह व नृत्य-वादन-गृह आहे; तसेंच एक चहापानगृहहि आहे; जागोजाग सुंदर लोखंडी कमानी आहेत; सारांश, हा धक्का म्हणजे एक शहरांतील छोटीशी पेठ आहे. रात्रीं हा धक्का विजेच्या १४००० साध्या व १०० आर्कलाईट दिव्यांनीं प्रकाशित केला जातो. तेव्हां तर त्याची शोभा अवर्णनीय दिसते असें समजलें ! अर्थात् ही अवर्णनीय शोभा पाहण्यास आम्हांस सवड नव्हती. म्हणून आम्हांला कल्पनेनें ती शोभा मनःचक्षूंपुढें उभी करावी लागली. हा धक्का पाहून मला **कराचीच्या कोठारी** धक्क्याची आठवण झाली. तांबड्या दगडांनीं बांधलेला व उतरत उतरत वाळवंटापर्यंत गेलेला तो धक्का बांधकलेच्या दृष्टीनें जास्त सुंदर आहे असें मला वाटलें. पण ब्रायटनचा **पॅलेस पीअर** हा प्रत्यक्ष बोटी लागण्याकरितां बांधलेला धक्का आहे; मात्र उपयुक्ततेबरोबर तो शहराला शोभादायक व्हावा व लोकांना करमणुकीचें ठिकाण व्हावा अशी त्यांत योजना केली आहे असें दिसून आलें. कराचीचा कोठारी धक्का हा फक्त समुद्रकिनाऱ्यावरील वाळवंटावर हवा खाण्याकरितां केलेला धक्का आहे. असा या दोन धक्क्यांतील फरक माझ्या ध्यानांत आला.

या धक्क्यावरून पूर्वपश्चिम पसरलेल्या ब्रायटनचा देखावा एकसमयावच्छेदेंकरून दिसतो. समोर दिसणारा तो अफाट समुद्र, धक्क्याच्या दोन्ही बाजूंस पांढऱ्या शुभ्र दगडांनीं व्याप्त असा तो लांबचलांब किनारा, त्याचे पाठीमागें एकावर एक चढते असे रस्ते व त्याच्याहि पलीकडे एकसारख्या लागलेल्या इमारती व त्यांचे नानाविध आकाराचे मनोरे व छपरें हा देखावा पाहून मन आनंद व आश्चर्य या मिश्र मनोविकारांनीं भरून येतें.

हा धक्का पाहून झाल्यावर शेजारीं असलेलें मोठें मत्स्यगृह लागलींच पाहिलें. हें मत्स्यगृह पांढऱ्या शुभ्र दगडांचें कोरें करकरीत बांधलेलें आहे. प्रवेशद्वाराच्या छोट्या छपराशीं सुबक घड्याळ आहे; तांबुस रंगाच्या दगडांच्या सुबक पायऱ्या उतरून खोल खालीं जावें लागतें. खालीं गेल्या-

वर प्रशस्त असा खुला दिवाणखाना लागतो. त्यांतून आंत गेलें म्हणजे लांबच लांब मत्स्यगृह लागतें. या लांबचलांब तळघरवजा गृहामध्यें सुंदर पांढऱ्या तांबूस खांबांची दुहेरी रांगच रांग लागते. म्हणजे तळघराची दुहेरी खांबांनीं तीन दालनें पडतात; मधून जायची वाट व दुसऱ्या दोन्ही कडेला समुद्राचें पाणी भरलेले कांचेचे मोठमोठे हौद आहेत व त्यांत नानारंगी, नाना आकारी जीवंत मासे व इतर लहानमोठे जलचर सरपटणारे प्राणी यांचा व्यवस्थित संग्रह केलेला आहे. प्रत्येक जातीच्या माशाच्या व इतर जलचरांच्या नांवांच्या पाट्या त्या हौदावर लावलेल्या आहेत. हें मत्स्यगृह सन १९२८ मध्यें नवें बांधण्यांत आलें. प्राणिशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीनें हें विलायतेंतील पहिल्या प्रतीचें मत्स्यगृह आहे. स्थलचर प्राण्यांच्यापेक्षां कितीतरी पटीनें अतर्क्य विविधता जलचर प्राण्यांमध्यें परमेश्वरानें निर्माण केली आहे हें पाहून आश्चर्यानें मन थक्क होतें. इन्द्रधनुष्यांतील सात रंग व त्यांच्या निरनिराळ्या छटा, आकाशामध्यें सकाळीं व सायंकाळीं दृग्गोचर होणारे आश्चर्यकारक रंग व त्यांच्या नानाविध छटा यांनाहि मागें टाकणारे रंग व त्यांच्या छटा या जलचर प्राण्यामध्यें पाहून मनुष्य आश्चर्यानें तोंडांत बोटें घालतो हें मत्स्यगृह पाहून आनंदाश्चर्यचकित मनानें आम्ही बाहेर पडलों. मग ब्रायटनच्या पूर्वभागाकडे जाणाऱ्या सुंदर रस्त्यानें दोन अडीचमैल सारखे सृष्टिशोभा पहात **ब्रायटनच्या** प्रख्यात भिंतीसारख्या तुटलेल्या **खडूच्या कडऱ्यापर्यंत** गेलों.

या रस्त्यांची रचना मोठी मजेदार आहे. सर्वांत उंच रस्ता आहे त्याचें नांव **मॅरिन परेड** असें आहे. हा रस्ता फार प्रशस्त असून त्याचे दोन्ही बाजूंस तितक्या प्रशस्त पायवाटा आहेत. पूर्वेकडे जाऊं लागलें म्हणजे डाव्या हातास एकसारखी मोठमोठ्या इमारतींची रांगचरांग लागते. हे सर्व राजवाडे आहेत कीं काय असा भास होतो; इतक्या या इमारती उत्तम बांधलेल्या आहेत. पण या सर्व **ब्रायटन**मधल्या खाणावळी आहेत हें कळलें म्हणजे मन आश्चर्यानें थक्क होतें. आपल्या देशांत

खाणावळ शब्दानें ज्या कल्पना मनांत येतात त्याच्या उलट इकडल्या खाणावळी असतात. म्हणून त्यांना खाणावळी न म्हणतां विश्रांति व विलास यांचीं मंदिरें म्हणणें जास्त युक्त आहे. कारण त्या प्रवाशाच्या सुखसोयी व विश्रांतिविलास यांच्याकडे लक्ष देतात. डाव्या हाताला या भव्य व सुंदर इमारती तर उजव्या हाताला एकाखालीं एक असे दोन सुंदर रस्ते; त्याचे पलीकडे बागा व त्याचे पलीकडे पांढऱ्या तांबड्या रंगांच्या लहानमोठ्या दगडांनीं व्याप्त असा किनारा व त्याचेहि पलीकडे तो नीळसर रंगाचा अफाट समुद्र; हा देखावा कोणाचें मन आकर्षित करणार नाहीं? या **मरिन परेडच्या** खालीं **मडिरा टरेस** म्हणून एक मधला रस्ता लागतो. हा फार रुंद नाहीं. कारण हा रस्ता म्हणजे त्याच्या खालीं लोखंडी खांबांनीं केलेल्या लांबचलांब निवाऱ्या-च्या प्लॅटफॉर्म वजा बांधलेल्या सोप्याचें छप्पर होय; वरच्या रस्त्या-वरून या छप्पररस्त्यावर येण्यास मधूनमधून सुबक जिने केलेले आहेत. प्रशस्त प्लॅटफार्मवजा बांधलेल्या सोप्याच्या पुढें पण त्याच पातळीवर **मडिरा** ड्राईव्ह नांवाचा प्रशस्त गाड्या-मोटार जाण्यायेण्यासारखा रस्ता केलेला आहे. त्यालाहि जाण्यायेण्याकरितां मधूनमधून जिने केले आहेत, असा हा तिमजली रस्ता आहे. **मडिरा ड्राइव्हच्या** पलीकडे मोठ्या खर्डीचें समुद्राचें वाळवंट लागतें व त्या वाळवंटावरून एक लहानशी ट्राम-सारखी विजेची छोटी आगगाडी गेली आहे त्या आगगाडीच्या गाड्या सारख्या जात येत असतांना मोठी मौज वाटते. केव्हां **मॅरिन परेड** या रस्त्यावरून तर थोड्या वेळानें **मडिरा टेरसवरून** तर आणखी कांहीं वेळानें **मडिरा ड्राइव्हवरून** अशा निरनिराळ्या पातळींवरील रस्त्यानें सभोंवारची शोभा पहात पहात आम्ही शहराचे टोंकाला आलों. तेथें हे सर्व रस्ते संपले. फक्त निसर्गस्थितींत असलेला समुद्राकिनारा व वाळवंट लागतें व त्या किनाऱ्याच्या उजव्या बाजूस लाटांनीं दोलायमान होणारें समुद्राचें पाणी व वर डाव्या बाजूस अगदीं भिंतीसारखा उंचच उंच व तुटलेला कडा व दरड. **ब्रायटनच्या** आसपासच्या टेकड्या खडूच्या

असल्यामुळें त्या पांढऱ्या दिसतात. त्या टेकड्यांचे कडे समुद्राला भिडलेले आहेत असें ध्यानांत येतें. याप्रमाणें ब्रायटनच्या दोनअडीच मैलांच्या सहलींत निसर्गकृत व मनुष्यकृत अशी दुहेरी शोभा पहात आम्ही किती वेळ तरी फिरलों; हां हां म्हणतां सायंकाळ होत आली. तेव्हां आम्ही परत फिरलों व घाईघाईनें आमच्या मोटार स्टँडजवळ आलों तोंच आमची सकाळची मोटार तयार होती; त्यांत जाऊन आम्ही बसलों व लागलींच मार्गस्थ झालों. कांहीं तासच कां होईना पण विलायतेंतील हवापाण्याच्या स्थानाचा मुकुटमणि जें **ब्रायटन** याचें दर्शन घडलें म्हणून मोठ्या मुदितमनानें आम्हीं आमच्या बिऱ्हाडीं आठ साडेआठ वाजतां पोहोंचलों. तो दिवस आदितवारचा असल्यामुळें रात्रींचें जेवण व्हावयाचें नव्हतें पण नऊ साडेनऊ वाजतां आम्ही **ब्रायटन**बद्दल बोलत बोलत अल्पोपाहार केला व मग लागलींच निद्रादेवीची आराधना केली व सबंद दिवसाच्या श्रमामुळें आम्हांला गाढ झोंप लागली.

सोमवार तारीख ३१ मार्च सन १९३०–माझ्या परत प्रवासाच्या प्रयाणाची तयारी आज पुरी झाली. मी आपल्या सर्व सामानाची बांधाबांध केली व युरोपच्या प्रवासांत बरोबर घ्यावयाच्या दोन बॅगांखेरीज बाकीच्या बॅगा मी ' टॉमस कुक ' कंपनीच्या स्वाधीन केल्या व माझ्या सामानाचा पंचवीस पौंडांचा विमा उतरला. युरोपला जातांना बोटींतील भाड्याच्या आरामखुर्चीनें मला अद्दल घडली होती म्हणून मी नऊ शिलिंगांला टॉमस कुक कंपनीकडे मिळणारी कापडी आरामखुर्ची विकत घेतली व हें सर्व सामान मला **व्हेनिस** येथें बोटीवर मिळेल अशी तजवीज करून आम्ही टॉमस कुकच्या कचेरींतून बाहेर पडलों. परत प्रवासाची सर्व तयारी आटोपली म्हणून एक प्रकारें आनंद झाला; पण एकदोन दिवसानें लंडनचा सुखकर निवास संपणार; आपला व आपल्या मुलाचा पुन्हां वर्ष दीड वर्षाचा वियोग होणार; तसेंच ज्या घरांत मी सात साडेसात महिने सुखानें घालविले त्या घराचा व तेथल्या मंडळींचा वियोग होणार म्हणून वाईटहि वाटत होतें.

आज दोनप्रहरीं आम्ही **ऑलिंपिया** हॉलमध्यें डेली मेल या दैनिकाच्या मालकांनीं भरविलेलें '**आदर्श–गृह–प्रदर्शन**' ( Ideal Home Exhibition ) पाहण्यास गेलों. लंडनच्या संस्कृतिसंवर्धक संस्थांपैकीं प्रदर्शन भरविण्याची ही एक संस्था आहे. लंडनमध्यें निरनिराळ्या मंडळांकडून नानाविध प्रदर्शनें नेहमीं भरत असतात. मोटारींचें प्रदर्शन, कुत्र्यांचें प्रदर्शन, गुलाबांचें प्रदर्शन, चित्रकलेचें प्रदर्शन, फुलझाडांचें प्रदर्शन, पोस्टाच्या तिकीटाचें प्रदर्शन अशीं एक ना दोन,कितीतरी प्रदर्शनें लंडन शहराच्या निरनिराळ्या भागांत सारखीं भरत असतात. लंडनकरांना हा प्रदर्शन पहाण्याचा फार नाद आहे. अशीं प्रदर्शनें लोकांना ज्ञान देणें व त्यांचें मनोरंजन करणें अशी दुहेरी कामगिरी करतात. मी फक्त अशा प्रकारचीं दोनच प्रदर्शनें पाहिलीं. पहिलें **इटालियन** चित्रकलेचें प्रदर्शन हें **बर्लिंगटन हाऊसमध्यें** भरलें होतें व दुसरें **आदर्श-गृह-प्रदर्शन.**

**ऑलिंपिया हॉल** ही एक प्रचंड इमारत आहे. ती दोन तीन मजली असून तीमध्यें प्रशस्त दालनें आहेत. हें प्रदर्शन या सर्व इमारतीभर मांडलेलें होतें. लहान मोठ्या आदर्शभूत बंगल्यांचे प्रत्यक्ष नमुने तयार केलेले होते. त्यांच्यापुढें सुंदर फुलबागा यांची रचना कशी असावी हें प्रत्यक्ष दाखविलेलें होतें. सुसंस्कृत व सुसंपन्न अशा गृहस्थितीला लागणाऱ्या नानाविध वस्तु, घरकामी छोटीं यंत्रें, उपकरणें, विजेचा घरकामी उपयोग, आरोग्यवर्धक सोयी, स्वच्छतेची व्यवस्था, रोग्यांची शुश्रूषा, बाळंतिणीची शुश्रूषा वगैरे सुखकर संसाराला अवश्य अशा गोष्टींचें प्रत्यक्ष दर्शन व्हावें अशा प्रकारचे नमुने या प्रदर्शनांत मांडलेले होते. या प्रदर्शनांत पहाणारास काय काय तरी पहावें अशी पंचाईत येऊन पडते. आदर्शभूत गृहाला उपयुक्त व शोभादायक अशा हजारों वस्तु निरनिराळ्या दालनांत मांडलेल्या होत्या. प्रत्येक दालनामधील वस्तूंची व नमुन्यांची माहिती देण्याकरितां नानातऱ्हेचे पोषाख केलेल्या स्वयंसेविका उभ्या होत्या. त्यांच्याकडे पाहिलें म्हणजे कल्पनासृष्टींतील किंवा स्वर्गसृष्टींतील कवींनीं केलेल्या वर्णनाची आठवण होई.

हें प्रदर्शन पाहून हिंदुस्थानांतील राहणीमध्यें व युरोपांतील राहणीमध्यें जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे असें ध्यानांत आल्यावांचून रहात नाहीं हें खरें. हें प्रदर्शन ओझरतें पहाण्याससुद्धां आम्हांला तीनचार तास लागले. इतकें विस्तीर्ण व प्रचंड हें प्रदर्शन होतें.

आज रात्रीं आम्हीं एका प्रख्यात हयात नाटककाराचें नाटक पाहून घेतलें. माझ्या लंडननिवासामध्यें पूर्वीं मीं तीन शेक्सपीयरच्यीं नाटकें पाहिलीं होतीं; त्यांचीहि हकीकत येथेंच एकदम देऊन टाकतों.

लंडनमध्यें **ओल्ड विक** ( Old Victoria Theatre नाटकगृहाचें लोकांमधील प्रचलित नांव ) नांवाचें नाटकगृह आहे. येथें एक अर्धवट धंदेवाईक व अर्धवट हौशी नाटक मंडळी कांहीं काळ नव्या अर्वाचीन नाटकांचे प्रयोग करते; व मधूनमधून शेक्सपीयरच्या नाटकांचे प्रयोग करते. आम्हीं या कंपनीचा **ज्युलियस सीझर** या शेक्सपीयरच्या ऐतिहासिक नाटकाचा प्रयोग पाहिला. हा प्रयोग खरोखरीं फार उत्तम बसविला होता यांत शंका नाहीं. रोमन लोकांच्या वेळच्या प्रत्यक्ष पोषाखाची पद्धति पात्रांनीं पत्करलेली असून रोमच्या इतिहासाच्या पुस्तकांत पाहिलेल्या त्या पोषाखाच्या चित्राप्रमाणें हुबेहूब पोषाख घातलेलीं पात्रें प्रत्यक्ष पाहतांना “ न च न परिचितो न चाप्यगम्य–। श्चकितमुपैमि तथापि पार्श्वमस्य ॥ सलिलनिधिरिव प्रतिक्षणं मे । भवति स एव नवो नवोऽयमक्ष्णोः” ॥ या श्लोकाची मला आठवण झाली.

या नाटकांत प्रवेशागणिक रंगभूमीमध्यें **सीन** बदलण्याची पद्धत दिसली नाहीं; दरएक अंकाचे सर्व प्रवेश एकाच **सीनमध्यें** करण्याची पद्धत दिसली. दुसरें शेक्सपीयरचें हॅम्लेट नाटक **कोर्ट थिएटर** नांवाच्या **स्लोन** चौकांतील थिएटरांत एका हौशी कंपनीनें केलेलें आम्हीं पाहिलें. हें नाटक तर विलायतेंत हल्लीं रूढ होऊं पहात असलेल्या एकाच सीनपद्धतीवर बसविण्यांत आलें होतें. मात्र विजेच्या निरनिराळ्या रंगाच्या प्रकाशानें व त्या प्रकाशांमधील चकचकितपणा व अंधुकपणा या भेदानें नाटकांतील निरनिराळीं स्थळें दिग्दर्शित करण्याची योजना

केली होती. मला ही पद्धत पसंत वाटली नाहीं. या पद्धतीनें पात्रांचे चेहरे केव्हां केव्हां स्पष्टपणें दिसत नसत व यामुळें अभिनयाचें कौशल्य पाहण्यास सांपडत नसे. या नाटकाचा प्रयोग ज्युलियस सीझरच्या प्रयोगाइतका चांगला वठला नाहीं असें मला वाटलें; तसेंच हॅम्लेटची भूमिका वाखाणण्यासारखी चांगली वठली नाहीं.

तिसरें शेक्सपीयरचें नाटक **समानशासन** ( Measure for Measure ) हें लंडन स्कूल ऑफ एकॉनामिक्सच्या **शेक्सपीयर सोसायटीनें** बसविलें होतें. यामध्यें कॉलेजांतील विद्यार्थी–विद्यार्थिनी व शिक्षक यांनीं सर्व भूमिका घेतल्या होत्या. या नाटकाचा प्रयोग कॉलेजच्या नाटकगृहवजा असलेल्या दिवाणखान्यांत झाला. हा प्रयोग मात्र हॅम्लेटच्या प्रयोगापेक्षां जास्त चांगला झाला यांत शंका नाहीं.

चवथें नाटक **बर्नर्ड शॉचें ॲपलकार्ट** हें वर उल्लेख केल्याप्रमाणें आम्हीं आज रात्रौ पाहिलें. त्याचा प्रयोग फार चांगला वठला. पात्रांचें अभिनयकौशल्य सरस होतें. एकंदरींत **बर्नर्ड शॉच्या** कीर्तीला साजेल असेंच पात्रांचें स्वभावरेखन केलेलें असल्यामुळें नाटक ब्रिटिश राज्यपद्धतीची सद्यःस्थिति व भावी स्वरूप यांवर असूनहि मोठें परिणामकारक झालें.

ता. १ एप्रिल सन १९३० मंगळवार हा माझ्या लंडन-निवासाचा उपान्त्य दिवस होता.

आम्हीं नेहमींप्रमाणें सकाळची न्याहारी केली. नंतर परत प्रवासांत बरोबर घ्यावयाच्या दोन्ही बॅगा बांधल्या. आज आम्हीं दुपारचा फराळ घरींच भावी प्रवासासंबंधीं बोलत बोलत केला. नंतर आज पाहूं उद्यां पाहूं असें करतां करतां पाहण्याचें राहून गेलेलें प्रेक्षणीय स्थळ लंडनचें प्रख्यात प्राणिसंग्रहालय आज दोनप्रहरीं पाहण्यास गेलों. आजच्या माझ्या लंडनमधील शेवटच्या दृश्यदर्शनांत एका धोंड्यानें तीन पक्षी मारिल्यासारखें होत होतें म्हणून मला विशेष आनंद वाटला. कारण लंडनचें प्राणिसंग्रहालय लंडनच्या बागांचा मुकुटमणि **रीजंटपार्क** या-

मध्यें असल्यामुळें त्या सुंदर बागेचें शेवटचें दर्शन घेतल्यासारखें होईल; दुसरें न पाहिलेलें प्राणिसंग्रहालय पाहून होईल व शेवटीं या बागेला लागून असलेल्या **प्रिमरोज** टेकडीचें पुनर्दर्शन घडेल. अशा तिहेरी उद्देशानें आम्ही फराळ झाल्याबरोबर बाहेर पडलों व अगदीं सायंकाळीं विम्बल्डनीं परत आलों.

आम्हीं भुयारी रेलवेनें **रीजंटपार्क** स्टेशनला आलों; व **रीजंटपार्कच्या** दक्षिणदारानें बागेंत प्रवेश केला. वसंताच्या प्रारंभाबरोबर पानाफुलांचा नवा बहार आलेल्या फुलझाडांच्या ताटव्याची शोभा पहात पहात **ब्रॉडवॉकच्या** रस्त्यानें आम्ही प्राणिसंग्रहालयाच्या दक्षिणदारानें आंत गेलों. केवढें प्रचंड हें प्राणिसंग्रहालय आहे! हें प्राणिसंग्रहालय लंडनच्या प्राणिशास्त्र मंडळानें १८२८ मध्यें स्थापन केलें; त्याची सर्व व्यवस्था मंडळ करतें; व संग्रहालयाचा खर्च मंडळच चालवितें. मंडळाच्या उत्पन्नाच्या बाबी म्हणजे सभासदांचीं वार्षिक वर्गणी व प्रेक्षकांकडून मिळणारी प्रवेश फी. या मंडळाचे एकंदर सुमारें **नऊहजार** सभासद आहेत. या संग्रहालयानें **रीजंटपार्क**मधील सदतीस एकर जागा अडविली आहे. या संग्रहालयांत प्राणी ठेवण्यासाठीं केलेलीं गृहें व आवारें एकंदर ८६ आहेत. यांमध्यें नानादेशांतील निरनिराळ्या कटिबंधांतील हजारों लहानमोठे प्राणी होतां होईल तितके त्यांच्या त्यांच्या स्वाभाविक स्थितींत ठेवण्यांत आलेले आहेत. या प्राणिसंग्रहालयांत पाऊल टाकलें म्हणजे काय पाहूं काय न पाहूं असा मनाचा मोठा गोंधळ होतो; आपण कधींहि न पाहिलेले नानाविध प्राणी आपल्या दृष्टीस पडतात, आपल्याला परिचित असणाऱ्या प्राण्यांच्यासुद्धां कल्पनातीत अशा उपजाति तेथें पहावयास सांपडतात. स्थलचर, जलचर व आकाशचर अशा तिन्हीं वर्गांचे प्राणी येथें आहेत. जलचर प्राण्याकरितां स्वतंत्र मत्स्यगृह आहे. हें मत्स्यगृह **ब्रायटनच्या** मत्स्यगृहाप्रमाणें नवेंच बांधलेलें दिसलें; ब्रायटनचें मत्स्यगृह व प्राणिसंग्रहालयाचें मत्स्यगृह यांमध्यें तरतमभाव शोधून काढणें मुष्किलीचें आहे

असें मला वाटलें; इतकीं दोन्हीं गृहें सुंदर व नानाविध जलचर प्राण्यांनीं गजबजलेलीं आहेत. याप्रमाणें सर्व प्राणिसंग्रहालय पाहून आम्हीं उत्तरे-कडच्या प्रवेशद्वारानें संग्रहालयाच्या बाहेर पडलों व लागलींच प्रिमरोज टेकडीच्या पायथ्याला आलों.

प्रिमरोज टेकडीच्या पायथ्याला सभोंवार हिरवें हिरवेंगार गवत आहे; टेकडी बहुतेक वाटोळी असून ती पायथ्यापासून शंभर फूट व आमच्या बिऱ्हाडापासून एकशेंपन्नास फूट उंच आहे असें माझ्या उंची मोजणाऱ्या यंत्रावरून मला कळलें. या टेंकडीवरून लंडनचा पुष्कळ भाग एकसमयावच्छेदेंकरून दृग्गोचर होतो व लंडनच्या दाट वस्तीचें राहून राहून आश्चर्य वाटतें. ज्याप्रमाणें एखादा हौशी प्रवासी प्रेक्षणीय स्थळांचे दोनचार फोटो आपल्या कॅमेऱ्यांत घेऊन ठेवतो त्याप्रमाणें टेंकडीच्या माथ्यावरून दिसणाऱ्या चारी दिशांच्या लंडन शहराचीं चार चित्रें मी आपल्या मनःफलकावर काढून घेतलीं. आतां पुन्हां लंडन शहर पाहण्याचा योग येईल काय अशा आशाळभूत प्रश्नाच्या मनःस्थितींत सायंकाळ झाली म्हणून मी मोठ्या जड पावलांनीं टेकडीच्या खालीं आलों. त्यानंतर डॉ. परांजपे यांचें बिऱ्हाड जवळ असल्यामुळें त्यांच्या-कडे जाऊन त्यांचा शेवटला निरोप घेतला. भुयारी रेलवेनें रात्रींच्या जेवणाच्या वेळीं आम्हीं बिऱ्हाडीं पोहोंचलों. माझ्या लंडनच्या निवासाचा अंत **अती समीप** आला असें मला वाटलें.

ता. २ एप्रिल सन १९३० बुधवार हा माझ्या लंडननिवासाचा शेवटला दिवस होता. आज मी सकाळीं सहा वाजतां उठलों. पहातों तों सारखा झिम झिम पाऊस पडत होता. आजचा सर्व दिवस दुर्दिन होणार कीं काय अशी मनाला शंका वाटली. नित्याचे विधि आटोपून आम्हीं सर्वत्रांनीं शेवटची एकत्र न्याहारी केली. कारण घरांतील सर्व मंडळी मला स्टेशनवर निरोप देण्यास येणार होती. आमची न्याहारी आटोपते तोंच पाऊस थांबला व सुंदर सूर्यप्रकाश पडला. हा माझ्या प्रवासाला शुभ शकून झाला असें वाटून माझें मन प्रसन्न झालें. "आम्हीं आतां

येतों लोभ असूं द्यावा " या अर्थाच्या इंग्रजी शब्दांनीं मी **मिसेस बॉट** व **मिस विनी बॉट** यांचा निरोप घेतला. त्या दोघी मिस्टर **मर्टेकर** व माझा मुलगा मनोहर अशीं सर्वजणें आम्ही आणविलेल्या टॅक्सीमध्यें बसून **व्हिक्टोरिया स्टेशनवर** आलों. त्या दिवशीं कॉन्टिनेंटल ट्रेनला बरीच गर्दी होती. पण शेवटीं सेकंडक्लासांत मला एक जागा मिळाली. मी आपल्या दोन बॅगा वरच्या रॅकवर ठेवल्या व आलेल्या मंडळींशीं इंग्रजीपद्धतीचें गाढ हस्तांदोलन व आमच्या पद्धतीचा नमस्कार असा दुहेरी पद्धतीचा निरोप घेतला व मी आपल्या जागेवर बसलों. आमची मंडळी डब्याबाहेर जाऊन खिडकीशीं उभी राहिली; इतक्यांत आगगाडीची शीळ झाली. व बरोबर अकरा वाजून वीस मिनिटांनीं आमची आगगाडी चालू झाली. मंडळी दिसेपर्यंत मी त्यांच्याकडे पहात होतों व त्यांना परत जाण्याबद्दल खुणावीत होतों तोंच आमची गाडी भराभर स्टेशन सोडून **डोव्हरकडे** जाऊं लागली. यावेळीं माझी मनःस्थिति कशी होती व माझ्या मनांत काय काय विचार आले हें सांगतां येणें अशक्य आहे. कारण हिंदुस्थान सोडल्यापासून विलायतेला येईपर्यंतचा व लंडनच्या आठमाही निवासांतील अनुभवाचा चित्रपट माझ्या मनःचक्षूपुढें एकसमयावच्छेदेंकरून उभा राहिला. आनंद, आश्चर्य, खेद इत्यादि मिश्र मनोविकार माझ्या मनांत उद्भूत झाले. पण या सर्व संकीर्ण मनःस्थितीचा विसर आमच्यापुढें लागलींच आलेल्या फराळानें पाडला. कारण **डोव्हरच्या** आंत फराळ आटोपला पाहिजे म्हणून आगगाडींतील सेवकांनीं फराळाचीं ताटें आणलीं व मग माझें मन खाण्याकडे लागलें. सभोंवारची शोभा पहात मधूनमधून लहान लहान बोगदे लागत त्याकडे लक्ष देत माझा फराळ आटोपून मी ५ शिलिंगांचें बिल चुकतें करीत आहे तोंच १ वाजतां **डोव्हर बंदर** आलें. **फोक स्टोन** व त्याच्या उत्तरेकडे असलेलें डोव्हर हीं दोन्हीं बंदरें साधारणतः सारखीं दिसतात. त्यांच्या किनाऱ्याला पांढऱ्या खडूच्या टेंकड्या आहेत; पण **डोव्हरचा** धक्का अर्ध वर्तुळाकार बांधला असून तो **फोक-**

**स्टोन**पेक्षां जास्त प्रशस्त आहे असें वाटलें, आम्ही बोटींत बसलों व बोट १॥ वाजतां सुटली. येथें इंग्लिश खाडी अगदीं अरुंद ह्मणजे फक्त पंचवीस मैल आहे. यामुळें बोट सोडून अर्धा तास झाला नाहीं तोंच फ्रान्सचा किनारा दिसूं लागला व इंग्लंडचा किनाराहि अस्पष्टपणें दिसत होता. खाडी अगदीं शांत होती; तेव्हां या छोट्या जलप्रवासाची मौज वाटली. निघाल्यापासून बरोबर सवातासानें ह्मणजे पावणेतीन वाजतां मी कॅले बंदराला आलों. येथें माझी विलायतची यात्रा संपली व माझ्या विलायतच्या यात्रावर्णनपर पुस्तकाचीहि समाप्ति झाली.

समाप्त.

# सूचि.


अकाबा २६
अपघात १७–१९
अरेबिया २६
अंत्यग्रही ७३–४
ॲन्‌राणी १४५, १६९
ॲपलकार्ट २५२
ॲबट्‌स्फर्ड २२५–८
आगरकर गो. ग. ११
आठवडा अखेर ८३–८५
आडारकर श्री. १९३, १९८
आड्मिराल्टी आर्च १५२
आदर्शगृह प्रदर्शन २५२
आद्यग्रही ७३–४
आग्न ११–११
आरबी व्यापारी २२
आर्गाइल टॉवर २२४
आर्थर सीट २२०–२२२
आर्नोल्ड एड्विन् १९०
आर्मिस्टिस दिवस १००–१
आर्यभवन ४१ ५१, ५५
आल्फ्रेड दि ग्रेट ६०
आल्बर्ट हॉल १५७
ऑक्सफर्ड १७८–१९२, प्रवास १७८–८०, कॅम्ब्रिजशीं तुलना १७८–९
ऑक्सफर्ड कॅमेरा २२२
ऑलिंपिया हॉल २५२
ऑल्‌डिच् १४९, ५०
ऑल्‌डेट्‌स् चर्च १८८
ऑलसोल्स् कॉलेज १८४–८५
ऑस्ट्रेलियन हाउस १४९
इटली ३५
इटालियन् कंपनी ४
इन्–ग्रे व लिंकन् १४८
इमॅन्युएल कॉलेज १९५–९६–स्ट्रीट १९६
इस्पितळ सेंटटॉमस् १७१, चेलसी १७१
इंडियन इन्स्टिटयूट १८१
इंडिया ऑफिस २, ५५-५६, १०१
इंडिया हाऊस १५०
ईस्ट एण्ड ६१, ८९, १३२
ईस्टर ९४
उत्तरापथ २१०
उपवनें ७१-७२
उपाहारगृहें ७८, २११
ऊन घरें ११८
एकिलीझ पुतळा १५५
एडन् १९-२२—आखात २३, २६
एडवर्ड एलन् १२२, १२५
एडवर्ड सातवा १७०
,, धी कनफेसर १६०
एडविन् बर्ज २१५

एडिंबरा २०९-२२९—प्रवास २०९-–१३, शहर २१४-५–इतिहास २१५-१६, एस्प्लेनेड २२३-स्मारक २२३–म्युझियम् २२०–आर्थर सीट २२०–मौंड २२५–फोर्थपूल २२५-२६
एपिंग फॉरेस्ट ७२, ८४, १२८-१३२ हायबीच १३०
एप्सन् डाउन्स १०९-१११, स्टेशन १०९—गांव १०९
एम्बँकमेंट ९९, १६७-८, १९९, २४३
एलिफंट आणि कॅसल १३२, १४०
एशिया बोट २, १२–१४
एस्प्लेनेड २२३
ऍण्ड्रूज हॉटेल २१४, २१६-२१७
ओरियल कॉलेज १९०
ओल्डाविक् थिएटर २५२
कपडे ५–लत्ते १०
करमणूक बोटीवर २३–२४
कवींचा कोपरा १६१
कंडक्टर ८३
कॅम् नदी १७८, १९४
कॅर फॅक्स १८७, १८९
कॅले २५८
कायस कॉलेज १९७
काल्टन टेकडी २१९
कांचगृहें १८० १९४
कॉर्पस क्रिस्टी कॉलेज १८९
कॉलेजें–ऑक्सफर्ड १७८–१९२
–कॅंब्रिज १९६–२०८
किंग्ज कॉलेज १९८
किंग्ज वे हॉल ८१–कॉसस्टे. ६६, ९६
केकस् १०३
केकरे श्री. १२०
केन–वन १३४
केन्सिंगटन् बाग १५५–५६,
—राजवाडा १५७
केबल कॉलेज १८५
कॅंब्रिज १७८, १९३–२०८ बॅकुस २००–२०४ स्त्रियांचीं कॉलेजें २०१, २०२–४
कोठारी धक्का २४८
क्युबाग ११६–११८
क्रॅन्मर १८६
क्राइस्ट चर्च कॉलेज १८८–८९, १९६–
–लेन १९६
क्रॉमवेल १६९
क्रॉयडन् १११–१२
क्रिस्टमस ९३, १०२–१०६–केक १०२-१०३ क्रिस्टमस कार्डं १०४-५ खेळणी १०५–कराउल १०६,
–ट्री १०६
क्रोकस २४१
क्लिओपाट्राची सुई १६७
क्लेअर कॉलेज २०५
क्वीन्स कॉलेज १९०
„ रोड २००
खडू कडा ( Chalk Cliffs ) २४८, २५१

खेळ ( बोटीवरील ) २४-५
गजगति ६४
गन्पावडर प्लॉट ९४
गर्टन् कॉलेज २०१-४
गॅमेजेस् १०५
गाय् फॉक्सडे ९४-९५
गार्डन सबर्ब १३५
गॉनव्हिल कॉलेज १९७
गिल्ड् हॉल ९६, १००
गृहशृंगारक ८६
गोल्डुस ग्रीन १३५
ग्रँथॅम २११
ग्रिफिन्पक्षी १४८
ग्रीनपार्क १५४-५
ग्लॅडस्टन् ६७, १४९
चहा ( लिंबाचा ) १६ पानगृहें ७७,११८
घरगुती चहा ०१९
चान्सरी गल्ली १४८
चित्रालय १५२
चेरिंग क्रॉस स्टेशन् ६२, १५१ -पूल
१६७—हॉटेल १५१
चौके—एलिफंट व कासल १४०
—कॅरफॅक्स १८७,१८९, लडगेट
७०, १४७; ट्रॅफल्गार ७०,९७,१५१
पिकाडिली ७०—ऑक्सफर्ड ७०—
पार्लमेंट २४३ स्लोन २५३
जखम—बोटाची ४४
जलकुलुपें १६५,१७३
जॉर्ज १६९,-दुसरा १६९-तिसरा १६९
चवथा २४६ पांचवा १७०
जिनोआ ४,३९
जेद्दा २६
जेम्स् ( पहिला ) १६९,२१६ दुसरा
१९५, १४५
टल्स्हिल् ४६-७
टसाउड १६३-६४
टॉमस कुक ४,२५१
टॉवर ( लंडन ) १४१, १४३,-व्हाइट
१४२-ब्लडी १४२-सेंट १४२-
ब्रिज १४३-४, १४९, १६६
टिमशा सरोवर २८, ३२
टिलूबरी डॉक्स् १६६
टेकडी हर्न १४०-डेन्मार्कहिल १४०-
टॉवर १४१, १४४, लडगेट् १४७-
पार्लमेंट १३४, सिडनहॅम १३४,
प्रिमरोज १३८, २५१, काल्टन्
२१९, २२४ ब्लॅकफर्ड २१९
टेडिंगटन् १६५-६, १७३
टेम्स् उत्पत्ति ५९ प्रवाह ६०, ११४-
१६-१४९, १६५-१७३, १७७,
१८५
टेंपल मिडल व इनर १४७ बार १४८
ट्रंपिंगडन् १९५,१९७,२०१,२०५-६
ट्रॅफलगार चौक ९७, १५१
ट्रिनिटी कॉलेज १८६ २००, २०७-
-रोड् ४५-६,हॉल् १९७राईस् ४६-
७, ५० प्रार्थनामंदिर १९७

ट्वीड नदी २२७
ठाकूर श्री. वा. १९३
डलिच कॉलेज १२३, २४, चित्रालय १२४ बाग १२५, २४२ रान १२३
डॅडिंग्टन सरोवर २२२
डाउनिंग कॉलेज १०५-स्ट्रीट १९५
डॉंकॅस्टर २१२
डेन्मार्क हिल् १२१—२४
डोव्हर २५७
तयारी ६—७, १०
तांबडा समुद्र २३, २६—२७
'तिकीट' ४
तिमाही टर्म ९३-९४
थिएटर—ओल्डविक २५३ कोर्ट २५३ रीगल २४४
दळणवळणाचीं साधनें ६३—६९,—पादचार ६३—४
—घोड्याच्या गाड्या ६४-५,-ट्रॅम६५
—रेल्वे जमिनीवरील ६५—बस् ६६—६७
—रेल्वे जमिनी खालील ६७,भुयारी रेल्वे ६७
—सोई ६९—रहदारीचें प्रमाण ७०
दर्यादुखी १४—१६
दुकानें ८६—८७
दुःखाश्रुपूल १९९
नकाशा ४५, ६७—८, १५३, १८०, १८३, १८७
नथांबती गाडी १७९, १९३
नमुने ( models ) १५३
नम्रताद्वार १९७
नाइट गाउन् ६
नॉक्स् जॉन् २१८
निवास गृहिणी ४५, ५४
नेपल्स ३६—३७
न्यायाधीश २३८
न्यू कॅसल् २१२
न्यून्हॅम कॉलेज २०१
पदार्थसंग्रहालयें-व्हिक्टोरिया, आलबर्ट व नॅचरल हिस्टरी १५८ स्कॉटिश २१० फिट्झविलयम् २०५—६ हॉनिमन् १२६
परदेश गमन ३—४
परांजपे डॉ. ४०, ४१, ४३, ५५, १९३, २५६
—सौ. सईबाई ४० ते ४४.
परीट ८—१०
पॅडिंगटन् ६६, ९६
पॅलेस् पियर २४७
पॅसेज ५
पादचार ६३—४
पामर्स्टन् ३२
पार्कलेन सत्याहत्तर, नाटक २२६
पार्लमेंट सभागृहें १६२—३, २४३
पासपोर्ट ५—ऑफिसर ५
पॉंपे ३७—३८
पिकाडिली १५६

पीटरपॅन् १५६

पीटर हॉउस् कॉलेज १९९

पुतळा–ॲन् १४५, एकिलीझ १५५, आलबर्ट १५७–क्रॉमवेल १६१, ग्लॅड्स्टन् १४९, जॉन्सन् १४९ नेलसून १५२–नॉक्स् २१८–पीटर-पॅन् १५६–रिचर्ड १६१–व्हिक्टोरिया १५४–हेग् २२३

पूल–लंडन ६०–१, १४०, १६६;–टावर १४४, १४९, १६६–७;–मॅगडेलन् १९१, २०४–फॉली १९७–वेस्टमिन्स्टर १६६–७, १७०–१,२४३–ब्लॅकफ्रायर्स १४७, १६७;–वाटर्लू १५०–१, १६७–बॅटरसी १७१, चेरिंग क्रॉस १६७–लॅंबेथ १७१–व्हॉक्सहॉल १७१–क्यू १७२–३, फोर्थ २२५

पेपजि २०४

पेंब्रोक कॉलेज १८८, २०७

पोपकवि १६९

पोर्ट सय्यद् २८–२९, ३५

पोलीस–लंडन व हिंदुस्थान ५३–५४

प्रदर्शन १८५१ चें १२० ते २५२

प्रसादचिन्हानि–१७३

प्राणिसंग्रहालय १३७–८, २५५

प्रार्थनामंदिर–वेस्टमिनस्टर १६०–६१ –सेंटपॉल्स १४४–४७, –ट्रिनिटी १९७–सेंटमेरी १८३०४ १८९, १९७ सेंट मॅगूडेलेन् १८७,मार्टिन १५२, १८१; सेंट जाईल्स् १८५, –ऑलडेट्स् १८८–रोमन कॅथॉलिक १५९

प्रिमरोज टेकडी १३८,२५६

प्रिन्सेसस्ट्रीट २१७,–स्टेशन २१७, २२४

प्लेन झाड १३३, १५२

फॉली पूल १८७

फिन्सबेरी बाग १३२–३३, स्टे. १३२–३३

फुप्फुसें ( लंडनचीं ) ७०

फेन कॉजवे २०५

फेबियन् सोसायटी ८१

फोकस्टोन ३९, २५७

फोर्थ खाडी २०९ २१४,२१९,२२२

फोर्थ पूल २२५

फ्रीमेट ३०

फ्लीट स्ट्रीट १४७–४८,

बकिंगहॅम पॅलेस १५४

बस् ४६–४७, ५१–५२, ६६, ८३, ११३–१४, १२०, १२९, १३१, १४०, १७७, २०३, २०९–१०, २१२, २१९, २२६, २२८, विजेची २१२

बॅक्स् २००–२०४

बॅरिस्टरी १४८

बाग ब्लॉकवेल १२६, १४०; क्यू १२६–११८, १७२, हाईडपार्क १५५–५६; रिचमंड ११४–१६,

१७३; रिजंट २३६–३७, २५५; केन्सिंगटन १५५–५६; फिन्सबेरी १३२–३३ ग्रीनपार्क १५४–५५ सेंट जेम्स १५३ रस्किन् १२७, १४० बॅटरसी १७२ हॉनिमन् १२६
बॉक्सिंग डे १०६
बॉट ( मिसेस् व मिस् ) ४८-५१, ५४–५७, १२९–१३१, २५७
बॉडलियन् वाचनालय १८१–८३
बिग् बेन २४३
बिटरलेक् २८
बीफन्लफील्ड ३४
बेन्. प्रो. १८४, १९०
बेलियल कॉलेज १८९–९०
बेलसाईझ पार्कस्टे. ४५, १३४
बोडेशियाराणी १६८
बोलती गॅलरी १४६
ब्रायटन् २४६–२५१–पॅलेस पिचर २७४, पॅलेस २४६, मत्स्यगृह २४८, ९ मॅरीन परेड २४९–५० माडिरा टेरेस् २५०, माडिरा ड्राइव्ह २५०
ब्रॉकवेल बाग १२६, १४०
ब्रॉड् वॉक ११७, १५५
ब्रॉड् स्ट्रीट् १८१
ब्रिटिश म्युझियम् ५५
ब्रूकलॅंड्स् एव्हेन्यू २०१
ब्रेसनोझ कॉलेज १८९
ब्रेंटफर्ड बेटें १७२
ब्लॅकफर्ड टेकडी २१९
ब्लॅकफ्रायर्सपूल १४७, १६७
भर्तृहरी ८२
भाकऱ्या बर्फाच्या २२१
भुयारी आगगाडी ४६, ६७, ६८, १३२
मक्का–मदीना २६
मणेरीकर श्री. १९४, १९८, २००, २०२
मत्स्यगृहें १३८, २२९, २५५
मद्याचीं दुकानें ९१
मद्यप्रियता ९१–९२
मनोरंजन १
मनोहर–भाटे–मुलगा ४, ४०, ४१–४२ ४५, ५१–५२, ५४–५५, १२९, २०९, २१३
मनोरा ( टॉवर ) घड्याळ १६२, व्हिक्टोरिया १६२, आरगाइल २२४, लंडन १४१–४३
'मराठी वाङ्मयाचा इतिहास' २–३, ४३
मर्टन् कॉलेज १९०
महाजनी डॉ. १९३
मॅगडेलन् कॉ. १८२, १९०–९१ पूल १८७, १९१, २०४ चर्च १८७ स्ट्रीट १८७
माडघर ११७
मानधनद्वार १९७
मॉल १५२–५४
मित्र का. र. १
मित्र ( आश्रयदाता ) २

मित्र ( डॉक्टर ) ३ एक १७९
मुरगेट १३२
मृगगति ६४
मेणाचीं चित्रें १६३
मेरिलिबोर्न ६६, ९६
मेंझाला २८
म्युझियम् व्हिक्टोरिया, आलबर्ट, नॅचरल हिस्टरी १५८ स्कॉटिश २१०
युनिव्हरसिटी—ऑक्सफर्ड १७८—९२, केंब्रिज १९३—२०८ एडिंबरा २२०, —कॉलेज १९०—युनियन् २१९ लंडन १५७
युजीन २९
यूस्टन् ६६, ९६
योगायोग १-२, ११, १३
रफू ९
रसेल रिचर्ड २४६
रस्किन् पार्क १२७, १४०
रस्ता—लड्गेट १४७—फ्लीट ९७, १४७—४८—स्टँड ९७, १४८-४९-मॉल १५३—५४ नॉरवुड ५० —किंग्जवे १५० —व्हाइट हॉल ९७, १५२-२४३ रॉटन्रो १५५ लेडीज माईल् १५५ प्रदर्शन १५८ प्रिन्सेस २१७, २२४ ऑक्स्फर्ड १५६—व्हिक्टोरिया १५८ स्पॅनियर्ड १३५ -ट्रंपिंगडन् १९५-९७ ब्रॉडवाक् १३३, १५६ बेझवाटर १५६
रॅड्क्लिफ् १८३ —कॅमेरा १८३
रॅले ( वाल्टर ) १४२
राष्ट्रीय चित्रालय १५२
रॉटन्रो १५५
रिचमंड टेकडी १६५ —पार्क १७३, ११४—१६ टेरेस् ११४—५
रिड्ले १८६
रीगल थिएटर २४४—५
रीजंट पार्क १३६-३७ इनरसर्कल औटरसर्कल व कालवा १३६-३७ —स्टेशन २५४
रीडिंग १८०—बिस्किटें १८०
रूकरी १२७
रेन क्रिस्टोफर १४१, १४५-४७, १९९
रेल्वे—सदर्न ६६, L.M.S.R. ६६, ९६ G.W.R. ६६, ९६, १७८, L.N.E.R. ६६, ९६, १९३
लंडन १०८—१७७,—दक्षिण १०८—१२७—उत्तर २२८ ते १३८ —मध्य १३९ ते १६४—महत्तम ६२ —महत्तर ६१ —बंदर १४०, १६५—६६ —विश्वविद्यालय १५७—टॉवर १४१ —पूल १४०, १६६ —रस्ते ६३ —हॉटेल्स ७७ —इतिहास ५८ ते ६२
लंडनकर ७३—९२ पोषाख ७५ —एकपणाची भावना ७६ —रोटी व्यवहार ७६—७७ स्त्रीपुरुष समानता ७८-७९ नियमितपणा ७९, ८१—२ घर ८६ रोजचा कार्यक्रम ८० सदभिरुचि ८५ —दुकानें ८७ —स्वच्छता ८७

सभ्यपणा व दाक्षिण्य ८८-८९-द्यूत-प्रियता ९० मद्यप्रियता ९१
लॅटिमर १८६
लँबेथ १७१ -पूल १७१ -बरो ४९
लायन्स ७६, ८०, २४७
लाँगवॉटर सरोवर १५५
लिव्हरपूल स्टेशन ६६, ९६, १९३
लिंकन् कॉलेज १८९
लेपेरे ३१
लेसेप्स् ३०-३५
वजनकार्ड ४४
वरुणदेव १५-१६
वॉढम कॉलेज १८५
वाटर्लू पूल १५०-१, १६७
वारांगना १३१-२
वॉटरलो ९६, ९९
वॉल्थॅम १२९
विइल्यम-मेरी १४५, १६९
विजयस्तंभ-नेल्सन् १५२
विद्यापीठ १७८, १८२, १८४, १८९ १९१
विद्यापेठ १८९, १९७
विलायत-हवामान, ऋतु २३०-२४१ -पाण्याचा सुकाळ २३० -थंड हवा २३१ -बदलती हवा २३१-२ चार ऋतु २३३ दिवस रात्रमान२३३-५ -ग्रीष्म २३५ शिशिर २३५ -हिमतुषार२३७ -धुकें २३७-८ -बर्फ पडणें २३८-४० -काळें धुकें २३९ -सूर्य जयद्रथ २४०
वीज-पाळणा ४५ -बस २१२ -वाहनांचें नियमन २१२
विश्वदुकान १०४-५
वुइंडसर पॅलेस ८४
वुलसे १६८-६९, १९०
वेव्हर्ले स्टे. २१७-१८ -पायऱ्या २१८
वेस्टएन्ड ६१
वेस्ट मिन्स्टर अॅबे १५९-६० हॉल १६२-६३, पूल ६१, १६६, १७०, २४३ पार्लमेंट १५९ राजवाडा १६०-६१
व्हाइट लॉज ११५
व्हाइट हॉल १६० प्लेस २४३
व्हिक्टोरिया राणी १७० -स्टेशन ३९, १५८-५९ एम्बँकमेंट ९९,१६७ -पुतळा १५४ म्युझियम् १५८
शॅरबँक २०९, २४६
शाळिग्राम मि. ५०
शॉ २५४
शिवरात्र ४२, २०२, २१४
शूद्रक ७७
शेक्सपियर १६९, नाटकें २५२-५३
शेजचहा ४३, २०२, २१६
सदापानी २३६
सद्गुणद्वार २३६
सण-गायफॉक्सडे ९४ नऊ नव्हेंबर ९६-९९ आर्मिस्टिस डे१००-१०१ नाताळ १०२-१०८
समशीतोष्ण घर ११८

समानशासन ( measure for measure ) २५४
सर्पंटाइन् १५५
संपत श्री. ४३
सॉलिस्बरी क्रॅग्स् २२०
सॉमरसेट हॉउस १५०
सिडनेससेक्स कॉ. १९६
सिडन्हॅमहिल १२१
सिनाई २६
सिनेमा २४४
सिसिली ३५
सुएझ; आखात २६ कालवा २०,२८, २९–काम ३२-३४ बंदर २७-२९
सेल्फ्रिजेस् १०४
सेल्बी १८५,१९०
सेंट—कॅथरीनडॉक्स १६६—क्लीमंटस् चर्च १४९ जाइल्स्चर्च १८५ जॉन्स कॉ. १८६, १९९ –जेम्स-पॅलेस १५३ –जेम्सबाग १५२;—टॉमस् इस्पितळ १७१ पॅंक्रियस् ६६,९६ पॉल १४४–१४७,१५९, ६०,२४३ मार्टिन १५२ मेरी चर्च ८३,१८२ स्टीफन्स हॉल १६२–६३
स्कॉट वॉल्टर १०६,२२०,२२६,२२८
स्टड् ९६
स्टॅंड १४८
स्ट्रॅथॅम कॉमन ११३, १२७
स्फटिक प्रासाद १२०, १२२
स्मारक आगीचें १४१–महायुद्धाचें १८६ आल्बर्ट १५७, बोडेशिया १६८, नेल्सन् १४६,१५२,२२४; किचनेर १४६ वेलिंग्टन् १४६, व्हिक्टोरिया १५०, शिपायांचें १०० स्कॉटिश शिपायांचें २२३–स्कॉट-वॉल्टर २२४
स्वीस कॉटेज् ५१–२
हर्नहिल १०९
हर्टफर्ड कॉलेज १८५
हॅम्पटन कोर्ट ८४,१६६,१७८,१७३–७७ ग्रीनकोर्ट १७४ घड्याळ चौक १७४ वर्णन १७५–६ —चक्रव्यूह १७६.
हॅम्लेट २५३
हॅम्स्टेड हीथ १३४ स्टेशन १३४–गार्डन् १३५
हाइड्पार्क १५५–५६, २२६
हाउस–ऑस्ट्रेलियन १४९, बुश १५० इंडिया १५०, सामरसेट् १५० कार्ल्टन १५३, मार्लबरो १५३, लॅंकॅस्टर १५३
हायस्ट्रीट १९१
हार्ट ऑफ मिडलोथियन् ११६,२२०
हॉटेल–विलास मंदिर १५१, २५०
—सॅव्हाय्, सेसिल, चेरिंग क्रास १५१
—बर्डबोल्ट १९४, ९५, २०२
ऍंड्रुज २१४, २१६–१७

हॉर्निमन् बाग १२६, पदार्थसंग्रहालय
१२६
हॉल्–ऑलिंपिया २५२ किंग्जवे ८१
गिल्ड हॉल ९६, १००
हेग अर्ल २२३
हेनरी आठवा १६०, १६८–६९
होडी घरें ११५, १५५, १६९, १९[illegible]
पकटी १५५
होलीरूड २१५, २१८

REFBK-0005211
REFBK-0005211